19-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1


**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात एकही मंत्री उपस्थित नाहीत. आपल्याकडे वेळ कमी आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, सभागृहात मंत्री उपस्थित होईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 01 मिनिटांनी 5 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

--------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी याबाबत खुलासा करतो की, सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधी माझे रोष्टर होते, त्यानुसार मला सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक होते.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

**मु.शी** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, विक्रम काळे, मोहन जोशी, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, संजय दत्त, रमेश शेंडगे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. अमरसिंह पंडित, जयदेव गायकवाड, एम.एम.शेख, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अमर राजुरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, जयवंतराव जाधव, राम पंडागळे, प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ, मराठवाड्यात सुरुवातीला पाऊस पडल्यानंतर पेरणीला सुरुवात झाली, तथापि, पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळाची परिस्थिती, पावसा अभावी पिके करपल्यामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेले दुबार पेरणीचे संकट, त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा न होणे, अपुऱ्या पावसामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होणे, राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, विदर्भात 4 हजार 300 गावांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या संकटाला तोंड द्यावे लागणे, गुरांच्या चाऱ्याचा व त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला प्रश्न, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडणे, अशा दुष्काळी परिस्थितीत रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील विशेषत: विदर्भातील शेतकरी कुटुंबीयांसह स्थलांतरित होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात शेततळी निर्माण करण्याची तसेच अवर्षणप्रवण भागात जलसंधारणाच्या कामाला निधी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

उपलब्ध करुन देऊन गती देण्याची आवश्यकता, राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापि त्या महामंडळाला निधी देण्यात आलेला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी व जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्यासाठी व जलसंधारणाची मोठ्या प्रमाणात कामे सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या विषयावर सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये प्रस्ताव आणण्याचे ठरविले त्यावेळी या सभागृहातील विशेष्त: विदर्भ आणि मराठवाड्यातील माझ्या सहकाऱ्यांनी या बाबत त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून जे काही संकट उभे राहिले,

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

त्याबद्दल सभागृहामध्ये सविस्तर माहिती यावी, त्याबद्दल सविस्तर चर्चा व्हावी आणि त्या चर्चेची फलनिष्पत्ती म्हणून विदर्भ आणि मराठवाडयाला विशेष करुन मराठवाडयाला आणि पश्चिम महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाला एक निश्चितपणे पुढील आठ ते दहा महिन्यांच्या कालावधीसाठी काही तरी ठोस उपाय योजना करण्याची सुरुवात व्हावी. शासनाने त्याकडे अधिक गांभीर्याने पहावे. त्याबाबतची आपली भूमिका आम्हा सर्वांजवळ आपण सांगितली होती. त्यावेळी असा एक अंतर्गत प्रश्न विचारण्यात आला होता की, माझ्यासारखा लोकप्रतिनिधी ज्या भागातून निवडून येतो त्याचा आणि दुष्काळाचा, त्याचा आणि पाणी टंचाईचा संबंधच काय येतो? एका बाजूने विचार केला तर ही गोष्ट खरी आहे.

मुंबईमध्ये कायम वास्तव्य केल्यानंतर साधारणत: पावसाळा निम्म्यावर आला की, आमच्या सर्वांच्या नजरा तानसा, भातसा, मोडक सागर या तलावामध्ये किती पाणी साठा शिल्लक आहे याच्या छापून आलेल्या रोजच्या वर्तमानपत्रामधील बातम्याकडे वळतात. धरणातील पाण्याची पातळी किती वाढली हे पहात असतो. त्यावेळी महानगरपालिकेकडून 10 टक्के पाणी कपातची सूचना आल्यावर आमच्या जीवाची घालमेल सुरु होते. त्यानंतर एकदा तलाव पूर्णपणे भरुन वाहू लागल्याचे आपल्याला समजले की, आमच्यापुरती पाण्याची समस्या सुटली आहे. आता राज्यातील जनतेचे काय व्हायचे ते होवो. अशाप्रकारची एक वेगळी भूमिका मनामध्ये तयार होते की काय? अशाप्रकारची भूमिका तयार होणे ही बाब लोकप्रतिनिधी म्हणून अत्यंत वाईट आहे असे आपल्या लक्षात येते.

काही कामाच्या निमित्ताने मराठवाडयाच्या कुठल्यातरी भागामध्ये जात असतो. मी इतर ठिकाणी काम करीत असलो तरी नाटय परिषदेच्या ॲक्टिव्हिटीजसाठी बीडला रस्त्याने जात असतांना जी गावे लागतात तेव्हा गावाबाहेर उभे असलेले चारा डेपो आपल्या नजरेला पडतात, एखादा टँकर येऊन उभा असतो व त्याच्या भोवती पाण्यासाठी झुंबड उडाल्याचे दृश्य पहातो त्यावेळी कदाचित आम्ही परदेशातील असतो तर गाडीतून खाली उतरुन त्याचे फोटोग्राफ्स घेतले असते. महाराष्ट्राच्या या अवस्थेचे दृश्य परिणाम मनावर कोरले जातात आणि मग मराठवाडयातील, विदर्भातील, पश्चिम महाराष्ट्रातील तहानलेल्या लोकांबद्दल एक आपुलकीचे नाते निर्माण करावयाचे असेल तर कुठेतरी त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आपण काही करु शकतो का? हा विचार जेव्हा मनामध्ये येतो त्यावेळी निश्चितपणे आमच्या सर्वांच्या संवेदनांची नाळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

तुमच्या वेदनेशी निश्चितपणे जोडली आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे बघत असतांना आम्ही त्यामध्ये तितकेच सहभागी होण्यास तयार आहोत. किंबहुना, याकरिता वेगवेगळया माध्यमातून,
वेगवेगळया पातळीवर जे जे प्रयत्न होणार असतील तर त्यामध्ये आमचा सहभाग घ्यावयास निश्चित आवडेल.

वेळप्रसंगी एखाद्या संकटाच्या वेळी आपली स्वेच्छा म्हणून आमदार म्हणून आपल्याला मिळणारा मेहनताना, भत्ते असतात ते या कामासाठी आम्ही देतो या बाबत मला असे सांगावेसे वाटते की, यापुढील सात ते आठ महिन्यांच्या काळासाठी या सर्व योजनांसाठी मराठवाडा, विदर्भ किंवा पश्चिम महाराष्ट्रातील एखाद्या तालुक्याला नव्हे तर एखाद्या तालुक्यातील छोटयाशा वस्तीला गावाला पाण्याची सोय करुन देण्यासाठी तुमचे मानधन तुम्ही वापरा असे निश्चित करुन दिले तर आम्ही सर्व जण त्याला मान्यता देऊ. आमचा निधी ठराविक गावासाठी, नेमून दिलेल्या गावातील पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी देण्याबाबत आम्ही निश्चितपणे तयारी करु. त्या प्रमाणे या प्रश्नामध्ये खारीचा का होईना एक वाटा आम्हाला उचलावयास मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये मराठवाडा आणि विदर्भामध्ये पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. धरणामधील मृत पाण्याचा साठा सुध्दा नाही, धरणे कोरडी ठाक पडलेली आहेत, विहिरींमध्ये सुध्दा पाणी नाही, पाण्याचे पाझर सुध्दा अदृश्य झाले आहेत. या छोटया छोटया गावातील सामान्य माणसे पाण्यावाचून तडफडत आहेत. शेतकऱ्याची शेती शिल्लक राहिलेली नसल्यामुळे जनावरे कशी जगवायची असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पुढील सहा ते सात महिन्यांच्या काळाबाबत मी माहिती घेत असतांना नेमेचि येतो मग पावसाळा असे म्हटल्यानंतर जून महिन्यामध्ये पाऊस सुरु झाला पाहिजे. परंतु काही वर्षाचा अनुभव असा की, जून मध्ये पाऊस पडणे हे कदाचित एखाद्या बोर्डावर राहिले असेल. उशिरा पावसाळा सुरु झाल्यानंतर तो पुढे लांबला जातो. यासंबधी नियोजन करीत असतांना जानेवारी महिन्यापासून 15 ऑगस्टपर्यंतचा कालावधी या करिता आपण नजरेसमोर ठेवण्याची आवश्यकता आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दुष्काळाच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा सुरु असल्यामुळे या चर्चेकरिता तीन मंत्र्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. प्रामुख्याने जलसंपदा, कृषी व महसूल मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत काय?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्याकडे कृषी, जलसंधारण व रोजगार हमी योजना हे विभाग आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या चर्चेच्या वेळी महसूल मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. माननीय सदस्य श्री. हेमंत टकले या ठिकाणी मांडीत असलेले मुद्दे महसूल मंत्र्यांशी संबंधित आहेत. या करिता आपण या चर्चेचा सन्मान केला पाहिजे. या चर्चेला उत्तर कुणी द्यावयाचे हा प्रश्न नाही. परंतु या सरकारने शेतकऱ्यांचा सन्मान केला पाहिजे. आमच्या चर्चेला आपण महत्व देऊ नका परंतु किमान जे वंचित शेतकरी आहेत त्यांच्या संदर्भात सुरु असलेल्या चर्चेचा सन्मान करण्यासाठी संबंधित मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. त्याप्रमाणे माननीय राज्यमंत्र्यांनी संबंधित मंत्र्यांना सांगावे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझ्या पुढील भाषणामध्ये मी सर्व खात्यांचा उल्लेख करणार आहे. आपण पुढील सात ते आठ महिन्यांसाठी कशा प्रकारचे नियोजन करावयाचे याचा विचार करीत असतांना हे नैसर्गिक चक्र बदलत चालले आहे. आता या निर्माण झालेल्या परिस्थितीला आपण तोंड देऊ. कदाचित असेच काहीतरी विपरीत पुढील वर्षी घडले आणि पुढील वर्षी पावसाने ओढ दिली तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे. ही अस्वस्थ करणारी परिस्थिती आहे. शासनकर्त्यासमोर आणि लोकप्रतिनिधींसमोर फार मोठे आव्हान आहे. या आव्हानाच्या वेळी शासनकर्त्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी सातत्याने सामान्य लोकांबरोबर राहण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न केवळ मंत्रालयामध्ये बसून सुटण्यासारखा नाही. ज्या लोकांसाठी आपण काहीतरी करीत आहोत, त्यांच्याबरोबर प्रत्यक्षपणे जाणे या पुढील काळात आवश्यक होणार आहे.

मला निश्चितपणे माहीत आहे की, पाण्याचा प्रश्न एवढया मोठया प्रमाणात भेडसावायला लागल्यानंतर स्थानिक राजकारणातील हेवेदावे, गटतट असतात त्या सर्वांच्या पलीकडे केवळ मानवतेच्या भावनेतून आपण सर्व एक आहोत ही भूमिका या पुढील काळात आपल्याला स्वीकारावी लागेल. अशाप्रकारच्या संकटाशी सामना करण्यासाठी दीर्घकालीन योजना तयार करण्याची आवश्यकता आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे प्राधान्याने या पुढील सात ते आठ महिन्यांच्या कालावधीत आपण सर्वजण काय करणार आहोत हा एक महत्वाचा प्रश्न आहे. या करिता सात ते आठ महिन्यांचे वेळा पत्रक निश्चितपणे आखण्याची गरज निर्माण झाली आहे. आज आपण पहातो की, असंख्य खेडयांना आणि गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. राज्यातील ज्या

तालुक्यांमध्ये अजिबात पाण्याचा साठा नाही त्या तालुक्यामधील छोटया खेडेगावामध्ये, वस्तीमध्ये टँकरने पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचा कोटा ठरवून द्यावा लागेल. त्याकरिता पाणी मापनाची पध्दत, कोष्टक निश्चितपणे ठरविता येईल. या करिता एक गाव निवडावे त्या ठिकाणी किती वस्ती आहे, किती घरे आहेत, किती माणसे आहेत हे पाहून त्याकरिता कोटा निश्चित केला तर तेवढे पाणी पुरवठयाचे वेळा पत्रक आपल्याला करुन द्यावे लागेल.

टँकरच्या बाबतीत बऱ्याच सुरस आणि चमत्कारिक गोष्टी वर्तमानत्रामधून सातत्याने छापून येत असतात. हे टँकर बऱ्याचदा दुरुस्त झालेले नसतात, नादुरुस्त असलेले टँकर त्या गावामध्ये नियमितपणे जात नाहीत. या बाबत सरकारने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. यामध्ये दुसरी गोष्ट अशी की, एखाद्या गावाला टँकर पोहोचल्यानंतर त्या गावामध्ये राजकारणी असतील किंवा ज्यांचा गावामध्ये दबदबा असेल, अशा व्यक्तींचा विशेष बोलबाला असतो अशावेळी जबरदस्तीने त्या गावाला मिळणाऱ्या पाण्याचा मोठा भार स्वत:कडे खेचण्याचा ते प्रयत्न करतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

दुर्बल लोकांना मात्र पाण्यापासून वंचित रहावे लागते. यासाठी पाणी वाटपाचे समान तत्व अंमलात आणले पाहिजे. टँकरव्दारे मिळण्याऱ्या पाण्याच्या गुणवत्तेबद्दल सतर्कता बाळगण्याची गरज आहे. छोट्या गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी उकळून घ्यावे असे सांगण्यासाठी एक अभियान सुरु करावे लागेल. तसेच याबाबतीत गावांमध्ये, शाळांमध्ये दूषित पाण्याच्या बाबतीत सातत्याने जनजागरणाचा कार्यक्रम करता येईल. जर गावांना दूषित पाण्याचा पुरवठा झाला तर त्यानंतर असंख्य साथीच्या रोगांचा फैलाव होण्याची भीती असते. म्हणून प्राथमिक टप्प्यावरच ही काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे पाण्याचे टँकर भरल्यानंतर त्यामध्येच क्लोरीन किंवा तुरटी यासारख्या प्रतिबंधक औषधांचा वापर देखील सुरुवातीपासून केला पाहिजे. ज्याप्रमाणे फर्स्ट एड कीट असते, तशा प्रकारे पाण्याच्या शुध्दतेसाठी कीट देता येईल का? याचा देखील विचार केला पाहिजे. 8-9 महिन्यांसाठी पाण्याचे नियोजन केले आहे. त्यासाठी जेथे पाण्याचे साठे आहेत तेथून टंचाईच्या भागामध्ये पाणी न्यावे लागेल आणि मग तेथे शेततळी आणि साठवण टाक्या बांधण्याची गरज आहे. आपण नियोजन करताना फार मोठ्या प्रमाणात करतो आणि ते वेळेमध्ये पूर्ण होणे शक्य नसते. परंतु आपण जर तात्पुरत्या स्वरुपामध्ये पाण्याच्या टाक्या केल्या तर त्याचा उपयोग पाणी साठविण्यासाठी होईल. शेततळी बांधावयास पाहिजेत. मात्र नंतरच्या काळामध्ये उन्हाळ्याची तीव्रता वाढत जाते तेव्हा बाष्पीभवनाने पाणी वाया जाणार नाही यासाठी त्यावर प्लॅस्टीकचे आवरण घातले पाहिजे.

सभापती महोदय, यामध्ये महत्वाचा प्रश्न असा आहे की, मुळातच पाणी कमी आहे, त्यामुळे मोजून पाणी देण्यात येणार आहे. अशा वेळी पाणी वाटपाच्या संबंधात सोसायट्या स्थापन करण्याचा कार्यक्रम हाती घ्यावयास पाहिजे. यासाठी कायम स्वरुपामध्ये ज्या काही गोष्टी करावयाच्या आहेत त्यासाठी जनसुधार कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली पाहिजे आणि त्यासाठी लोकांना प्रवृत्त करण्याची गरज आहे. आपल्याकडे 2010 पर्यंत 12,000 पाणी वाटप सोसायट्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. मात्र आजपर्यंत प्रत्यक्षात अत्यंत अल्प स्वरुपात यश मिळालेले आहे. मला याठिकाणी उल्लेख केला पाहिजे की, नाशिक येथे ओझरच्या परिसरात समाज परिवर्तन केंद्रा तर्फे 45 पाणी वाटप सोसायट्या कार्यरत आहेत. आज जेथे हे संकट उद्भवले आहे तेथील अधिकाऱ्यांनी सदरहू प्रकल्पांना आवर्जून भेट द्यावयास पाहिजे.पाण्याचे वाटप

श्री.हेमंत टकले . . . .

मोजून केल्यानंतर त्याचा वापर काटकसरीने आणि योग्य प्रकारे होऊ शकतो हे निश्चितपणे दिसून येईल. शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान वेळेवर मिळावयास पाहिजे. अजूनही ठिबक, तुषार आणि सूक्ष्म सिंचनाच्या बाबतीत जी.आर.निघालेला नसल्याने याबाबत अंमलबजावणी होत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर तसे झाले नसेल तर याबाबत तातडतोब कार्यवाही करावी लागेल. संबंधित विभागाने याकडे लक्ष दिले पाहिजे. आज राज्यासमोर पाणी टंचाईच्या बाबतीत असाधारण परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे दीर्घकालीन आणि आता सुरु करावयाच्या योजनांबाबत गंभीरपणे विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मला याठिकाणी पाणलोट विकास कार्यक्रमासंबंधी निश्चितपणे बोलावेसे वाटते. देशाचे एकूण चित्र पाहिले तर सिंचनाखाली येणारी जमीन 40 टक्के असून पडणाऱ्या पावसाचा थेंब अन् थेंब साठविणे, अडविणे आणि मुरवणे, भू-गर्भातील पाण्याची पातळी वाढविणे आणि गरजेप्रमाणे आवश्यक असेल तेवढ्याच पाण्याचा वापर करणे अगत्याचे झाले आहे. पाणलोट विकासाचे काम निव्वळ शासकीय अधिकाऱ्यांमार्फत कधीच होणार नाही. त्यामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करावयास हवी. राज्यातील आज असलेली सिंचनाची टक्केवारी 18 टक्क्याच्या आसपास आहे आणि ती 26 टक्क्याच्या पुढे जाऊ शकणार नाही असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. राज्यात 160 लाख हेक्टर एवढी जमीन कायम कोरडवाहू रहाणार आहे. त्यासाठी पाणलोट विकास कार्यक्रम करणे आवश्यक आहे. दुष्काळाचा प्रतिकार करु शकतील अशा पिकांच्या जाती विकसित करण्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. यासाठी राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांनी त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रामध्ये नवीन जाती शोधून त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत. तसेच सामूहिक पाणी वाटप सामूहिक शिस्तीने व्हावयास पाहिजे आणि पुढच्या काळामध्ये या कार्यक्रमाची एक कायम स्वरुपी चळवळ उभी राहिली पाहिजे.

सभापती महोदय, एका महत्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणे मला महत्वाचे वाटते. ग्रामीण आणि नागरी जीवनातील पाण्याचा समन्वय करणारी रचना ही भविष्य काळाकरता महत्वाची ठरणार आहे. आज शहरीकरण वाढत आहे.नागरी वस्तीला प्रचंड पाणी मिळत असल्याने ग्रामीण भागावर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होत आहे. म्हणूनच सांडपाण्यावर उत्तम तऱ्हेने प्रक्रिया केल्यानंतर त्याचा पुन्हा वापर करता येऊ शकतो. त्यामुळे शहरी भागातील सर्व सांडपाण्यावर ...

. . . .सी-3

श्री.हेमंत टकले . . . .

प्रक्रिया केल्यावर ते पाणी पुन्हा एकदा रि-सायकलिंग करुन कसे उपयोगात आणता येईल याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. आपण याकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे. आडगाव असेल, राळेगणसिध्दी असेल, कडवंची असेल किंवा दरेवाडी असेल येथील ग्रामीण नेतृत्वाने कौशल्याने सदरहू गावातील प्रश्न सोडविले आहेत. ही कदाचित आपल्या राज्यासाठी मॉडेल ठरणारी गावे आहेत. सिंचन व्यवस्थेच्या मुळाशी समाजामध्ये रुढ होत जाणारा पाण्याच्या एकत्रित आणि सामूहिक यंत्रणेच्या कार्यपध्दतीचा आधार रहाणार आहे. याठिकाणी संपूर्ण गावाने एकत्रितपणे सगळयांची शेती किती, पिके किती, त्यासाठी किती पाणी लागते या सगळ्याचा एकत्रितपणे विचार केला पाहिजे. वेगवेगळया ऋतूमध्ये आपल्याला जे पाणी वापरावयाचे आहे त्याचे नियमन केले पाहिजे आणि पाण्याचा हिशोब देखील ठेवला पाहिजे. नाहीतर काही पिकांना अवाजवी प्राधान्य दिले जाते त्यामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत जाते त्याला आवर घालावा लागेल. लोकसमुहामध्ये एकमेकांवर व्यावहारिक देखरेख आणि नैतिक दबाव ठेवण्याची आवश्यकता आहे. या गोष्टी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगून होणार नाहीत तर कोणती पिके घ्यावयाची आहे, कोणत्या ऋतूमध्ये किती पाणी लागणार आहे यासाठी संपूर्ण गावाचा निर्णय व्हावयास पाहिजे.

सभापती महोदय, आपण शिरपूर पॅटर्नबाबत देखील निश्चितपणे माहिती घेतली पाहिजे. जेव्हा पावसाचे पाणी उपलब्ध होते तेव्हा ते योग्य पध्दतीने अडविले, साठविले आणि त्यावर लहान बंधारे बांधले तर त्यामधून पाणी साठा करता येतो. जेव्हा आपण समोर आलेल्या संकटाचा सामना करीत आहोत त्यावेळी भविष्यामध्ये असा प्रसंग येऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक कार्यक्रम देखील राबवावयास पाहिजे. अशा वेळी भू-स्तर रचनेचा, त्यांच्या गुणधर्माचा अभ्यास करणेही आवश्यक आहे. पीक कोणते घ्यावयाचे, आपल्या जमिनीचा स्तर काय आहे, जमिनीमध्ये किती पाणी मुरते आणि किती शिल्लक रहाते याची पाहणी करुन याची पाहणी करुन या पाणी संकटाच्या निमित्ताने जमिनीच्या मातीचा अभ्यास पुन्हा एकदा नव्याने करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आणखी एका महत्वपूर्ण कार्यक्रमाचा मला उल्लेख करावासा वाटतो. सातारा येथील माण आणि खटाव तालुक्याच्या हद्दीतील निढळ गावाचा आहे.आपण याकडे उदाहरण म्हणून पाहू या. हे गाव 2000 हेक्टर शिवाराचे आहे. या गावामध्ये लागोपाठ तीन-तीन वर्षे पाण्याचे टँकर येत आहेत. तेथील एकाही विहिरीमध्ये पाण्याचा थेंब शिल्लक नव्हता. या छोट्या गावामध्ये ओढ्यांवर सिमेंटचे 30 बंधारे बांधले. या सर्व बंधाऱ्यातून साडेचौदा कि.मी.लांबीचा वॉटर



APR/KTG/ 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

कॅनॉल उभा राहिला. या निढळ इंडो जर्मन वॉटर शेड विकास कामासाठी आतापर्यंत 1 कोटी 40 लाख रुपये लागले आहेत. त्याठिकाणी पाणलोट विकास कार्यक्रमामुळे तेथील संपूर्ण गावाचा काया पालट झाला आहे.अशा प्रकारे जेव्हा दुष्काळाचा सामना करण्यासाठी आपण मायक्रो प्लॅनिंग करतो, एखादी भव्य-दिव्य योजना करतो आणि त्यासाठी 100 कोटी, 200 कोटी रुपये देऊन मग त्याचे वाटप करावयाचे असे न करता पायथ्यापासून माथ्यापर्यंत प्रत्येक गावाचा वेगळा विचार, प्रत्येक गावाची भौगोलिक रचना, प्रत्येक गावातील शेती, प्रत्येक गावातील शेतीतून मिळणारी पिके, त्यासाठी शेतकऱ्यांना लागणारे पाणी या सगळयाचे नियोजन केले तर त्यामधूनच आपल्याला प्रत्येक गावासाठी पाण्याचा किती कोटा असेल हे ठरविता येईल.

सभापती महोदय, याठिक्‍ाणी पाणलोट विकासाबद्दल देशाच्या माजी अर्थमंत्र्यांनी आणि महाराष्ट्राचे सुपूत्र कै.सी.डी.देशमुख यांनी फार पूर्वी विचार मांडले होते की, भू-विनाश किंवा जमिनीची धूप होण्याचे मुख्य कारण म्हणजे जमिनीचा दुरुपयोग किंवा चुकीचा उपयोग हे आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

जमीन योग्य पध्दतीने वापरली पाहिजे. त्याकरिता माणसाने निसर्गाला फक्त सहाय्य केले पाहिजे. त्याच्या विरोधात जाता कामा नये. हे एक बेसिक तत्व आहे. आपण सरकार म्हणून ज्या ज्या गोष्टी करतो त्यावेळेला निसर्गाच्या विरोधात ज्या काही गोष्टी असतील त्याला पायबंद घालण्याची जबाबदारी आपल्यावर निश्चितपणे येऊन पडते. जवळपास 123 तालुक्यात आज दुष्काळाची स्थिती आहे. 70 तालुक्यांमध्ये तर ही झळ तीव्रपणे जाणवते. सर्व मराठवाडा आज तहानलेला आहे. दुष्काळी महामंडळ अशा गोंडस नावाचे महामंडळ सरकारने बनविले आहे, असे कानावर येते. ते नक्की काय करीत आहे या प्रश्नाचे उत्तर आपल्याला द्यावे लागेल. काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत ते महामंडळ स्थापनच झालेले नाही. त्या बाबतीत जी घोषणा झाली त्या घोषणेचे पुढे काय झाले हे माहीत नाही.

महाराष्ट्रात सांगली साताऱ्यापासून मराठवाड्याच्या शेवटच्या टोकापर्यंत तसेच विदर्भातील काही भागामध्ये पाण्याचे आणि दुष्काळाचे संकट आलेले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी आता निचांकावर आहे. कितीही खोल गेलो तरी पाणी लागत नाही. सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त 42 गावांनी महाराष्ट्र सरकारला इशारा दिला होता की, आम्हाला पाणी द्या नाही तर आम्ही कर्नाटक राज्यात जातो. ज्या गावांना पाणी नाही त्या गावातील शेतकऱ्यांचा हा संताप आहे. त्याकडे जर आपण वेळीच लक्ष दिले नाही तर या सर्व बोलण्यामध्ये काही अर्थ उरणार नाही. या दुष्काळात कदाचित या वर्षी अन्नधान्याचा प्रश्न तेवढा गंभीर असणार नाही, अन्नधान्याचा पुरवठा होऊ शकेल परंतु तीव्र पाणी टंचाईला मात्र निश्चितपणे तोंड द्यावे लागणार आहे. टँकर लॉबी नावाची काही तरी लॉबी आहे. मी त्यांना माफिया म्हणण्याचे कारण नाही परंतु ही एक लॉबी आहे हे आपल्याला नाकारुन चालणार नाही. या सर्व लॉबीचा एक पगडा या व्यवस्थेवर निर्माण झालेला आहे. त्यामुळे जशी मागणी वाढेल तसे टँकर वाढविण्याची मागणी होते आणि मग लोकप्रतिनिधी सुध्दा टँकर वाढविण्याची मागणी करण्यासाठी पुढे येत आहेत. पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. आपण सर्वजण निसर्गाबद्दल अत्यंत बेजबाबदार आहोत, ही शोकांतिका आहे. आपण निसर्गाची हानी करीत आहोत. खरे तर आजच्या या संकटाच्या काळात शासनाने 'जल, जंगल आणि जमीन वाचवा' असा नवीन मूलमंत्र अंगीकारला पाहिजे आणि अशा पध्दतीचे एक मोठे अभियान घ्यावे लागणार आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. हेमंत टकले .....

सभापती महोदय, राज्यामध्ये अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली, एखादे संकट आले, महापूर आला, मोठ्या प्रमाणवर नागरी वस्त्यांचे नुकसान झाले तर त्यासाठी डिझॉस्टर मॅनेजमेंट सेल म्हणजे आपतकालीन व्यवस्थापन कक्ष निर्माण केलेला आहे. मला असे वाटते की, मराठवाड्यात आणि विदर्भातील काही भागात तसेच पश्चिम महाराष्ट्रात आज निर्माण झालेली परिस्थिती ही डिझ ाास्टर मॅनेजमेंट सारखीच आहे. मघाशी विरोधी पक्षाकडून जे सांगण्यात आले त्याप्रमाणे यामध्ये सर्वच खात्यांचा संबंध आहे. जलसंपदा, महसूल, पाणीपुरवठा, आरोग्य, गृह अशा अनेक खात्यांनी एकत्रित काम करण्याची आवश्यकता आहे. मला तर असे वाटते की, मराठवाड्यासाठी या सर्व कामावर देखरेख करण्यासाठी एक कंट्रोल रुमची आवश्यकता आहे. त्या कंट्रोल रुमला एक सक्षम अधिकारी दिला पाहिजे. अधिकारी म्हणजे ज्याला अधिकार दिले जातात असा अधिकारी असला पाहिजे. नाही तर प्रत्येक वेळेला त्याने वर फोन करावयाचा आणि सांगावयाचे की मला अधिकारच नाहीत, असे होता कामा नये. या बाबतीत तशी यंत्रणा निर्माण करण्यासाठी एक कंट्रोल रुम ताबडतोबीने मराठवाड्यात निर्माण केली पाहिजे.

दुसरी महत्वाची बाब अशी की, ज्यावेळी आम्ही ही चर्चा उपस्थित करतो त्यावेळी संबंधित खात्याचे सर्व मंत्री या ठिकाणी उपस्थित राहावेत असे आम्हालाही मनापासून वाटते. कारण अनेक विषय उपस्थित होतात. कॅबिनेट मंत्री असतात. राज्यमंत्र्यांना फक्त सह्यांचे अधिकार असतात असे म्हटले जाते पण मी या गोष्टीवर विश्वास ठेवत नाही. आपला ताळमेळ अतिशय चांगला असला पाहिजे. पालक सचिव नेमण्याची जी बाब आहे ती म्हणजे मला अगदी पालकची भाजी खाल्यासारखी वाटते. मला त्यामध्ये काहीही अर्थ वाटत नाही. आपले एकूण मंत्रिमंडळ लक्षात घेता, हा सगळा दुष्काळी भाग आणि तालुके लक्षात घेता आपल्यापैकी कॅबिनेट मंत्र्यांनी त्या तालुक्यांचा गट या पुढच्या काळात हाताशी घ्यावा अशी संकल्पना का करु नये ? आपण त्या ठिकाणी सातत्याने जाणे आवश्यक आहे. सर्वांनी त्या ठिकाणी फिरत राहिले तरच लोकांच्या मनामध्ये विश्वास निर्माण करता येईल. आपण ते करावयास पाहिजे. आज टँकरने पाणी जात आहे पण परिस्थिती आणखी विपरित झाली तर कदाचित रेल्वेच्या वॅगन्सने सुध्दा मराठवाड्यामध्ये पाणी न्यावे लागेल. ठिकठिकाणी त्या पाण्याचे वितरण करावे लागेल. हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. हेमंत टकले .....

सभापती महोदय, 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दिवशी गावांच्या ज्या आमसभा होतात त्या लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत होतात. आताचे पाणी संकट असे आहे की, या आमसभा आता दर महिन्याला घेण्याची आवश्यकता आहे. काय झाले आणि काय केले पाहिजे या सर्व बाबतीमध्ये आपल्याला निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. तात्पुरत्या योजना, पुढच्या योजना आणि ज्या दीर्घकालीन योजना करावयाच्या असतील या सर्वांचा आपण एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवावे लागेल. यामध्ये अनेक तज्ज्ञ लोकांचे सहाय्य घ्यावे लागेल. ज्यांनी गावोगावी जे अनेक वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत त्यांचे मार्गदर्शन घ्यावे लागेल.

श्री. माधव चितळे यांची आता एसआयटीच्या प्रमुखपदी नियुक्ती झाल्यामुळे आपण त्यांचा सल्ला घेणार की नाही हे मला माहीत नाही पण श्री. माधवराव चितळे, श्री. विजय बोराळे, धनंजय मोवाडकर, सुरेख खालापूरकर, चंद्रकांत दळवी, डॉ. अविनाश पोळ, डॉ. मोरे, डॉ. शंकरराव मगर असतील या सर्वांचा एकत्रित उपयोग कसा करावयाचा याचा विचार केला पाहिजे. आज केंद्रामध्ये असलेले आपले कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांचा या विषयातील अभ्यास, त्यांची या विषयातील संशोधकांशी केलेली जवळीक आणि त्या निमित्ताने त्यांनी तयार केलेले कार्यक्रम याचाही उपयोग करता येईल. मी जेव्हा आजच्या भाषणासाठी या संदर्भातील कात्रणे बघत होतो तेव्हा मागे राज्याने दुष्काळाचा सामना करण्यासाठी काही निधी मागितला होता आणि केंद्राने 167 कोटी रुपयांचा निधी दिला. आपल्या या ज्या सर्व यंत्रणा आहेत त्यामध्ये निश्चितपणे गाव पातळीपासून पाण्याची योजना करताना त्यासाठी किती निधी लागणार आहे, तो निधी कशा प्रकारे उपलब्ध होणार आहे, स्वयंसेवी संस्थांमार्फत काही निधीची भर पडू शकते का या सर्व गोष्टींचा आपण साकल्याने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या किमान निम्म्या भागामध्ये आज हे संकट आलेले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी, या संकटाला सामोरे जाताना आपण सर्वांनी एक गोष्ट निश्चितपणे लक्षात ठेवली पाहिजे की, आपल्या घरात हे घडत नाही ना मग दुसऱ्याच्या घरात काय होत असेल ते होवो अशी एक त्रयस्थ प्रवृत्ती उर्वरित महाराष्ट्रामध्ये शिल्लक राहता कामा नये.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातील आणि विदर्भातील दुष्काळासंबंधी गंभीर चर्चा सुरु असताना संबंधित खात्याचे कोणीही मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. आम्ही कशासाठी या ठिकाणी चर्चा करावयाची ? इतका गंभीर विषय असताना, मराठवाड्यामध्ये आणि विदर्भामध्ये पाणी टंचाई असताना संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर आम्ही या ठिकाणी चर्चा करणार नाही. कारण असे असेल तर या सभागृहात चर्चा करण्याला काही अर्थ नाही. काल सुध्दा असेच झाले. पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते. आज या ठिकाणी दुष्काळी परिस्थितीवर गंभीर चर्चा होत आहे. यामध्ये विदर्भाचा प्रश्न आहे, मराठवाड्याचा प्रश्न आहे, पश्चिम महाराष्ट्राचा प्रश्न आहे. या ठिकाणी संबंधित खात्याचे कोणीही मंत्री उपस्थित नसतील तर सभागृहाचे कामकाज बंद करावे. संबंधित मंत्री सभागृहात येईपर्यंत चर्चा करु नये अशी आमची मागणी आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला आमचे समर्थन आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की, दुष्काळी प्रश्नासाठी महामंडळ आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो यासाठी सुसंगत आहे की, राज्य शासनाच्या वतीने वस्तुस्थितीवर आधारित काय परिस्थिती आहे याची जबाबदारी घेणारेच जर कोणी मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर अशा पध्दतीने पुढे चर्चा होऊ शकत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

यासंबंधी खुलासा झाला पाहिजे. त्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये चर्चा सुरु असताना उपस्थित राहाणे आवश्यक आहे.

श्री. विनोद तावडे : या प्रस्तावावरील चर्चेचा सुरुवात झाल्यानंतर हा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला होता. आमची अशी अपेक्षा होती की, संबंधित खात्याचे महसूल मंत्री सभागृहामध्ये येतील. कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये हजर राहू शकत नसतील तर राज्यमंत्र्यांनी तरी सभागृहामध्ये उपसिथत राहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे भाषण सुरु होऊन 30 मिनिटे झाली तरी संबंधित खात्यापैकी एकाही खात्याचे मंत्रीमहोदय सभागृहामध्ये उपस्थित झ ालेले नाहीत. राज्यातील गंभीर प्रश्नाबाबत शासनामध्ये इतकी उदासीनता असेल तर या ठिकाणी बोलण्यात काय अर्थ आहे. आम्ही या ठिकाणी केवळ बोलण्यासाठी नाही तर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी येतो.

डॉ. पतंगराव कदम : विधानसभेमध्ये देखील या प्रश्नावर चर्चा चालू आहे. या गंभीर प्रश्नावर काय काय उपाययोजना करायच्या यासंबंधीची बैठक चालू होती आणि त्या बैठकीतून मी आता येत आहे.

श्री. विनोद तावडे : या सरकारमधील सर्व मान्यवर तहान लागली की विहीर खोदतात. आपण स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी एकदा असे विचारले होते की 9 नक्षत्रे नसतील तर काय उरेल ? कुणालाही या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. एका शेतक-याने सांगितले की, 9 नक्षत्रे नसतील तर शून्य उरेल. कारण पाऊस पडला नाही तर काहीच उगवणार नाही. या दुष्काळाच्या गंभीर प्रश्नावर चर्चा सुरु होत असताना माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित राहात नसतील तर त्यामधून शासनाची उदासीनता दिसून येते.

श्री.रामदास कदम : या सभागृहामध्ये महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना संबंधित खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नसतात असे ब-याच वेळा घडते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय मंत्री महोदयांनी चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. राज्यातील कोकणावर, विदर्भावर, मराठवाड्यावर सातत्याने अन्याय होत आहे. हा अन्याय किती सहन करायचा. एखाद्या प्रस्तावावर चर्चा सुरु असताना संबंधित खात्याच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित राहावे अशा त्यांना सूचना द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदय, सभागृहामध्ये हजर झाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रस्ताव चर्चेला घेतल्यानंतर या सभागृहातील माननीय मंत्री महोदयांची उपस्थिती हा खरोखरच गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. जेव्हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाकडून राज्यातील महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा उपस्थित केली जाते त्यावेळी संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित राहाणे आवश्यक आहे. मग हे अधिवेशन उपचार केल्यासारखे करणार काय ? पुरवणी मागण्यावरील चर्चा असेल, अन्य विषयावरील चर्चा असेल त्यावेळी, झाले झाले म्हणायचे, "होय"चे एकमत "होय"चे एकमत म्हणायचे आणि परत जायचे अशा प्रकारची प्रवृत्ती राज्यातील दुष्काळाच्या बाबतीत दिसत असेल तर मला या ठिकाणी माझी नाराजी स्पष्टपणे नोंदविण्याची गरज वाटते. या चर्चेसाठी भरपूर वेळ दिला पाहिजे. समस्या मोठी आहे. लोकप्रतिनिधींच्या भावना तीव्र आहेत. त्यांना त्यांच्या भावना या सभागृहामध्ये मांडता आल्या पाहिजेत.

सभापती महोदय, राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या गांभीर्याबाबत मला जे काही म्हणावयाचे होते ते मी माझ्या प्रस्तावाच्या रुपाने सभागृहासमोर सादर केलेले आहे. या संदर्भात ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतील किंवा जो काही कृती कार्यक्रम या निमित्ताने जाहीर करावयाचा असेल तो हे नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी शासना मार्फत जाहीर करण्यात यावा. या दुष्काळाचा सामना करण्यासाठी एक्सवायझेड कोटीचे पॅकेज आम्ही जाहीर करतो असे जर सांगितले जाणार असेल तर त्या पॅकेजशी आम्हाला काही देणे घेणे नाही. तहानलेल्या माणसाला पाणी देणे ही राज्याची संस्कृती आहे असे केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी एका ठिकाणी जाहीर केले होते. आज आपण पहात आहोत की, मराठवाड्यासाठी सोडलेल्या पाण्याबद्दल काही जिल्ह्यामध्ये त्या पाण्याचा प्राथम्यक्रम बदलून शेतीला पाणी देण्यासंबंधीचा संघर्ष उभा आहे. स्थानिक पातळी वरील सर्व राजकीय पक्षाचे नेते जिल्ह्याचा प्रश्न म्हटल्यानंतर एकवटून पुढे येतात. ही भूमिका पुढच्या काळात बाजूला करावी लागेल. आज जो

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे तो महाराष्ट्रातील एका जिल्ह्याचा प्रश्न नाही. या महाराष्ट्रामध्ये राहाणा-या प्रत्येकाला, खेड्यापाड्यात आणि वस्त्यांवर राहाणा-या शेवटच्या प्रत्येक घटकाला, तहानलेल्या माणसाला पाणी देण्यासाठी आपण काय करणार आहोत या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयानी या प्रस्तावाच्या रुपाने या सभागृहाला द्यावे अशी विनंती करतो आणि मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 11:40

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावरील चर्चेसाठी वेळ वाढविण्यात यावी अशी माझी विनंती आहे. मराठवाड्याच्या प्रश्नासाठी स्वतंत्र प्रस्ताव द्यावा की काय असे वाटू लागले आहे.

श्री. दिवाकर रावते : हा दुष्काळी भागाचा प्रश्न आहे. या दुष्काळाची झळ महाराष्ट्रात मराठवाड्याला सर्वात जास्त बसलेली आहे. त्यामुळे थोडे डावे उजवे करुन मराठवाड्यातील लोकप्रतिनिधीना बोलण्याची संधी दिली तर बरे होईल.

श्री. अमरसिंह पंडित : आपण लक्षवेधी पुढे ढकलून चर्चेसाठी अधिक वेळ द्यावा.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर बोलू इच्छिणा-या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. आता सन्माननीय विरोधी पक्षनेते आपले भाषण सुरु करतील.

...नंतर श्री गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळा संबंधी सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. आम्ही काल याच विषयाच्या अनुषंगाने नियम 289 चा प्रस्ताव दिला होता. परंतु या बाबतीत माननीय सभापती महोदयांनी असे सांगितले की, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून दुष्काळासंबधीचा प्रस्ताव मांडण्यात येईल, त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची संधी मी निश्चितपणे उपलब्ध करुन देईल. माझी फक्त या निमित्ताने विनंती आहे की, या प्रस्तावावर चर्चेसाठी सत्ताधारी पक्षास जेवढा वेळ दिला जाईल, तेवढाच वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांनाही देण्यात यावा.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षापासून या राज्यात सातत्याने दुष्काळ पडतो आहे. यापुढच्या काळात या दुष्काळी परिस्थितीला आपल्याला तोंड द्यावयाचे आहे. महाराष्ट्रात साधारणत: जून महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात पाऊस पडण्यास सुरुवात होते. 31 जुलै पर्यंत पाऊस पडण्याची स्थिती लक्षात येते. महाराष्ट्रात 31 जुलै पर्यंत पावसाचे प्रमाण 75 टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे जाणवले आहे. मराठवाडयातील बहुतांशी जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातील बहुतांशी जिल्हे, विदर्भातील बुलढाणा जिल्हा, पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली जिल्हयातील काही तालुके या ठिकाणी पाऊस अतिशय कमी प्रमाणात पडलेला आहे. जुलै महिन्याची परिस्थिती पाहिल्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत काही तरी बदल होईल अशा अपेक्षेत आपण होतो. महाराष्ट्रातील जनतेला या दरम्यानच्या काळात सरकारकडून काही बदल होतील असे वाटले होते. परंतु या बाबतीत सरकारकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना सुचविण्यात आलेली नाही.

महोदय, दरम्यानच्या काळात 50 तालुक्यात 25 ते 50 टक्के पाऊस झाला. 136 तालुक्यात 75 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेला आहे.सरासरीपेक्षा कमी पाऊस पडलेल्या तालुक्यांची संख्या 102 एवढी आहे. या राज्यातील दुष्काळाची किती भयानक आहे ही गोष्ट आकडेवारीवरुन दिसून येते. 64 तालुक्यात 50 टक्क्यांपेक्षा कमी पेरण्या झालेल्या आहेत. याचा परिणाम म्हणून राज्यातील 20 लक्ष हेक्टरपेक्षा जास्त शेत जमिनींवर पेरण्याच झालेल्या नाहीत, ही वास्तविकता आपल्याला डोळयासमोर ठेऊन ठोस उपाययोजना बनवाव्या लागतील. पाऊस पडेल अशा अपेक्षेवर शेतकऱ्यांनी आपल्या शेत जमिनीमध्ये पेरण्या केल्या, परंतु पेरणी केलेली पिके जळून गेली. दुबार पेरणी केली तर काही तरी अन्नधान्य पिकेल अशा अपेक्षेने त्या शेतकऱ्यांनी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

दुबार पेरणी केली. दुबार पेरणीचा मोठा भाग विदर्भात आहे. 31 जुलै अखेर 56 टक्के शेत जमिनीवर धान्याची पेरणी झाली होती आणि 74 टक्के शेत जमिनीवर कडधान्याची पेरणी झाली होती. यावेळी धान्याचे उत्पादन 44 टक्क्यांनी आणि कडधान्याचे उत्पादन 26 टक्क्यांनी घटणार आहे.

सभापती महोदय, दिनांक 10 डिसेंबर, 2012 रोजी राज्यातील विविध धरणात असलेल्या पाणीसाठयाची मी माहिती घेतली आहे. जायकवाडी प्रकल्पात 10 डिसेंबर, 2012 पर्यंत 9 टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. दिनांक 10 डिसेंबर, 2011 मध्ये या प्रकल्पात 47 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. येलदरी धरणात 8 टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. मागील डिसेंबर महिन्यात 65 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. माजलगाव प्रकल्पात डिसेंबर अखेर पर्यंत शून्य टक्के पाणी साठा आहे. मागील डिसेंबर पर्यंत 76 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. माजरा प्रकल्पात देखील डिसेंबर 2012 अखेर शून्य टक्के साठा आहे. मागील डिसेंबर 11 मध्ये 79 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. निम्न तेरणा प्रकल्पात या डिसेंबर अखेर शून्य टक्के पाणी साठा आहे, मागील डिसेंबर 11 मध्ये 20 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. सिना कोळेगाव प्रकल्पात डिसेंबर 12 अखेर पाणी साठा शुन्य टक्के आहे. मागील डिसेंबर 11 अखेर त्या प्रकल्पात 64 टक्के पाणी साठा होता. या धरणातील जल साठयाची आकडेवारी पाहिली तर शेतीचे नुकसान नव्हे तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न यापूढे किती भयानकपणे उभा राहील ही गोष्ट देखील या आकडेवारीवरुन दिसून येते.

सभापती महोदय, विदर्भातील धरणातील जलसाठयाची परिस्थिती काय आहे याची देखील आकडेवारी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. खडकपूर्ण धरणात दिनांक 10डिसेंबर, 2012 पर्यंत शून्य टक्के पाणीसाठा आहे. डिसेंबर, 2011 मध्ये 16 टक्के पाणी साठा उपलब्ध होता. नळगंगा धरणात दिनांक 10 डिसेंबर, 2012 पर्यंत 12 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. 10 डिसेंबर, 2011 पर्यांत या धरणात 80 टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. पेनटाकळी धरणात 10 डिसेंबर, 2012 पर्यंत 2 टक्के पाणीसाठी उपलब्ध आहे. दिनांक 10 डिसेंबर, 2011 ला या धरणात 70 टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. गतवर्षी या धरणांमध्ये 20 ते 76 टक्क्यांपर्यंत पाणी साठा होता. या वर्षी मात्र शून्य ते 12 टक्के एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. पाणीसाठयाची स्थिती गेल्या वर्षी देखील बरोबर नव्हती, परंतु या वर्षी त्यापेक्षाही पाणीसाठयाची परिस्थिती अतिशय बिकट आहे.

3..



ABG/ D/ D/ KTG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, एका बाजूला शेत जमिनींमध्ये पेरण्या झाल्या नाहीत. दुसऱ्या बाजूला धरणातील पाणीसाठा अतिशय कमी झालेला आहे. या परिस्थितीवर मात करयासाठी शासन कशा पध्दतीने उपाययोजना करणार आहे या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, पाण्याच्या पातळीची माहिती जीएसडीए कडून घेतली आहे. त्यांच्या माहिती प्रमाणे 70 तालुक्यातील पाण्याची पातळी एक मीटरने, 38 तालुक्यातील पाण्याची पातळी 2 मीटरने आणि 19 तालुक्यातील पाण्याची पातळी 3 मीटरने खोल गेली आहे. बुलढाणा, चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा  तसेच मराठवाडयातील 36 तालुक्यांमध्ये अधिक पाणी टंचाई निर्माण होणार आहे अशा प्रकारचा अहवाल जीएसडीएने दिलेला आले. या बाबतीतही काय उपाययोजना केल्या जाणार आहेत, याचा देखील या सभागृहात खुलासा माननीय मंत्री महोदयांकडून होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या राज्यातील 3920 विहिरींचे निरीक्षण नोंदविले. 353 तालुक्यातील 178 तालुक्यातील विहिरीच्या पाण्याच्या भूजल पातळीमध्ये घट दिसून आली. औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद या जिल्हयातील प्रत्येक 7 तालुक्यामध्ये भूजलाची पातळीत घट दिसून आली आहे.

सभापती महोदय, या संदर्भात राष्ट्रीय कृषी दुष्काळ निर्धारण व संनियंत्रण व्यवस्था यांनी खरीपाच्या काळात हवामान व पर्जन्यमानाचा अहवाल दिला तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने तो हिताचा ठरु शकतो. एनटीपीआय कडून व्हेजिटेशन इंडेक्स काढला जातो. त्यातील माहिती आपण नीटपणे पाहिली तर सप्टेंबर, 2010 मध्ये बहुतांशी क्षेत्रामध्ये एनडीबीआय हा 0.8 इतका असताना सप्टेंबर 2012 मध्ये तो 0.4 ते 0.6 इतका खाली गेलेला आहे. दुष्काळाच्या संदर्भात जे  चार मुद्दे महत्वाचे आहेत, त्यात एनटीपीआयचा मुद्दा महत्वाचा असतो. पाणीसाठा अतिशय कमी झालेला आहे. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, विदर्भातील बुलढाणा तसेच मराठवाडयातील बहुतांशी जिल्हयांमध्ये नोव्हेंबर 2012 पासूनच 15-15 दिवस पाणी पुरवठा होत नाही. बुलढाणा येथे 20 दिवस, चिखली येथे 15 दिवस, सिंदखेडराजा येथे 15 दिवस देऊळगावराजा येथे 15 दिवस, जालना येथे 30 दिवस, परतूर येथे 15 दिवस, घनसावंगी येथे 15 दिवस, औरंगाबाद शहर 3 दिवस आणि सिल्लोड येथे 5 दिवस अशा पध्दतीने पाणी पुरवठा होत आहे. पुढील महिन्यात पाणी वाटपाची परिस्थिती अतिशय बिकट होईल. सध्या जो पाणीसाठा उपलब्ध आहे, तो किती दिवस पुरेल याचा भरवसा राहिलेला नाही.

19-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-4

ABG/ D/ D/ KTG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:50

श्री.विनोद तावडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मराठवाडयातील वैजापूर शहरास पाणी पुरवठा करणारा नारंगी तलाव आणि गोरेगाव साठवण तलाव या ठिकाणी 60 दिवस पुरेल एवढाच पाणी साठा उपलब्ध आहे. सिल्लोड शहरास पाणी पुरवठा करणारा जो तलाव आहे, तेथून सुध्दा डिसेंबरपर्यंत पाणी पुरवठा होईल एवढेच पाणी शिल्लक आहे. भोकरदन, परतूर तालुक्यात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अजून काही दिवसानंतर भीषण होणार आहे. या भीषण परिस्थितीला शासन कशा पध्दतीने तोंड देणार आहे याची चिंता राज्यातील जनतेला लागलेली आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी बागायती पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. या वर्षी देखील बागायती पिकांचे नुकसान झाले आहे. फळबागा संकटात आलेल्या आहेत, त्यांच्या पासून उत्पन्न मिळत नाही. गेल्या वर्षी ठिंबक सिंचन योजनेचा वापर करुन शेतकऱ्यांनी फळबागा वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु या वर्षी तसा प्रयत्न कशा प्रकारे करता येईल हा खरा शेतकऱ्यासमोर प्रश्न उभा राहिलेला आहे. डाळींब, आंबा, पेरु, सिताफळ या फळ पिकांवर मोठया प्रमाणात दुष्परिणाम दिसून येतो आहे. जवळपास 1 लाख 50 हजार हेक्टरवरील फळबागा संकटात आल्याची आकडेवारी आपल्या समोर आलेली आहे. या फळबागा टिकवावयाच्या कशा, जगवावयाच्या कशा हे स्वाभाविकपणे मोठे आव्हान उभे राहिलेले आहे. यावर्षी संत्रा पिकाचे देखील मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. विदर्भातील संत्रा पिकाच्या बाबतीत देखील शासनाला गांभीर्याने विचार करावा लागेल...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/पूर्वी श्री.गिते 12:00

श्री.विनोद तावडे.......

सभापती महोदय, 2011-12 मध्ये कमी पावसामुळे राज्यात चारा टंचाई निर्माण झाली होती. आजही 7 तालुक्यांमध्ये चारा डेपो सुरु असल्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध झाली आहे. त्या डेपोंच्या माध्यमातून 10.513 लाख मे.टन चारा शासनामार्फत पुरविल्याचे सांगितले गेले. गेल्या वर्षीचा अनुभव माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना माहिती आहे. वनमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनाही माहिती आहे. मी सांगली जिल्हयाचा दौरा केला होता. अनेक मान्यवरांनी त्या भागात दौरा केला होता. ज्या गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या त्याबाबत दखल घेतली गेली नाही. आटपाडी तालुक्याचे तहसीलदार कसे खोटे बोलतात याबाबत मुख्यमंत्र्यांसमोर गृहमंत्र्यांनी त्यांना उघडे पाडले. माझ्या दौऱ्यामध्ये मी देखील त्यांना उघडे पाडले. अधिवेशनामध्ये आम्ही त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. वनमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही नक्की कारवाई करु. परंतु सर्व काही आलबेल आहे. नंतर ॲण्टी करप्शन विभागाच्या कचाट्यात ते सापडले. ज्यावेळी मंत्रीमंडळातील एका मंत्र्यांनी, विरोधी पक्षनेत्यांनी तहसीलदारांची लबाडी निदर्शनास आणून दिली तरी सुध्दा सरकार त्यांच्यावर कारवाई करु शकले नाही. मंत्र्यांनी ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर कारवाई झाली असती तर हे सरकार संवेदनशील आहे हे दिसून आले असते.

सभापती महोदय, दुष्काळग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे 2281 कोटी रुपये मिळण्याबाबत प्रस्ताव पाठविला होता. त्यापैकी 574 कोटी रुपये केंद्र शासनाकडून मिळाले. उर्वरित 1707 कोटी रुपयांबाबत काय झाले याची विचारणा केल्यानंतर वनमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सभागृहामध्ये पॅकेजची घोषणा केली. 2685 कोटी रुपयांचे पॅकेज त्यांनी जाहीर केले. त्या पॅकेजचा आम्ही अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, दरवर्षी केंद्र सरकारकडून जो निधी प्राप्त होतो त्याची तंतोतंत बेरीज करुन पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी पॅकेज जाहीर केले होते. राज्यपालांपेक्षा ते मोठे आहेत. ते कुलपती आहेत, फक्त मंत्री नाहीत. एआयसीटीईने भारती विद्यापीठाला ए ग्रेड दिले आहे. ते मंत्रीमंडळतील दमदार मंत्री आहेत. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांनी वित्तमंत्री श्री.अजित पवार यांच्या तिजोरीतून पैसा काढला. केंद्र सरकार राज्याला दरवर्षी जो निधी देते त्याची बेरीज कुलपतींनी केली. म्हणून अर्थमंत्री श्री.अजित पवार उदार झाले. त्यांनी तिजोरीतून 10 कोटी

..2..

श्री.विनोद तावडे.......

रुपये दिले. कृपा करुन अशी फसवणूक यावेळी करु नका. दुष्काळ पडला काय आणि न पडला काय, केंद्राकडील निधी दरवर्षी येणारच आहे. शेतकरी साधा असला तरी मूर्ख नाही. तुम्ही पॅकेज दिले म्हणून सांगता. शेतकऱ्यांना माहिती आहे, दरवर्षी हा निधी केंद्र सरकारकडून दिला जातो. अशी थट्टा यापुढे तरी करु नका अशी राज्यातील शेतकऱ्यांची आणि आम्हा विरोधकांची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारचे दुष्काळी पथक मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आले. केंद्र सरकारकडून आपण मागणी केलेली पूर्ण रक्कम मिळणार की नाही हे माहित नसते. पण आपला संसार आपण थाटला. बाप मदत करेल असे नाही. केली तर उत्तम आहे. परंतु दुष्काळाचा भार केंद्र सरकारवर टाकायचा प्रयत्न केला गेला. सह्याद्री अतिथीगृहावर कानमंत्र दिला गेला. टंचाई म्हणू नका. दुष्काळ घोषित करा. त्यामुळे ताबडतोब कॅबिनेटची बैठक झाली आणि दुष्काळी तालुके निश्चित करण्याचा प्रयत्न सुरु झाला. ज्या निकषावर तालुके निश्चित केले पाहिजेत त्याऐवजी मंत्र्यांमध्ये आपापला तालुका दुष्काळी म्हणून घोषित करण्याची स्पर्धा लागली.

सभापती महोदय, मंत्रीमंडळातील एका मंत्र्यांनी असे वर्णन केले की, सोमालिया देशामध्ये हेलिकॉप्टरमधून फूड पॅकेट टाकल्यानंतर नागरिकांची झटापट सुरु होते त्याप्रमाणेच माझा तालुका दुष्काळी कसा आहे हे सांगण्यासाठी अहमहमिका सुरु झाली. शेवटी बारामती, संगमनेर यासारखे तालुके दुष्काळी तालुक्याच्या यादीत अंतर्भूत झाले. केंद्रीय वित्तमंत्री श्री.चिदंबरम यांनी कान उघाडणी केली. केंद्रात विरोधी पक्षाचे सरकार नसून सत्ताधारी पक्षाचेच सरकार सत्तेवर आहे. दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक येते. त्या पथकाकडून दुष्काळग्रस्त भागाला प्रत्यक्ष भेट दिली जाते. सह्याद्री अतिथीगृहावर बैठक झाल्यानंतर टंचाई ऐवजी दुष्काळ शब्द वापरण्यात आला तर नक्की काहीतरी मदत मिळेल असे सुचविले गेले. ही मदत डिझास्टर फंडमधून मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु दुष्काळग्रस्त यादीतील तालुके लक्षात घेतले तर ते डिझास्टर स्थितीतील वाटत नाहीत हे केंद्रीय पथकाच्या लक्षात आले. प्रामाणिकपणे यादी तयार केली असती तर केंद्रीय मंत्र्यांनी अधिक मदत दिली असती. परंतु प्रत्येक वजनदार मंत्री आपापला तालुका दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्नशील होते. त्यामुळे जी मदत मिळणे अपेक्षित होते तेवढी मदत मिळाली नाही.

..3..



SGB/ KTG/ D/पूर्वी श्री.गिते 12:00

श्री.विनोद तावडे.......

सभापती महोदय, पुनर्वसन मंत्री यांनी घोषणा केली की, नजर आणेवारी केली जाईल. दुष्काळी तालुके घोषित करण्यात आले. नंतर माहिती मागविण्यात आली. केंद्र सरकारकडून निधी आणण्यामध्ये राज्य सरकारला यश आले नाही. दुसऱ्या बाजूला शेजारची राज्ये 3500 कोटी रुपयांचे पॅकेज देऊन पुढे जात आहेत असे दिसून आले. कर्नाटक आणि गुजराथ राज्यांनी दुष्काळाबाबत केलेल्या उपाययोजना लक्षात घेऊन केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार यांनी कौतुकास्पद उद्‌गार काढले. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केल्यानंतर केंद्र सरकारकडे आर्थिक मदतीचा प्रस्ताव पाठविला. परंतु त्याबरोबरच राज्य सरकारचे दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने काही निर्णय घेण्याचे कर्तव्य होते. त्यात जमीन महसुलामध्ये सूट देणे, सहकारी कर्जाचे दीर्घ मुदतीत रुपांतर करणे, वीज बिलामध्ये 1/3 सूट देणे, परीक्षा शुल्क माफ करणे, चारा डेपो उघडणे, बुडित क्षेत्रातील वीज जोडणी खंडित न करणे हे महत्वाचे निर्णय घेणे अपेक्षित होते. सरकारने दुष्काळ घोषित केला. केंद्र सरकारकडून निधी मिळण्यासाठी प्रयत्न करण्यापूर्वी आपले जे कर्तव्य होते ते मात्र पार पाडले नाही. केवळ केंद्रीय मदत मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत हे चित्र जगासमोर उघड झाले. प्रामाणिकपणे दुष्काळ निवारणासाठी प्रयत्न केले असते तर निश्चित राज्याला त्याचा फायदा झाला असता.

सभापती महोदय, केंद्रीय पथकाची कार्यक्षमता जबरदस्त होती. एका दिवसात त्यांनी किती ठिकाणी भेटी देऊन पाहणी करावी? मी केंद्रीय पथकाच्या भेटीची कार्यक्रमपत्रिका मिळविली आहे. केंद्रीय पथकाने दुपारी 12 ते 7 यावेळेत जालना जिल्हयातील वेगवेगळ्या तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळेतील जेवण व चहापानासाठी लागणारा वेळ वगळण्यात यावा. राहिलेल्या वेळेत केंद्रीय पथकाने चार ते पाच तालुक्यांना भेटी दिल्या. केंद्रीय पथकाला मी विचारणा केली की, तुम्ही बुलढाणा जिल्हयाला भेट दिली नाही का? त्यांनी सांगितले की, आम्हाला विदर्भात दुष्काळ आहे अशी शासनाने माहिती दिली नाही. मला केंद्रीय पथकाकडून लेखी उत्तर आलेले आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये दुष्काळ पडला नाही त्यामुळे तेथे जाण्याची आवश्यकता नव्हती असे केंद्रीय पथकाचे म्हणणे आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांमध्ये कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना व इतर गोष्टी राबवायच्या आहेत. मंत्रीमंडळात सातारा, सांगली जिल्हयातील मातब्बर मंत्री असल्यामुळे ते जिल्हे खूप चांगल्या स्थितीत आहेत. त्या ठिकाणी योजना दिसून आली नाही.

नंतर श्री.जुन्नरे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

नेहमीच्या आश्वासना प्रमाणे आपले हे आश्वासन देखील हवेमध्ये विरले गेले. गेल्या वेळी मी आटपाडी गावाला भीमा किंवा कृष्णा नदीवरुन पाईपलाईनने पाणी देण्याचा विषय उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय पतंगराव कदम तसेच माननीय मंत्रीमहोदय श्री. ढोबळेसाहेंबानी बोलावून होकार दिला. माननीय ढोबळे साहेबांचे परफेक्शनने नाही तर ढोबळ मानानेच काम चालत असते. त्यावेळी ढोबळे साहेब म्हणाले होते की, यासंदर्भात बैठक बोलून त्याला मान्यता देऊ. परंतु आज सभागृहात येतांना कळले की, मागच्या वेळेची बैठक आज लावली गेली आहे. या कामाच्या संदर्भात आपली जी प्रामाणिकता दिसून आली तशीच प्रामाणिकता दुष्काळाच्या प्रश्नाच्या संदर्भात दिसून येईल असे आम्हाला वाटते.

सभापती महोदय, जायकवाडी धरणात यावर्षी काहीच पाणी नाही. जायकवाडी धरणातून 200 गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असतो तसेच परळी औष्णीक केंद्र, औद्योगिक वसाहतींना पाणी पुरवठा होत असतो. जायकवाडी धरणात 95 द.घ.मी. जीवंत पाणी साठा आहे. त्यातील 738 द.घ.मी. पाणीसाठा हा मृत पाणीसाठा आहे. असा एकूण 933 द.घ.मी.पाणी साठा आहे. या पाणी साठयाचा अंदाज सहा महिन्यापूर्वी वर्तविण्यात आला होता. सध्या जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याचा मुद्दयावर जोरात चर्चा सुरु आहे. जायकवाडी धरणातील 25 टक्के भाग गाळाने भरलेला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पाणी किती शिल्लक राहणार हा पुढचा प्रश्न आहे. जायकवाडी धरणामध्ये आता एकंदर असलेल्या पाण्यातून 5.5 टक्के टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होण्याची शक्यता आहे. जायकवाडी धरणात 17 टीएमसी पाणी पोहचण्याची आवश्यकता आहे. त्यातील 12 टीएमसी पाणी बिगर सिंचनासाठी लागणार असेल व त्या 12 टीएमसी पाण्यापैकी 5.5 टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होणार आहे. जायकवाडी धरणासाठी 17 टीएमसी पाण्याची आवश्यकता असतांना आपण आतापर्यंत 9 टीएमसी पाणी सोडलेले आहे. हे पाणी सोडण्याच्या बाबतीत माननीय विखे-पाटील साहेबांचे वेगळे मत आहे तर माननीय मंत्री महोदय श्री. जयदत्त क्षीरसागरांचे वेगळे मत आहे. दुष्काळाच्या प्रश्नावर संपूर्ण राज्य एकजूट होऊन काम करीत आहे असे चित्र जनतेला दिसले पाहिजे परंतु जनतेला वेगळेच चित्र दिसत आहे.

मी मागच्या बजेटच्या वेळी उल्लेख केला होता की, या राज्यामध्ये राज्याचे नेतृत्व दिसत नाही तर त्या त्या जिल्हयाचे सुभेदार दिसतात.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

जो तो आपापली बाजू लाऊन धरीत आहेत. परवा माननीय शरद पवार साहेबांनी सांगितले की, दुष्काळाच्या संदर्भात राज्याला कडक निर्णय घ्यावेच लागतील. हे सांगितल्यानंतर काही दिवस बोलणे थोडे कमी झाले होते परंतु नंतर 4-5 दिवसांनी मंत्र्यांनी पुन्हा आपापली स्टेटमेंट सुरु केली. सर्वोच्च नेतृत्वाने दुष्काळाच्या संदर्भात राजधर्म सांगून सुध्दा या विषयाच्या संदर्भात नंतर मंत्र्यांची वक्तव्ये ऐकावयास मिळतात त्यामुळे प्रश्न पडतो की, लोककल्याणकारी राज्याच्या सरकारमध्ये बसणारे हेच मंत्री आहेत काय ? जो तो आपापली सुभेदारी सांभाळण्याचे काम करीत आहे. त्यामुळे मराठवाडयाच्या जायकवाडी धरणात आपण किती टीएमसी पाणी सोडणार आहात व हे पाणी कधीपर्यंत सोडले जाईल याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. जायकवाडी धरणामध्ये आता जे काही पाणी सोडलेले आहे ते पुरेसे आहे काय हे नंतर दिसून येईल.

सभापती महोदय, दुष्काळाच्या परिस्थितीत पाण्याच्या संदर्भात जलसंपदा नियमन प्राधिकरणाने सन 2005 मध्ये जे सूचविले होते त्यातील काही तरी पाळले असते तर पुढील काळात त्याचा उपयोग झाला असता.

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रश्नाच्या संदर्भात उपाययोजना करीत असतांना मागच्या वर्षी सुध्दा चारा डेपोतील घोटाळे आम्ही आपल्या समोर मांडले होते. आता मी नगर जिल्हयातील एका चारा डेपोचे उदाहरण कागदपत्रासह आपल्याला देणार आहे. कर्जत तालुक्यातील बारडगाव येथे एकनाथ पाटील ग्रामीण विकास संस्थेने चारा न आणता तो कागदोपत्री प्रत्यक्षात दाखवला आहे. या प्रकरणामध्ये तहसीलदार सुरेश थोरात असेल, रासकर, कामत, पठाण, पशुवैद्यकीय अधिकारी श्री. सपकाळ या सर्वांनी मिळून चारा घोटाळा केलेला आहे. या संस्थेने ठाणे, कल्याण, पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, पिंपरी चिंचवड, सोलापूर, नगर, जालना, बीड, धुळे, नगर, मालेगाव, नाशिक या सर्व शहरांमधून चारा आणल्याचे दाखवले आहे. चारा ज्या वाहनामधून आणला गेला त्या वाहनांचे नंबर सुध्दा त्यांनी दिलले आहेत. ही वाहन कोणती आहेत याची माहिती घेतली असता ही सर्व वाहन याच गावातील असल्याची माहिती मला आरटीओने दिली. ही जी वाहने आहेत ती नेमकी कोणती आहेत ट्रक आहेत की, ट्रेलर आहेत याची माहिती आरटीओकडून मागवली. या संस्थेने कोणकोणत्या वाहनातून किती, किती चारा आणला त्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

माहिती देतो. 1989 सालमध्ये पासींग करण्यात आलेल्या एम-16-1690 या लुना गाडीतून 23 टन 540 किलो चारा आणला. खरे म्हणजे या लुना कंपनीने आमची लुना किती लोड आणू शकते यासंदर्भात त्यांनी जाहिरात केली पाहिजे. यानंतर त्यांनी एम-80-एमएम 16-2471 मधून 15 टन 245 किलो चारा आणलेला आहे. कोणकोणत्या वाहनातून चारा आणला याची मी आरटीओ कडून माहिती मागवली असता मला हा सर्व प्रकार आढळून आला. एम-80 तसेच सर्व वाहनांचे फोटो मी काढून आणले आहे. आरटीओवाले आरसी बुक बदलवयण्याचा प्रयत्न करीत असतात त्यामुळे मी आधीच सर्व वाहनांचे तसेच आरसी बुकचे फोटो काढून आणले आहे. तुमच्याकडे कलाकारी असल्यामुळे बोलण्याच्या अगोदर सर्व माहिती घेऊनच बोलावे लागते.

लुना, एम-80 मधून चारा आणल्यानंतर मारुती कार मागे कशी काय पडेल ? मारुती कार एमएच-16 7634 मधून 18 टन चारा आणला. मारुती मधून चारा आणल्यामुळे जेसीपी मागे कसा पडेल जसीपी 5365 मधून 20 टन चारा आणला. जेसीपीने चारा आणला की, खोऱ्याने पैसा ओढला याची चौकशी आपण प्रामाणिक असाल तर प्रामाणिपणे करा. या गावचा सरपंच नितीन पिसेला या सर्व वाहनांचा ड्रायव्हर म्हणून दाखविण्यात आले आहे. 72 दिवसात 5,116 टन चारा आणून तो जनावरांना वाटण्यात आल्याचे दाखवलेले आहे. लाभार्थीचे कार्ड सुध्दा अर्धवट आहेत. या विषयामध्ये अनिल शर्मा, लालचंद जयसिंग कदम यांनी महसूलमंत्री तसेच पालक मंत्र्यांकडे तक्रारी केल्या परंतु यासंदर्भात काहीही कारवाई झाली नाही. कारवाई करायची नाही की, यांच्याच सांगण्यावरुन हा सर्व प्रकार झाला हे काही समजत नाही. त्यामुळे या चारा घोटाळयात तेथील तहसीलदाराला ताबडतोब निलंबित केले पाहिजे. एवढेच नाही तर या सर्वांवर गुन्हेगारी केस दाखल करुन सर्व कारवाई केली पाहिजे. सामान्य माणसाला मदत दिली जात असतांना त्यामध्ये जर कोटयावधी रुपयांचा अपहार होत असेल तर ते योग्य नाही. मला माफ करा हे कार्यकर्ते कोणाचे आहे यासंदर्भात मी सभागृहात कोणाचेही नाव घेणार नाही. खरे म्हणजे या लोकांना मंत्र्यांचा आशीर्वाद आहे.

शेतकरी दुष्काळामध्ये जनावरांना जगवण्याचा प्रयत्न करीत असतो आणि चाऱ्यामध्ये अशा प्रकारचे घोटाळे होत असतील तर ते योग्य नाही. आमचे पैसे आमच्या खात्यावर जमा करा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे परंतु आपण शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करीत ...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

नाही. यातील निम्मे जरी पैसे आपण शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा केले तरी तो खूश होईल परंतु आपण तसे करणार नाहीत. तुम्हाला तुमच्या कार्यकर्त्यांना जगवायचे आहे की, शेतकऱ्यांच्या जनावरांना जगवायचे आहे ? शेतकऱ्यांना तुम्ही 75 टक्क्यापेक्षा 50 टक्के मदत केली तरी चालेल. जेव्हा हे पैसे डायरेक्ट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होतील तेव्हाच आपण शेतकऱ्यांना न्याय देऊ शकू. मी फक्त एका जिल्हयाचीच माहिति सभागृहाला दिलेली आहे. दुष्काळी जिल्हयातील सर्व माहिती मी माहितीच्या अधिकारातून मागवलेली आहे. त्यामुळे सर्व चारा वाटपाच्या घोटाळयाची सीआयडी चौकशी घोषित केली तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल व सर्व गोष्टी जनतेसमोर येतील. चाऱ्यामध्ये तहसीलदार 15 टक्के कमिशन घेतो व 25-30 कोटी कमावतो व संस्था 70-80 कोटी रुपये कमावतात. चारा घोटाळयाची सीआयडी चौकशी करतांना त्यामध्ये आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्याच्या मार्फत चौकशी केली तरच न्याय मिळू शकेल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

हे कुठे तरी थांबले पाहिजे. अशा पद्धतीने लूट करणे चुकीचे आहे. यात आपलाच पैसा जात आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब म्हणाले की, आपण आपले मानधन देखील देऊ या. आपण कर्मचाऱ्यांचे देखील एक दिवसांचे वेतन घेतो. हे पैसे दलाली करणाऱ्या लोकांच्या खिशात जाता कामा कामा नये. यातील जे वास्तव आहे ते सर्वसामान्य माणसाला कळले पाहिजे. त्यांना समजले पाहिजे की, आपण दिलेला पैसा हा गरजेपोटी संबंधितांकडे जात आहे.

चाऱ्या प्रमाणे रोजगार हमी योजनेमध्ये देखील अनेक घोटाळे आहेत. त्यासंबंधातील कागदपत्रे तयार होत असून लोक आमच्याकडे आणून देत आहेत. त्याची फेर तपासणी आम्ही करून घेत आहोत. त्यातून वास्तव बाहेर येत आहे. मी नेवासा-शेगाव या नगरच्या भागात गेलो होतो. तेथे रोहयोची कामे सुरू आहेत. पण महिना झाला तरी त्यांना पैसे मिळत नाही. त्या बँकेत खाते नसल्यामुळे त्यांना पैसे मिळत नाही. लोकांना विचारले की, तुमचे बँकेत खाते नाही काय ? तेव्हा ते म्हणाले की, खाते उघडण्यासाठी पैसे नाहीत. झिरो बॅलन्सवर बँकेत खाते उघडले जाते हे त्या लोकांनाच माहीत नाही. त्यामुळे लोकांना थोडे जागरूक केले पाहिजे. शेगाव-नेवासा येथील रोहयोच्या कामावर काम करायला आलेली कुटुंब ही सधन होती, चांगली होती. ज्यांची स्वत:ची मोठी शेती आहे अशी कुटुंब होती, तर काही जणांना यातील काहीच माहीत नसते.

गावात लहानशा पोस्ट ऑफिसमध्ये एकच कर्मचारी असतो. तेथे जर एकाच वेळी 750 लोक आले तर पोस्टात खाती उघडायला सहा महिने जातील. तेव्हा महसूल विभागात असणारा ॲडिशनल स्टाफ पोस्टात खाती उघडण्यासाठी आपण देणार आहात काय ? जेथे अशा प्रॅक्टीकली अडचणी येतात त्या सोडविण्याचा काही तरी प्रयत्न केला पाहिजे. लोक सांगतात की, आम्ही आमच्या अडचणी पालक मंत्र्यांना सादर केल्या आहेत पण काहीही होत नाही. जेव्हा विरोधी पक्ष तेथे जातो तेव्हा मग अमुक अमुक झाले आहे असे लोक सांगतात. 30-45 दिवस काम केल्यानंतर आम्हाला कामाचे पैसे मिळत नाही. पैशाची गरज आहे म्हणून आम्ही कामाला येतो, असे लोक सांगतात म्हणून यात प्रॅक्टीकली उत्तर काढण्याची गरज आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, दुष्काळग्रस्तांसाठी 3500 कोटी रूपयांचे पॅकेज कर्नाटकने घोषित केले आहे. कर्नाटक राज्य तर कृषि अर्थसंकल्प सादर करते. त्यांनी 3200 कोटी रूपयांचे पीक कर्ज माफ केले आहे. अशा पद्धतीच्या योजना आपण करू शकतो काय ? या दुष्काळाच्या निमित्ताने काय मिळाले पाहिजे हे मी या निमित्ताने सांगतो व माझे भाषण पूर्ण करतो.

पुनर्भरण उपाययोजनेसाठी 25 कोटी रूपयांची, विभागीय पाणी पुरवठा योजनेसाठी 75 कोटी रूपयांची, टँकर दुरुस्ती, बोअरवेल्ससाठी 80 कोटी रूपयांची, पाणी पुरवठा योजनेची थकित वीज बिलांची रक्कम भरण्यासाठी 13 ते 15 कोटी रूपयांची तरतूद आपण करावी. त्यातून लोकांना बऱ्या पैकी पाणी मिळू शकते. गुरांच्या छावण्यासाठी 200 कोटीची तरतूद करणे आवश्यक आहे. छावण्या सुरू झालेल्या आहेत. पण पैसे पोहोचत नाही. चारा डेपोसाठी 300 कोटी रूपयांची आवश्यकता आहे. फळबागा जगविण्याचा देखील विषय महत्वाचा आहे. शेततळ्यांच्या प्लास्टिकचा देखील विषय आहे. या सर्वांसाठी 3500 कोटी रूपयांची गरज आहे. सूक्ष्म सिंचनासाठी 500 कोटी रूपये लागतील. शेततळ्यांच्या प्लास्टिकसाठी 21 कोटी रूपये लागतील. बागायतदारांच्या नुकसान भरपाईसाठी सव्वाशे कोटी रूपये लागतील, चेक डॅमसाठी 500 कोटी रूपये लागतील. मी प्रत्येक बाबीची आकडेवारी काढली आहे. ती साधारणत: 3520 कोटी रूपये एवढी येते. तेव्हा सदर रकमेची तरतूद सरकारने करावी अशी मी मागणी करीत आहे. तसेच चारा लागवडीसाठी आपण योजना केली पाहिजे. तशी योजना आपण केली तर तो चार उपयोगात आणता येईल.

धरणे आता रिकामी आहेत. त्यातील गाळ काढण्याचा प्रश्न येथे नेहमीच उपस्थित केला जातो. ह्या संकटाची संधी घेऊन गाळ काढावा म्हणजे पुढच्या काळामध्ये धरणात अधिक पाणी साठा होऊ शकेल व ते पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध होऊ शकेल. तेव्हा अशा सुद्धा गोष्टींचा विचार सरकारला कुठे ना कुठे करावा लागेल. सरकारचे मत प्रामाणिक असते तर त्यांनी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच घोषणा करायला पाहिजे होती. पण तशी घोषणा आपण केलेली दिसत नाही. नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या लोकांचे या सरकारच्या माध्यमातून अधिक हाल होत असल्याचे दिसून येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

माझे तर असे मत आहे की, प्रत्येक मंत्र्याला दुष्काळी तालुकाचा पालकमंत्री बनवावे. गेल्या वर्षी ज्या भागात दुष्काळ होता त्यावेळी त्या दुष्काळी भागातील मंत्री स्वित्झर्लॅंडमध्ये देखील जाऊन आले. खरे म्हणजे आपण दुष्काळी भागाची देखरेख केली पाहिजे. आज आटपाटीतील तहसीलदार माजतो कसा?. राजकीय नेतृत्व अंकुश ठेवून बसले आहे असे त्याला वाटत नसावे. मागच्या अधिवेशनात वारंवार मी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते साहेब एक मुद्दा उपस्थित करीत होतो. किल्लारीच्या भूंकपाच्या वेळी माननीय श्री.शरद पवार हे अधिकाऱ्यांसह तेथे जाऊन बसले व त्यांनी 3 महिने काम केले. असे दुष्काळाचे आव्हान माननीय राज्यमंत्री व सरकार स्वीकारणार आहे काय ? मघाशी टकले साहेब म्हणाले पालकमंत्री सचिवांच्या भरवशावर सर्वांना सोडून सुट्टीत मौजमजा मारण्यासाठी गेले. तसे आपण करणार आहात काय ? दुष्काळाच्या संकटाशी सामना करताना राजकीय इच्छा शक्ती असणे आवश्यक आहे. तशी इच्छा शक्ती राज्य शासनाची दिसत नाही. त्यामुळे सामान्य माणसाचे काय होईल ही चिंता आज महाराष्ट्रातील लोकांना आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चाऱ्यामध्ये घोटाळा कसा होतो हे मांडले आहे. ते म्हणाले की, यात मंत्री आहेत. पण मी त्यांचे नाव घेत नाही. दुष्काळाच्या कामावर माननीय मंत्र्यांनी भ्रष्टाचार केला असेल तर ती बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणी कोणत्या प्रकारची चौकशी करण्यात येणार आहे हे माननीय मंत्र्यांच्या उत्तरातून कळले पाहिजे. त्यात मंत्र्यांचा सहभाग असेल तर त्यांना माफ केले जाणार नाही. त्यांना जामीन मिळाला तरी मंत्रिमंडळामध्ये ठेवले जाणार नाही, अशा प्रकारचे आश्वासन द्यावे लागेल. हे आम्ही आताच सांगत आहोत. नंतर मग आम्ही गोंधळ केला असे म्हणू नका.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आता येथे जी माहिती देण्यात आली आहे त्याची सीआयडी मार्फत चौकशी केली जाईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित मंत्र्यांनी सीआयडी चौकशीची घोषणा केलेलीच आहे. पण मी देखील गृह मंत्री म्हणून सांगतो की, ज्यावेळी सीआयडीकडे ही चौकशी येईल त्यावेळी या कामासाठी सीआयडीमधील एक आय.जी.नेमून 15 दिवसाच्या आत चौकशी करू. याच्या पाठीशी कोणीही असला तरी त्यांना सोडून देण्याची भूमिका सरकार घेणार नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्यावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महाराष्ट्रामध्ये दुष्काळाची दुष्ट परंपरा हजारो वर्षापासून आहे. दुष्काळाच्या नोंदी सातव्या वर्षापासून ते 1972 पर्यंत आहेत. इ.स.941 ला दुष्काळ पडला होता. इ.स.1022 ला दुष्काळ पडला होता. इ.स.1033 मध्ये दुष्काळ पडला होता. इ.स.1148 ते 1159 असा 11 वर्ष दुष्काळ महाराष्ट्रामध्ये पडला होता. 1396 ते 1407 म्हणजे 12 वर्षे दुष्काळ घोंगावत होता. तो दुर्गादेवीचा दुष्काळ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे कृष्णा आणि कोयनेचे खोरे पूर्णपणे उजाड झाले. शास्त्री आणि पंडित पैठण आणि पुणतांबा सोडून काशीला गेले.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

धर्मकार्य बुडाले, संस्कृत विद्यापीठ बंद पडले आणि हे सर्व दुष्काळामुळे घडले आहे. महाराष्ट्राला दुष्क्‍ाळाची अशी दुष्ट परंपरा आहे.

सभापती महोदय, इ.स.1460 मध्ये पडलेला दुष्काळ हा दामाजी पंताचा दुष्काळ म्हणून ओळखला जातो. या दुष्क्‍ाळी काळात दामाजी पंतांनी धान्यांची कोठारे रिक्त केली होती. त्यांनी विजापूरकरच्या सुलतानाला खलिता पाठवून "आपल्याकडे धान्याची कोठारे भरली आहेत ती खाली करुन भरपाई करावी असे सांगितले होते. त्यानंतर एक आख्यायिका सांगितली जाते की, विठू महार आला आणि त्यांनी दामाजी पंताना वाचविले.

सभापती महोदय, इ.स.1595 मध्ये दुष्काळ पडला, 1598 मध्ये दुष्काळ पडला. 1629 ते 1631 या काळात दुष्काळ पडला. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म 1630 मध्ये झाला तेव्हा संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळग्रस्त होता. त्यावेळी महाराष्ट्रातील जनतेला वाचविण्यासाठी जिजाऊ मातेने धान्याची कोठारे रिक्त केली होती. इ.स.1769, 1783 आणि 1793 या काळात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडले होते. 1850 ते 1900 या दरम्यान देशामध्ये जे दुष्काळ पडले त्यामध्ये जवळपास 2 कोटी लोक मृत्युमुखी पडले. 1943 मध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळामध्ये 45 लोक मृत्यमुखी पडले. त्यावेळी महात्मा गांधी आणि पंडित जवाहर नेहरु यांनी इंग्रज सरकारकडे निषेध व्यक्त केला होता. परंतु त्या संदर्भात इंग्रज सरकारने कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे इतिहासात आढळून येत नाही. या ऐतिहासिक दुष्काळाची पार्श्वभूमी पाहिल्यानंतर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रात पुन्हा दुष्काळाचे सावट पडणार नाही याचे चिंतन व ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझे मित्र तत्कालीन सदस्य श्री.पाशा पटेल यांनी पीक पैसेवारी पध्दतीमध्ये बदल करण्याची मागणी केली होती. त्यांना तसे आश्वासन देखील देण्यात आले होते. परंतु सरकारने आजपर्यंत पीक पैसेवारी पध्दतीमध्ये कोणताही बदल केलेला नाही. जशी पृथ्वी सूर्याभोवती फिरते तशी पीक पैसेवारीच्या अवती भोवती हा दुष्काळ फिरत राहणार आहे. आज महाराष्ट्रातील जनता विरहात आहे, चिंताग्रस्त आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, आमच्या मराठवाड्यामध्ये पावसाळ्यामध्ये देखील टँकरने पाणी पुरवठा होत असतो अशी परिस्थिती आहे.मराठवाड्यावर नेहमीच पाऊस रुसतो आणि दुर्दैवाने राज्यकर्त्यांचे देखील दुर्लक्ष होत असते. परंतु आजचे राज्यकर्ते जागरुक आहेत. डॉ.पतंगरराव कदम माझ्याकडे पाहत आहेत. त्यांची नजर जर मराठवाड्यावरुन फिरली तर मराठवाड्यातील दुष्काळावर मात करण्याची क्षमता त्यांच्या नजरेमध्ये आहे.

सभापती महोदय, "दुष्काळ" या शब्दाचे सरकारला वावडे असेल परंतु दुष्काळाला ना सरकारचे वावडे आहे, ना जनतेचे वावडे आहे. तो राजरोसपणे येतो. "आला आला महाराजा, सोबत बँडबाजा" असा तो येतो आणि लोकांना भरडून टाकतो. आपणास हे चित्र बदलावयाचे असेल तर त्यासाठी प्रभावी व दूरगामी योजना आखून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. शासन तशी योजना आखणार आहे काय असा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. बीड जिल्ह्यातील परिस्थिती पाहिल्यानंतर आमच्या घशाला कोरड पडते. बीड जिल्हा हा स्थलांतरित मजुरांचा जिल्हा आहे. बीड जिल्ह्यातील जवळपास चार ते पाच लाख मजूर अन्यत्र जाऊन आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. भाकरीसाठी ते बाहेर जातात. पण आज परिस्थिती बदलली आहे. आज बीड जिल्ह्यातील लोकांवर पाण्यासाठी स्थलांतर करण्याची वेळ आलेली आहे. त्यांना भाकरीसाठी स्थलांतर करावे लागत होते, परंतु आता त्यांना पाण्यासाठी स्थलांतर करावे लागणार आहे आणि हे चित्र भयानक आहे. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या महिन्यात पाण्याचा दुष्काळ असतोच परंतु त्यानंतरच्या महिन्यांत या जिल्ह्यातील गावे शासनाला पाण्यासाठी उचलून न्यावी लागतील इतकी भीषण भयानता बीड जिल्ह्यात आहे. आमच्याकडे तांदूळ आणि पोहे मिळतील, परंतु ते शिजविण्यासाठी पाणी कोठून आणायचे ? तेव्हा शासन बीड जिल्ह्यासाठी पाण्याची व्यवस्था अतिशय जागरुक आणि तन्मयतेने करील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, मध्यंतरी शासनाने घोषणा केली की, काही जिल्ह्यांना रेल्वेने पाणी पुरवठा करण्यात येईल. आमच्या बीड जिल्ह्यामध्ये रेल्वेच नाही. स्वातंत्र्यानंतर अशी मागणी करुन थकलो. अनेकांचे डोळे अधू झाले, अनेकांचे कान बहिरे झाले, काही देवाघरी गेले. बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे नसल्यामुळे त्या ठिकाणी रेल्वेने पाणी पुरवठा कसा करणार आहात ? परळी-बीड हे 100 कि.मी.चे अंतर आहे. तेथून एक टँकर आणायला एक दिवस लागतो. तेव्हा शासन बीड जिल्ह्यामध्ये कसे पाणी आणणार, त्या बाबत शासनाने नियोजन केले आहे काय की ते नियोजन फक्त कागदावरच आहे ? झारीतील शुक्राचार्य डोळे झाकून बसले आहेत त्यांना दूर केले पाहिजे.

सभापती महोदय, ज्यांनी मराठवाड्याला पाणी द्यायला विरोध केला त्यांना माणुसकीचा धर्म काय आहे हे समजून सांगितले पाहिजे. जातीपेक्षा धर्म श्रेष्ठ, धर्मापेक्षा देश श्रेष्ठ आणि देशापेक्षा माणुसकी श्रेष्ठ आहे. तेव्हा माणूस आहे तर सर्व आहे. माणूस नसेल तर हिमालयाला, हिमालय कोण म्हणणार, सह्याद्रीला, सह्याद्री कोण म्हणणार ? तेव्हा माणूस जगला पाहिजे हे नगर जिल्ह्यातील आमच्या नेते मंडळींना सांगण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे हे जागरुक सदस्य आहेत. उदार मनाचे आहेत, उदार अंत:करणाचे आहेत. मराठवाड्याला अजून 20 ते 30 टीएमसी पाण्याची गरज पडली तर त्यांनी आम्हाला पाठिंबा द्यावा एवढी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी टँकर लॉबीचा उल्लेख केला. ज्यांच्याकडे टँकर्स आहेत त्याची आज संपूर्ण महाराष्ट्राला गरज पडणार आहे. दुष्काळ पडल्यानंतर टँकर लॉबी बेंबीच्या देठापासून खूष असते. त्यांना उकळया फुटत असतात. पण आज मात्र या टँकर लॉबीची गरज पडणार आहे कारण ग्रामीण भागांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी टँकर शिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

महाराष्ट्रातील एकूण पर्जन्यमानाच्या तुलनेत कोकणामध्ये 40 टक्के पाऊस पडतो. यावर्षी मराठवाडयामध्ये फक्त 35 टक्के पाऊस पडला असून त्याची सरासरी 650 ते 700 एमएम इतकी आहे.त्या पाण्यावरच आम्ही आमची गरज भागवीत आहोत. तेव्हा मराठवाडयाला दिलासा देण्याचे काम माननीय मत्री श्री. अनिल देशमुख व माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी करावे अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाला ग्रामीण भागामध्ये अन्न छत्र उभे करावे लागतील, चारा डेपो उभे करावे लागतील. गाई-गुरे यांना जगवावे लागेल, शेतकऱ्यांना जगवावे लागेल. चारा डेपो सुरु करुन जनावरांचे संगोपन राज्य शासनाला करावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात तामिळनाडूमध्ये दुष्काळ पडला होता त्यावेळी मद्रास व इतर भागामध्ये त्यावेळच्या शासनाने अन्न छत्र सुरु केले होते. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर देखील महाराष्ट्र शासनाने गरज पडल्यास अन्न छत्र सुरु करावे अशी मी विनंती करणार आहे. हा दुष्काळ म्हणजे इष्टापत्ती ठरावी.

सभापती महोदय, मी मागील चार अधिवेशनांपासून या सभागृहात शेततळयांची आग्रहाने मागणी करीत आहे. शेततळी बांधतांना कोणत्याही प्रकारचे निकष लावता कामा नयेत. मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे आपण दिले पाहिजे. महाराष्ट्रातील सिंचन 40 टक्के वाढवावयाचे असेल तर शेततळयाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही असे माझे मत आहे. आपल्याला दुष्काळावर मात करावयाची असेल तर शेततळे झाले पाहिजे. सभापती महोदय, 2 कोटी लिटरचे शेततळे उभारले तर 1 हजार लोकसंख्या असलेल्या एका गावाला पाच महिने पाणी पुरवू शकतो. गावातील प्रत्येक व्यक्तिला प्रति दिवशी 100 लिटर इतके पाणी पाच महिने सतत आपण देऊ शकतो. त्यामुळे आपल्याला टँकर लावण्याची आवश्यकता भासणार नाही. कधी कधी माझ्या मनामध्ये संशय निर्माण होतो की, राज्यातील टँकर लॉबी शेततळे तयार करण्याच्या आड येते काय? तसे नाही. आपले मंत्री जागरुक आहेत, शासन अतिशय उदार आहे. या पुढील काळात महाराष्ट्रातील ही टँकर लॉबी मोडून काढण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने पार पाडावी अशाप्रकारची आग्रहाची विनंती शासनाला करु इच्छितो.

या दुष्काळी परिस्थितीमुळे मराठवाडयातील शास्त्री आणि पंडित हे`काशीला निघून गेले तर आमच्या बहुजनांची लग्ने कुणी लावावयाची असा प्रश्न पडला आहे?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

"ॐ स्वस्ति न इन्द्रो वृध्दश्रवा: स्वस्ति न: पूषा विश्ववेदा:! स्वस्ति नस्ताक्ष्योऽ अरिष्टनेमि: स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु!!" या बहुजनांची लग्ने माझ्यासारखा माणूस लावणार आहे काय? माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब राज्यामध्ये परिस्थिती अतिशय गंभीर आहे. बीड शहरामध्ये आठ दिवसानंतर नळाला पाणी येते. जालना शहरामध्ये एक महिन्यानंतर एक तास पाणी येते. एस.आर.पी. चे जवान रजेवर गेले आहेत. बुलढाण्याची सुध्दा अशीच स्थिती आहे. पाणी नसेल तर स्नानसंध्या कशी करावयाची? कुणी स्तोत्रे म्हणावयाची?

सभापती महोदय, आज आमच्या बीड जिल्ह्यातील बिंदुसरा प्रकल्प पाण्याअभावी पूर्ण कोरडे पडलेले आहे. माजलगावच्या बॅक वॉटरमधून बीड शहराला पाणी पुरवठा होत आहे. या करिता राज्य शासनाने दूरगामी परिणाम होतील यादृष्टीने ठोस कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे, योजना करण्याची गरज आहे. माती अडवा आणि पाणी जिरवा, पाण्याचा एक थेंबही वाहून जाता कामा नये. नदीमधून मोठया प्रमाणावर वाळू उपसली जात आहे. वाळूच्या माध्यमातून नैसर्गिकरित्या जमिनीमध्ये पाणी जिरविण्याची प्रक्रिया केली जाते. ही निसर्गाने केलेली व्यवस्था आहे. आपण निसर्गावर मात करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील वाळू माफियांवर अंकुश ठेवण्याची गरज आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या सकाळच्या सत्राची वेळ आता संपत असल्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा दुपारी पुन्हा सुरु करण्यात येईल. माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले हे ऑन लेग राहतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे, सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 पुन: भरेल.

(दुपारी 12.45 ते 1.00 वाजेपर्यन्त बैठक स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 1:00

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**औरंगाबाद मनपाचे समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(1) * 33460 श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) औरंगाबाद मनपाच्या समांतर जलवाहिनीसाठी कांचनवाडी येथील जमीन संपादित नसल्याचे सप्टेंबर, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, समांतर योजना ठरलेल्या वेळेत पूर्ण होऊ न शकल्याने त्याचा खर्च वाढतच असून तो आर्थिक भुर्दंड सामान्य नागरिकांवर बसत असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, व चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही. औरंगाबाद महानगरपालिकेच्या समांतर जलवाहिनी प्रकल्पाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याने पैठण-औरंगाबाद या 30 मीटर रूंदीच्या राज्य मार्गाच्या कडेने जलवाहिनी टाकण्यास परवानगी दिली आहे, त्यामुळे भूसंपादनाची आवश्यकता नाही.
(2) हे खरे नाही. औरंगाबाद महानगरपालिकेची समांतर पाणीपुरवठा योजना खाजगी सार्वजनिक सहभाग तत्वावर (PPP) राबविण्यात येत असल्याने वाढीव खर्चाचा भार नागरिकांवर पडणार नाही.
(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, या कामाचे टेंडर 10 मार्च 2009 रोजी काढण्यात आले आणि 20 मार्च 2011 रोजी ते स्थायी समितीने मंजूर केले. अजूनही याबाबत वर्क ऑर्डर दिलेली नसताना सदरहू कंपनीने जवळजवळ 50 कोटी रुपयांचे काम केले आहे. महानगरपालिके कडे तीन वर्षापासून केंद्र शासनाचे पैसे जमा आहेत. पण यासाठी महापालिकेने स्वत:चा वाटा दिला नाही. या कंपनीला कोणीही कर्ज देत नाही म्हणून त्यांचे काम होत नाही. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"औरंगाबाद महानगरपालिकेची समांतर पाणीपुरवठा योजना खाजगी सार्वजनिक सहभाग तत्वावर (PPP) राबविण्यात येत असल्याने वाढीव खर्चाचा भार नागरिकांवर पडणार नाही." माझा असा प्रश्न आहे की, ही कंपनी म्हणजे चॅरिटेबल ट्रस्ट आहे काय, तीन वर्षानंतर सुध्दा किंमत वाढत नाही. मग ते स्वत:च्या खिशातून पैसे देणार आहेत काय? याबाबत माझा असा प्रश्न आहे की,या संपूर्ण प्रक्रियेबाबत चौकशी करणार आहात काय?तसेच याला कोण-कोण जबाबदार आहे हे निश्चित करणार काय? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की,ही योजना नागरिकांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33460

श्री.सतिश चव्हाण . . .

परवडणारी नसल्याने ती राज्य शासन ताब्यात घेणार आहे काय? त्याच प्रमाणे ज्यांनी वर्क ऑर्डरशिवाय काम सुरु केले त्या बाबत कोण जबाबदार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, यामुळे वाढीव खर्चाचा भार नागरिकांवर पडणार नाही. पण किंमत वाढणार नाही असे म्हटलेले नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, ही खूप मोठी आणि ऐतिहासिक अशी योजना आहे. 2005-2006 मध्ये केंद्र शासनाने छोट्या शहरांकरता यु.आय.डी.एस.एस.एम.टी. ही स्कीम अंमलात आणली तेव्हा योजनेची एकंदर किंमत 359 कोटी 67 लाख रुपये इतकी होती. आपल्याला माहिती आहे की, त्याला मंजुरी देण्यासाठी दोन-तीन वर्षे लागतात. पण मधल्या काळामध्ये या योजनेची किंमत खूप मोठ्या प्रमाणात वाढली. परंतु तसे झाले असले तरी केंद्र शासन आणि राज्य शासनाने आपला हिस्सा, महानगरपालिकेचा हिस्सा आणि ज्या कंपनीला ही योजना 17 वर्षे चालविण्यासाठी देणार आहेत त्यांनी देखील आपला हिस्सा दिला असून, ज्याला फायनान्शिअल क्लोजर असे म्हणतात ते पूर्ण झ ालेले असल्यामुळे आता या योजनेचे काम लवकरच सुरु होईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर आहे आणि मराठवाड्याची राजधानी म्हणून औरंगाबादकडे पाहिले जाते. आज या शहराची लोकसंख्या साधारणत: 12 लाखापर्यंत पोहोचली आहे.माननीय मंत्री महोदयांनी याबाबत 2006 मध्ये सांगितले होते. त्याला सहा वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि आज त्या प्रोजेक्टची किंमत काय आहे? तसेच प्रत्यक्षात हे काम कधी सुरु होणार आहे आणि ते पूर्ण करण्यास किती कालावधी लागणार आहे हा माझा स्पेसिफीक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, ही योजना सुरु झाल्यानंतर म्हणजे लोकांना या पाईप लाईनमधून पाणी प्रत्यक्षपणे मिळाल्या नंतरच,याबाबतची नवीन पाणीपट्टी आकारली जाईल काय? कारण महानगरपालिकेने असे नियोजन केले होते की, आता पासूनच पाणीपट्टी आकारावयाची.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, या प्रॉजेक्टची एकूण किंमत काय आहे? दुसरा प्रश्न असा की, हे काम कधी सुरु होणार आणि कधी संपणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाबाबत सांगावयाचे तर या प्रोजेक्टची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

एस्टीमेट कॉस्ट 792 कोटी 20 लाख रुपये आहे. साधारणपणे ही योजना तीन वर्षामध्ये म्हणजे 2015 पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने तरतूद आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतरच या योजनेची पाणीपट्टी आकारण्यात येईल काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. त्याबाबत सांगावयाचे तर आता ज्यावेळी आपण लोक सहभागातून योजना तयार करतो, त्यावेळी योजना तयार करण्यासाठी किती खर्च येईल, तो खर्च केल्यानंतर त्या योजना चालविण्यासाठी कोणकोणत्या प्रकारची उपाययोजना करावी लागेल याचा अंदाज अगोदरच दिला जातो. पण प्रत्यक्षपणे पाणी योजना सुरु झाल्यानंतर या योजनेसाठी मीटर लावण्यात येणार आहे. त्यानंतरच पाण्याचे बिल वसूल केले जाईल.

श्री.किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, समांतर जलवाहिनी हा संभाजीनगरसाठी फार महत्वाचा पाण्याचा प्रोजेक्ट आहे. यासाठी केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने देखील मदत केली आहे.माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. केंद्र शासनानेही मदत केली आणि राज्य शासनानेही मदत केलेली आहे. पण महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे महाराष्ट्र शासन महानगरपालिकेला 100 कोटी रुपये कर्ज म्हणून देणार आहे काय? महानगरपालिकेचा हिस्सा त्यामध्ये टाकावयाचा आहे. परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे शासन महानगरपालिकेला खास 100 कोटी रुपयांची मदत करणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये केंद्र सरकारचा निधी आलेला आहे तो तेवढाच खर्च केला जाईल आणि राज्य शासनाचा निधी खर्च केला जाणार नाही. राज्य शासनाचा निधी खर्च होईल परंतु महानगरपालिकेचा निधी खर्च होणार नाही. महानगरपालिकेचा हिस्सा खर्च होईल परंतु जी प्रायव्हेट पार्टी आहे त्यांच्याकडून पैसे खर्च होणार नाहीत याबाबत काळजी घेऊन टप्प्याटप्प्याने जो एकंदर खर्च होईल त्यात केंद्र शासनाचा हिस्सा, राज्य शासनाचा हिस्सा आणि त्याच प्रमाणात महानगरपालिकेचा आणि त्याचप्रकारे खाजगी पार्टीचा हिस्सा सुध्दा त्याच वेळेला वर्ग करण्याची तरतूद करारामध्ये केलेली आहे. 100 कोटी रुपयांच्या कर्जाच्या बाबतीत कोणताही प्रस्ताव या क्षणापर्यंत शासनाकडे आलेला नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय,मी अगोदर असा प्रश्न विचारला होता की, याबाबतीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अजूनपर्यंत वर्क ऑर्डर दिलेली नाही काय? तसेच वर्क ऑर्डर देण्यापूर्वी काम सुरु केलेले आहे काय? याचे उत्तर दिलेले नाही. या कामाची वर्क ऑर्डर केव्हा दिली आणि काम केव्हा सुरु केले?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, जोपर्यंत फायनान्शिअल क्लोजर होत नाही तोपर्यंत वर्क ऑर्डर दिली जात नाही. म्हणून 22 सप्टेंबर रोजी या संदर्भातील वर्क ऑर्डर देण्यात आली आहे आणि याबाबतीत प्राथमिक स्वरुपाचे जे काम करावे लागते तशा प्रकारचे काम सुरु झालेले आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी चुकीचे उत्तर दिले जात आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सध्या औरंगाबाद मध्ये पाणीपट्टी किती आहे आणि नागरिकांना दिवसाला किती पाणी मिळत आहे? याठिकाणी 800 कोटी रुपये खर्च केल्यानंतर अंदाजे पाणीपट्टी किती असेल, त्याचे स्लॅब काय असतील याचा काही अभ्यास झाला आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सध्याची पाणीपट्टी काय आहे याची माझ्याकडे माहिती नाही. पण याठिकाणी नवीन योजनेच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे संपूर्ण योजनेला मीटरच लावण्यात येणार आहे. त्यामुळे मीटर रिडींगप्रमाणेच पाणीपट्टी घेतली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.तनवाणी साहेबांनी प्रश्न विचारला होता. परंतु आता सदरहू महानगरपालिकेकडे तेवढी आर्थिक तरतूद नाही जेणेकरुन यासाठी निधी उपलब्ध होईल. सन्माननीय सदस्य श्री.तनवाणी यांचा विषय तुम्ही 100 कोटी रुपये देत आहात की 200 कोटी रुपये देत आहात हा नाही. त्यांचा विषय असा होता की, आता महानगरपालिकेची आर्थिक क्षमता अशी आहे की, ते या प्रकल्पासाठी एक रुपया देखील देऊ शकत नाहीत. त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आम्ही या प्रकल्पासाठी असे नियोजन केले आहे की, केंद्र शासनाचा, राज्य शासनाचा, महापालिकेचा आणि ज्यांनी काम हाती घेतले त्यांचा एकाच वेळेला तेवढ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल अशी व्यवस्था केली आहे. पण जर महानगरपालिकेकडे पैसेच नसतील तर तेथून निधी उपलब्ध होणार नाही आणि जर ते स्पष्ट असेल तर त्यासंदर्भात निधी उपलब्ध करुन द्या असे त्यांनी म्हटले. आज तुम्हाला 200 कोटी रुपयाचे पाण्याचे बिल माफ करावे लागले अशी त्या महानगरपालिकेची स्थिती आहे.त्यांच्या तिजोरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. या महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना तीन महिने पगार दिला नव्हता अशी अवस्था आहे. मग त्याकरता कर्ज काढले. या महानगरपालिकेची अशी अवस्था असताना 700 कोटी रुपयांचा प्रकल्प राबवित असताना महानगरपालिकेचा जो हिस्सा आहे तो जर ते देऊ शकले नाहीत तर ते पैसे राज्य शासन देणार आहे काय? मग ती रक्कम 100 कोटी असेल किंवा 25 कोटी असेल हा मुद्दा होता. म्हणून याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संपूर्ण प्रोजेक्टसाठी राज्य शासनाने 35 कोटी 97 लाख रुपये इतका हिस्सा देण्याचे मान्य केलेले आहे आणि त्यातील हिस्सा सुध्दा दिलेला आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33460.... श्री. भास्कर जाधव ....

केंद्र शासनाने 287.74 कोटी रुपयांचा हिस्सा दिलेला आहे. त्यातील रक्कम सुध्दा या ठिकाणी आलेली आहे. महानगरपालिकेने स्वत:ची आर्थिक स्थिती काय आहे याचा निश्चितपणे अंदाज घेतला असेल. ती त्यांची स्वत:चीच जबाबदारी आहे. त्यामुळे ते जर त्यांची जबाबदारी पार पाडू शकले नाहीत तर शासनाने त्यांची जबाबदारी घेण्याचे काही कारण नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दूषित पाण्याचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(२) * ३३५८० श्री.रमेश शेंडगे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , ॲड.आशिष शेलार , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.भगवान साळुंखे , श्री.विनायक राऊत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दूषित पाण्याचे प्रमाण २५ ते ३० टक्के वाढले असून पाण्याच्या नमुन्याची तपासणीही करण्यात येत नसल्याची बाब दिनांक ७ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक जिल्ह्यामध्ये पाणी शुध्दीकरणासाठी पुरेशी ब्लिचींग पावडरच नाही, तर अनेक जिल्ह्यांमध्ये निकृष्ट दर्जाच्या ब्लिचींग पावडरचा पुरवठा केला जात असल्याचे आढळून आले आहे, ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.लक्ष्मणराव ढोबळे** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

आवश्यक असणारी ब्लिचिंग पावडरची खरेदी विहित प्रक्रियेचा अवलंब करुन स्थानिक स्तरावरच करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये तर दूषित पाणी येतेच पण राज्यातील ग्रामीण भागामध्ये सुध्दा प्रामुख्याने ज्या ठिकाणी दुष्काळी तालुके आहेत, ज्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा होतो अशा बऱ्याच ठिकाणी दूषित पाणी येते. ज्यावेळी आपण भेटी देतो त्या वेळेला तेथील नागरिक दूषित पाण्याबद्दल तक्रारी करतात. टँकरचे जे पाणी आम्ही घरामध्ये ठेवतो त्यामध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्याचा दिवशी अळ्या तयार होत आहेत. आज जर आपण आरोग्य खात्याकडून आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल की, मागील दोन तीन महिन्यांमध्ये कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, कावीळ असे रोग झालेल्या रुग्णांची संख्या वाढलेली आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाला उत्तर देताना 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. अशा प्रकारे लोकांना दूषित पाणी मिळत आहे आणि या संदर्भात या ठिकाणी उपस्थित केलेला प्रश्न ही माझी तक्रार समजून आपण सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्याची माहिती घेणार का ? ऑक्टोबरच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 33580 ..... श्री. रमेश शेंडगे ....

शेवटच्या आठवड्यामध्ये आरेवाडी या एकाच गावामध्ये दूषित पाणी प्यायल्यामुळे जवळजवळ 47 लोकांना ॲडमिट करावे लागले. अशी परिस्थिती असताना शासनाकडून पॉझिटिव्ह उत्तर अपेक्षित आहे. केवळ कवठेमहांकाळ तालुकाच नव्हे तर राज्यात ज्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा होतो त्या ठिकाणी ब्लिचिंग पावडरचा सुध्दा पुरवठा व्यवस्थित होत नाही. या सर्व बाबीची चौकशी करुन शासन कारवाई करणार का ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, एकूण 4 लाख 26 हजार 57 पाण्याचे नमुने माझ्या विभागाने तपासलेले आहेत. 65 हजार 903 नमुने दूषित आढळलेले आहेत. परंतु त्याच्या एकूण क्वालिटीचा जर विचार केला तर त्यामध्ये 15 टक्केच दूषितची टक्केवारी आहे. ग्रामीण भागातील काही तालुक्यांमध्ये पाण्याचे दूर्भिक्ष्य वाढल्यामुळे, पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे आणखी खारट पाणी येणे किंवा त्या ठिकाणचे पाणी दूषित होणे हे प्रकार या टंचाईसदृश्य परिस्थितीमध्ये वाढलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या तालुक्यातील आरेवाडीची माहिती या ठिकाणी सांगितली. सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी समजून त्या ठिकाणची चौकशी करुन त्याचा रिपोर्ट देता येईल. परंतु महाराष्ट्रातील ज्या दूषित पाण्याबद्दलचे रिपोर्ट घेतले जातात आणि 20 टक्केपेक्षा अधिक कंटॅमिनेशन ज्या पाण्यामध्ये आढळून येते त्या पाण्याच्या बाबतीत मात्र यलो, ग्रीन, रेड अशा प्रकारचे लेबल्स लावले जातात आणि ते लेबल लावल्यानंतर ते पाणी जर पिण्यासाठी लायक नसेल तर या ठिकाणचे पाणी पिऊ नये अशा प्रकारचा बोर्ड लावून त्या ठिकाणचे पाणी स्वच्छ करण्यासाठी किंवा शुद्ध करण्यासाठी ज्या पाणी शुद्ध करण्याच्या 8-9 प्रक्रिया आहेत त्या सर्व प्रक्रिया त्या स्त्रोतासाठी वापरल्या जातात ही वस्तुस्थिती आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी आहे की, राज्यामध्ये दूषित पाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. टक्केवारीमध्ये तफावत असू शकते. दूषित पाण्यापासून होणाऱ्या गॅस्ट्रो, कावीळ इत्यादी रोगांमुळे मृत्यू पावलेल्या लोकांचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. राज्यामध्ये सर्वात जास्त दूषित पाण्याचे प्रमाण असलेले तीन जिल्हे कोणते ? शासनाकडे असलेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी दूषित पाणी असण्याची कारणे काय आहेत ? तेथील दूषित पाणी नष्ट करण्यासाठी शासनाने त्या ठिकाणी काय उपाययोजना केली आहे ?

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 33580 .....

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन जिल्हे विचारलेले आहेत. त्यामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये दूषित पाण्याचे प्रमाण अधिक आढळलेले आहे. त्याचबरोबर मुंबई शहरामध्ये दररोज पाण्याचे 200 नमुने घेतले जातात परंतु त्यामध्येही जी टक्केवारी आढळून आली ती 20 टक्केपेक्षा अधिक नाही. संपूर्ण राज्याची जी टक्केवारी आहे ती 20 ते 30 टक्केच्या आत आहे. अशा परिस्थितीत देखील ज्या ठिकाणी दूषित पाण्याचे प्रमाण आढळून येते त्या ठिकाणचे पाणी स्वच्छ करण्यासाठी आम्ही 9 कॅटेगरीमध्ये या सर्व गोष्टी तपासतो. त्या तपासत असताना या बद्दलची जी उपाययोजना आहे ती करीत असताना पाण्याच्या शुद्धतेबद्दल त्या ठिकाणी एक तर आम्ही लेबल लावतो त्यानंतर पाणी शुद्ध करण्याची पावडर टाकून पाणी शुद्ध करण्याचा प्रयत्न करतो. स्त्रोताच्या आजूबाजूला जी घाण किंवा कचरा असेल तो काढून टाकण्याचा प्रयत्न करतो. त्याचबरोबर एखाद्या पाणीपुरवठ्याच्या निमित्ताने एखादा साठाच जर खराब झाला तर त्या ठिकाणचा तो साठा पूर्णपणे काढून टाकून पाण्याचा नवीन साठा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिलेल्या असतात. त्याचप्रमाणे नियमितपणे हे पाणी तपासले जाते तसेच स्थानिक टीसीएल पावडरची सुध्दा आपण व्यवस्था करतो. ही सर्व व्यवस्था स्थानिक संस्थांनी आपापल्या अधिकारामध्ये करावयाची आहे. आम्ही फक्त सूचना देतो आणि दर तीन महिन्याचा पावडरचा साठा त्यांनी त्या ठिकाणी उपलब्ध केला आहे की नाही याची खात्री करण्यात येते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रदूषित पाण्याच्या संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा होते. सन्माननीय सदस्य जे प्रश्न विचारतात त्यांचा हेतू असा असतो की, त्याबद्दल तपशीलवार माहिती मिळावी. परंतु या ठिकाणी उत्तर देत असताना हे खरे नाही, प्रश्न उद्‌भवत नाही अशी उत्तरे दिलेली आहेत. आधीच आपण प्रश्नकर्त्यांच्या भूमिकेवर सरळ शून्य का देऊन टाकता ? दूषित पाणी शुद्ध करण्याचा ब्लिचिंग पावडर हा एकच उपाय आहे का ? इतरही उपाययोजना शासनाने केलेल्या आहेत का ? किती ब्लिचिंग पावडर टाकली की किती पाणी शुद्ध होणार याचे काही तरी प्रमाण असेलच. ब्लिचिंग पावडर पुरेशी आहे की नाही ? ब्लिचिंग पावडर पुरेशी आहे असे जर म्हणणे असेल तर ब्लिचिंग पावडरच्या बाबतीत आपण काही उदाहरणे किंवा तपशील सांगावा की, इतक्या पाण्यासाठी आम्ही इतकी ब्लिचिंग पावडर वापरतो. ब्लिचिंग पावडर टाकून सुध्दा पाणी शुद्ध होत नाही. म्हणून दुसरी काय उपाययोजना केली आहे ?

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33580....

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या प्रश्नाचा अतिशय बारकाईने अभ्यास करुन प्रश्न विचारलेला आहे. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण पहिल्या प्रश्नाच्या दोन ओळी नीटपणे लक्षात घ्याव्यात. त्यामध्ये असा प्रश्न विचारलेला आहे की, मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये दूषित पाण्याचे प्रमाण 25 ते 30 टक्के वाढले असून पाण्याच्या नमुन्याची तपासणी करण्यात येत नसल्याची बाब 7 सप्टेंबर, 2012 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे का ? या प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर जे प्रश्न विचारलेले आहेत त्यामध्ये ज्या ठिकाणी शक्य आहे किंवा जे खरे आहे त्याचे खरे आहे म्हणून उत्तर दिलेले आहे. ज्या ठिकाणी ते शक्यच नाही, प्रश्नच उद्‌भवत नाही त्या ठिकाणी देखील आपल्याला प्रश्न उद्‌भवत नाही म्हणण्यापेक्षा त्यापुढे विस्ताराने उत्तर लिहिले असते तर बरे झाले असते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तशी दुरुस्ती निश्चितपणे करण्यात येईल. एखाद्या गावाच्या पातळीवर असलेल्या टाकीमध्ये किंवा विहिरीमध्ये ब्लिचिंग पावडर टाकल्यानंतर त्या पाण्याचे प्रमाण 34 टक्केपर्यंत असावयास पाहिजे. तसे जर नसेल तर पुन्हा आपण त्याची प्रक्रिया करतो आणि त्यानंतरही जर आपल्याला पाणी खराबच आढळले, पाणी दूषितच आहे असे लक्षात आले तर त्या ठिकाणी आपण रेड लेबल लावतो. त्या पाण्याची स्वच्छता होईपर्यंत लोकांना ते पाणी पिऊ देत नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आपण लक्ष दिले तर लक्षात येईल की, अलीकडे सर्व खात्यांनी 'प्रश्न उद्‌भवत नाही' असे उत्तर देण्याचे धोरण अवलंबिले आहे. प्रश्नाचा रोख असा आहे की, लोकांनी दूषित पाणी पिऊ नये आणि दूषित पाण्यापासून जी काही रोगराई होते त्यापासून रोगांना मुक्ती मिळावी असा प्रश्नाचा रोख असताना जेवढा प्रश्न विचारला आहे तेवढेच उत्तर द्यावयाचे अशा पध्दतीने उत्तर देणे बरोबर नाही. या प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. या प्रश्नाची व्याप्ती आपण लक्षात घ्यावी. सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळ होऊ नये असा प्रश्न विचारण्याचा रोख आहे. माननीय मंत्री महोदयांनी सर्व प्रक्रिया सांगितली. हे पाणी पिण्यासाठी अयोग्य आहे यासाठी आपण लाल टॅग लावतो असे सांगितले.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33580...

श्री. भाई जगताप ...

हे पाणी गावक-यांना किंवा नागरिकांना पिण्यायोग्य करण्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था केली जाते ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : ब्लिचिंग पावडरमधील क्लोरीनचे प्रमाण 20 टक्क्यापेक्षा कमी आढळून आले तर त्या ठिकाणी पाण्याच्या शुद्धतेचा विचार केला जातो. त्याच बरोबर पाण्याची गुणवत्ता सांभाळण्यासाठी बॅक्टेरोलॉजिकल फिल्ड टेस्ट किटस् वितरित केलेल्या आहेत. आरोग्य प्रयोग शाळेचे बळकटीकरण केलेले आहे, जिल्हा आरोग्य व विभागीय भूजल सर्व्हेक्षण यंत्रणेचा आधार घेतलेला आहे, तालुका प्रयोगशाळांना निधी देऊन त्या बळकट करण्यात आलेल्या आहेत. ग्रामविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांची समन्वय समिती करण्यात आलेली आहे. नवीन निकषाप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सर्वेक्षण करताना "लाल" म्हणजे पाणी एकदम खराब, "हिरवे" म्हणजे मध्यम आणि "पिवळे" म्हणजे अल्प जोखीम अशा प्रकारची वर्गवारी करुन पाण्याची तपासणी केली जाते. प्रश्नाचा रोख विचारात घेताना विचारलेल्या प्रश्नाचे मर्यादित स्वरुपात उत्तर देणे बंधनकारक असल्यामुळे तसे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांना या प्रश्नाच्या संदर्भात जी काही माहिती अभिप्रेत असेल ती देण्याची माझी तयारी आहे.

श्री. भाई गिरकर : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी सर्वात जास्त दूषित पाणी असलेले राज्यातील तीन जिल्हे कोणते असा प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. त्या तीन जिल्ह्यामध्ये पिण्याचे पाणी शुद्ध करण्याकरिता कोणती विशेष मोहीम राबविण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी असे दूषित पाणी आहे त्याठिकाणी कोणती पर्यायी व्यवस्था केलेली आहे ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे :मी आता विस्ताराने माहिती देतो. माझ्या विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहिती वरुन औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड या चार जिल्ह्यामध्ये अणुजैविकदृष्ट्या 20 टक्क्यापेक्षा अधिक दूषित पाणी आढळून आलेले आहे. अकोला, वाशिम, बीड, धुळे, जळगाव, नंदूरबार आणि ठाणे या जिल्ह्यामध्ये ब्लिचिंग पावडरमध्ये 20 टक्क्यापेक्षा कमी क्लोरीन आढळून आले.अशाच पध्दतीने मे, जून आणि जुलै 2012 या महिन्यांचा तक्ता विभागाकडे उपलब्ध आहे. हा तक्ता मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. साधारण साडेचार लाख पाण्याचे नमुने तपासले गेलेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. त्या पध्दतीने सूचना करणे, मार्गदर्शने करणे, स्थानिक स्वराज्य संस्था करीत असलेल्या कामांना मदत करणे हा पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा विषय असून त्या पध्दतीने तो विषय हाताळण्यात येत आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड येथील आर.टी.ओ. कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३) * ३४१८५ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील आर.टी. ओ. कार्यालयात २१ पदे मंजूर असताना या कार्यालयाचा कारभार तीन अधिकारी आणि पाच कर्मचाऱ्यांवर सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे या कार्यालयाच्या कार्यकक्षेत तब्बल १२० दलाल कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर.टी.ओ. मधील १३ पदे रिक्त असल्यामुळे दैनंदिन कामकाजात मोठ्या अडचणींचा सामना कर्मचाऱ्यांना करावा लागत असून नागरिकांनाही त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू १३ पदे मंजूर करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) बीड येथील आर.टी.ओ. कार्यालयात २१ मंजूर पदांपैकी १४ पदे भरलेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही, कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामकाज करून घेण्यात येते.

(४) व (५) रिक्त असलेली ७ पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

श्री. धनंजय मुंडे : बीड जिल्ह्यातील आरटीओ कार्यालयामध्ये २१ पदे मंजूर आहेत. छापील उत्तरामध्ये १४ पदे भरलेली असून ७ पदे रिक्त असल्याचे नमूद केलेले आहे. रुजू न झालेले कर्मचारी, निलंबित कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता या कार्यालयामध्ये फक्त ९ कर्मचारी कार्यरत आहेत. या कार्यालयाच्या माध्यमातून शासनाला १२ लाख रु. महसूल मिळातो. उपप्रादेशिक परिवहन अधिका-यांनी उपायुक्तांना दिलेल्या माहितीमध्ये या कार्यालयामध्ये फक्त ९ कर्मचारी कार्यरत असल्याचे नमूद केलेले आहे. शासनाने आदेश काढून देखील जे अधिकारी/कर्मचारी या कार्यालयात रुजू झाले नाहीत त्यांच्यावर काय कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे ?

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी विस्ताराने प्रश्न विचारण्या ऐवजी तो थोडक्यात विचारला तर अन्य सन्माननीय सदस्यांवर अन्याय होणार नाही.

श्री. धनंजय मुंडे : नियुक्तीचे आदेश काढून देखील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या कार्यालयात रुजू झालेले नाहीत. त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? उर्वरित रिक्त पदे निश्चित किती कालावधीत भरण्यात येतील ?

श्री. गुलाबराव देवकर : बीड जिल्ह्याच्या डेप्युटी आरटीओ कार्यालयामध्ये एकूण २१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १४ पदे भरलेली असून ७ पदे रिक्त आहेत. श्री. सूर्यवंशी या अधिका-यांचे

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असिस्टण्ट आरटीओ यापदावर पोस्टींग केले आहे. त्यांनी विनंती करुन असे सांगितले आहे की, मला या विभागामध्ये १० वर्षे झालेली आहेत. म्हणून बीड किंवा औरंगाबाद सोडून अन्य विभागामध्ये पोस्टिंग द्यावी. औरंगाबाद कार्यालयामध्ये असिस्टण्टला गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला होता. हे त्यांच्या शेजारी बसलेले होते. त्यांना त्या संदर्भात धमक्या येत आहेत. म्हणून हा विभाग सोडून दुसरीकडे बदली दिली तर बरे होईल असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून ते त्या ठिकाणी हजर होत नाहीत. त्याबाबतीत त्यांना नोटीस देऊन विचारणा केलेली आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येत आहे. डेप्युटी आरटीओ कार्यालयामध्ये मोटार वाहन निरीक्षकाचे एक पद रिक्त असून पदोन्नती समिती त्याबाबतीत निर्णय घेत आहे. दोन महिन्याच्या आत हे पद भरले जाईल. दुय्यम मोटार वाहन निरीक्षकाची २ पदे रिक्त आहेत. त्या बाबतीत एमपीएससीकडून निवड यादी आलेली आहे. एक महिन्याच्या आत पोस्टिंग करण्यात येईल. रोखपालाचे पद रिक्त आहे. ते पद एक महिन्याच्या आत भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. वाहनचालकाची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच कायम पदाची देखील व्यवस्था करीत आहोत. परिवहन हवालदाराचे पद रिक्त आहे. त्याबाबतीत लवकर निर्णय घेण्यात येईल. एक ते दोन महिन्यामध्ये ही सर्व पदे भरण्याची व्यवस्था करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले :आरटीओ कार्यालयासाठी जागा उपलब्ध आहे. प्रस्ताव शासन स्तरावर धूळ खात पडलेला आहे. या प्रस्तावावर ताबडतोबीने निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : होय.

----

...५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे शहरात लावण्यात आलेल्या अनधिकृत होर्डिंग्जमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत

**(४) * ३३९८७ श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात लावण्यात आलेल्या अनधिकृत होर्डिंग्जमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार होर्डिंग्जमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांविरुध्द तसेच अनधिकृत होर्डिंग्ज लावणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) नमूद कालावधीत अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज लावणाऱ्यांविरुध्द सातत्याने कारवाया केल्या जातात. मार्च, २०१२ ते नोव्हेंबर, २०१२ अखेर पुणे शहरामधील एकूण ४०७ अनधिकृत होर्डिंग्ज काढण्यात आली असून यानंतरही अशा स्वरूपाची कार्यवाही चालू ठेवण्यात आलेली आहे.

श्री. अनिल भोसले : पुणे शहरामध्ये ज्या जाहिरात फलकांचे नूतनीकरण होत नाही अशा फलकांच्या बाबतीत कोणती कारवाई करण्यात येणार आहे, होर्डिंग्ज पॉलिसीमुळे पुणे महापालिकेचे ८० ते ९० कोटी रु.चे नुकसान होत आहे. शासनस्तरावर होर्डिंग्ज पॉलिसी प्रलंबित आहे. ही होर्डिंग्ज पॉलिसी मंजूर करुन ती पुणे महापालिकेला पाठविली तर त्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल. या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. भास्कर जाधव : हे होर्डिंग्ज कोठे आणि कशा प्रकारे लावायचे या संदर्भात एकत्रित पॉलिसी राज्य शासन जाहीर करणार आहे. डीसी रुल्स प्रमाणे होर्डिंग्ज लावण्यासंबंधी एकाच महापालिकेने धोरण ठरवावे अशी तरतूद नाही. पुणे महापालिकेने त्यांची एक स्वत:ची होर्डिंग्ज पॉलिसी तयार करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविली. शासनाच्या धोरणानुसार एकाच महापालिकेची पॉलिसी मान्य करता येत नाही. त्या पॉलिसीमध्ये त्रुटी होत्या. त्यांची पूर्तता करण्यासाठी शासनाने पुणे महापालिकेला कळविलेले आहे. शासन लवकरच एकत्रित पॉलिसी जाहीर करणार आहे.

...नंतर श्री गिते...

अशुध्द प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 01:30

ता.प्र.क्र.33987...

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहराचे अनधिकृत होर्डिंग्जमुळे विद्रुपीकरण होत आहे. होर्डिंग्जसंदर्भात नगरविकास विभागाने पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून माहिती मागविली होती. ती माहिती आयुक्तांनी एका वर्षापूर्वी नगरविकास विभागाकडे पाठविलेली आहे.ती माहिती नगरविकास विभागाकडे एका वर्षापासून प्रलंबित आहे. यासंबंधी टेंडर सुध्दा काढून झालेले आहे. होर्डिंग्जच्या धोरणाच्या माध्यमातून पुणे महागरपालिकेला वार्षिक 3 लाख रुपये महसूल मिळत होता. आता होर्डिंग्जच्या माध्यमातून 127 कोटी रुपयांचा महसूल पुणे महानगरपालिकेस मिळणार आहेत. यासंदर्भात टेंडर काढण्यात आलेले आहे. ते टेंडर काही लोकांना मिळालेले आहे. या बाबतची सर्व प्रोसीजर झालेली असताना केवळ महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसाठी सदर प्रकरण प्रलंबित आहे. यामुळे पुणे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे यास कोण जबाबदार आहे व होर्डिंग्ज पॉलिसी येत्या दोन महिन्यात शासनाच्या वतीने जाहीर करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये ज्यावेळी टेंडर काढले गेले होते, त्यावेळी पुणे महानगरपालिकेने तशा प्रकारची पॉलिसी ॲडॉप्ट करण्याचे ठरविले होते. या गोष्टीलाच काही मंडळींनी न्यायालयात आव्हान दिलेले आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे ती बाब न्यायालयीन झालेली आहे. मी मघाशीच सांगितले की, एकाच महानगरपालिकेची अशा प्रकारची होर्डिंग्ज पॉलिसी असू शकत नाही. संपूर्ण राज्यासाठी या संदर्भात एकच पॉलिसी असली पाहिजे. त्यासाठी हा विषय थांबलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतात त्या पध्दतीने शासनामुळे पुणे महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे आभार यासाठी मानणार आहे की, राज्य शासनाने संपूर्ण राज्यातील महानगरपालिकांसाठी एकाच प्रकारचे होर्डिंग्ज पॉलिसी ठरविण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय शासनाने कधी घेतला आहे यासंबंधी माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. पुणे महानगरपालिकेने आपल्या मनाने शासनाशी सल्ला मसलत न करता तसेच यासंबंधी शासनाचे धोरण ठरत असताना टेंडर काढले असेल तर ती बाबच मुळामध्ये अयोग्य ठरते असा एक भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, होर्डिंग्ज धोरण कधी ठरणार आहे, त्या धोरणामध्ये विविध जाहिरातदारांना, विविध भागात होर्डिंग्ज लावण्याच्या संदर्भात परवानगीचा विचार करणार आहे.

2...

ता.प्र.क्र.33987...

डॉ.नीलम गोऱ्हे...

काय की संपूर्ण शहरासाठी एक टेंडर काढावयाचे आणि त्या टेडरकर्त्याला काय करावयाचे ते त्याने करावयाचे असे काही निर्णय या धोरणाच्या अनुंषंगाने घेतला आहे काय ? राम और शाम, सीता और गिता सारखे कोणालाही समजत नाही की, कोणती टेंडर्स अधिकृत आहेत आणि कोणती टेंडर्स अनधिकृत आहेत. हे धोरण अस्तित्वात आणत असाल तर पुणे महानगरपालिकेच्या बाबतीत योग्य तो निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून आपण बैठक आयोजित करावी. राज्य स्तरावर होर्डिंग्ज धोरण ठरविले जाणार आहे तर पुणे महानगरपालिका क्षेत्रात त्या धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्य शासनाने या बाबतीत 2003 मध्येच धोरण ठरविलेले आहे. नंतर काढलेल्या टेंडरमध्ये राज्य शासनाची थोडीशी अशी भूमिका आहे की, पुणे महानगरपालिकेने वेगवेगळे चार झोन तयार केले. या चार झोनमध्ये कोठे-कोठे होर्डिंग्ज लावता येतील, त्यासंबंधी जागा निश्चित केल्या येथेपर्यंत ठीक आहे. जागा निश्चित केल्यानंतर तसेच टेंडर काढल्यानंतर एकाच माणसाने जागा फिक्स केली असेल व तेथे होर्डिंग्ज लावले ते ठीक आहे. परंतु ते होर्डिंग्ज या माणसामार्फतच लावावे अशा प्रकारची बाब शासनाच्या धोरणाला धरुन नसल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय शासन स्तरावर प्रलंबित आहेत. सन्माननीय सदस्या म्हणतात त्या पध्दतीने यासंदर्भातील पॉलिसी लवकरात लवकर आणली जाईल.

श्री.अनिल भोसले : ही न्यायालयीन बाब झाली आहे अशी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली आहे. या बाबतीत न्यायालयाने कोणत्याही प्रकारचा स्टे दिलेला नाही. पुणे महानगरपालिकेने सदरचा प्रस्ताव पुन्हा मंजूर करुन शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावा अशा प्रकारचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, या बाबतीत संपूर्ण राज्यासाठी एकत्रित पॉलिसी जाहीर केली जाणार आहे. राज्य सरकारच्या पॉलिसीच्या अनुषंगानेच आम्ही ही पॉलिसी तयार केली आहे आणि ती् पॉलिसी मंजूर करण्यासाठी शासनाकडे पाठविलेली आहे. सध्या ती पॉलिसीची फाईल शासन स्तरावर प्रलंबित आहे. पुणे महानगरपालिकेच्या या पॉलिसी फाईलला विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात येईल काय?

3...



ABG/ प्रथम श्री.शिगम 01:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33987...

श्री.भास्कर जाधव : संपूर्ण राज्यासाठी अशा पध्दतीचे एकत्रित धोरण असते, त्यावेळी एका शहरासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी देणे शक्य नसते. परंतु ज्यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत, त्या निविदाकारांना स्वत:चे लायसन्सचे नुतनीकरण करण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही. महानगरपालिकेने या कारणास्तव त्यांच्या लायसन्सचे नूतनीकरणच करावयाचे नाही ही पध्दत योग्य आहे असे मला वाटत नाही.

-------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर जिल्ह्यातील नवे चंद्रपूर म्हणून उल्लेखित केल्या जात असलेल्या म्हाडा वसाहतीतील रस्ते बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(5) * 34498** **श्रीमती शोभा फडणवीस** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चंद्रपूर जिल्ह्यातील नवे चंद्रपूर म्हणून उल्लेखित केल्या जात असलेल्या म्हाडा वसाहतीत 70 कोटी रुपये खर्च करुन रस्त्याचे बांधकाम करण्यात आल्याचे दिनांक 10 ऑगस्ट, 2012 रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पहिल्याच पावसात रस्ते उखडल्याने बांधकामात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री..सचिन अहिर,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) हे खरे नाही. चालू वर्षी झालेल्या अती पावसामुळे काही ठिकाणी रस्त्याचा वरचा थर निघालेला होता. सदर कामाची दुरुस्ती करारनाम्याप्रमाणे Defect liability period अंतर्गत कंत्राटदारांकडून करुन घेण्यात आली आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी दिलेले उत्तर पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे. रस्ता, तसेच नाल्या बांधून एक वर्षाचा देखील कालावधी झालेला नाही. चंद्रपूर येथे अतिवृष्टी झालीच नाही. तरी सुध्दा चंद्रपूर येथे अतिवृष्टी झाल्यामुळे रस्ता उखडला अशा प्रकारचे लेखी उत्तर विभागाकडून देण्यात आले आहे. मी या जागेची पाहणी करुन आले आहे. त्या ठिकाणी असे लक्षात आले की, रस्त्यावर टाकण्यात आलेला सिमेंटचा थर अतिशय कमी होता. त्या

5...



ता.प्र.क्र.34498..

श्रीमती शोभा फडणवीस...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिमेंटच्या थराखाली जे गोटे होते, ते काढून पाहिले तर तेथे फर्निस ऑईलचा वापर केला गेला आहे. तसेच नाल्यांचे बांधकाम पूर्णपणे खचलेले होते. तसेच रस्त्यामध्ये मोठया प्रमाणात खड्डे पडलेले होते. तेथे म्हाडाच्या इमारती बांधावयाच्या आहेत, तेथे अठरा-अठरा फुट उंचीचे रस्ते बांधून लोकांच्या मनामध्ये भीती निर्माण झाली आहे. म्हाडा वसाहतीतील रस्ते बांधकामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, त्याची माननीय मंत्री महोदय चौकशी करतील काय ?:

श्री.सचिन अहिर : होय.

-------

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्ह्यातील जनतेला शुध्द पाणी पुरवठा करणाऱ्या 125**

**यंत्रणा अयशस्वी ठरल्याबाबत**

**(6) * 34971 श्री.संदिप बाजोरिया , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक 25643 ला दिनांक 2 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यात जनतेला दारातच शुद्ध पाणी या हेतूने जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या योजनांपैकी सुमारे 125 योजना अयशस्वी ठरल्याचे माहे ऑगस्ट, 2012 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जनतेला शुद्ध पाणी मिळावे म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.लक्ष्मणराव ढोबळे** : (1) हे खरे नाही

(2), (3), व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नास उत्तर दिलेले आहे. यवतमाळ जिल्हयातील जनतेला शुध्द पाणी पुरवठा करण्याऱ्या 125 यंत्रण अयशस्वी ठरल्या आहेत. यवतमाळ जिल्हयात जलशुध्दीकरणाच्या यंत्रणा बंद पडल्या आहेत, त्या योजना केव्हापर्यंत कायान्वित करण्यात येणार आहेत. यवतमाळ जिल्हयात ग्रामीण भागात टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या पाण्यात ब्लिचींग पावडर टाकले जात आहे किंवा नाही याची तपासणी करुन ते शुध्द पाणी पुरवठयाचे काम लवकरात लवकर करण्यात येईल काय ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : होय.

---------

7...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाकरिता**

**राज्य शासनाने तयार केलेल्या आराखडयाबाबत**

**(7) * 34560 श्री.विनायक राऊत** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाकरिता राज्य शासनाने आराखडा तयार केला आहे व त्यामुळे या भागात अनेक वर्षापासून रहात असलेल्या झोपडपट्टीवासीयांच्या स्थलांतराचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, विमानतळ खाजगीकरणांमार्फत विमानतळाचे विस्तारीकरण करण्याच्या नावाने विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीचा वापर व्यापारी उद्योगाकरिता करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास स्थलांतर, कधी कोठे व कोणत्या विकासकांमार्फत केले जाणार आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) मुंबईतील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एकूण 802.03 हेक्टर अधिसूचित क्षेत्राकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली असून त्यांचेकडून अंतरिम प्रारुप विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. तसेच सदर विमानतळ परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचा नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार आहेत.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 1991 च्या विनियम 33 (10) परिशिष्ट 4 मधील खंड 3.11 मध्ये राज्य शासनाकडील / प्राधिकरणाकडील झोपडपट्टयांनी व्याप्त जमिनी महत्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प (Vital Public Project) यासाठी आवश्यक असतील तर अशा जागेवरील झ ोपडपट्टयांचे पुनर्वसन खाजगी जागेवर करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदी शासनाकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) सह कलम 154 खालील दिनांक 29.03.2007 च्या निदेशानुसार केंद्र शासनाच्या वैधानिक प्राधिकरण / सार्वजनिक उपक्रम / प्राधिकरण किंवा विभाग तसेच त्यांनी केलेले संयुक्त उपक्रम यांच्या किंवा त्यांनी केलेले संयुक्त उपक्रम यांच्या किंवा त्यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जमिनींनाही लागू केलेल्या आहेत.

8...



ABG/ प्रथम श्री.शिगम 01:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

सदर तरतुदीनुसार छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रामधील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड ही संयुक्त उपक्रमातील कंपनी प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे वैमानिक वापरासाठी आवश्यक असलेल्या सुमारे 42.15 हेक्टर झोपडपट्टी व्याप्त क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित 82.88 हेक्टर झोपडपट्टी व्याप्त क्षेत्राकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आराखडा तयार केलेला नाही. सबब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या अंतरिम प्रारुप विकास आराखड्यामुळे तेथील झ ोपडपट्टीवासीयांच्या स्थलांतराचा प्रश्न निर्माण झाला आहे असे म्हणणे संयुक्तीक नाही.

(2) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेल्या अंतरिम प्रारुप विकास आराखड्यानुसार अंदाजे 53.88 हेक्टर क्षेत्र म्हणजे संपूर्ण क्षेत्राच्या 6.72 % एवढे क्षेत्र व्यापारी प्रयोजनासाठी दर्शविलेले आहे.

(3) विमानतळाच्या जागेवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरीता मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. (MIAL) यांनी मे. हाऊसिंग डेव्हलपमेंट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (HDIL) यांची करारनाम्यानुसार नेमणूक केलेली आहे.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. (MIAL) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेवरील पात्र झ ोपडीधारकांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. त्यानुसार कुर्ला, मुलूंड, अंधेरी (पूर्व), माहूल येथील वेगवेगळ्या 7 ठिकाणी सुमारे 27216 सदनिकांच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे व सुमारे 9000 सदनिका तयार असून, सदर इमारतींना मूलभूत सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(4) झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करण्याचे काम प्रगतीपथावर असून पुनर्वसनाची वैकल्पिक जागा जागा उपलब्ध झाल्यानुसार पर्यायी सदनिका बांधण्याचे काम सुरु करण्यात येत आहे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मुंबई विमानतळाच्या आजूबाजूच्या झोपडपट्टीवासीयांचा हा प्रश्न आहे. MIAL आणि HDIL मध्ये झालेल्या कराराप्रमाणे या ठिकाणच्या झ ोपडपट्टीधारकांचे पुर्नवसन करणे भाग होते. परंतु नुकताच एमएमआरडीएने प्रारुप आराखडा तयार केला. त्यामध्ये अंतर्भूत केलेला आणि वगळलेला असे दोन भाग केले. अंतर्भूत केलेल्या

9...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..

जागेचे क्षेत्रफळ फक्त 42.15 हेक्टर आणि वगळलेले क्षेत्र 82.88 हेक्टर एवढे आहे. मोठया जागेवर सदरच्या झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत. नवीन आराखडयातून वगळलेल्या क्षेत्रावरील झ ोपडीधारकांच्या पुर्नवसना बाबत शासनाने कोणती ठोस भूमिका घेतलेली आहे हे या उत्तरावरुन स्पष्ट होत नाही. MIAL आणि HDIL यांच्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून करार झाला आहे. त्याप्रमाणे या ठिकाणच्या सर्व रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने निश्चित कालावधी ठरविलेला आहे काय? प्रश्न क्र.4 ला उत्तर देताना शासनाने असे नमूद केले आहे की, झ ोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करण्याचे काम प्रगतीपथावर असून पुनर्वसनाची वैकल्पिकजागा उपलब्ध झाल्यानुसार पर्यायी सदनिका बांधण्याचे काम सुरु करण्यात येत आहे. झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चिततेचा दिनांक कोणता धरलेला आहे ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34560...............

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे खरे आहे की, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाकरिता 802 हेक्टर जागा विकसित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. 42.25 आणि 82.22 हेक्टर जागेवर झोपड्या उभारण्यात आलेल्या आहेत. ॲरोनॉटिकल झोन-1 मध्ये त्या झोपड्या मोडत असल्यमुळे त्यांचे पुनर्वसन करणे बंधनकारक आहे. त्याच पध्दतीने ॲरोनॉटिकल झोन-2 मध्ये उर्वरित झोपड्यांचा समावेश होत असला तरी त्यांचेही पुनर्वसन करण्याचे काम शासन करणार आहे. त्याकरिता वेगवेगळ्या योजना आहेत. एसआरए योजना जाहीर करावी लागेल किंवा 33(10) अथवा 33(9) खाली पुनर्वसन करावे लागेल. झोपडपट्टी धारकांची पात्रता प्रचलित धोरणानुसार तपासण्याचे काम सुरु आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे सुप्रीम कोर्टाच्या गाईडलाईन्स प्रमाणे सन 2000 ची कट ऑफ लाईन या झोपड्यांना लागू केलेली आहे. सन 2000 पूर्वी झोपडी खरेदीचा व्यवहार झाला अशा केसेस पात्र करण्याचा निर्णय 1 जानेवारी, 2012 रोजी झाला. मात्र त्या फाईलवर मुख्यमंत्र्यांची सही झालेली नाही हे खरे आहे काय, असल्यास या संदर्भातील निर्णय कधी घेण्यात येईल? आहे त्याच जागेवर झोपडयांचा पुनर्विकास व्हावा अशी योजना व्हायबल झाली आहे. त्याबाबत शासन आग्रह धरणार आहे काय?

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी झोनिंग आणि डीपीचा उल्लेख केला आहे. ॲरोनॉटिकल झोन 1 आणि 2 मध्ये पब्लिक हाऊसिंग, धोबी व्यवसाय, रिक्रिएशन ग्राऊंड, गार्डनचे असलेले आरक्षण डिलिट झाले आहे, त्याबद्दल शासनाचा निर्णय झालेला आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी तीन प्रश्न मांडले आहेत. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला त्या संदर्भातील निर्णयाच्या फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांची सही होणे बाकी आहे का, या बाबतची माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नसली तरी ती माहिती माननीय सदस्यांना अवगत केली जाईल. झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. हे विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम आहे. तेथील परिस्थिती, उपलब्ध असणारी जागा या सर्व गोष्टींचा विचार करुन प्राधान्याने तेथील लोकांना त्याच ठिकाणी पुनर्वसित करण्याचे धोरण शासनाने हाती घेतले आहे. डीपीमध्ये जी काही आरक्षणे होती ती डिलिट झाली असतील तर ती आरक्षणे पुन्हा लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

..2..

ता.प्र.क्र.34560...............

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला झोपड्यांनी वेढा घातला आहे. या विमानतळासाठी नवीन दोन एअर स्ट्रीप व्हाव्यात म्हणून तेथील झोपड्या हटवून 802 हेक्टर जागेचा परिसर विकसित केला जात आहे. आज तेथे दोन एअर स्ट्रीप होऊ शकत नाहीत अशा प्रकारचा अहवाल आला आहे हे खरे आहे काय? तेथील झोपड्या हटवून जागा मोकळी केल्यानंतर झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी कुर्ला, मुलुंड, अंधेरी, माहूल आदी ठिकाणी नवीन घरे बांधण्यात येणार आहेत. तेथे मोकळा करण्यात येणारा परिसर कमर्शियल वापरासाठी किंवा हॉटेल उभारणीसाठी दिला जाणार आहे हे खरे आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नगरविकास विभागामार्फत जागा मोकळी करुन एअरपोर्ट प्राधिकरणाच्या ताब्यात देणे हा पहिला टप्पा आहे. तेथे दोन एअरस्ट्रीप होणार की नाही हे एअरपोर्ट प्राधिकरण ठरविणार आहे. त्या संदर्भातील तांत्रिक अहवालाबद्दल सांगणे अवघड आहे. सध्या जागा मोकळी करुन देणे हे पहिले काम आहे.

सभापती महोदय, एमआयएएल कंपनीला सरकारी जागा दिल्यासारखे होईल असे माननीय सदस्य म्हणाले. टेंडर फ्लोट करुनच ही जागा देण्याचा निर्णय झालेला आहे. असा निर्णय झालेला असला तरी माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे खाजगी किंवा कमर्शियल बेसीसवर जागा दिली जाणार नाही. एअरपोर्टबाबत नवीन कन्सेप्ट आलेली आहे. त्यानुसार थोडी जागा विकासाचा भाग म्हणून आरक्षित केली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 9000 सदनिका बांधून तयार आहेत असे उत्तरामध्ये म्हटले आहे. धरण बांधण्याकरिता आधी पुनर्वसन मग धरण ही कन्सेप्ट मान्य केली आहे. त्यानुसार झोपडीधारकांना आधी घरे द्यावीत. उपलब्ध घरांमध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन केव्हापर्यंत केले जाईल?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, झोपडीधारकांना त्या ठिकाणाहून हलविण्याचा निर्णय अजून झालेला नाही. मुंबई शहराचा नवीन विकास आराखडा तयार होत आहे. त्याबाबत सजेशन्स, ऑब्जेक्शन मागविल्या जातील. या संदर्भातील घरे बांधण्याचे काम आता सुरु आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, त्यांचे पुनर्वसन करण्याचा विचार अगोदरच करण्यात आला आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : अनेक झोपडपट्टीवासियांना वाशी नाका येथे हलविण्यात आले आहे. झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम कोणत्या एजन्सीला देण्यात आले आहे? ही एजन्सी काम व्यवस्थितपणे पार पाडीत आहे का याचा आढावा सरकार घेणार आहे का? 6.72 टक्के एवढे क्षेत्र व्यापारी प्रयोजनासाठी दर्शविण्यात आले आहे. यामधून सरकारला कोणता फायदा होणार आहे?

श्री.भास्कर जाधव : जे झोपडीधारक आहेत त्यांची पात्रता ठरविण्यासाठी एजन्सी नेमली जात नाही. हे काम महसूल विभागामार्फत केले जाते. 6.72 हेक्टर जमीन कमर्शियल वापरासाठी आरक्षित केली आहे. या विषयाला अजून अंतिम स्वरुप आलेले नाही.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कामामध्ये मोठया प्रमाणावर अपहार, भ्रष्टाचार व अनियमितता आढळून येत असल्याबाबत**

**(८) * ३४९९५ श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अपहार, भ्रष्टाचार व अनियमितता आढळून येत असल्याने ही कामे ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांमार्फत न करता जिल्हा परिषद स्तरावर निविदा मागवून करण्याबाबत नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जून २०१२ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, प्रा.लक्षणराव ढोबळे यांच्याकरिता :** (१) होय, सदरहू निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर, राज्य घटनेच्या ११ व्या अनुसुचीनुसार तसेच, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची आखणी, अंमलबजाणी व देखभाल दुरुस्ती तसेच अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुती ही जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. त्यासाठी प्रत्येक गावात ग्रामपंचातीच्या नियंत्रणाखाली ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमध्ये वाद निर्माण होऊन पाणीपुरवठा योजनेचे काम रखडल्यास अशा योजना जिल्हा परिषदांमार्फत पूर्ण करण्याबाबत दिनांक २/१२/२०११ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या समितीच्या व्यवहारांवर ग्रामपंचायतींचे नियंत्रण आणण्यासाठी तसेच निधीचा अपहार रोखण्यासाठी समितीचे बँक खाते चालविण्यासंदर्भात दि.२/१२/२०११ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामांमध्ये पारदर्शकता यावी यासाठी दि.२९/०२/२०१२ च्या परिपत्रकान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करताना ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्याची कार्यपध्दती स्वीकारता येणार नाही. त्याप्रमाणे संबंधित लोकप्रतिनिधींना दि.२६ नोव्हेंबर, २०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, राज्याला दुष्काळाचा सामना करण्याची वेळ आलेली आहे. ज्या पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठया प्रमाणात अपहार व भ्रष्टाचार आढळला आहे त्या योजना रखडलेल्या आहेत. या योजना रखडण्याबाबत जबाबदार कोण आहे? ज्यांच्या चुकीमुळे योजना मुदतीत पूर्णत्वास जाऊ शकल्या नाहीत त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे? ज्या योजनांमध्ये अपहार व भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झाले आहे त्या संदर्भात कारवाई करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी किंवा तहसीलदार यापैकी

..५....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कोणाची आहे? मुदतीत योजना पूर्ण न झाल्यामुळे आता वाढीव निधी लागणार आहे. हा वाढीव निधी शासन जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देणार आहे काय? शासन एका परिपत्रकामुळे करोडो रुपयांचा निधी वाया घालविणार आहे की केंद्र सरकारकडे पुन्हा निधी मिळण्याबाबत विनंती करणार आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 73 व्या घटना दुरुस्तीनंतर पाणीपुरवठा हा विषय स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आला आहे. राज्य शासनाने स्वीकारलेल्या धोरणानुसार पाणीपुरवठा योजनांची आखणी, बांधकाम, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे दिली पाहिजे. कदाचित बांधकाम करताना काही कारणांमुळे विलंब झाला किंवा ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये वाद निर्माण झाला तर त्याबाबत हस्तक्षेप करु शकतो. त्या संदर्भात शासनाने अनेक सर्क्युलर काढली आहेत. गटबाजीच्या कारणामुळे काही प्रमाणात कामे थांबली आहेत. आता निर्णय घेतला असून सरपंच व ग्रामसेवक यांना विश्वासात घेऊनच काम केले पाहिजे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 34995....

श्री. रणजित कांबळे ....

कोणताही चेक काढण्याच्या अगोदर त्यांनी अगोदर किती पैसे विथ्ड्रो केले आहेत याची माहिती दिल्याशिवाय तसेच ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीने मान्यता दिल्याशिवाय त्यांना कोणताही चेक काढता येणार नाही अशा प्रकारचा एक निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच ते हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे काढू करु शकणार नाहीत असाही निर्णय जीआर मध्ये घेण्यात आलेला आहे. आपल्याकडील अनेक ग्रामपंचायतीमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणाने काम थांबलेले आहे. अशी जी वादग्रस्त गावे आहेत तेथील प्रमुखाना बोलावून सीईओ आणि कार्यकारी अभियंता यांनी हा वाद संपवावयाचा आहे. वाद मिटला नाही तर या ग्रामपंचायतीचे सर्व अकौंट जिल्हा परिषद आपल्या ताब्यात घेईल व ती कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पूर्ण केली जातील. या कामांमध्ये जर काही गैरव्यवहार झाला तर पोलीस केस करुन वसुलीची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या विभागाचे मंत्रिपद माननीय ढोबळे साहेबांकडे आल्यापासून पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या कमी झाल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. प्रत्येक अधिवेशनात पाणी पुरवठा योजनेत भ्रष्टाचार झाल्याचा प्रश्न असतोच असतो. पाणी पुरवठयाची सर्व कामे ग्रामसमितीकडे दिलेली असल्यामुळे सभागृहात भ्रष्टाचाराची प्रकरणे उपस्थित होत असतात. या कामांची जबाबदारी सरपंच आणि ग्रामसेवकांकडे असते. भ्रष्टाचार झाला तर अटक कुणाला करावयाची असा प्रश्न पडतो. त्यामुळे पूर्वी पाणी पुरवठा योजनेचे काम शासकीय यंत्रणेकडे होते ते काम पुन्हा शासकीय यंत्रणेकडे द्यावे अशी शिफारस पंचायत राज समितीने सुध्दा केलेली आहे. त्यामुळे पाणी पुरवठयाची कामे शासकीय यंत्रणेकडे देण्याचा निर्णय कधी पर्यंत घेतला जाणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, घटनेमध्ये दुरुस्ती झाल्यानंतर पाणी पुरवठयाची कामे स्थानिक स्वराज्य संस्थेला देण्यात आलेली आहेत. अधिकार आणि जबाबदारीचे काम स्थानिक स्वराज्य संस्थेला देण्यात आलेले आहे. पाणी पुरवठयाची योजना गावाचीच असते आणि त्या पाण्याचा उपयोग त्या गावातील लोकांनाच होत असतो त्यामुळे पाणी पुरवठा योजनेचे काम स्थानिक स्वराज्य संस्थेला देण्यात आलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 220 गावांमध्ये वाद झाल्यामुळे त्या ठिकाणच्या पाणी पुरवठयाच्या योजनेचे काम थांबलेले आहे. या गावांमध्ये

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 34995....

श्री. रणजित कांबळे....

13.32 कोटी रुपयांची अनियमितता झाली असून त्यामधून 9.75 कोटी रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. शिल्लक राहिलेली रक्कम लवकरच वसूल केली जाईल व या ठिकाणची कामे पूर्ण केली जातील.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, यासंदर्भातील अधिकार सीईओ यांना दिलेले आहेत. परंतु जर सीईओ संबंधितांवर गुन्हे दाखल करीत नसतील तर त्याला जबाबदार कोण ? ज्या योजना अपूर्ण आहेत, त्या योजनांना वाढीव निधी लागणार आहे त्यामुळे याबाबतीत शासनाचे नेमके धोरण काय राहणार आहे ? या योजनांना किती निधी जाईल व हा निधी किती दिवसात दिला जाईल ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सगळी जबाबदारी पाणी पुरवठा समितीच्या अध्यक्षांवर आणि सचिवांवर असते. ज्या पाणी पुरवठा योजनेचे काम 80-90 टक्के पूर्ण झालेले आहे व त्याचे बाकी काम शिल्लक असेल तर यासंदर्भात संबंधितांचा प्रस्ताव आल्यानंतर शासन त्या योजनांना निश्चितपणे पैसे उपलब्ध करुन देईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, पाणी पुरवठा योजनेतील 50 लाख ते 2.5 कोटी रुपयांपर्यंतच्या कामाची तांत्रिक तपासणी जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंत्यांनी करावयाची असते. 2.5 कोटी ते 5 कोटी रुपयांच्या कामाची तांत्रिक तपासणी जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता यांनी करावयाची असते. परंतु एकही अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता तांत्रिक तपासणी करीत नाही. आमच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तसे विभागाला कळवले आहे. त्यामुळे यासंदर्भातील तांत्रिक तपासणी करण्याचे सक्त आदेश संबंधितांना दिले जाणार आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 2.5 कोटी रुपयांच्या कामाची तांत्रिक तपासणी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी करावयाची असते व 2.5 कोटी रुपयांच्या वरील कामाची तांत्रिक तपासणी करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

करीत असतात. हीच पध्दत आपल्या राज्यात असून 2.5 कोटीच्या वरील कामाची तांत्रिक तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता करीत असतात. 2.5 कोटी रुपयांच्या आतील कामाची तांत्रिक तपासणी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता करीत असतात.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगाव जिल्हा परिषदेतील काही शाळांमध्ये पाणी साठा व वीजपुरवठा नसतांनाही 'जलमणी' (आर.ओ.) पुरवठा केल्याबाबत**

**(9) * 33952 श्री.मनीष जैन** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगांव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये पाणी साठवण क्षमता व वीज पुरवठा / वीज जोडणी नसतांनाही जलशुध्दीकरण यंत्र, जलमणी (आर ओ) वाटप करण्यात आले असल्याचे तालुकास्तरीय चौकशी अहवालात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर अहवालात जलमणी (आर.ओ) अनियमितता झाली असल्याचा ठपका ठेवण्यात आला असल्याची बाब उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे,

(5) असल्यास, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांचे करिता** : (1), (2) (3) (4) व (5) जळगाव जिल्हयातील काही शाळांमध्ये वीज जोडणी व पाणी साठवण क्षमता नसतांना जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यात आली असल्याचे आढळून आले आहे. याबाबत तीन अधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरु करण्यांत आली असून ती पूर्ण झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या प्रकरणात ज्या तीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्या तीन अधिकाऱ्यांची नावे तसेच त्यांचा हुद्दा काय आहे ? सदर कामाची चौकशी केव्हापर्यंत पूर्ण केली जाणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या तीन अधिकाऱ्यांचा हुद्दयाची माहिती माझ्याकडे आहे परंतु त्यांची नावे आता माझ्याजवळ उपलब्ध नाहीत. त्यातील अधिकाऱ्यांचे हुद्दे पुढील प्रमाणे आहेत. 1) डेप्युटी सीईओ, आयसीडीएस 2) डीस्ट्रीक्ट सोशल वेल्फेअर ऑफिसर 3) डीस्ट्रीक्ट ॲनिमल हजबंडरी ऑफिसर या तिघांना 434 शाळांची तपासणी करावयाची असून त्यांनी आतापर्यंत 320 शाळांची तपासणी केलेली आहे. या महिन्याच्या अखेर पर्यंत तपासणीचे काम पूर्ण होणार असून त्यांनतर उर्वरित कारवाई केली जाईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत महानगरपालिकेतील सफाई कामगारांना मोफत सदनिका देण्याबाबत.**

**(10) * 34672 श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक 30764 ला दिनांक 11 जुलै, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महानगरपालिका सेवेत 25 वर्षे पूर्ण करणारे सफाई कामगार अथवा सेवेत असताना मृत्यू झालेल्या कामगारांच्या पात्र वारसाला मालकी तत्वावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत मोफत सदनिका देण्याचा निर्णय राज्य सरकारने 19 जुलै, 2012 रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सफाई कामगारांच्या वसाहतीचे स्वरुप काय असणार आहे,

(3) असल्यास, या योजनेअंतर्गत किती सफाई कामगारांना लाभ होणार आहे,

(4) असल्यास, संबंधित सदनिकेचे काम सुरु केलेले आहे काय,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (1) महानगरपालिका/नगरपालिकातील ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांचा सेवा नित्तीनंतर किंवा सेवेत असताना मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक 22.10.2008 च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे, हे खरे आहे.

(2), (3), (4) व (5) सदर शासन निर्णयान्वये पात्र सफाई कामगारांना किंवा मयत सफाई कामगारांच्या पात्र वारसास महानगरपालिका/नगरपालिकाकडून मालकी हक्काने 269 चौरस फूट चटई क्षेत्राच्या सदनिका वाटप करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर योजनेंतर्गत सफाई कामगारांसाठी सदनिका बांधण्याकामी गरजू 'ड' वर्ग महानगरपालिका व नगरपालिकांना मागणीनुसार अनुदान दिले जाते त्याअनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.

श्री.सुभाष चव्हाण :सभापती महोदय, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या श्रमसाफल्य योजनेंतर्गत महानगर पालिकेतील सफाई कामगारांना मोफत घरे देण्याचा जो क्रांतीकारक निर्णय झाला आहे त्याचे मी मनापासून अभिनंदन करतो. मुंबई महानगरपालिकेत एकंदर किती सफाई कामगार आहेत, 25 वर्षे काम केलेले सफाई कामगार किती आहेत, निधन झालेल्या सफाई कामगारांची संख्या किती आहे, सफाई कामगारांना जी मोफत घरे दिली जाणार आहेत त्या घरांचे स्वरुप काय आहे, सफाई कामगारांना एक वर्षाच्या आत घरांचे वितरण केले जाणार आहे काय, सफाई कामगारांना 350 चौरस फूटाचे घर दिले जाणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र.:34672....

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सफाई कामगारांना 269 चौरस फुटाचे घर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. किती सफाई कामगारांना मोफत घर दिली जाणार आहेत असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या सफाई कामगाराने किमान 25 वर्षे सेवा केली असेल, किंवा सेवेत काम करीत असतांना ते मृत पावले तर त्यांच्या वारसांना घरे दिली जाणार आहेत. जी मोफत घरे दिली जाणार आहेत त्यातील 90 टक्के भार राज्य शासन उचलणार असून 10 टक्के भार संबंधित नगरपालिका किंवा महानगरपालिकेने उचलावयाचा आहे. राज्यामध्ये किती कामगार आहेत व किती महानगरपालिकेत घरे देण्याचे काम सुरु आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, शासनाकडे यासंदर्भात 3 महानगरपालिकांचेच प्रस्ताव आले असून त्यांना शासनाकडून निधी वितरीत करण्यात आलेला आहे. राज्य शासनाने 10.92 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद या वर्षीच्या बजेट मध्ये केलेली आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सफाई कामगारांच्या घरासाठी राज्य शासनाने जे 9 कोटी रुपये दिलेले आहे ते कोणकोणत्या महानगरपालिकांना दिलेले आहेत ? श्रमसाफल्य योजनेअंतर्गत आतापर्यंत किती सफाई कामगारांना घरे वितरीत करण्यात आलेली आहेत ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्य शासनाने 9 कोटी 39 लाख 45 हजार 179 रुपये आतापर्यंत वितरित केले असून हे पैसे काटोल नगरपरिषद, सोलापूर महानगरपालिका, अहमदनगर महानगरपालिका आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला वितरित करण्यात आलेले आहेत. कोणकोणत्या महानगरपालिकेत किती सफाई कामगारांना घरे दिलेली आहेत असा प्रश्न सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई आणि सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विचारला आहे. परंतु सफाई कामगारांची नावे खूप असल्यामुळे ही सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, ही योजना 22.10.2008 साली मंजूर झाली होती. ज्यांची सेवा 25 वर्षे पूर्ण झालेली असेल अशा सफाई कामगारांना मोफत घरें दिली जाणार आहेत अशी माहिती मंत्री महोदयांनी दिलेली आहे. मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या 4-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र.:34672....

श्री. विजय गिरकर ....

पिढया पीटी केस मध्ये राहत आहेत. आपण आतापर्यंत 9 कोटी रुपये दिलेले आहेत त्यामुळे हें 9 कोटी रुपये कोणकोणत्या महानगरपालिकेला दिलेले आहे व तीन वर्षात आतापर्यंत किती घरे बांधून पूर्ण झालेली आहेत ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34672...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संबंधातील माहिती मी आताच दिलेली आहे. मुंबई महापालिकेचे 2508 एवढेच कर्मचारी आहेत. त्यापैकी फक्त 50 सदनिका उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या क्षणाला मुंबई महानगरपालिकेचा एकही प्रस्ताव आलेला नाही.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्वातंत्र्याच्या लढयामध्ये योगदान दिलेल्या व हैद्राबाद मुक्तीसंग्रामात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(11) * 34532 डॉ.नीलम गोऱ्हे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) स्वातंत्र्यांच्या लढयामध्ये योगदान दिलेल्या व हैद्राबाद मुक्तीसंग्रामात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून मिळणाऱ्या सुविधांमध्ये दुजाभाव करण्यात येत असून यामध्ये समानता आणावी व अन्य प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याची मागणी मराठवाडा स्वातंत्र्यसैनिक संघर्ष समितीने माहे सप्टेंबर, 2012 मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या मागण्यांबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे,

(3) असल्यास, घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2), (3) व 4) स्वातंत्र्यसैनिकांच्या काही मागण्या आर्थिक स्वरुपाच्या आहेत. उदा. निवृत्तीवेतनात वाढ करणे, निवृत्तीवेतनावर महागाई भत्ता मंजूर करणे. तर काही मागण्या प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत. स्वातंत्र्यसैनिकांच्या मागण्यांची शासनस्तरावर छाननी करण्यात येत आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या संबंधातील हा प्रश्न आहे. आजही या स्वातंत्र्यसैनिकांना शासन दरबारी हेलपाटे घालावे लागत आहेत. या स्वातंत्र्य सैनिकांच्या मागण्यांसंबंधात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. तरी देखील त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वातंत्र्य लढ्यासाठी ज्यांनी कष्ट घेतले आपले जीवन व्यतीत केले त्यांची हेळसांड करणे बरोबर नाही. आपण मागे निदेश देऊन देखील त्यांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत. तेव्हा अर्थसंकल्पीय अधिवेशन पूर्वी त्यांच्या ज्या न्याय्य मागण्या आहेत त्या शासन मान्य करेल काय आणि त्या संबंधातील शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याबाबत अनेकांनी मागण्या केलेल्या आहेत. श्री.विक्रमराव घुगे पाटील, अध्यक्ष व अन्य पदाधिकारी हैद्राबाद मुक्ती संग्राम व मराठवाडा स्वातंत्र्य सैनिक संघर्ष समिती, मराठवाडा विभाग जालना यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे निवेदने दिली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती यांनी सुद्धा

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34532...

प्रा.फौजिया खान..

माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. तसेच अनेकांची वैयक्तिक निवेदने देखील मिळालेली आहेत. यासंबंधी सगळ्या विभागांकडून अभिप्राय तयार करून घेण्यात आलेले आहेत. आज देखील आपण स्वातंत्र्य सैनिकांना अनेक सवलती देत आहोत. दिनांक 4 जुलै 1995 रोजीचा शासन निर्णय निर्गमित केला पाहिजे अशी स्वातंत्र्य सैनिकांची मागणी आहे. त्याप्रमाणे दुरूस्तीचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच केंद्रा प्रमाणे मानधन असावे अशी देखील मागणी आहे. आपण नुकतीच त्यांच्या मानधनामध्ये दोन हजार रूपयांनी वाढ केली आहे. तसेच, डी.ए. द्यावा अशा प्रकारची देखील मागणी करण्यात आली आहे. आता आपण दहा हजार रूपये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी दिलेले आहेत. यापूर्वी संपूर्ण अपंगत्व असले तरच आपण दहा हजार रूपये एकदाच देत होतो. आता प्रतिवर्षी दहा हजार रूपये देण्यात येत आहेत. यासोबत त्यांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये देखील समाविष्ट केले आहे. त्यांची अन्य जी मागणी आहे त्याबाबत शासन विचार करीत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्य मंत्री ज्या पद्धतीने उत्तर देत आहेत त्याचे आम्हाला दु:ख होत आहे. स्वातंत्र्य सैनिकांनी बलिदान दिलेले आहे. आपले आयुष्य घालविले आहे. त्यांना पाच-दहा हजार रूपये देऊन काहीच होणार नाही. आपण सूर्य मावळण्याची वाट बघाता आहात काय ? हे सर्व मावळतीला लागले आह. यांची संख्या फार थोडी आहे. त्यांच्या शेवटच्या काळातील आरोग्याची किमान जबाबदारी शासनाने पूर्णपणे उचलली पाहिजे. त्यांची दुसरी मागणी अशी आहे की, प्रवास, वेतन, मानधनासंबंधीच्या सवलती केंद्राप्रमाणे मिळाल्या पाहिजेत. ती आपण पूर्ण करणार आहात काय ? त्यांची तिसरी मागणी भेटी संबंधातील आहे. आपण त्यांना भेट देखील देत नाही. तेव्हा माझी तिसरी मागणी आहे की, आपण यात पुढाकार घेऊन सर्वांना एकत्र आणून त्यांच्या ज्या किमान मागण्या आहेत त्या येत्या 8-15 दिवसामध्ये मार्गी लावाव्यात.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, स्वातंत्र्य सैनिकांच्या मागण्यांच्याबाबत आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर पुन्हा एकदा बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात येईल.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34532...

**सभापती** : मंत्रिमहोदया, हैद्राबाद मुक्ती संग्राम किंवा अन्य मुक्ती संग्रामातील जे स्वातंत्र्यवीर आहेत.त्यांच्याकडे आपण अत्यंत काळजीपूर्वक पाहणे गरजेचे आहे. आज त्या सर्वांचे वय झालेले आहे.. वैद्यकीय सवलती, पेन्शनच्या सवलती यासंबंधी जो फरक आहे तो त्यांना मिळाला पाहिजे अशी त्यांची भावना आहे आणि ती खरी आहे. मी आपला प्रश्न राखून न ठेवता सन्माननीय मुख्यमंत्री यांना विनंती करतो की, माझ्या दालनात आपण या प्रश्नासंबंधी चर्चा करू या. त्यात मी आपणास देखील बोलावितो व आपण या बाबतीत लवकरात लवकर प्रयत्न केला तर त्यास न्याय दिल्या सारखे होईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबात**

**सभापती** : आज सर्वश्री विनोद तावडे, दिवाकरजी रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये "राज्यात गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा लागू करावा या मागणीसाठी ह.भ.प.बंडातात्या कराडकर यांच्या नेतृत्त्वाखाली दिनांक 19 डिसेंबर 2012 रोजी सुमारे 1 लाख वारकऱ्यांनी विधान भवनावर आणलेला मोर्चा" यासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असून. ती माझ्याकडे आलेली आहे. आजच्या कामकाजामध्ये असा कोणताही विषय नसल्यामुळे मला हा प्रस्ताव चर्चेसाठी घेता येणार नाही. तथापि, यासंबंधी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी एक मिनिटामध्ये आपले विचार मांडावेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दुष्काळासह अन्य महत्त्वाचे विषय चालल्यामुळे चर्चा घेता येत नाही हे मान्य आहे. गोवंश हत्येच्या बंदीसंबंधी मोठा मोर्चा विधान मंडळावर आलेला आहे. त्यांनी मांडलेले प्रश्न महत्वाचे आहेत. मी सातत्याने दोन वर्षे त्यांचे शिष्टमंडळ सरकारकडे घेऊन जात आहे. सरकारने धर्माधिकार समिती मार्फत जे नियम केले आहेत त्याचे देखील पालन होत नाही. तेव्हा आलेल्या मोर्च्याच्या प्रतिनिधींना शासनाने भेटून या विषयासंबंधी कडक धोरण आणून ते अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आजच्या कामकाजामध्ये अशा प्रकारचा कोणताही विषय नसल्यामुळे मी ही प्रस्तावाची सूचना मी माझ्या अधिकारात नाकारली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती केली आहे त्यासंबंधी मी शासनाला जरूर कळवेन.

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील व श्री.कपिल पाटील यांनी 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आता येथे उपस्थित नाहीत. मात्र, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील उपस्थित आहेत, त्यांनी थोडक्यात विचार मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे मोर्च्याला गेले आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर सभागृहात चर्चा सुरू आहे. कोकणातील शेतकऱ्यांबाबात आणि मच्छीमारांबाबत शासनाने स्वतंत्रपणे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण याबाबत निदेश दिले तर तो ही प्रश्न मार्गी लागू शकेल.

**सभापती** : नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील व श्री.कपिल पाटील यांनी दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील येथे उपस्थित नाहीत. सदर सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडली आहे. आजचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव बघितला तर तो महाराष्ट्रातील दुष्काळी आणि पाणी प्रश्नासंबंधातील आहे हे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे यासाठी वेगळी परवानगी देण्याची गरज नाही.

...7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यानी "डोंबिवली येथे अल्पवयीन मुलीवर झालेले अत्याचार व तरूणीची छेडछाड रोखण्याच्या प्रयत्नात तरूणाचा गेलेला बळी व राज्यात स्त्रियांवर वाढलेले अत्याचार" या संबंधी नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. त्यांना मी एक मिनिटामध्ये विचार मांडण्याची संधी देत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 02:10

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, डोंबिवलीमध्ये लागोपाठ दोन घटना घडल्या. एका घटनेमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला तर दुसऱ्या घटनेमध्ये तरुणीची छेडछाड करणाऱ्यांना रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचा बळी गेला. राज्यामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण सारखे वाढत आहे. मुंबई शहरातून जवळपास 150 हून अधिक मुली व स्त्रियांचे अपहरण झालेले आहे. त्यातील 50 जणी अजून सापडलेल्या नाहीत, ही गंभीर परिस्थिती आहे. दिल्ली येथे घडलेली घटना आपणा सर्वांना माहीत आहे. आता त्यापेक्षा महाराष्ट्र आणि मुंबई ही वेगळी राहिलेली नाही हे सांगण्यासाठी मी मुद्दाम हा प्रस्ताव दिलेला आहे. स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. हा केवळ गृह विभागाचा प्रश्न नाही. या प्रश्नास अनेक कंगोरे आहेत. तेव्हा या विषयावर अत्यंत विस्ताराने चर्चा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाकडे केवळ स्त्रियांचे प्रश्न म्हणून पाहू नये. पुरुष प्रधान संस्कृती आणि पुरुष वर्चस्ववादी वृत्तीतून अत्याचार वाढत आहेत. त्यासाठी शासनाने वेगळ्या पध्दतीची उपाय योजना केली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात तशी उपाय योजना होताना दिसत नाही. हा केवळ गृह विभागाचा प्रश्न आहे म्हणून त्याकडे पाहत राहतो आणि त्याचा मोठा परिणाम होत आहे. या गोष्टीचा सर्वात मोठा परिणाम असा झालेला आहे की, आज माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर मुलींच्या गळतीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. मुलींना बाहेरगावी कॉलेजमध्ये शिकण्यासाठी पाठविण्याचे प्रमाण अत्यंत कमी झालेले आहे. याचा मोठा परिणाम मुलींच्या सबलीकरणावर होत आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर होत आहे. तेव्हा या प्रश्नावर स्वतंत्र चर्चा होणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : मी या संदर्भातील निर्णय आज दिवसभरात देईन.

शुक्रवार, दिनांक 14 डिसेंबर, 2012 रोजी माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "पटपडताळणीच्या नावाखाली विषय शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची परवानगी नाकारण्यात येत असल्यामुळे लक्षावधी विद्यार्थ्यांचे नुकसान होणे" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्या सूचनेच्या संदर्भात मी माझा निर्णय राखून ठेवला होता. या बाबत उद्या, गुरुवार, दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी विशेष बैठकीत एक तासाची अल्पवेळ चर्चा घेण्याचे मी ठरविले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

त्याच प्रमाणे मंगळवार, दिनांक 18 डिसेंबर, 2012 रोजी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, शिवेसना पक्षाचे गट नेते श्री.दिवाकर रावते, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री.सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार यांनी "राज्यात गर्भातील भ्रृणापासून ते वयोवृध्द महिलापर्यंत सर्वजण असुरक्षित असून महिलांवरील अत्याचारात मोठ्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्या सूचनेच्या संदर्भात मी या विषयावर दोन तासाची चर्चा उद्या, गुरुवार दिनांक 20 डिसेंबर 2012 रोजी विशेष बैठकीत घेण्याचे ठरविले आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 10 डिसेंबर, 2012 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : दिनांक 10 डिसेंबर, 2012 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (उद्योग मंत्री ) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2009-2010 या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॉयल लिमिटेड, नागपूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचा सन 2011-2012 या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षाचा अनुक्रमे एकोणचाळीस व चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 2002-2003 व 2003-2004 या वर्षाचा अनुक्रमे बत्तिसावा व तेहेतिसावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, या ठिकाणी सन 2002-2003 आणि 2003-2004 या वर्षांचे वार्षिक अहवाल ठेवण्यात आले. हे अहवाल मागील दहा वर्षापूर्वीचे आहेत. कोकणच्या विकासाबाबत हे शासन नेहमीच उदासीन राहिले आहे. कोकणाला सापत्नतेची वागणूक नेहमीच दिली जाते. कोकणावर अन्याय केला जात आहे. जर अहवाल देण्यासाठी दहा-दहा वर्षे लागत असतील तर कोकणचा विकास कसा हाईल ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांच्याशी मी सहमत आहे. परंतु ही बाब 1994-1995 सालची आहे. या महामंडळामध्ये स्वेच्छा निवृत्ती योजना लागू केल्यामुळे त्या महामंडळात कार्यरत असलेल्या 328 कर्मचाऱ्यांपैकी 315 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतलेली आहे. आता त्या महामंडळामध्ये वर्ग-3 चे 3 कर्मचारी आणि वर्ग-4 चे 10 कर्मचारी कार्यरत आहेत.

सभापती महोदय, अहवाल वेळेत सादर करण्याबाबत आपणाकडून यापूर्वी निर्देश देण्यात आलेले आहेत. त्या निर्णयाचे पालन करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. या संदर्भात दिल्ली येथील महालेखापरीक्षकांना पत्र दिलेले आहे. तेव्हा उर्वरित अहवाल तातडीने दाखल करण्याची दखल घेतली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अन्य अहवाल केव्हा सादर करण्यात येतील याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली नाही.

**सभापती** :अन्य अहवाल सभागृहापुढे तातडीने ठेवण्यात येतील असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून एक बाब सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत म्हणाले की, कोकणावर अन्याय केला जात आहे आणि माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, मी त्यांच्याशी सहमत आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी काही अंशी सहमत आहे असे म्हणालो. या संदर्भात आपणास चर्चा करायची असेल तर त्यास माझी तयारी आहे.

**सभापती** : वार्षिक अहवाल व लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-------

..6..



AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 02:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वित्तीय महामंडळाचा दिनांक 31 मार्च 2011 रोजी संपलेल्या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.रणजित कांबळे ( पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती अलका देसाई (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा दहावा व अकरावा अहवाल सभागृहाला सादर करते.

**सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा दहावा व अकरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सादर करणे

श्री. धनंजय मुंडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा विसावा व एकविसावा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा विसावा व एकविसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा विसावा व एकविसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे एकोणसत्तर, एकशे सत्तर व एकशे एकाहत्तरावा अहवाल सादर करणे

श्री. मोहन जोशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, विधानपरिषद आश्वासन समितीचा सन 2009च्या पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या अधिवेशनातील आश्वासनांबाबतचा कार्यवाहीदर्शक अहवाल अनुक्रमे 169, 170 व 171 आपल्या अनुमतीने मी सभागृहास सादर करीत आहे.

आदरणीय महोदय, आश्वासन समितीला कार्यरत असताना माझ्या कार्यकाळात निदर्शनास आलेल्या काही बाबी व त्या अनुषंगाने समितीने केलेल्या काही शिफारशी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर तीन महिन्यात म्हणजेच 90 दिवसांच्या आत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविणे आवश्यक आहे व त्याची पूर्तता विहित मुदतीत करता न आल्यास त्यासाठी होणाऱ्या विलंबाची कारणे समितीला कळविणे आवश्यक आहे. या बाबतीत समितीने आपल्या या पूर्वीच्या अहवालात तीव्र भावना व्यक्त करुनही सदरहू अहवालातील बरीचशी आश्वासने विहित मुदतीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाहीत वा समितीला विलंबाची कारणे वेळेत कळविण्यात आलेली नाहीत, ही बाब गंभीर आहे.

मंत्रालयातील संसदीय कार्य विभाग हा सर्व मंत्रालयीन विभाग व विधानमंडळ सचिवालय या दोहोंमधील कामकाजामध्ये समन्वय ठेऊन व प्रलंबित कामकाजाचा आढावा घेऊन त्याचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्याचे महत्वाचे कार्य करीत असल्याने आश्वासन समितीच्या प्रत्येक बैठकीस संसदीय कार्य विभागाच्या सचिव/उप सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्याबाबतचा निर्णय माझ्या कार्यकाळात समितीने पहिल्यांदाच घेतला असून समितीचे कामकाज गतिमान करण्यास निश्चितच सहाय्य झाले आहे.

आश्वासन समितीचा समिती प्रमुख म्हणून मला या ठिकाणी नमूद करण्यास आनंद वाटतो की, आश्वासन समितीच्या मागील 10-12 वर्षातील प्रलंबित आश्वासनांचा माझ्या कालावधीत पाठपुरावा करुन मागील अनुशेष भरुन काढण्यात आमच्या समितीला यश आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मोहन जोशी हे या सभागृहामध्ये अमूक इतक्या आश्वासनांची पूर्तता केली असे सांगून आपली पाठ थोपटून घेत आहेत. या सदनामध्ये माझ्या कारकीर्दीमध्ये एवढी आश्वासने दिली होती. तसेच माझ्या कार्यकाळात समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या आश्वासनांची पूर्तता करण्यास सरकारला भाग पाडले असे आपण आम्हाला सांगा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे ऐकून घ्यावे. तसेच आश्वासनांची मागील प्रलंबित विवरणपत्रे विभागनिहाय करुन आणि त्या त्या विभागाच्या प्रधान सचिव/सचिवांना प्रलंबित आश्वासनांची विवरणपत्रे उपलब्ध करुन व त्याबाबत केलेल्या कार्यवाही बाबतच्या माहितीसह समितीपुढे समक्ष बोलाऊन आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विलंबा बाबतची कारणमिमांसा समितीने जाणून घेण्याची पध्दत माझ्या कार्यकाळात नव्यानेच सुरु करण्यात आली असून त्यामुळे मागील प्रलंबित आश्वासनांचा निपटारा झपाट्याने करण्यास तसेच, आश्वासनांचे महत्व ओळखून त्यांचा वेळेत निपटारा करणे आवश्यक असल्याची बाब मंत्रालयीन स्तरावरील अधिकाऱ्यांना पटवून देण्यात आमच्या समितीला यश आले आहे. यामुळे प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा तर झालाच तथा मंत्रालयीन विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सभागृहातील आश्वासनांबाबत अधिक जागरुकता निर्माण झाली आहे.

समितीच्या एकूण कामकाजात समितीवरील माझ्या सहकारी सदस्यांनी बैठकींना उपस्थित राहून व कामकाजात सक्रीय सहभाग घेऊन योगदान दिल्यानेच समितीला सन 1993 पासूनचे मागील प्रलंबित कामकाज उरकून सन 2010 च्या पावसाळी अधिवेशनापर्यन्तच्या आश्वासनांची स्थिती अद्ययावत करणे शक्य झाले आहे.

शासनाच्या सर्व मंत्रालयीन विभागांना समितीच्या वतीने माझी विनंती आहे की, अधिवेशन काळातील आश्वासनांवरील कार्यवाही बाबतची माहिती पुढील अधिवेशनापर्यंत विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्याच्या दृष्टीने सतर्क राहून त्या दृष्टीने कार्यवाही करावी जेणेकरुन, सभागृहात विविध माध्यमातून उपस्थित करण्यात येणाऱ्या समाजातील तळा-गाळातील जनतेच्या प्रश्नांना वेळीच न्याय मिळून संसदीय परंपरेवरील त्यांचा विश्वास दृढ होण्यास सहाय्य होईल व सभागृहातील तद्वतच समितीच्या कामकाजाला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, अशी मला आशा आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी...

समितीच्या वतीने माझे मनोगत व्यक्त करण्यास मला सभागृहाचा अमूल्य वेळ दिल्याबद्दल माननीय सभापती महोदयांचे व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानतो.

धन्यवाद !

**सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे एकोणसत्तर, एकशे सत्तर व एकशे एकाहत्तरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

**पृ.शी./मु.शी.**: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती अलका देसाई (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा पहिला अहवाल सादर करते. समितीची पहिली बैठक शुक्रवार, 14 डिसेंबर, 2012 रोजी दुपारी 3.00 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. या बैठकीमध्ये माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यांच्या रजेचा अर्ज विचारात घेण्यात आला. श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स. यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते अर्थसंकल्पीय सत्र कालावधीमध्ये दिनांक 27 मार्च ते 20 एप्रिल 2012 व दिनांक 5 ते 8 एप्रिल 2012 हे सुट्टीचे चार दिवस वगळून एकूण 21 दिवस विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याबाबत माननीय सदस्यांनी दिलेल्या अर्जावर समितीने विचार विनिमय केला. उपरोक्त बैठकींना अनुपस्थित असल्याबाबत सदस्यांनी दिलेल्या अर्जातील रजेचे कारण ग्राह्य मानून त्यांना उक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित राहण्यास अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. समितीची शिफारस सभागृहाने संमत करावी असा मी प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीकरिता अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : मी मंजूर केलेल्या नियम 93 अन्वये सूचना सहसचिव वाचून दाखवतील.

**सहसचिव** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी मान्यता प्राप्त अनुदानित शाळांमधील 126 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन बंद करण्याचा दिलेला निर्णय अन्यायकारक असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील यांनी "कांद्री कन्हान (ता.पारशिवनी, जि. नागपूर) येथील राजीव मूकबधिर निवासी शाळा व अंजनाबाई वासनिक मतिमंद मुलांची शाळा या शाळांतील गैरव्यवहार प्रकरणी अनेक तक्रारी करुनही या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे कन्हान येथील श्री. पोहोनकर यांनी आत्महत्त्या करण्याची दिलेली सूचना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे शहरात वाघोली-केसनंद रस्त्यावरील भारतीय संस्कृती दर्शन आयुर्वेद महाविद्यालयाच्या चौथ्या मजल्याच्या स्लॅबचे काम सुरु असतानाच दि. 18.12.2012 रोजीच्या सुमारास कोसळून मजूर ठार झाल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यातील जिगांव प्रकल्पाला 20 वर्षापूर्वी मंजुरी मिळालेली असूनही या प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "एक्सलसियर एज्युकेशन सोसायटी या संस्थेने केलेले बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे नसल्याचे आढळून आल्यामुळे ठाणे तहसीलदारांनी संस्थेला मंजूर केलेली जमीन शासन जमा करण्या बाबतचे आदेश देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडे केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी "मुंबई आणि राज्यातील सन 2005 पूर्वी विना अनुदानित/कायम विना अनुदानित शाळेत नेमणूक झालेले आणि 2005 नंतर अनुदानावर आलेले सर्व सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांच्या नेमणुका 2005 पूर्वीच्या असूनही जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश देऊनही अंमलबजावणी न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "नियमित पदे व वेतनश्रेणीवर कॉम्प्युटर, आय.टी., बी.कॉम. तसेच बी.एड. विषयक शिक्षक नेमण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "मुंबई बांद्रा येथील लिलावती हॉस्पिटल बंद पाडून तेथे पंच तारांकित हॉटेल बनवून त्याचा व्यावसायिक वापर करण्याचा असवलेला डाव" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "मुंबईतील दादर येथील स्वामी नारायण मंदिरासमोर एका महिलेला अज्ञात इसमाने धारदार शस्त्राने भोसकल्याची दि.18.12.12 रोजी घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजाबाबत

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 93 अन्वये पाच निवेदने प्राप्त झाली आहेत. ती आजच्या ऐवजी उद्या घेण्यात येतील.

मी आता सदनाचे कामकाज तहकूब करीत आहे. सदनाची बैठक पुन्हा दुपारी 3.00 वाजता सुरु होईल आणि त्यानंतर नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा घेण्यात येईल. आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेल्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चेसाठी आज मी एक तासाचा वेळ देण्याचे ठरविले आहे. त्यावेळी पूर्वीच्या प्रलंबित असलेल्या लक्षवेधी सूचना आणि आजच्या लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्याच्या दृष्टीने माझा प्रयत्न आहे.तसेच नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा अडीच तासामध्ये उत्तरासह सदरहू विषयावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे.त्याचबरोबर आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली शासकीय विधेयके आपल्या सर्वांच्या सहकार्याने आज मंजूर करुन घ्यावयाची आहेत.

श्री.जयवंतराव जाधव (खाली बसून) : सभापती महोदय,अर्धा तास चर्चेबाबत काय करणार?

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली अर्धा तासाची चर्चा घ्यावी की नाही हे मी अजून ठरविलेले नाही. जर संधी मिळाली तर ती देखील दण्यात येईल.

(यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 2.31 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.** : महानगरपालिका (चौथी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. L OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 50 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 50 मागे घेतो.

**उप सभापती** : सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 50 मागे घेण्यात आले आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

**मु.शी** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, विक्रम काळे, मोहन जोशी, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, संजय दत्त, रमेश शेंडगे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. अमरसिंह पंडित, जयदेव गायकवाड, एम.एम.शेख, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अमर राजुरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, जयवंतराव जाधव, राम पंडागळे, प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु )

**उप सभापती** : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांचे भाषण अपूर्ण होते. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सभागृहात उपस्थित असलेले राज्यमंत्री श्री. गुलाबराव देवकर यांच्याकडे सर्व जबाबदारी आहे.

श्री. गुलाबराव देवकर : माननीय मंत्री महोदय, दोन मिनिटांमध्ये सभागृहात येत आहेत.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी या ठिकाणी उभा आहे आणि मराठवाड्यातील जनता तिकडे उभी आहे. या दुष्काळाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेची मराठवाड्यातील जनता एका पायावर उभे राहून वाट पाहात आहे. बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दुष्काळाचे चटके बसत आहेत. खरीप पिकाने मराठवाड्यातील जनतेच्या हातामध्ये खापर दिले. खापराच्या दिव्यातून कधी वाती पेटणार या आशेवर मराठवाड्यातील जनता शासनाकडे डोळे लावून वाट पाहात आहे. कापसाची पूर्ण वाढ होऊ शकली नाही. कापसाची बोंडे पूर्ण कोमेजून गेली. हे दृश्य पाहून शेतकऱ्याचे हृदय सुध्दा कळवळून गेले आहे. आज गावागावामध्ये विकण्यासाठी कापूस शिल्लक नाही पण गावागावामध्ये दलाल मात्र कापूस मिळेल या आशेने फिरत आहेत.

...3...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

"कापसाच्या गावातुनी जाग आली नागव्यांना, उजेडाचे दान आता सूर्य मागे काजव्यांना" अशी एकूण त्या शेतकऱ्यांची परिस्थिती आहे. आमचा सूर्यासारखा तेजस्वी शेतकरी उजेडाच्या दानासाठी या नागव्यांकडे पाहात आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका महाराष्ट्र शासनाने बजवावी अशी मी आग्रहाची विनंती करणार आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शेतकऱ्यांच्या कापसाला 5268 रुपये भाव द्यावा अशी आग्रहाची मागणी आणि प्रस्ताव पाठविला. पण केंद्र शासनाने 3900 रुपये भाव जाहीर केला आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, या भावामधील जी तफावत आहे ती राज्य शासनाने स्वीकारुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना द्यावी. जे व्यापारी कापूस निर्यात करतात त्यांना 4 टक्के प्रोत्साहनपर शासन मदत करते. जे जिनिंग-प्रेसिंगचे मालक आहेत किंवा जे स्वत: जिनिंग-प्रेसिंग चालवितात त्यांना या चार टक्के प्रोत्साहनपर रकमेचा उपयोग झाला तर निश्चितपणे त्याचा फायदा होऊ शकेल. आज आपण जे तेल आयात करतो त्यावर एकेकाळी 90 टक्केपर्यंत आयात शुल्क होते. आज ते शुल्क शून्य टक्क्यावर आणलेले आहे. गॅट करारानुसार 300 टक्के आयात शुल्क आकारता येऊ शकेल अशा प्रकारच्या तरतुदी आहेत. त्यामुळे आपण आग्रहपूर्वक केंद्र शासनाकडून जे खाद्यतेल आयात केले जाते त्या खाद्यतेलावर किमान 60 ते 70 टक्के आयात शुल्क आकारले जावे अशा प्रकारचा प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, रब्बीचे पीक गेले. आमच्याकडे ज्वारी कमरेइतकीही वाढली नाही. मराठवाड्यात त्याला बाटूक म्हणतात. हे बाटूक सुध्दा आज हाती पडणार नाही अशा प्रकारचे चित्र आहे. त्यामुळे परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे. विंधण विहिरी शेवटच्या आचक्या देत आहेत. फेब्रुवारीनंतर अनेक ठिकाणच्या विंधण विहिरी आटणार आहेत, मृत्यूपंथास जाणार आहेत. त्या ठिकाणी आपण कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहोत याचेही नियोजन राज्य शासनाने या सभागृहामध्ये उद्‌धृत करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पाणी वाटप लवादाने मराठवाड्यातील 300 टीएमसी पाण्यापैकी जे 203 टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये उपलब्ध आहे ते 203 टीएमसी पाणी अडविता येईल अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. या 203 टीएमसीपैकी आपण किती पाणी अडवू शकलो हे सुध्दा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

एकदा राज्य शासनाने जाहीर केले पाहिजे. गोदावरी खोऱ्यामध्ये पाच उपनद्या आहेत. या पाच उपनद्या आणि गोदावरी खोरे जर अडविले तर 203 टीएमसी पाणी मराठवाड्यातील जनतेला मिळू शकेल आणि त्यामुळे जवळजवळ 20 हजार गावांचा पाण्याचा प्रश्न मिळणार आहे. हे सर्व पाणी आंध्र प्रदेशमध्ये वाहून जाते. आंध्र प्रदेशचे सरकार आपल्या अर्थसंकल्पात तरतूद करुन ते पाणी अडविते. आपल्या राज्य शासनाने सुध्दा या विषयाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. कारण आमच्या मराठवाड्यातील मायमाऊल्या वाचल्या पाहिजेत. मराठवाड्यातील पशूधन वाचले पाहिजे. कारण आज सर्व पशूधन कसायाच्या दिशेने जाणे सुरु आहे. कसायाकडे रांग लागलेली आहे. अशा स्थितीमध्ये जर आपण हे पशूधन वाचविले नाही तर कम्पोस्ट खत कसे येणार, जमीन सुपीक कशी होणार ? माती सुपीक नसेल तर धान्याचे उत्पादन कसे वाढणार ? या सर्व गोष्टी दुष्काळाभोवती फिरत आहेत. म्हणून राज्य शासनाला माझी विनंती आहे आमचे हे पशूधन, आमचा शेतकरी, आमचा सर्वसामान्य माणूस वाचविण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहावे. त्या दृष्टीने जर आपण प्रयत्न केले तर ते निश्चितपणे उपयुक्त ठरणार आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित उपस्थित आहेत. आम्ही लहानपणी गाई-म्हशींना ओवाळत होतो. "दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी, गाई म्हशी कोणाच्या" असे म्हणत होतो. मला दोन तीन ओळी आठवतात.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

माझ्या बोहळया गाईची मेख जसी
सूर्याची लेकन माझी
बोहळी बोहळी गाय बरी रे
दूध भरुन देते चरी की
वरच्या वरी राखीन गोंडा
माझ्या बोहळया गाईची चाल
जशी नागिनी ताल न् माझी
बोहळी बोहळी गाय बरी रे
दूध भरुन देते चरी की
वरच्या वरी की, राखीन गोंडा.

सभापती महोदय, ही बोहळी गाय वाचविण्याची आवश्यकता आहे. ही बोहळी गाय वाचवा, त्या गायीचा मालक वाचवा, हा शेतकरी वाचवा. हे केले तरच या राज्य शासनाला लोकांमध्ये ताठ मानेने जाता येऊ शकेल. अत्यंत सन्मानाने लोकांच्या पुढयात जायचे असेल तर आपल्याला हे करावे लागेल आणि ते करण्याची क्षमता या राज्य शासनामध्ये आहे ही धारणा बाळगणारा मी एक सामान्य कार्यकर्ता असल्यामुळे पुन्हा एकदा मी आपणाला विनंती करतो की, हे सर्व आपण करावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मी जे काही सांगत आहे ते लक्षपूर्वक ऐकत आहेत. कारण त्यांचा आणि मराठवाड्याचा अन्योन्य संबंध आहे. त्यांनी आणि मी बरोबरीने काम केलेले आहे. खांद्याला खांदा लावून काम करीत असताना मराठवाड्यातील मातीचा आस्वाद आम्ही दोघांनी घेतलेला आहे. काळी माती, तांबडी माती, अनेक प्रकारची माती आमच्या वाट्याला आली. अनेक कार्यकर्त्यांची माती होत असताना त्यांना उभे करण्याचे काम जे कोणी करीत होते त्यापैकी ते एक आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करील एवढा आशावाद बाळगतो आणि माझे भाषण संपवितो.

----

....2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी आताच आपल्या भावना व्यक्त केल्या. आमच्या मुशीत तयार झालेला कार्यकर्ता किती रोखठोक असतो हे त्यांच्या परखड भाषणावरुन दिसून येते. शेतक-यांची उद्ध्वस्तता त्यांच्या मुखातून ऐकून केवळ नाईलाज म्हणून मी आता जेथे बसलो आहे त्या बसण्याच्या सन्मानाकरिता ते शेवटी असे म्हणाले की माझे शासन हे करु शकेल. परंतु त्यांची साशंकता दूर करण्यासाठी मी या दुष्काळाच्या प्रश्नावर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कवितेतून आपल्या भावना व्यक्त केल्या. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री विनोद तावडे यांनी दुष्काळ निवारणासाठी काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत यासंबंधी सूचना केल्या. आता मी पुन्हा सूचना करुन सरकारने काही करावे हे सांगण्याच्या पलीकडे माझी मानसिकता आहे. आम्ही प्रत्येक अधिवेशनामध्ये दुष्काळासंबंधी चर्चा करतो. दुष्काळासंबंधी मागील अधिवेशनामध्ये जी भाषणे केली तशी भाषणे पुन्हा करावीत अशी परिस्थिती नसते. दुष्काळी परिस्थिती सारखी बदलत असते, शासनाच्या धोरणातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतक-यांची उद्ध्वस्तता ही देखील बदलत असते. त्यामुळे त्या परिस्थितीचा लेखाजोखा येथे मांडून सरकारने निश्चित स्वरुपामध्ये धोरणे निर्माण करावीत या अपेक्षेने आम्ही येथे बोलत असतो. प्रत्येक वेळी सांगितल्या नंतर देखील काही गोष्टी होत नसतील तर त्याबाबतीत मला येथे एक मराठी म्हण सांगाविशी वाटते. म्हण अशी आहे, "कोडग्या कोडग्या लाज नाही, आणि कालचा गोंधळ आज नाही" मराठी म्हण रोखठोक आहे. सांगायचा मुद्दा हा आहे की, ही दुष्काळी परिस्थिती सरकारी धोरणामुळे निर्माण झालेली आहे. धोरण निर्माण केल्यानंतर ते राबविण्याची कुवत आणि क्षमता ज्या प्रशासकीय अधिका-यांमध्ये असते त्यांच्यावर सरकारमध्ये काम करणा-या मंत्र्यांचे निर्बंध नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि हे सत्य आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी मराठवाडी काव्यातून जे सांगितले ते फार महत्वाचे आहे. दुष्काळी योजना शेतक-याला जगविण्यासाठी असतात. त्या राज्यकर्त्यांना जाणूनबुजून मौज करण्यासाठी नसतात हे सांगण्याची पाळी आमच्यावर का यावी हा प्रश्न घेऊन मी उभा आहे. मी मराठवाड्याच्या दौ-यावर होतो. मी पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागामध्ये देखील फिरलो. दुष्काळाच्या काळामध्ये मी सांगलीमध्ये होतो. जत आणि आजुबाजूच्या परिसरातील सर्व लोक दुष्काळी परिस्थितीला तोंड देत होते. सांगलीमध्ये असताना वर्तमानपत्रातून 42 गावांनी घोषणा केली की, या महाराष्ट्रामधील या दुष्काळी गावामध्ये राहून आयुष्यभर दुष्काळ सोसत राहाण्यापेक्षा आमची गावे कर्नाटकामध्ये सामील करा. ही बाब या राज्य शासनाला भूषणावह आहे की नाही हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे. मला आदरणीय शिवसेना प्रमुखांचा सकाळी 8.00 वाजता फोन आला....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता देखील महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. आपण सभागृहाची बैठक तहकूब करावी.

**तालिका सभापती** : आपण पाच मिनिटे वाट पाहू. पाच मिनिटामध्ये मंत्री महोदय सभागृहात आले नाहीत तर सभागृहाची बैठक तहकूब करण्यात येईल. तोपर्यन्त सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, संबंधित खात्याचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसतील तर प्रस्तावावर चर्चा कशी करणार ?

**तालिका सभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मी पाच मिनिटाकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.13 ते 3.22 पर्यंत स्थगित झाली.

----

..नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्येष्ठ मंत्री डॉ.पतंगराव कदम हे कधी तरी या राज्याचे मुख्यमंत्री होतील अशा अपेक्षेने आम्ही त्यांच्याकडे पाहतो. ही चर्चा पूर्ण होईपर्यंत त्यांनी सभागृहाच्या बाहेर जाऊ नये अशा प्रकारची आपण त्यांना ताकीद द्यावी अशी माझी विनंती आहे. आम्हाला आशेचा एकच किरण आहे, ते सभागृहात उठून पटकन निर्णय जाहीर करतात.

सभापती महोदय, माननीय, आदरणीय, सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या सांगली जिल्हयामध्ये मी गेलो होतो. सांगली जिल्हयातील 42 गावे म्हणतात की, महाराष्ट्र सरकारने गेल्या 56 वर्षात आमच्यासाठी काहीही केले नाही, म्हणून आम्हाला येथे रहावयाचे नाही. ती बातमी आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी वाचली. मला माननीय बाळासाहेबांचा सकाळी 8.30 वाजता दूरध्वनी आला. सांगलीमध्ये काय चालले आहे याची तुला कल्पना आहे काय अशी विचारणा केली. मी त्यांना सांगितले की, मी सांगली येथेच उपस्थित आहे. मला त्यांनी सांगितले की, तू उद्धव ठाकरे यांचेशी बोलून घे आणि त्या ठिकाणी प्रत्यक्षात काय झाले याची मला माहिती दे. माननीय श्री.उद्धव ठाकरे यांनी त्या दिवशी माझ्याशी चर्चा केली. त्या गावांमध्ये नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती मला सुर्देवाने सापडल्या. मी त्यांचे श्री.उद्धव ठाकरे यांचेशी बोलणे करुन दिले. ते दुसऱ्या दिवशी विमानाने सांगली जिल्हयातील जत येथ दुष्काळी पाहणी करण्यासाठी आले व त्या ठिकाणच्या 42 गावांशी संपर्क साधला. त्यावेळी त्यांनी त्या गावातील लोकांना शब्द दिला की, आम्ही तुमच्या मागे भक्कमपणे उभे आहोत. कर्नाटकात जाण्यासंबंधीची घोषणा या पुढे कधीही करावयाची नाही असेही त्या लोकांकडून वदवून घेतले.

सभापती महोदय, डॉ.पंतगराव कदम साहेबांना व सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांना माहिती आहे की, मी त्या ठिकाणी दोन महिने ठिय्या मारुन होतो. आम्ही त्या 42 गावांसाठी चारा छावण्या काढल्या, छावण्या काढण्यासाठी तुमच्या सरकारची कोणत्याही प्रकारची मदत घेतली नाही. त्या चारा छावण्यामध्ये 1500 ते 1700 जनावरे ठेवण्यात आली होती. आम्ही या 42 गावांना 6 टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला. त्या ठिकाणी आम्ही जी कामे केली ते सांगण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. 42 गावांनी पुन्हा स्थलांतराबाबतचा एकही शब्द काढला नाही. जनतेला

श्री.दिवाकर रावते...

सामोरे गेल्यानंतर परिस्थिती कशी बदलते या बाबतीत मी एक उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. स्वातंत्र्य प्राप्ती पासून जत गावातील ग्रामपंचायत ही कॉंग्रेस पक्षाकडे होती. त्या ग्रामपंचायतीची निवडणूक झाली, त्या ग्रामपंचायतीमध्ये 16 पैकी 11 सदस्य शिवसेना पक्षाचे निवडून दिले. आम्ही तेथील लोकांची सेवा केल्याबाबतची पावती त्यांनी आम्हाला लागलीच दिली. जत ग्रामपंचायत प्रथमच आमच्या पक्षाच्या ताब्यात आली. तेथील लोकांनी तुम्हाला वर्षानुवर्षे निवडून दिल्यानंतरही त्या लोकांसाठी तुम्ही कोणते योगदान केले आहे असा आम्ही आपणास प्रश्न विचारीत नाही. तुम्ही तेथील लोकांच्या घरामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरुपात मदत केली असेल म्हणून तुम्हाला त्यांनी अनेक वर्षे निवडून दिले होते. केलेल्या कार्याची जाणीव लोक ठेवतात ही गोष्ट मी या ठिकाणी आवर्जून सांगतो.

सभापती महोदय, मराठवाडयातील प्रत्येक गावा गावांमध्ये मी फिरलो. मी संभाजीनगर, बीड, जालना धाराशिव येथे फिरलो. परंतु तेथील पाण्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राणा जगजितसिंह पाटील बसलेले आहेत. धाराशिव जिल्हयाबाबतीत तुम्हाला बोलावयाचे आहे म्हणून त्या जिल्हयाबाबतीत मी काही बोलणार नाही. या ठिकाणी श्री.अमरसिंह पंडित साहेब या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे बीड जिल्हयाबाबत देखील मी काही बोलणार नाही. हे सदस्य दुष्काळ भोगून या ठिकाणी आलेले आहेत. त्या जिल्हयातील दुष्काळाबाबत मी जास्त भाष्य करणार नाही.

सभापती महोदय, या राज्यात पश्चिम महाराष्ट्रातच दुष्काळ पडला अशा प्रकारच्या बातम्यांना मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्यात येत होती. माननीय केंद्रीय कृषी मंत्री पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागाची पाहणी करुन गेले. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी भेट दिली. तुमच्या पक्षांतर्गत संघर्ष मी समजू शकतो. परंतु दुष्काळी भागाचे श्रेय घेण्यासाठी तुमची आम्ही चढाओढ पाहिली. "तुम्ही एवढे मोठे आहात, तर आम्ही सुध्दा काही कमी नाही" हे दाखविण्यासाठी नंतर श्री.राहुल गांधी यांना दुष्काळी भागाची पाहणी करण्यासाठी बोलाविण्यात आले. त्यांनी त्या भागाची पाहणी केली. श्री.राहुल गांधी दुष्काळी भागात फिरले. पश्चिम महाराष्ट्रातील पाच-सहा तालुक्यां व्यतिरिक्त महाराष्ट्रात इतरत्र कोठेही दुष्काळाची पाहणी केली नाही. विदर्भ, मराठवाडा, खानदेश या विभागातील अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळ पडलेला आहे परंतु

3..



ABG/ प्रथम श्री.शिगम 03:22

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्या ठिकाणी पाहणी करण्यासाठी शासनातील एकही मंत्री जाण्यास तयार नाही. दुष्काळाबद्दलच्या तुमच्या अशा जाणीवा आहेत काय ? मी सन्माननीय सदस्य सर्वश्री. राणा जगजितसिंह पाटील, अमरसिंह पंडित यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो की, तुम्ही सत्तेत बसला असला तरी तुम्हाला या सरकारला जाब विचारावाच लागेल. सत्ताधारी पक्षातील एकही मंत्री तुमच्या जिल्हयात दुष्काळाची परिस्थितीची माहिती घेण्यासाठी आले नाहीत.

सभापती महोदय, सरकारच्या या वृत्ती आणि प्रवृत्ती आणि करण्यात येणाऱ्या वल्गनामुळे आमच्या काळजामध्ये भोके पडतात. या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रामाणिकपणे दुष्काळ जाहीर केला. दुष्काळ जाहीर झाल्याबरोबर त्यावर उपाययोजना करण्यासाठी आलेला निधी भराभरा माननीय मंत्र्यांनी कशा प्रकारे गिळंकृत केला ही बाब निषेधार्ह आहे. महाराष्ट्रातील मंत्र्यांनी आमचा दुष्काळ ओरबाडला. तो कसा ओरबाडला ते मी नंतर सांगणार आहे. मी जालना येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी गेलो होतो, त्या ठिकाणी श्री.मोहन देठे हे 85 वर्षाचे वयोवृध्द भेटले. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही फिरुन काय करणार ? जे काही करावयाचे आहे ते तातडीने करा. आता आम्हाला मंत्र्यांच्या फेऱ्या नको आहेत. त्यांची करमणूक आम्हाला नको आहे. दुष्काळ हा करमणुकीसाठी नाही असा तुम्ही मंत्र्यांना निरोप द्या असे त्याने मला खडसवून ऐकविले.

सभापती महोदय, दुष्काळाच्या बाबतीत सरकारकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजने बाबत व केलेल्या कार्याबाबत जनतेच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत. अतिशय तीव्र भावना आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले म्हणाले की, आदरणीय श्री.शरद पवार साहेब कोठे तरी म्हणाले की, तहानलेल्या माणसाला पाणी देणे हा माणसाचा धर्म आहे. या सरकारचा पंचनामा आदरणीय श्री.शरद पवार यांनीच केलेला आहे. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी "पाणी देणे हा धर्म आहे" असे सांगितल्यानंतरही महाराष्ट्रातील जनतेला पिण्यासाठी पाणी न देण्याचे दुर्देवी काम सरकारकडून झालेले आहे. आदरणीय श्री.शरद पवार यांच्या वाक्याचा अर्थ असा आहे की, हे सरकार जनतेला पाणी देण्यास असमर्थ ठरले आहे. अशा प्रकारची पोच पावती तुमच्या नेत्यांनी आपल्याला दिलेली आहे. या बाबतीत सरकारला काही तरी वाटले पाहिजे.

यानंतर श्री. भोगले....

श्री.दिवाकर रावते ....

मी किती तरी पिकांची वाळलेल्या पाने जमा करुन आणलेली आहे. कपाशी चांगली आली परंतु बोंडाला कापूसच लागला नाही, ज्वारीचे पीक चांगले आले परंतु कणीस भरलेच नाही. शेत हिरवेगार दिसत होते परंतु पीक आलेच नाही अशी परिस्थिती या दुष्काळामध्ये झाली. दुष्काळाचा प्रश्न माननीय मुख्यमंत्र्यानी गांभीर्याने घेतला व सांगितले की, आता आम्ही पंतप्रधांनाकडे जाऊ, केंद्र सरकारकडून दुष्काळासाठी मदत मागू. परंतु केंद्र सरकारकडे मदत मागावयाची असेल तर त्यासाठी राज्यात अगोदर दुष्काळ जाहीर करावा लागत असतो. त्यामुळे केंद्र शासनाच्या मदतीसाठी दुष्काळ जाहीर करण्यात आला. दुष्काळाच्या मदतीसाठी राज्याचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण दोन दिवस राजधानीत होते. परंतु एवढे करुन सुध्दा त्यांच्या नशिबी पोकळ आश्वासने आली. राज्यातील दुष्काळासाठी केंद्राचे 5 हजार कोटीचे पॅकेज मागण्यासाठी,पंतप्रधांनाची भेट घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर उप मुख्यमंत्री तसेच अर्धा डझन मत्र्यांचा ताफा होता. ही सर्व मंडळी 2 दिवस दिल्लीमध्ये ठाण मांडून बसली. परंतु माननीय पंतप्रधांनानी 10 मिनिटांची वेळ सुध्दा यांच्यासाठी दिली नाही. यांना हात हलवत परत यावे लागले.

50 टक्के आणेवारी आणि 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला असेल तर दुष्काळ जाहीर होऊ शकतो व ही परिस्थिती असेल तरच केंद्र सरकार मदत देत असते. असे असतांनाही पश्चिम महाराष्ट्रातील 44 तालुके दुष्काळग्रस्त करण्यात आले. मराठवाडयात 36, खानदेशमध्ये 18 आणि विदर्भातील 19 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला. दुष्काळी तालुके जाहीर होण्यासाठी मंत्रीमंडळात चढाओढ लागली होती. दुष्काळ म्हणजे आपल्या भागासाठी लूट निर्माण करण्याचा भाग आहे असे त्यांना वाटू लागले. दुष्काळ हा शेतकऱ्यांसाठी जाहीर करावयाचा असतो, ज्यांच्याकडे पाऊस पडला नाही, शेती पिकली नाही, ज्यांच्याकडे पिण्यासाठी पाणी नाही, ज्यांची जनावरे मरत आहे अशांसाठी दुष्काळ असतो. परंतु प्रतिष्ठित मंत्र्यांनी आपल्या भागासाठी दुष्काळ जाहीर केला. भुजबळ-येवला, पंकज भुजबळ-नांदगाव, अजित पवार- बारामती, आर.आर.पाटील-तासगाव, जयदत्त क्षीरसागर-बीड, वसंत पुरके-राळेगाव, बाळासाहेब थोरात-संगमनेर, पतंगरावजी कदम-कडेगाव, या मातब्बर मंत्र्यांनी जेथे 75 टक्के पाऊस पडला तिकडे दुष्काळ जाहीर करण्याचा आग्रह धरला व मंत्रीमंडळाच्या बैठकीत 122 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयास लावला. केंद्रातून पैसे आले तर त्याची लूट आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचली पाहिजे अशा प्रकारे 122 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करावयास भाग पाडले. राज्य सरकारने दुष्काळासाठी केंद्राकडे 5200 कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु प्रत्यक्षात केंद्राकडून किती पैसे मिळाले त्याची माहिती उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, चारा छावण्याच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात विरोधी पक्ष नेत्यांनी विचार मांडलेले असल्यामुळे मी त्यावर बोलणार नाही. 10 लाख हेक्टरवर चारा लागवड करण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आली होती. आपण आतापर्यंत किती लाख हेक्टरवर चारा लागवड केली याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये देण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी पाण्याची सोय असेल अशा शेतकऱ्यांच्या काही क्षेत्रामध्ये चारा लागवडीचे बंधन निर्माण केले जाईल अशी घोषणा त्यावेळी करण्यात आली होती. त्यानंतर दुष्काळाचा कलगीतुरा सुरु झाला याचे मला वाईट वाटते. दुष्काळामध्ये शेतकऱ्याला आधार देण्याचे काम आपल्या सर्वांचे असते. त्या काळात मी आपल्यावर राजकीय टीका केली होती असे एक जरी वाक्य दाखवले तर मी राजीनामा देईन. मी माझ्या आयुष्यामध्ये अशा प्रकारचे घाणेरडे राजकारण कधीही करत नाही. सर्वांना एकमेकाची गरज असते, मदत देणारे सरकार असते, दुष्काळाच्या संदर्भात सरकारला आवाहन करावयाचे असते, सरकारचे कपडे ओरबडून मदत मागावयाची नसते हे मला पक्के माहिती आहे. सरकारची मदत पोहचविण्याचे काम केले तर ती सरकारला मदत होऊ शकते. खरे म्हणजे दुष्काळामध्ये शेतकऱ्याला जगवायचे असते.

मुद्दा दुष्काळाचा असतांना याचा वाद काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा होता. चांगल्यासाठी कलगीतुरा झाला असता तर मला आनंद झाला असता. नगर जिल्यातील दुष्काळ परिषदेत आमचे माननीय पतंगराव म्हणाले होते की, "पैसे गोळा करा, वाटा व निवडून या असे मित्र पक्षाचे धोरण आहे त्यामुळे आम्ही एकत्र निवडणुका लढविणार नाही." दुष्काळाच्या परिस्थिती शेतकऱ्यांना मदत करावयाची सोडून यांनी कलगीतुरा सुरु केला होता. सांगली जिल्हयाच्या खानापूरमध्ये दुष्काळाची दाहकता एवढी प्रचंड वाढली होती की, चाऱ्या अभावी बाळकृष्ण नलावडे यांच्या मालकीचा रेडयाचा



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

मृत्यू झाला व त्याच्या चार दिवस अगोदर त्याच गावात 15 जनावरांचा चाऱ्या अभावी मृत्यू झाला होता. त्यावेळी चाऱ्या अभावी आपल्या जिल्हयात जनावरे मरत होती परंतु आपण मात्र चरणाऱ्यांची व्याख्या करत बसला होता.

ज्या ठिकाणी आणेवारी जास्त होती असे असतांनाही आपण 40 तालुके दुष्काळी घोषित केले होते. आंबेगाव, वेल्हा, मुळशी, इंदापूर, हवेली, सोलापूर, पंढरपूर, माळशिरस, माढा, पुरंदर, उदगीर, तासगाव, संगमनेर, सिंदखेड, सेलू, नांदेड, लोहा असे 40 तालुके आपण 122 तालुक्यांमध्ये घुसवले. परंतु याचा परिणाम दुष्काळासाठी आर्थिक मदत मिळण्यावर झाला. याही परिस्थितीत स्वार्थी राजकारणाची चढाओढ निर्माण झाली. दुष्काळाचे गांभीर्य वाढत असतांना टंचाईग्रस्त तालुके निश्चित करण्याच्या ऐवजी माझा मतदारसंघ दुष्काळी घोषित करण्यामुळे दुष्काळाची थट्टा झाली. जे दुष्काळाने पीडित होते त्यांची दुर्दैवाने दुर्दशा निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण केली. आम्हाला चारा द्या, पाणी द्या असे सांगून सांगून जत तालुक्यातील शेतकरी वैतागले, कंटाळले शेवटी रस्त्यावर उतरले. शेतकरी आंदोलनात उतरण्या अगोदर त्यांना पोलिसांकडून नोटीसा देण्यात आल्या. दुष्काळासाठी मदत मागणाऱ्या शेतकऱ्यांना तुरुंगात पाठवीन अशा प्रकारची धमकी आपण दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना देऊन त्यांचा घोर अपमान केला. जगायचे कसे या विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांबद्दल सरकारची वागायची पध्दत योग्य होती काय ? हे शेतकरी आतंकवादी होते काय ? आटपाडीमध्ये चारा नाही, पाणी नाही म्हणून शेतकऱ्यांचे स्थलांतर सुरु झाले होते तेव्हा त्यांचे फोटो वर्तमानपत्रात छापून आले होते परंतु या शासनाला जाग आली नाही. अशा प्रकारे दुष्काळाची पिळवणूक सुरु असतांना आमचा दुर्लक्षित झालेला विदर्भ, मराठवाडा व खानदेशकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नव्हते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी धाराशीवला गेलो व तेथील जिल्हाधिकारी श्री.नागरगोजे यांना भेटलो आणि शेतकऱ्यांच्या शेताचे आजच पंचनामे करावेत अशी मागणी केली. याला कारण आज शेत उभे होते. कणसे भरली नव्हती. त्यावेळी शेतकऱ्यांच्या कापसाला बोंडे आली नव्हती. हे सर्व सांगत मी फिरत होतो. मराठवाडा व विदर्भातील 15 नोव्हेंबरची आणेवारी आवश्यक असते. पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन केंद्र शासन दुष्काळी भागासाठी मदत करत असते. आपण जर आधीच पंचनामे करून ठेवले तर चारा जनावरांकरिता वापरता येईल. आपण कापणीचे आदेश द्यावेत अशी मी विनंती करीत फिरत होतो. तसेच पाण्याचा विषय देखील मांडत होतो.

मला बीडचे जिल्हाधिकारी श्री.सुनील केंद्रेकर यांचे कौतुक करावेसे वाटते. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुंदर नियोजन केले होते. त्यांनी दुष्काळी कामाला स्वत:ला वाहून घेतले होते. मला अशा जिल्हाधिकाऱ्यांचे मनापासून कौतुक वाटते. त्यांनी दुष्काळ आपल्या अंगावर घेतला होता. दुष्काळ माझ्या घरात आहे असा विचार करून आपल्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन ते दिवस रात्र काम करीत होते. असे अधिकारी देखील मला भेटले. मी 2 व 3 सप्टेंबर रोजी सर्व गावागावांमध्ये गेलो होतो. चारा,शेती यांचे पंचनामे करण्याची विनंती केली होती.

आताच येथे गोदावरीचा विषय सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. पाण्याची पातळी डेड वॉटर पेक्षा 14 टक्के खाली गेली. माझा देखील पाण्यासंबंधातील 10 ते 15 टक्के असा थोड्या प्रमाणात अभ्यास आहे. गोदावरीच्या खोऱ्यामध्ये 30 टक्के पाणलोट क्षेत्र हे वर आहे, 70 टक्के अनिश्चित पाणलोट क्षेत्र हे मराठवाड्यामध्ये आहे. गोदावरी पाण्याचे वाटप झाले तेव्हा 197 TMC पाण्या पैकी 97 TMC पाणी नगर आणि नाशिक करिता आणि 100 TMC पाणी मराठवाड्याकरिता देण्याचे ठरले. आदरणीय श्री.शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने जायकवाडी धरण तयार झाले. त्यामुळे मराठवाड्यासाठी पाणी आणणारे ऋषीतुल्य असे व्यक्तिमत्व तयार झाले. आज जायकवाडी धरण झाले नसते तर ...... ? असा विचार लोकांच्या मनात आला तरी थरकाप उडतो. जायकवाडी धरण झाले, पण 100 TMC पाणी आमच्याकडे आले नाही. जायकवाडी धरणात पाणी येण्या अगोदरच नगर आणि नाशिकच्या राजकारणाच्या दंडेलशाहीमुळे जायकवाडीच्या वर 7 मोठे, 15 मध्यम, 491 लघुप्रकल्प, 7327 स्थानिकस्तर असे मिळून 7810 योजनाबद्ध बंधारे आणि धरणे बांधून 196 TMC पाणी अडविण्यात आले.त्यामुळे आमच्या वाट्याला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

शून्य पाणी आले. जायकवाडी व्यतिरिक्त मांजरा, माजलगाव, येलदरी, सिद्धेश्वर, मन्यार, या धरणातील पाणी साठे आटलेले आहेत. जायकवाडी गोदावरी खोऱ्याच्या वरील बाजूस पर्जन्यमान प्रदेश म्हणून 36 टक्के पाण्याचा भाग येतो आणि त्यानुसार नाशिक नगर या भागातील 100 TMC पाण्याची अपेक्षा असताना किमान 36 TMC पाणी सोडणे अपेक्षित होते ते देखील सोडले नाही. आपण महाराष्ट्र जलसंपत्ती विनियम प्राधिकरण विधेयक 2005 मंजूर करून घेतले. त्याचे वाभाडे सिंचनावर चर्चा होईल तेव्हा काढू. तो आजचा विषय नाही. आपण विधेयक पास करून घेतले पण पुढचे नियम बनविण्यामध्ये असमर्थता दाखविल्यामुळे मराठवाडा, विदर्भ व खानदेशात उद्ध्वस्तता निर्माण करण्याचे काम माननीय जलसंपदा मंत्र्यांनी केले असा मी जाहीर आरोप करीत आहे. हे काम मग तत्कालीन मंत्री श्री.अजित पवार किंवा विद्यमान मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी केले असेल. त्यांनी या तिन्ही भागांवर अन्याय केलेला आहे. या जलसंपत्ती विनियमन प्राधिकरण विधेयकातील खंड 12 (6) हे महाराष्ट्र शासनावर बंधनकारक असताना देखील आमच्या जायकवाडी प्रकल्पासाठी पाणी सोडण्यात आले नाही. सात हजार बंधारे बांधून देखील यांची लूट थांबली नाही. दोन महिन्यापूर्वीच नाशिक येथे तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांनी 5 TMC पाण्याच्या निलवंडे धरणाचे भूमिपूजन केले. मला समोरील बाजूकडील सन्माननीय सदस्यांना विचारायचे आहे की, या कारणाकरिता तरी आपण शासनापुढे गुडघे टेकू नये. आपल्याला जनतेने त्यांच्या हक्कासाठी येथे पाठविले आहे.

सभापती महोदय, श्री.अशोक वनवे मु.पो.घोडेगाव ता.अंबड, जिल्हा जालना यांनी चारा पाण्या अभावी स्वत:ची जनावरे गोदावरीच्या पात्रात कसायाला न विकता विधीवत पूजा करून सोडून दिली. ज्या दिवशी मी गेलो त्याच दिवशी हळद-कुंकू लावून जनावरे सोडली. मी त्यांना विचारले काय करतो भाऊ, तेव्हा तो मला म्हणाला मला घरात खायला काही नाही तर मी काय करू ? हे मी स्वत: अनुवभले आहे. श्री.ज्ञानेश्वर चापे, श्री.रूस्तुम पांडुरंग चापे, सरपंच मु.पो.कर्णेश्वर ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांच्या जनावरांना चारा नाही, पाणी नाही, पेरणी नाही, रोजगार हमी योजना नाही, पीक विमा नाही म्हणून तो देखील जनावरे नदीत सोडायला गेला होता. मी स्वत: तेथे होतो.

..3



BGO/ 03:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी स्वत: लोकांमध्ये फिरलो, बसलो. लोकांशी बोललो. त्यांना आधार दिला. मी त्यांना चारा, पाणी, देऊ शकत नव्हतो. मात्र जगण्याचे सामर्थ्य देत होतो. आम्ही सरकारकडे जाऊन भांडू पण तुम्ही असे करू नका असे सांगत होतो. अंबडची परिस्थिती गंभीर आहे. त्याचे वर्णन करून मी येथे जास्त वेळ घेणार नाही. माझ्याकडे सर्व निवेदने आहेत. ती मी येथे वाचत बसणार नाही. कारण अनेक जणांना येथे चर्चा करावयाची आहे. येथे सिंचनाच्या श्वेतपत्रिकेवर चर्चा होईल असे मला वाटले होते. श्वेतपत्रिकेवर चर्चा करण्यासाठी पूर्ण दिवस वेळ द्यावा अशी अधिवेशनाच्या आधीच पत्राद्वारे मागणी मी केली होती. श्वेतपत्रिकेतील भ्रष्टाचार मला मांडायचा नाही. तो वेगळा विषय आहे. विदर्भ-मराठवाड्याची पाण्याच्या बाबतीत कशी दुर्दशा केली आहे हे श्वेतपत्रिकेच्या आकडेवारीत आले आहे. येथे माननीय कृषी मंत्री थोडा वेळ थांबायला पाहिजे होते. त्यांना खालच्या सभागृहात काम आहे हे माझ्या लक्षात आले आहे.

सभापती महोदय, श्वेतपत्रिकेनुसार 25 TMC पाणी आले पाहिजे. ते खरे 56 TMC पाणी असायला हवे. तो वाद आपण नंतर बघू या. संपूर्ण भारतात आदरणीय श्री.शरद पवार यांनी नद्याजोड प्रकल्पासंबंधातील गणित मांडले. या प्रकल्पाचा कोणताही फायदा महाराष्ट्राला होणार नाही. कारण महाराष्ट्र हा पठाराचा भाग आहे. त्यामुळे येथे पाणी आणता येणार नाही. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्र शासनाला सांगितले की, एकूण देशाच्या दहा टक्के लोकसंख्या महाराष्ट्राची आहे. त्यामुळे तो जो खर्च येईल त्याच्या दहा टक्के रक्कम महाराष्ट्राला मिळाली पाहिजे. आम्ही आमच्या अंतर्गत नद्याजोड प्रकल्प राबवून सुबत्ता आणू. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी 10 टक्क्याचा फॉर्म्युला देशाकरिता लावला. पश्चिम महाराष्ट्राला कृष्णा खोऱ्याचे 597 TMC पाणी मिळाले आहे. आम्ही मराठवाड्यातील आहोत त्यातील दहा टक्के पाणी आम्हाला द्यावे. कारण राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी 10 टक्के लोकसंख्या ही मराठवाड्याची आहे. 596 TMC च्या दहा टक्के म्हणजे 56 TMC पाणी आमच्या वाट्याला येते. पण श्री.अजितदादा पवार म्हणाले की, 21 TMC पाणी मिळेल. सर्व काही आपणच ठरविणार. आमच्या हक्काचे पाणी देखील अर्धे केले. ते पण आता देत नाही. ..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिवाकर रावते...

टेंडरची घाई, वर्क ऑर्डरची घाई. कृष्णा खोरेची 700 कोटी रूपयांची कामे झाली. परंतु, इंदापूर पासून येणारा टनेल दहा वर्षापासून होत नाही. म्हणजे 700 कोटी रूपये पाण्यात गेले. सांगताना आपण काय सांगणार ? हा श्वेतपत्रिकेतील आकडा आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आम्ही टेंडर काढून 700 कोटी रुपयांची कामे दिली. ती कामे सुरु झालेली आहेत. पण आपणास हे पाणी भीमा-कृष्णामधून आणण्यासाठी इंदापूर येथे टनेल करावे लागणार आहे आणि त्या कामास मागील दहा वर्षापासून सुरुवात झालेली नाही. तेव्हा 700 कोटी रुपये खर्च करुन आपल्याला ते पाणी मिळणार नाही. 700 कोटी रुपये खर्च करुनही आमचा भाग कोरडा राहणार आहे. 21 टीएमसी पाण्यासाठी आम्ही कायम ओरडत राहणार आहोत अशी आमची अवस्था आहे. तेव्हा आमच्याकडे कशी सुधारणा होणार आहे ? गोदावरी खोरे कोरडे पडले आहे. कृष्णा खोऱ्यातून येणारे पाणी बीड आणि धाराशीव कडून लातूरकडे जाणार आहे.एवढे असूनही अजून धोरणात्मक भूमिका मांडली जात नाही. तुम्हा आम्हाला सांगितली जात नाही. असे होत असेल तर मराठवाड्यातील जनतेला पिण्यासाठी, शेतीसाठी, जनावरांसाठी, उद्योगांसाठी पाणी कसे मिळणार आहे ? आमच्याकडे पाणी नसल्यामुळे कोणताही उद्योग येत नाही. मी आकडेवारी सांगण्यामध्ये वेळ घालविणार नाही.

सभापती महोदय, मला हे सांगायला येथे वाईट वाटते. अकोला जिल्ह्यामध्ये माननीय राज्यपालांचा दौरा होता. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी आणि सावकरग्रस्त झालेले शेतकरी यांनी माननीय राज्यपालांना भेटण्यासाठी निवेदन दिले. माननीय राज्यपालांनी त्यांना भेट देण्याचे नाकारले. भेट नाकारल्याचे दुःख नाही. परंतु माननीय राज्यपाल त्यांना म्हणाले की, "मी, आपणास भेटून करु काय ?" या सरकारने सावकारी विधेयक चांगल्या प्रकारे न केल्यामुळे आणि ते राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पडून असल्यामुळे मी आपणास भेटून कोणाताही आधार देऊ श्कत नाही. माननीय राज्यपाल सरकारच्या वतीने येऊन भाषण करतात व सांगतात My Government, My Government आणि सर्व भाषण इंग्रजीमध्ये वाचतात. हे My Government सावकाराकडे कसे गहाण पडले आहे आणि मी शेतकऱ्यांना सावकाऱ्यांच्या कचाट्यातून कसे सोडवू शकत नाही असे माननीय राज्यपालांनी त्या शेतकऱ्यांना सांगितले. आमचा शेतकरी धाय मोकलून रडत आहे. माननीय राज्यपाल त्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसू शकत नाही हे मला भळभळत आहे. मी शेतीवर बोलणार नाही. शेतीच्या प्रश्नासंबंधी आम्ही वेगळा प्रस्ताव आणणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी संभाजीनगरमध्ये असताना त्या जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.बाळासाहेब थोरात आले होते. खरे म्हणजे पाण्याची पहिली फेरी ऑगस्ट महिन्यामध्ये सोडावयास पाहिजे होती. आम्ही अडीच टीएमसी पाणी सोडले याचे कोणाला कौतुक सांगता ? पहिली फेरी ऑगस्ट महिन्यामध्ये सोडावयास पाहिजे. पालकमंत्री सांगत आहेत की, परतीचा पाऊस आला तर पाणी देण्याचा विचार करु. पालकमंत्र्यांनी धाय मोकलून रडणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी पाजायचे की परतीचा पाऊस आला तर पाणी देण्याचा विचार करु असे मस्तीत बोलायचे ? असे हे आपल्या राज्याचे मंत्री आहेत.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आताच सभागृहातून बाहेर गेले. मी त्यांना सांगितले थोडा वेळ येथे थांबा. श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आजच्या आज राजीनामा दिला पाहिजे. त्यांना सभागृहात बसण्याचा कोणताही अधिकार नाही. "मराठवाड्यास पाणी सोडले तर मी मंत्री पदाचा राजीनामा देईन " अशी त्यांनी घोषणा केली. त्यांच्या जिल्ह्यामध्ये शेतीला कालव्यातून पाणी सोडले जात आहे आणि इकडे मराठवाड्यातील जनतेला पिण्यासाठी पाणी मिळत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली की, प्रथम पिण्यासाठी पाणी देऊ. उरले तर शेतीसाठी पाणी देऊ अन्यथा ते सुध्दा दिले जाणार नाही. मग उद्योगाला पाणी देण्याचा प्रश्नच येत नाही. नगर आणि नाशिक जिल्ह्यातील लोक कालव्यातून शेतीला पाणी देत आहेत, परंतु मराठवाडयासाठी पाण्याचा एक थेंब सोडायला तयार नाहीत आणि वरुन सरकारला धमकी देत आहेत की, मराठवाड्याला पाण्याचा एक थेंब सोडला तर राजीनामा देऊ. तेव्हा माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आजच्या आज राजीनामा दिला पाहिजे. आपण राज्याचे कृषी मंत्री आहात, केवळ आपल्या विभागाचे मंत्री नाही. लोक पिण्याच्या पाण्यापासून तडफडत आहेत. पाण्यावाचून जनावरे मरत आहेत. असे असताना राज्याचे कृषी मंत्री स्वत:च्या जिल्ह्याची, स्वत:च्या तालुक्याची चिंता करीत आहेत आणि राजीनामा देण्याची धमकी देत आहेत. तेव्हा त्यांना मंत्री पदावर राहण्याचा अधिकार नाही. माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात आणि श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मराठवाड्याच्या कुशीत खंजीर खुपासला आहे. तेव्हा त्यांनी आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिलाच पाहिजे अशाप्रकारची आग्रही मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व अन्य सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी विषयांची पुनरावृत्ती करणार नाही. आजचा प्रस्ताव हा विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या विभागांमध्ये असलेल्या दुष्काळासंबंधी मांडला होता. परंतु आज संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळाने व्यापलेला असल्यामुळे त्याची चर्चा या सभागृहात होणे अपेक्षित होते.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाची परिस्थिती माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी येथे उद्धृत केलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील, जत, सांगली, सांगोला या तालुक्यांमध्ये दुष्काळाची अतिशय विदारक परिस्थिती आहे असे येथे सांगण्यात आले.

सभापती महोदय, हा मागील दोन वर्षापासून विदर्भ आणि मराठवाडा दुष्काळाच्या छायेत वावरत आहे. मराठवाड्यात आणि विदर्भात सिंचन वाढलेले नाही. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी हा निसर्गाच्या भरवशावर शेती करतो. या भागातील शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध नाहीत.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 35 जिल्ह्यांपैकी 19 जिल्ह्यांमध्ये दुष्काळ आहे.136 तालुक्यांमध्ये अतिशय गंभीर परिस्थिती आहे. 102 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झालेला आहे. तर राज्यातील 20 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली नाही. 15 लाख हेक्टर क्षेत्रावर दुबार पेरणी झाली. दुबार पेरणी झाल्यानंतर शेवटचा पाऊस देखील झाला नाही. शेवटचा पाऊस न झाल्यामुळे पिके वाढलीच नाही त्यामुळे महाराष्ट्रातील शेती उत्पादनामध्ये घट झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सदस्यांनी सांगितले त्याचा पुनरुच्चार मी करणार नाही. शासनाने अगोदर दुष्काळ जाहीर केला. जोपर्यंत 15 ऑक्टोबरपर्यंत नजर आणेवारी येत नाही किंवा डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष आणेवारी येत नाही तोपर्यंत आपणास दुष्काळ जाहीर करता येत नाही. पण या सरकारने केंद्र सरकारची मदत मिळण्यासाठी

..4..



AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 03:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

घाईघाईने दुष्काळ जाहीर केला. सरकारने दुष्काळ जाहीर केल्यानंतर केंद्र सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही.  केंद्र सरकारकडे शिष्टमंडळ भेटण्यासाठी गेल्यानंतर ते कशाप्रकारे परत आले हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आताच सांगितलेले आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती आहे की, दुष्काळ सदृश्य टंचाई परिस्थिती आहे हे प्रथम माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात स्पष्ट करावे. कारण एकदा दुष्काळ जाहीर केल्यानंतर दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य जनतेला ज्या सवलती द्यायला पाहिजेत त्या दिल्या गेल्या पाहिजेत. तेव्हा प्रथम दुष्काळ आहे की दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे हे जाहीर करावे. मग तो जत तालुका असेल, सांगोला तालुका असेल किंवा अन्य कोणताही तालुका असेल, मराठवाडा असेल किंवा विदर्भ असेल.

सभाापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सांगितले की, गेल्या वर्षी विदर्भात अधिवेशन सुरु असताना दुष्काळी परिस्थितीवर चर्चा सुरु होती. त्यावेळी आम्ही मागणी केली होती की, दुष्काळ ठरविण्यासाठी जी आणेवारी काढण्यासाठी जी समिती आहे ती बाबा आदमच्या काळापासूनची आहे. त्या निकषामध्ये बदल करणार आहात की नाही ? त्यावेळी माननीय मंत्री महोदंयानी आश्वासन दिले होते की, त्या समितीमध्ये बदल करण्यात येऊन दुष्काळाचे निकष ठरविण्यात येतील. परंतु आतापर्यंत ती समिती करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सुरुवातीला थोडाफार पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी बँकाकडून महागडे बियाणे व खतांसाठी कर्ज काढले. परंतु शेतीमध्ये बियाणे पेरल्यानंतर पावसाने पाठ फिरवली.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी कोरडवाहू आहे. निसर्गाची कृपा होऊन त्याचा शेताला पाणी मिळाले नाही, सिंचनाची व्यवस्था नाही, महागडे बियाणे आणि खत शेतामध्ये टाकल्यानंतर देखील पाऊस न आल्यामुळे त्याच्या शेतातील छोटी छोटी रोपे करपून गेली. त्यामुळे त्याच्यावर दुबार पेरणी करण्याचे संकट आले. दुबार पेरणी करण्याकरिता त्याला बँकेने कर्ज नाकारले, त्यामुळे शेतकऱ्याला सावकाराच्या दारामध्ये जावे लागले. दुबार पेरणी कशी करावयाची याच्या संकटात तो शेतकरी सापडला.

सभापती महोदय, शासनाने 122 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला परंतु विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांकडे आपले दुर्लक्ष झाले आहे. त्याने दुबार पेरणी कशी करावयाची याच्या चिंतेत पडला आहे. सावकाराकडून कर्ज घेऊन त्याने आपल्या शेतामध्ये पेरणी केली परंतु शेवटचा पाऊस न झाल्यामुळे त्याची पेरणी वाया गेली आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, खानदेशाच्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये जे पांढरे सोने होते, जो कापूस पिकत होता त्याने सुध्दा मार खाल्ला. त्याच्या कापसाच्या पिकाचे सरासरी उत्पादन घटले. ज्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये एकरी 5 क्विंटल, 7 क्विंटल कापूस येणे आवश्यक आहे त्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये दीड क्विंटल सुध्दा कापूस पिकला नाही. त्यामुळे तो शेतकरी उद्ध्वस्त झाला. पहिल्या पेरणीकरिता, दुसऱ्या पेरणीकरिता कर्ज घेतले, त्यानंतर सावकाराकडून कर्ज घेतले तरीसुध्दा त्याने लावलेले शेतातील पीक वाया गेले. त्यामुळे गेल्या तीन महिन्यात अकोला, बुलढाणा, अमरावती जिल्ह्यातील 26 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. आत्महत्त्या करण्यापूर्वी त्यानी शेतातील पहिली पेरणी वाया गेली, दुसरी पेरणी केल्यानंतर सुध्दा शेतामध्ये पीक न आल्यामुळे सावकाराचे व बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेत सापडल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्याचे कारण पुढे आले आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या किती दिवस चालू राहणार आहेत?

एका बाजूला कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक, ज्वारी उत्पादक, उडीद, मूग, धान पिकविणारा शेतकरी उद्ध्वस्त झाला असतांना दुसऱ्या बाजूला त्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये थोडेफार पीक आले, 50 किलो पीक आले, 100 किलो कापूस आला तर त्याचा कापूस विकत घेणारा कुणीही व्यापारी मार्केटमध्ये नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 04:00

श्री. .पांडुरंग फुंडकर...

माननीय कृषी मंत्र्यांनी घोषणा केली की, विदर्भामध्ये पणन महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या कापसाची आम्ही खरेदी करु. हिवाळा सुरु होण्यापूर्वी आम्ही सर्व केंद्रे सुरु करु असे सांगितले परंतु एकही केंद्र सुरु करण्यात आले नाही. पणन महासंघाकडे कर्मचारी वर्ग नाही, त्यांनी केंद्र सुरु करण्याची व्यवस्था केलेली नाही. आम्ही 150 केंद्रे सुरु करुन विदर्भ व मराठवाडयातील शेतकऱ्याचा कापूस खरेदी करु अशा प्रकारच्या अव्वाच्या सव्वा घोषणा केल्या, परंतु एकही केंद्र सुरु करण्यात आले नाही. आपण 3900 रुपयांचा हमी भाव जाहीर केला परंतु या हमीभावामध्ये कापूस घेणारा कोणताही मायका लाल मार्केटमध्ये उभा नाही. खाजगी व्यापारी शेतकऱ्याचा कापूस खरेदी करीत आहेत. शेतकऱ्याच्या घरामध्ये क्विंटल, दीड क्विंटल आलेला कापूस कमी भावात त्याला विकावा लागत आहे. सोयाबीनची देखील तीच अवस्था आहे. ज्यावेळी सोयाबीनचे पीक शेतकऱ्याच्या ताब्यात येते त्यावेळी सोयाबीनचे भाव खाली पाडले जातात. याठिकाणी माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी आपण तेलावर आयात शुल्क का लावले नाही असे विचारले. आपण आयात शुल्क न लावता ते झिरो केले. हिंदुस्थानातील सोयाबीनचा भाव पडल्यामुळे महाराष्ट्रातील सोयाबीन पिकविणारा शेतकरी उद्ध्वस्त झाला. खरे म्हणजे शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळवून देण्यासाठी आपण परदेशामधून येणाऱ्या तेलावर आयात शुल्क लावणार आहात की नाही असा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे. आज मार्केटमध्ये 2000 ते 2100 या भावाने सोयाबीन विकले जात आहे, मागील वर्षी जे सोयाबीन 5 हजार रुपये भावाने विकले गेले ते यावर्षी दोन ते अडीच हजार रुपये या भावाने विकले जात आहे अशी दुष्काळामध्ये सापडलेल्या शेतकऱ्याची स्थिती आहे.

सभापती महोदय, शासनाने ज्वारी खरेदी केंद्र सुरु करण्याचे नाटक केले. शेतकऱ्याच्या शेतात जर 10 क्विंटल ज्वारीचे उत्पादन आले तर शासनाच्या जी.आर. नुसार आम्ही 6 क्विंटलपेक्षा जास्त ज्वारी खरेदी करणार नाही असे शेतकऱ्याला सांगितले जाते. म्हणजे 10 क्विंटलपैकी फक्त 6 क्विंटल ज्वारी आपण खरेदी करणार अशाप्रकारचा जी.आर. कुणी काढला? शेतकऱ्याच्या शेतात जेवढे पिकले असेल तेवढे तुम्ही खरेदी केले पाहिजे. परंतु एका बाजूला दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्याच्या कापसाला भाव दिला जात नाही, सोयाबीनला भाव दिला जात नाही, ज्वारीचे थोडेसे उत्पादन आले असेल तर ते तुम्ही खरेदी करण्यास तयार नाही, त्यामुळे त्या ज्वारीची मार्केटमध्ये माती होत आहे. अशाप्रकारे विदर्भ, मराठवाडयातील शेतकरी आज उद्ध्वस्त व्हावयास लागला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, दुष्काळग्रस्त, टंचाईग्रस्त शेतकरी आता नव्याने कसा उभा राहणार आहे? या शेतकऱ्याला उभे करण्यासाठी शासन कोणती उपाय योजना करणार आहे. त्याचे रब्बीचे पीक वाया गेले असून पुढील पीक घेण्यासाठी जर सरकार त्याच्या पाठीशी उभे राहिले नाही तर विदर्भामध्ये शेतकऱ्यांचे आत्महत्त्येचे सत्र या पुढील काळात सर्रास सुरु राहणार आहे. दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्याला सावरण्यासाठी शासनाने काहीतरी भरीव निर्णय घेतले पाहिजेत. एका बाजूला शेतकरी उद्ध्वस्त झाला आणि दुसऱ्या बाजूला पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. विदर्भाच्या काही भागात थोडेफार पीक आले असेल परंतु आज विदर्भातील 4300 गावांना पिण्याचे पाणी नाही. एक तर विदर्भातील कोणत्याही धरणामध्ये पाणी शिल्लक नाही. आपल्या शासनाने भंडाऱ्याचा गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण केला नाही. आमचा बुलढाण्याचा जिगाव प्रकल्प आपण पूर्ण केला नाही. ज्या प्रकल्पामध्ये आज पाणी आहे त्यातील 60 टक्के पाणी इंडिया बुल्ससारख्या बलाढय उद्योगपतींना दिले त्यामुळे त्या प्रकल्पामध्ये आज पाणी नाही अशी अवस्था आहे. यामुळे विदर्भातील 4 हजारगावे पाण्यासाठी तडफडत आहेत.

बुलढाण जिल्ह्यातील जवळपास 12 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. माननीय डॉ. पतंगराव कदम, बुलढाणा जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्यानंतर सुध्दा आपण बुलढाणा जिल्ह्याला विसरलात. केंद्र सरकारकडे 122 तालुक्यांची यादी पाठवितांना त्यामध्ये विदर्भातील 19 तालुक्यांना आपण फाटा दिला. केंद्र शासनाकडे 122 तालुक्यांची शिफारस करीत असतांना विदर्भातील 19 तालुक्यांचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्याबाबत ओरड झ ाल्यानंतर त्या यादीमध्ये 19 तालुक्यांचा समावेश करण्यात आला. ज्या बुलढाणा जिल्ह्याचे मी प्रतिनिधित्व करीत आहे त्या जिल्ह्यातील 13 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्याबाबतची आकडेवारी माझ्याकडे आहे. बुलढाणा तालुक्यामध्ये 2.21 मी., चिखली तालुक्यामध्ये 2.21 मी., देऊळगावराजा तालुक्यामध्ये 2.48 मी. , मेहकर तालुक्यामध्ये 1.38 मी., लोणार तालुक्यामध्ये 1.41 मी., सिंदखेडराजामध्ये 1.93 मी., मलकापूर तालुक्यामध्ये 1.29 मी., मोताळयामध्ये 1.61 मी, नांदूरामध्ये 2.11 मी., शेगावमध्ये 0.55 मी., जळगाव-जामोदमध्ये 1.28 मी., आणि संग्रामपूरमध्ये 0.88 मी. एवढा कमी पाऊस झाला आहे. सभापती महोदय, आज बुलढाणा जिल्ह्यातील पाण्याची पातळी अत्यंत खोल गेली आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

बुलढाणा जिल्ह्याच्या 13 तालुक्यांपैकी 12 तालुक्यातील ही भीषण परिस्थिती आहे. जवळपास बुलढाणा 58, चिखली 63, देऊळगावराजा 46, मेहकर 79, लोणार 69,सिंदखेडराजा 66, मलकापूर 37, मोताळा 74, नांदूरा 69, खामगाव 50, शेगाव 30, जळगावस-जामोद 45 आणि संग्रामपूर 50 अशी जवळपास 750 गावांमध्ये आज पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा, नळगंगा, पेनटाकळी, मन, तोरणा ही सर्व धरणे आता पाण्याअभावी कोरडी पडली आहेत. म्हणजे या धरणातील पाण्याची पातळी डेडवॉटरपेक्षा खाली गेली आहे. या धरणामधून ज्या ज्या नगरपालिकांना आपण पाणी पुरवठा करीत होतो तो आता बंद झाला आहे. नांदूरा नगरपालिकेला सिंदखेडराजा नगरपालिकेला, देऊळगावराजा नगरपालिकेला पाणी पुरवठा होत नाही. जवळ जवळ 15 दिवस जनतेला पाण्यासाठी वाट पहावी लागत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये दहा-दहा दिवस पाणी मिळत नाही अशी स्थिती झ ाली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर . . . .

ज्या विंधण विहिरी, बोअर आहेत त्याची पातळी खोल गेली असून कदाचित जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये बोअर आटणार आहेत. आज बुलढाणा जिल्ह्यामध्ये केवळ 14 टँकर्स सुरु आहेत. काल माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने टँकर्स्च्या संबंधात मोठा आकडा सांगितला. पण मी जेव्हा बुलढाणा जिल्ह्याच्या बाबतीत माहिती घेतली तेव्हा मला असे सांगण्यात आले की, बुलढाणा जिल्ह्यामध्ये फक्त 14 टँकर्स सुरु आहेत. तेथील 750 गावांमध्ये पिण्यासाठी पाणी नाही. तेथील जनावरे पिण्याच्या पाण्यासाठी तडफडत आहेत. एका बाजूला पश्चिम महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील जनावरांसाठी चारा नाही. पण विदर्भातील स्थिती अशी आहे की, जनावरांना चाऱ्याबरोबर पिण्यासाठी पाणी देखील उपलब्ध नाही. त्यामुळे जनावरांचे जे मालक आहेत, शेतकरी आहेत ते जनावरांना सोडून देत आहेत. अशा प्रकारे आमच्या जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत स्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, आपण विदर्भाच्या भूमीमध्ये आलो आहोत अशा परिस्थितीमध्ये सरकार आता काय करणार आहे हा प्रश्न आहे. विदर्भातील चार हजार गावे पिण्याच्या पाण्यासाठी आसुसलेली आहेत. अशा वेळी मदत व पुनर्वसन विभागाचे माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम आपण येथील लोकांना पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत आश्वस्त करणार आहात की नाही. आता दोन दिवसांनी अधिवेशन संपणार आहे. माननीय डॉ. पतंगराव कदम यांनी या विषयावरील उत्तराच्या भाषणामधून विदर्भातील जनतेला आश्वस्त केले पाहिजे आणि सांगितले पाहिजे की, विदर्भातील चार हजार गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. येथील जे दुष्काळग्रस्त तालुके आहेत त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील 12 तालुके आहेत. अशा वेळी शासन बुलढाण्यातील जनतेला आश्वस्त करणार आहे की नाही की तुम्ही चिंता करु नका. जर याठिकाणी लोकांना पिण्यासाठी पाणी नसेल, शेतकऱ्यांना या परिस्थितीत उभे करावयाचे असेल तर महाराष्ट्राचे सरकार तुमच्या पाठीशी आहे अशा प्रकारचा विश्वास शासन शेतकऱ्यांना देणार आहे की नाही हा मुद्दा आहे. याबाबतीत केवळ आश्वासने देऊन चालणार नाही.

सभापती महोदय, याठिकाणी दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. डिसेंबर महिना संपल्यानंतर जानेवारी महिन्यापासून प्रत्येक गावा-गावामध्ये दुष्काळाची दाहकता जाणवणार आहे. त्यासाठी सरकारने काय तयारी केली आहे तर माननीय डॉ.पतंगराव कदमसाहेब अजूनपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे प्लॅनिंग करण्यात आलेले नाही. मी याबाबतीत ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर . . . .

बुलढाणा येथील कलेक्टर यांच्याकडेही विचारणा केली त्याबाबत त्यांनी असे सांगितले की, आम्ही प्रस्ताव तयार केलेले आहेत. पण आज बुलढाणा येथील 12 तालुक्यांमध्ये पुरेसे पिण्याचे पाणी नाही. अशा वेळी हे प्रस्ताव शासनाकडे कधी जाणार, शासन त्याला कधी मंजुरी देणार आणि त्यासाठी लागणारा निधी कधी उपलब्ध होणार आणि मग लोकांना पिण्यासाठी पाणी कधी देणार हा प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, जर आपण दुष्काळाकडे गांभीर्याने पाहिले तरच विदर्भ आणि मराठवाड्यातील माणसांना वाचविता येईल. अन्यथा महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्याला आत्महत्ये शिवाय पर्याय रहाणार नाही. मग त्या आत्महत्येचे पाप तुमच्या आधाडी सरकारच्या डोक्यावर बसल्याशिवाय रहाणार नाही आणि मग शासनाला याचा जाब द्यावा लागेल. अशा प्रकारचा इशारा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

. . . .2 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनांक 31 मार्च 2013 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या
कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी
विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे
यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक

**मु.शी. L. A. BILL NO. XXXV OF 2012**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2013.)

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक - 35 दिनांक 31 मार्च 2013 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामां साठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सभागृहाने या विधेयकाच्या बाबतीत कोणतीही शिफारस न केल्याबद्दल आभार मानतो.



पृ.शी. : राज्यातील ब-याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाडयात पाऊस
कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मृ.शी. : राज्यात ब-याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाडयात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण,विक्रम काळे,मोहन जोशी, किरण पावसकर, अशोक उर्फ भाई जगताप,सतीश चव्हाण,संजय दत्त,रमेश शेंडगे डॉ.सुधीर तांबे,सर्वश्री अमरसिंह पंडित,जयदेव गायकवाड,एम.एम. शेख, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री शरद रणपिसे,प्रकाश बिनसाळे, अमर राजुरकर,श्रीमती दिप्ती चवधरी,जयंतराव जाधव,राम पंडागळे,प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई,वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे चालू )

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्याबाबत मी माझे मते मांडण्यासाठी उभा आहे. पण एकही मंत्री महोदय नाहीत.

सभापती महोदय, आज सकाळी टी.व्ही.वर पहावयास मिळाले की, मराठवाड्यातील गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या गावांची संख्या 3299 असल्याचे राज्य शासनाने घोषित केले आहे. याठिकाणी मी अत्यंत जबाबदारीने सांगू इच्छितो की, 3299 पैकी बीड जिल्ह्यातील साधारणपणे 70 टक्के गावांचा यामध्ये समावेश असणार आहे.अंबेजोगाई आणि परळीचा काही भाग वगळला तर पूर्ण बीड जिल्हा हा दुष्काळामध्ये होरपळत आहे.साधारणपणे बीड जिल्ह्यात 16 मध्यम आणि 122 लधु प्रकल्प असून या सर्व प्रकल्पांमध्ये आता मृत साठा शिल्लक राहिलेला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी राज्यातील दुष्काळाच्या विषयाबाबत चर्चा सुरु असताना सदनामध्ये या विषयाशी संबंधित असलेले एकही माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे मुद्दे मांडत आहेत त्याची मी नोंद करीत आहे.



श्री.रामदास कदम : पण माननीय राज्यमंत्र्यांना काय अधिकार आहेत. सभापती महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीबाबत चर्चा करीत आहोत. अशा वेळी महसूल मंत्री, रोजगार हमी योजना मंत्री, कृषी मंत्री, जल संधारण मंत्री महोदय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपस्थित असले पाहिजेत.पण याठिकाणी दुष्काळाच्या विषयावर महत्वाची चर्चा करीत असताना येथे माननीय मंत्री महोदय नकोत असे जर तुम्हाला वाटत असेल तर माझी काही हरकत नाही. येथे संबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना बोलविले पाहिजे. ही काय चेष्टा चालली आहे? राज्यमंत्र्यांना काय अधिकार आहेत ते सांगा. जर सन्माननीय मंत्री महोदयांना सदनामध्ये येण्यासाठी वेळ नसेल तर मग त्यांच्या लाल दिव्याच्या गाड्या काढून घ्याव्यात.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर यांच्या जलसंधारण, कृषी आणि रोजगार हमी योजना विभाग असल्याने ते मुद्दे घेत आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सदनामध्ये वारंवार चर्चा झाल्यानंतर सुध्दा जर माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित न रहाणे हे बरोबर नाही. माननीय मंत्री महोदयांनी तातडीने हजर रहावे. माननीय मंत्री महोदय दोन मिनिटांमध्ये येत आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरु आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, जिल्ह्यामध्ये 16 मध्यम आणि 122 लघू प्रकल्प असून त्यातील सर्व पाणी समाप्त झालेले आहे आणि केवळ मृत साठा म्हणून शिल्लक राहिलेले आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव सारखी मोठी गावे आहेत. बीड येथे एक लाखा पेक्षा अधिक लोकसंख्या आहे. तेथे आम्हाला आठ-आठ दिवस पाणी मिळत नाही. बीड आणि माजलगाव या शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या प्रकल्पामध्ये आता जास्तीतजास्त जानेवारी पर्यंत पुरेल एवढे पाणी शिल्लक राहिलेले आहे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यात यावर्षी स्थलांतरीत होणारा जो ऊस तोडणी कामगार आहे त्यामध्ये सव्वाचार लाख मजूर स्थलांतरीत झाला आहे. आपण दिवसेंदिवस वेगवेगळ्या योजना करीत असताना आपली माफक अपेक्षा असते की, स्थलांतरीत मजूरांची संख्या कमी करता येईल काय? सिंचनाची साधने वाढविता येतील काय? परंतुं दुर्दैवाने मराठवाडा आणि बीड जिल्ह्यामध्ये

6..



श्री.अमरसिंह पंडित .

अशा प्रकारचे प्रयत्न होऊ दिले नाहीत की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे अशा प्रकारची शंका येत आहे. मराठवाड्याला 18 टीएमसी पाणी दिले आहे. आता त्याठिकाणी 250 हेक्टरच्या आतील

प्रकल्प शिल्लक राहिलेले नाहीत आणि 250 हेक्टरच्या वरील प्रकल्प माननीय राज्यपालांनी जे बंधन घालून दिलेले असल्यामुळे ते हातामध्ये घेणे शक्य नाही अशी स्थिती आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयंतराव जाधव )**

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

एकीकडे आपण पाणी देता, 18 टीएमसी पाणी मंजूर करता आणि दुसरीकडे माननीय राज्यपाल महोदयांनी कामे सुरु करण्यासाठी आता प्रतिबंध केलेला आहे. आज बीड जिल्ह्यामधील गेवराई तालुक्यामधील 78 गावांमध्ये पेरणीच झालेली नाही. त्यामुळे रब्बीचा प्रश्नच येत नाही. ज्या ठिकाणी खरीपाचीच पेरणी झालेली नाही त्या ठिकाणी रब्बीचा प्रश्नच येत नाही. आपण आमच्याकडील रब्बीच्या उत्पन्नाचा भाग पाहिला, तहसील कार्यालयाकडून रीतसर माहिती घेतली तर या वर्षी दोन चार गावे वगळता रब्बीचे उत्पादन शून्य आहे. आमच्याकडे सोयाबीन नाही. आम्ही कापसाचा थेट खोडवा घेतो, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, आमच्याकडे स्थलांतरित होणारे जे मजूर आहेत त्यांची संख्या या वर्षी 13 ते 14 टक्के वाढत चालली आहे. इतकी वाईट परिस्थिती असताना, टँकर डिप्लॉय करीत असताना आणि अनेक लोक यामध्ये आपला सहभाग नोंदवित असताना त्यावर आपण ज्या उपाययोजना आखल्या पाहिजेत त्यापेक्षा ग्राऊंड रिॲलिटी वेगळी आहे. आपण टँकर डिप्लॉय केले. साधारणपणे 15 जानेवारीपासून 40 किलोमीटरच्या पेरीफेरीमध्ये आमच्याकडे पाणी नाही. काही गावांमध्ये जर 40 किलोमीटर लांबवरुन पाणी आणावयाचे ठरविले, महसूल मंडळाच्या ठिकाणी टँकर लावले तर एका दिवशी मुश्किलीने एक ट्रिप होईल. ज्या गावांची लोकसंख्या 10 हजार पर्यंत आहे त्या गावांना एक ट्रिपपेक्षा जास्त ट्रिप होणार नाही. दुर्दैवाने जिल्ह्याच्या स्तरावर पाहिजे त्या प्रमाणात अजूनही नियोजन झालेले नाही.

सभापती महोदय, या शासनाने मराठवाड्याकडे का दुर्लक्ष करण्याचे ठरविले आहे हे आमच्या लक्षात येत नाही. एमजीनरेगा मध्ये एकीकडे असे सांगितले जाते की, तुम्हाला कमांडमध्ये कामे करता येणार नाहीत. गोदावरीला पाणी नाही. पलीकडच्या जायकवाडी प्रकल्पामध्ये पाणी नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी कमांडच शिल्लक नाही. आपण कमांड कशाला म्हणतो ? कमांडची व्याख्या करा असे जर म्हटले तर एखाद्या तळ्याचे पाणी ज्या क्षेत्रामध्ये जाते त्या लाभक्षेत्राला आपण कमांड म्हणतो. आम्हाला जर कोणत्याही प्रकल्पाचे पाणी मिळत नसेल तर कमांडच्या नावाखाली एमजीनरेगामधील कोणतीही कामे करता येत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये हा फार कठीण प्रश्न निर्माण झालेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आम्हाला सिंचनाच्या विहिरी घेता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अमरसिंह पंडित ....

येत नाहीत. एमजीनरेगामध्ये कमांडच्या नावाखाली आम्हाला सिंचनाच्या विहिरी घेता येत नाहीत. त्यामुळे वॉटर बॉडीज तयार होतात असे सांगण्यात येते. वॉटर बॉडीज तयार केल्यानंतर हे पाणी पुढच्या लोकांपर्यंत जात नाही म्हणून या सिंचनाच्या विहिरी न करण्याचा डाव या मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला असल्याचे आम्हाला समजते. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. एकीकडे आपण आम्हाला रस्त्याची कामे करण्यास सांगता. पण रस्ते किती करावयाचे ? अनुत्पादक काम म्हणून रस्त्याच्या कामाकडे पाहिले जाते. रस्त्याची कामे संपल्यानंतर कोणतेही उत्पादक काम शिल्लक राहिलेले नाही.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, एमजीनरेगाच्या माध्यमातून आम्हाला कोठेही पाझर तलाव करता येत नाहीत. त्याचे कारण असे आहे की, या एमजीनरेगामध्ये लँड ॲक्विझिशनचा कॉम्पोनन्ट नाही. जर लँड ॲक्विझिशनचा कॉम्पोनंट नसेल तर आम्हाला पाझर तलावाची कामे करणे अशक्य कोटीतील गोष्ट आहे. जर पाझर तलाव करावयाचे नाही असे म्हटले तर दुसरी मजूर क्षमता असलेली कामे नाहीत. पाझर तलावाच्या कामावर 400-400 मजूर काम करतात. एका रस्त्यावर जास्तीत जास्त 30, 40, 50 मजूर काम करतात. जर आपण मजूर क्षमता असलेली काम चालू करणार नसाल तर ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. त्या भागातील लोकांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही.

सभापती महोदय, काल-परवा छावण्यांच्या संदर्भात माहिती मिळाली. सातत्याने परवानगी मागूनही आम्हाला छावण्यांच्या संदर्भात परवानगी मिळत नाही. जर परवानगी दिली तर सरकारच्या अटी इतक्या जाचक आहेत की या छावण्या सुरु करण्याचा कोणाचाही इरादा किंवा कोणाचीही हिंमत होत नाही. काल-परवा जी माहिती मिळाली त्यातील काय खरे आणि काय असत्य ते मंत्रिमंडळातील सदस्यांनाच माहीत असेल. सोलापूरला एका महिन्यासाठी छावण्यांसाठी 150 कोटी रुपये दिले. सांगलीला एका महिन्यासाठी 140 कोटी रुपये छावण्यांसाठी दिले. पण बीड जिल्ह्याला, दुष्काळी भागात आतापर्यंत फक्त 25 कोटी रुपये दिले. सोलापूरमध्ये 28 सहकारी साखर कारखाने आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर असताना आमच्याकडे पिण्यासाठी पाणी नाही. आमच्याकडे छावण्यांसाठी शासन पैसे देत नाही, यापेक्षा दुसरी कोणती दुर्दैवी बाब असू

...3...

RDB/

श्री. अमरसिंह पंडित .....

शकत नाही. काल-परवा अशी माहिती मिळाली की, आपण लिफ्ट योजनेचे बिल स्केअरसिटीमधून भरता. चांगली गोष्ट आहे.

सभापती महोदय, आम्ही मराठवाड्यातील लोक ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील झालो तेव्हा विनाअट सामील झालो. आमच्या बापजाद्यांनी चूक केली की काय ? विदर्भातील लोकांनी अटी घातल्या आणि त्या अटींचे फलीत म्हणून विदर्भात या ठिकाणी अधिवेशन होत आहे. मराठवाड्यातील लोक विनाअट संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील झाले. स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या विनंतीला मान देऊन संतांच्या भूमीतील आम्ही मराठवाड्याचे लोक विनाअट तुमच्यात सामील झालो. त्याचे हे फळ आहे का ? तुम्ही कॅपिटल एक्स्पेंडिचरमधून पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाट खणावयास लागला आहात. जतला पाणी द्यावयाचे म्हणून 25 कोटी रुपये खर्च करुन त्या ठिकाणी पाटाचे काम चालू आहे. आम्ही या ठिकाणी पिण्यासाठी पाणी मागत असताना उत्तर महाराष्ट्रातील लोक म्हणतात की, आम्ही आत्मबलिदान करु, आम्ही आमचा जीव देऊ. आपण राज्याचे मंत्री आहात की एका जिल्ह्याचे मंत्री आहात ? ही शरमेची बाब आहे. आम्ही मराठवाड्यातील लोक आमच्या मनगटीच्या जीवावर जगतो. आम्ही कष्ट केले. आम्ही कोणाच्याही समोर भीक मागितली नाही. आज तुम्ही दिले नाही म्हणून काय झाले उद्या पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचा ऊस तोडू पण लाचार होऊन आम्ही तुमच्याकडे भीक मागणार नाही. आम्ही तुम्हाला हक्काचे मागत आहोत. हे अधिवेशन आता हिवाळी अधिवेशन आहे असे वाटत नाही. या राज्यकर्त्यांसाठी हे दिवाळी अधिवेशन आहे. या ठिकाणी आमचे गाऱ्हाणे ऐकण्यासाठी कोण उपस्थित आहेत ? एमजीनरेगाबद्दल कोण बोलणार आहे ? पिण्याच्या पाण्याबद्दल कोण बोलणार आहे ? या योजनांच्या संदर्भात या ठिकाणी बोलणारे कोणी नाही. हे हिवाळी अधिवेशन नाही. यांच्यासाठी हे दिवाळी अधिवेशन आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील सामान्य माणूस तुमच्याकडे आस लावून पाहात आहे. उद्याच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मराठवाड्यासाठी काही तरी निर्णय होईल यासाठी मराठवाड्यातील माणूस तुमच्याकडे नजर ठेऊन आहे.

सभापती महोदय, यदाकदाचित जर तुम्हाला आमचे दुखणे खरे वाटले तर आमची आपल्याला एक विनंती आहे. आमच्याकडे उच्च शिक्षण घेत असलेले जे विद्यार्थी आहेत, शालेय शुल्क असेल, महाविद्यालयीन शुल्क असेल किमान त्यांना या प्रसंगी त्या शुल्कातून माफी द्यावी अशी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

मी विनंती करतो. आमच्या कर्जाचे जे हप्ते आहेत त्यात आम्हाला माफी देऊ नका, आम्ही आमच्या कर्जात माफी मागत नाही पण आमच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे अशी विनंती करतो.

**तालिका सभापती (श्री. जयवंतराव जाधव)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात संपवावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या चर्चेमध्ये आमचेही नाव होते. आमचा वेळ सन्माननीय सदस्यांना द्यावा.

**तालिका सभापती** : माननीय सभापती महोदयांनी जे निदेश दिलेले आहेत त्यामध्ये आपला वेळ धरुनच सन्माननीय सदस्यांना वेळ दिलेला आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, पाणी देऊ नका पण बोलण्यासाठी वेळ तरी द्या, थोडे बोलू द्या. मनाला समाधान वाटेल आणि गावाकडे जाईन. तिकडेही तेच होते पण इकडे बदलेल असे मला वाटले होते. विद्यार्थ्यांना शालेय शुल्कातून या वर्षी माफी देता येईल का याचा शासनाने विचार करावा. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे आम्ही जे शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे त्या कर्जाचे हप्ते आम्हाला माफ करु नका पण किमान त्या कर्जाचे पुनर्गठन करावे. आता जे शेतीचे हप्ते मागत आहेत ते थांबविता येईल का आणि त्या कर्जाचे पुनर्गठन करता येईल का याचा शासनाने विचार करावा. हा अतिशय महत्वाचा विषय आहे.

सभापती महोदय, जायकवाडी धरण हे 102 टीएमसी क्षमतेचे आहे. 102 टीएमसी क्षमतेचे जायकवाडी धरण 33 टक्के भरल्याशिवाय उत्तरेतील पाणी तुम्हाला थांबविता येत नाही. 33 टक्के म्हणजे 33 टीएमसी पाणी जायकवाडी धरणामध्ये येणे क्रमप्राप्त आहे. सभापती महोदय, आपणही उत्तर महाराष्ट्रातील आहात. आता 9 टीएमसी आणि 4 टीएमसी पाणी दिले. म्हणजे 13 टीएमसी पाणी दिले पण जायकवाडी धरणामध्ये फक्त पावणेचार टीएमसी पाणी आलेले आहे. काल लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत असे सांगण्यात आले की, हे पाणी मराठवाड्यातील लोकांना पुरणार आहे. यापेक्षा अधिक पाणी लागणार असेल तर पिऊ नका, मिनरल वॉटर प्या. आम्ही आमच्या हक्काचे पाणी मागतो. आम्ही शेतीला पाणी मागत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. गिते 04:30

श्री. अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, आज सकाळी टी.व्ही.वरील बातम्यातून अशी माहिती देण्यात आली की, उजनी धरणातून 28 हजार क्युसेस पाणी सोलापूरच्या राज्यकर्त्यांना मिळाले. आम्ही 28 हजार क्युसेक्स पाणी मागत नाही. तर आमचे पाट भिजतील एवढे पाणी द्यावे. आमचे पाट भिजले तर आमच्या जनावरांना चारा मिळेल. जनावरांचा चारा आणण्यासाठी दीडशे कि.मी. अंतराच्या पलीकडे जावे लागते. किमान चारा उपलब्ध होण्यासाठी आम्ही जानेवारीमध्ये एक रोटेशन मागत आहोत. आम्हाला 8 दिवस रोटेशन दिले तर किमान आम्ही जनावरांसाठी चारा तरी उपलब्ध करुन देऊ शकू. या पलीकडे आम्ही काही मागत नाही. दिले तर आनंदच आहे आणि नाही दिले तरी तुमच्या बरोबर आम्ही वाद घालणार नाही. संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील झालो हे योग्य झाले की अयोग्य झाले असा विचार करण्याची वेळ आमच्या पिढीवर आलेली आहे. सभापती महोदय, मला माझे विचार मांडण्याची संधी दिल्या बद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे मत व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी देखील महाराष्ट्रामध्ये दुष्काळ होता. हे दुष्काळाचे सलग दुसरे वर्ष आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ अशा काही भागामध्ये दुष्काळाची तीव्रता अधिक आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये खूप काही चांगली परिस्थिती आहे असे म्हणता येणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने पावले उचललेली आहेत. दुष्काळ निवारणाचे प्रयत्न राज्य शासनाच्या माध्यमातून होत आहेत. त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. सातत्याने पडणा-या दुष्काळामध्ये राज्य शासनाने गावांना पाण्याचे टँकर पुरविले, टँकरने पाणी पुरविण्याच्या संदर्भातील अधिकार तहसीलदार स्तरावर दिले, जिल्हाधिका-यांशी व्हीडिओ कॉन्फरन्सने संपर्क साधून सूचना दिल्या, जमीन महसूलात, वीज बिलात सूट दिली. वीज खंडित न करण्याचा निर्णय घेतला, रोजगार हमी योजनेचे निकष शिथिल करण्यात आले, चारा डेपो आणि गुरांच्या छावण्या निर्माण केल्या. अडचणी निश्चितच आहेत. दुष्काळाचा सामना करणे ही सोपी गोष्ट नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी दुष्काळाचा इतिहास प्रभावीपणे मांडला. दर तीन चार वर्षांनी महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडत असतो. श्री. डहाणूकर नावाच्या सन्माननीय सदस्यांनी 1953मध्ये दुष्काळाच्या संदर्भात लिहिलेली पुस्तिका मी लायब्ररीमध्ये जाऊन वाचली. त्यांनी त्या पुस्तिकेमध्ये लिहिलेले आहे की, दुष्काळ निवारणार्थ आपण प्रत्येक वेळी दोन ते तीन कोटी रुपये खर्च करतो. तरी देखील परिस्थिती बदलत नाही. त्यांनी 1953मध्ये ती पुस्तिका लिहिली. स्वातंत्र्यांनतरचा तो थोडा काळ होता. आता स्वातंत्र्यानंतर 60-65 वर्षे लोटलेली आहेत. या काळामध्ये दुष्काळाचे चित्र मात्र बदललेले आहे. दुष्काळाचे स्वरुप बदललेले आहे. पूर्वी अन्नधान्य आणि रोजगाराचा प्रश्न होता. आता आपण अन्नधान्याच्या बाबातीत स्वयंपूर्ण झालो आहोत. आता माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चा-याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मागेल त्याला काम देण्याची भूमिका रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून घेतल्यामुळे रोजगाराचा प्रश्न राज्यात गंभीर आहे असे म्हणता येणार नाही. मात्र

..3..



MSS/ पूर्वी श्री. गिते 04:30

डॉ. सुधीर तांबे...

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शहरे वाढत आहेत, नागरीकरण वाढत आहे, औद्योगिकीकरण वाढत आहे. या सर्वासाठी पाणी लागत आहे. औरंगाबाद, जालना या सारख्या शहरांची वाढ होत आहे. जायकवाडी धरणामध्ये पाणीसाठा नसल्यामुळे भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील दुष्काळाच्या दाहकतेबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत. दुष्काळाशी सामना करण्याकरिता दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे. पाण्याचे नियोजन करण्यामध्ये आपण खूप कमी पडत आहोत. शेतीसाठी आधुनिक सिंचन पध्दतीचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाणीसाठ्यामध्ये वाढ केली पाहिजे. उद्योगासाठी पाण्याची आवश्यकता आहे, वाढत्या नागरिकरणासाठी पाण्याची आवश्यकता आहे, शेतीसाठी पाण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन आपल्याला दीर्घकालीन उपाययोजना करावयास पाहिजे. पाणलोट क्षेत्राचा विकास ही देखील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरिश पटेल यांनी शिरपूर येथे जो प्रयोग केलेला आहे तसे प्रयोग प्रत्येक ठिकाणी केले तर त्या त्या गावचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. माननीय वनमंत्री सभागृहामध्ये आहेत. त्यांनी जंगलामध्ये मोठ्या प्रमाणावर चारा निर्माण केला तर जनावरांच्या चा-याचा प्रश्न सुटू शकेल.दुष्काळी परिस्थितीमध्ये ऐन वेळी चारा मिळत नाही. जनावरांना खाण्यासाठी ऊस दिला जातो. ऊस हा चा-याला चांगला पर्याय नाही. परंतु नाईलाजाने ऊसाचा चारा म्हणून वापर करावा लागतो. दीर्घकालीन उपाययोजना करताना चा-याच्या निर्मितीचा विषय प्राधान्याने घेतला पाहिजे. सह्याद्रीच्या बाजूने समुद्राला मिळणारे पाणी वळविण्याची नितांत गरज आहे. पाणलोट कार्यक्रमाबरोबरच विहिरींच्या पुनर्भरणाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने चांगली पावले उचलेली आहेत. केन्द्र शासनाने देखील मदत केलेली आहे. यावेळी देखील केन्द्रकडून अधिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. तेव्हा या निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने ठोस अशी उपाययोजना करावी असे आवाहन करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये जो दुष्काळासंबंधीचा प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारत हा कृषिप्रधान देश आहे असा लौकिक संपूर्ण जगामध्ये आहे. या देशाची अर्थव्यवस्था ज्या शेतीवर आधारलेली होती ती शेती आणि शेतकरी आता पूर्णपणे निराधार झालेला आहे. ग्रामीण भाग हा विकासापासून लांब जात आहे,. उद्योगाअभावी शहरे भकास होत चालली आहेत, राज्याच्या आर्थिक विकासामध्ये शेतीचा वाटा दिवसेंदिवस घटत चालला आहे. देशामध्ये जीडीपीचा दर 15 टक्के आणि महाराष्ट्रामध्ये तो 11 टक्के आहे. आपला देश कृषिप्रधान आहे. सबंध देशाची सरासरी सिंचन क्षमता पाहिली तर ती 52 टक्के आहे आणि महाराष्ट्राची सिंचन क्षमता केवळ 18 टक्के आहे. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे हे महाराष्ट्राबद्दल खूप चांगले बोलतात. पंजाबमध्ये 92 टक्के सिंचन होते. महाराष्ट्राची सिंचन क्षमता केवळ 18 टक्के आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 65 वर्षाच्या काळात सिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्राची ही अवस्था आहे. आपण सन्माननीय सदस्यांच्या भावना येथे ऐकलेल्या आहेत. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, आम्हाला फक्त पिण्यासाठी पाणी द्या. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचा पृथ्वीतलावरील राजा असा उल्लेख केला. आज विदर्भातील आणि मराठवाड्यातील जनता ओरडून सांगत आहे की, हे राजा आम्हाला पिण्यासाठी पाणी दे. पण आपण त्यांना पाणी देऊ शकत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

या सभागृहात दुष्काळावर प्रथमच चर्चा होत नाही. या सभागृहात दुष्काळावर चर्चा झाली नाही असे एखादे वर्ष तरी मला दाखवून द्यावे. या राज्यात एक वर्ष गेले तर दुसऱ्या वर्षी दुष्काळ पडतो. या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने आम्ही सरकारकडून फक्त पाणी मागतो आहोत. संपूर्ण देशात 52 टक्के एवढे सिंचन आहे आणि आपल्या राज्यात फक्त 18 टक्के सिंचन आहे. सिंचनामध्ये एवढी तफावत का आहे या बाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काय केले, फक्त सत्ता उपभोगली, खुर्च्या उबवल्या, सिंचनाच्या पैशांचे काय झाले याचाही खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे.

सभापती महोदय, नगर जिल्हयाचे पालक मंत्री म्हणतात की, मी पाणी सोडणार नाही. नाशिकचे पालकमंत्री म्हणणार की, मी पाणी सोडणार नाही. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासारखे दुसरे कोणते पुण्य नाही. तुम्ही जगणार आणि तुमच्या खाली राहणारी माणसे पाण्याविना मरतील ते तुम्हाला चालेल.? मंत्री होताना तुम्ही शपथ घेतलेली असते. तुम्ही जर जनतेला पाणी उपलब्ध करुन देणार नसाल तर तुम्हाला मंत्री म्हणून त्या खुर्चीवर बसण्याचा नैतिक अधिकार नाही.

सभापती महोदय, मी बीड येथे गेलो होतो, तेव्हा मी बोललो की, मराठवाड्यास पाणी मिळाले नाही तर मी आंदोलन करण्यासाठी तेथे येईन. मराठवाड्यास पाणी मिळावे म्हणून शिवसेनेने तेथे मोर्चा काढला. जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी मला बोलण्याचा नैतिक अधिकार आहे. पाण्यावर कोणाचाही अधिकार नसतो. आम्ही पाणी सोडणार नाही, धरणाच्या खालची माणसे मेली तरी चालतील, पाण्यासाठी तडफडून मेली तरी चालतील, अशा प्रकारची भूमिका पालक मंत्र्यांनी घेणे हे बरोबर नाही. तुम्ही मंत्री म्हणून शपथ घेता. पालक मंत्री म्हणून सरकारने काही नैतिक जबाबदारी सोपविलेली असते. जर आपण जनतेला पाणी उपलब्ध करुन देणार नसाल तर तुम्हाला त्या खुर्चीवर बसण्याचा नैतिक अधिकार मुळीच नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

महोदय, भारत हा कृषि प्रधान देश आहे. या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत.या राज्यात आदिवासी भागात कुपोषणामुळे बालकांचे मृत्यू मोठया प्रमाणात होत आहेत. तरी आपण आपला देश हा शेतीप्रधान आहे असे म्हणवून घेतो आहोत. शासनकर्त्यांना राज्यातील शेतकऱ्यांची किती काळजी आहे. स्वातंत्र्यानंतर जो समतोल ठेवावयास पाहिजे होता, दुर्दैवाने तो समतोल ठेऊ शकलो नाहीत ही देखील एक दुर्दैवाची गोष्ट आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित हे त्या भागातील दुष्काळाच्या संदर्भात अतिशय पोटतिडकीने बोलले. आम्ही महाराष्ट्रात आलो ही चूक केली काय ? त्यांचे बोलणे ऐकल्यानंतर मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याकडे पाहिले. वेगळया विदर्भाच्या बाबतीत त्यांच्या भावना ताबडतोब जाग्या झाल्या. या विषयाबाबत मी काही बोलणार नाही. अशा प्रकारच्या भावना निर्माण होण्यास कोण जबाबदार आहे हा खरा प्रश्न आहे. या भावना का निर्माण होतात, का होतात, कोणामुळे अशा भावना निर्माण होतात, "एक खातो तुपाशी, दुसरा राहतो उपाशी" अशी वेळ या राज्यातील जनतेवर का यावी याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या राज्यात 18 टक्के सिंचन आहे, त्यातील 70 टक्के पाणी हे पश्चिम महाराष्ट्रातील ऊस पिकासाठी दिले जाते ही वस्तुस्थिती असून ती कोणी नाकारु शकत नाही. कोकण, खानदेश, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणचे आमदार आम्हाला पाणी मिळावे म्हणून सभागृहात शंख करीत असतात. शासनकर्त्यांकडून सांगितले जाते की, आम्ही तुम्हाला पाणी कोठून देणार. कोकणात सिंचनाची परिस्थिती अतिशय वाईट आहे. आम्हाला वेगळे कोकण द्यावे असे आम्ही म्हणणार नाही. संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी माननीय शिवसेना प्रमुख यांनी जेलची शिक्षा भोगली आहे आणि 106 हुतात्मे दिलेले आहेत. संयुक्त महाराष्ट्रासाठी शिवसेनेने रक्त सांडले आहे. त्यामुळे आम्हाला कोकण वेगळा द्यावा असे आम्ही कधीही म्हणणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यातील 40 टक्के पाऊस कोकणात पडतो. सगळयात जास्त पाऊस कोकणात पडत असूनही तेथील गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. ही एक दुर्देवी गोष्ट आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी पाझर तलावाचा विषय या ठिकाणी उपस्थित केला होता. या राज्यात 1999 पर्यंत आमचे सरकार कार्यरत होते. त्यावेळी पाझर तलावांची कामे झाली. 1999 नंतर आमची सत्ता गेल्यानंतर या सरकारने एकही पाझर तलावाचे काम केलेले नाही. मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. पाटबंधारे प्रकल्प बाजूला ठेवा, एक पाझर तलावाचे काम या सरकारने केले आहे काय ते आम्हाला दाखवा. आमच्या कालावधीमध्ये आम्ही कोकणामध्ये 35 पाटबंधाऱ्यांची कामे हाती घेतली होती. आमचे शिवशाहीचे राज्य गेले. आपण सत्तेवर आलात तेव्हा पासून या संपूर्ण 35 कामांना निधी उपलब्ध करुन दिला

3...



ABG/ प्रथम श्री.शिगम 04:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

गेला नाही म्हणून ती कामे ठप्प झालेली आहेत. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण येथील लोकांनी काय पाप केले,त्यांना सरकार का न्याय देत नाही.? पश्चिम महाराष्ट्र म्हणजे सरकार असाच कारभार सध्या सुरु आहे. आदिवासी विकास विभागाचा पैसा कोठे गेला तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेला. वेगवेगळया विभागांचा पैसा कोठे गेला तर तो पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेला अशा प्रकारच्या बाबी आमच्या निदर्शनास आलेल्या आहेत. सरकारचा बराच मोठा निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळता होत असल्यामुळे लोकांच्या मनामध्ये वेगळे होण्याची भावना तयार होत आहेत. या गोष्टीस सर्वस्वी शासनच जबाबदार आहे असे माझे ठाम मत आहे.

सभापती महोदय, या देशाला स्वातंत्र्य मिळूनही या देशातील 55 टक्के लोक दारिद्रय रेषेच्या खाली आहेत. महाराष्ट्र सरकारची 1997 ची दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची नवीन यादी अजून फायनल होत नाही. ती यादी प्रसिध्द का केली जात नाही, त्यासंबंधी सरकार हिंमत का दाखवित नाही. या संदर्भात सभागृहात अनेक वेळा प्रश्न विचारले, परंतु त्यासंबंधी शासन उत्तर देऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, प्रगतशील महाराष्ट्रात दरवर्षी 15 हजार मुले कुपोषणामुळे मृत्यू पावतात. त्या कुपोषित मुलांच्या मातांना पुरेसे अन्न मिळत नाही, पाणी मिळत नाही. त्यांना आरोग्य सुविधा दिल्या जात नाहीत. कुपोषित बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे म्हणून ठोस अशा उपाययोजना शासनाकडून होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी दुष्काळाच्या बाबतीत एक अतिशय चांगली कविता म्हटली. आतापर्यंत मराठवाडयात 18 वेळा दुष्काळ पडला आहे. माझ्याकडे त्याबाबतची यादी आहे. मराठवाडयात दुष्काळ अशी सातत्याने परिस्थिती का यावी हा एक संशोधनाचा विषय आहे. एकदा माणसाला ठेच लागली की तो माणूस पुढे शहाणा होतो. मराठवाडयात सतत दुष्काळ पडत असल्यामुळे शासनाच्या माध्यमातून कायम स्वरुपी काय उपाययोजना केल्या जाणार आहेत याची माहिती सभागृहात देण्यात यावी. सरकार या बाबतीत काय उत्तर देणार आहे याची आम्हाला माहिती आहे. कारण शासनाने पूर्वीच्या दुंष्काळ विषयक चर्चेला जे उत्तर दिले आहे तेच उत्तर या चर्चेत देखील दिले जाईल आणि सभागृहाचे समाधान केले जाईल. झोपलेल्या माणसाला जागे करु शकतो, परंतु झोपेचे सोंग घेणाऱ्या माणसाला जागे

4...



श्री.रामदास कदम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करता येऊ शकत नाही. या सरकारने झोपेचे सोंग घेतलेले आहे. सरकारकडे पैसे कोठे आहेत, या सरकारने तिजोरी खाली करुन ठेवली आहे. या सरकारने 2 लाख 80 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. आता पुन्हा 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. पुढील आठवडयात पुन्हा 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढणार आहात. तुमचे 7 हजार कोटीचे कर्ज व्याजामध्ये गेले. सरकारकडे पैसे नसताना राज्याचा विकास कशा पध्दतीने केला जाणार आहे याची माहिती सांगितली तर
माझ्या ज्ञानात थोडी भर पडेल.

महोदय,सरकारकडे पैसेच नाही. सरकारच्या तिजोरी खडखड वाजू लागली आहे. बडा घर पोकळ वासा अशी सरकारची परिस्थिती आहे. पैसे नाहीत म्हणून दिल्ली मध्ये जाऊन केंद्र सरकारकडे पैसे द्या म्हणून मागणी कराल. परंतु केंद्र सरकार पैसे उपलब्ध करुन न देता तुम्हाला हाकलून लावील. केंद्र सरकार सांगेल की, एवढे तालुके, एवढी गावे दुष्काळी म्हणून जाहीर करुन टाका त्यानंतर तुम्ही आमच्याकडे पैसे मागण्यासाठी या. जे तालुके दुष्काळी नाहीत ते तालुके दुष्काळी म्हणून सरकार जाहीर करुन टाकेल. ज्या तालुक्यांमध्ये खरोखरच दुष्काळ पडलेला आहे, ते तालुके सरकार दुष्काळातून वगळून टाकेल. प्रत्येक आमदार आणि मंत्री माझ्या तालुक्याचा समावेश दुष्काळी तालुक्याच्या यादीत कसा येईल असा प्रयत्न करीत आहेत. या बाबतीत स्पर्धा लागलेली आहे. माझ्याकडे त्याची देखील यादी उपलब्ध आहे. ज्या तालुक्यात जास्त पाऊस पडला तो तालुका दुष्काळी तालुक्यांच्या यादीत घेतला जाईल, ज्या तालुक्यात पाऊस कमी पडला तो तालुका मात्र वगळण्यात येईल. जे सत्ताधारी पक्षात नाहीत, त्याच्या तालुक्यात पाऊसच पडला नसेल तरी त्या तालुक्याचा समावेश दुष्काळी तालुक्यात होणार नाही. अशी सरकारची दुष्काळाची व्याख्या आहे. सत्ताधारी पक्षाकडून दुष्काळात राजकारण केले जात आहे.

सभापती महोदय, मघाशी छावणीच्या बाबतीत उल्लेख झाला. एका छावणीत किती जनावरे ठेवली पाहिजेत यासंबंधी मुख्यमंत्र्यांनी आयुक्तांना सांगितल्या नंतर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना नियम दाखविले. एका जनावरासाठी किती पैसे द्यावयाचे, छावणी संबंधी कोणते निकष लावावयाचे यासंबंधी आयुक्तांकडून सूचना दिल्या गेल्या. जनावरांच्या छावणीसाठी प्रथम 251 कोटी रुपये देण्यात आले. त्यातील 100 कोटी रुपये राजकारणी लोकांनी खाल्ले. मी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. सरकार दुष्काळी परिस्थितीमध्ये देखील राजकीय पोळी भाजून



श्री.रामदास कदम..

घेत आहेत. छावणीसाठी दिलेल्या पैशात देखील आपण गैरव्यवहार करता ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.जनावरे पाणी आणि चाऱ्या अभावी तडफडून मृत्यूमुखी पडत आहेत. हे सरकार मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाण्याचे काम करीत आहे. छावणीसाठी दिलेल्या निधीत 100 कोटी रुपयांचा गैरव्यवहार संबंधितांकडून करण्यात आला आहे. असे प्रकार होऊ लागल्याची बाब माननीय मुख्यमंत्र्यांना कळली. त्यांनी छावण्या बंद केल्या. छावण्या बंद केल्या म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांचे मी अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो. मी प्रथमच त्यांना धन्यवाद देतो आहे. सत्ताधारी पक्षातील लोक दुष्काळाची वाट बघतात, आम्हाला दुष्काळाचे पैसे कधी खायला मिळतात याची वाट पहात असतात. एकदा सर्वंकष विकास निश्चित केल्यानंतर त्याची अंमलबजावणी होते आहे किंवा नाही. ही जबाबदारी कोणी तरी स्वीकारली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.गिते 04:50

श्री.रामदास कदम.........

कुंपणाने जर शेत खाल्ले तर त्याला जबाबदार कोण? आज राज्यातील धरणे केवळ उद्योगांसाठी लागणाऱ्या पाण्याच्या टाक्या बनल्या आहेत असे मी म्हटले तर ते अनाठायी ठरणार नाही.

सभापती महोदय, शासनाने रोजगार हमी योजनेची किती कामे हाती घेतली आहेत याची मला माहिती नाही. परंतु लोकांचे स्थलांतर थांबवायचे असेल तर त्यांच्या हाताला काम द्यावे आणि संध्याकाळी कामाचा मोबदला दिला तर दुष्काळी भागातील लोकांचे स्थलांतर थांबेल. दुष्काळी परिस्थितीत रोजगार हमी योजनेचे नियम शिथिल केले पाहिजेत. वीज बिलामध्ये 33 टक्के सवलत दिली पाहिजे. थकबाकी वसुली थांबविली पाहिजे. कृषी कर्जाचे सुसूत्रीकरण केले पाहिजे. शेतसारा माफ केला पाहिजे. विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ केले पाहिजे. दुष्काळ जाहीर केल्यानंतर शासनाची ही नैतिक जबाबदारी आहे. दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी श्रमदानातून गावतलाव करणे, गावतळी आणि पाझर तलाव बनविणे या चांगल्या उपाययोजना आहेत. गाव तेथे पाझर तलाव असलाच पाहिजे. या भूमिकेतून कामे होणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या निधीतून यंत्राद्वारे नाल्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याची कामे केली पाहिजेत. शासनाने जर का 20 कोटी रुपये आणि 20 पोकलेन मशीन्स उपलब्ध करुन दिल्या तर आणि त्या माध्यमातून नद्या व नाल्यांचे खोदकाम करुन त्याची रुंदी व खोली वाढविली तर निश्चितपणे त्याचा उपयोग दुष्काळ निवारणासाठी काही अंशी होऊ शकतो. सिमेंट बंधारे बांधणे, फळबागा वाचविण्यासाठी ठिबक सिंचन योजनेच्या अनुदानात वाढ करणे, अल्पभूधारक शेतकऱ्यांना मोफत बियाणे आणि खते पुरविणे, ज्वारी व बाजरी विकासाला प्रोत्साहन दिल्यास चाऱ्यांचा प्रश्न सुटण्यास निश्चितपणे मदत होईल.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचे नियम जे अधिकारी शिथिल करणार नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. पाणलोटासाठी कृषी विभागासह पाटबंधारे व जिल्हा परिषद यांच्यामध्ये समन्वय साधून कामे व्हावीत. जलसंधारणाच्या कामांच्या भूसंपादनासाठी रोजगार हमी योजनेतून निधी द्यावा आणि प्रत्येक गावात रोजगार हमी योजनेचे किमान एक सामुदायिक काम हाती घ्यावे. या उपाययोजना कराव्यात. पीक पैसेवारीचे निकष बदलण्यात यावेत. जलसंधारण व रोजगार हमी योजनेसाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना 10 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत. रोजगार हमी योजनेवरील मजुरीचा दर सहा महिन्याच्या काळासाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

वाढविण्यात यावा. आमदार आणि खासदार यांच्या विकास निधीतून दुष्काळग्रस्तांसाठी प्रत्येकी 1 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत. या उपाययोजनांकडे सरकारने अधिक लक्ष दिले तर निश्चितपणे काही अंशी दुष्काळावर मात करता येईल.

सभापती महोदय, राज्यात 60 हजार पाणलोटांचे शास्त्रशुध्द पध्दतीने वॉटरशेड टीम वापरुन तीन वर्षात काम पूर्ण केले तर दुष्काळ आला तरी आपण त्याला तोंड देऊ शकतो. पाणलोट क्षेत्राचा उपयोग केवळ छोट्या नद्यांमध्ये पाणी टाकण्यापेक्षा सगळे पाणी पाईपच्या माध्यमातून धरणामध्ये नेले तर आपल्याकडे एक-दोन वर्षे पाऊस पडला नाही तरी मोठया प्रमाणात दिलासा मिळू शकतो. कमी पैसे खर्च करुन अधिक प्रमाणात कामे होऊ शकतात. निर्धाराने ही कामे केली तर आपल्याला निश्चित यश मिळू शकते.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण केंद्रात मंत्री असताना राज्याचे मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक साहेब होते. 1972 च्या दुष्काळात त्यांनी रोजगार हमी योजनेची कामे काढून दररोज 50 लाख लोकांच्या हाताला काम दिले होते. त्यांच्यापासून आपण काही प्रेरणा घेणार आहोत की नाही? दुष्काळाच्या परिस्थितीत गुरांच्या छावण्यांवर कोट्यवधी रुपयांची लयलूट कशी सुरु आहे हे मी निदर्शनास आणले आहे. विभागनिहाय दुष्काळ जाहीर करण्यापेक्षा ज्या भागामध्ये दुष्काळाचे प्रमाण कमी आहे तेथे शासन, कमी तेथे आम्ही ही भावना बाळगली जात आहे. एखादा विशिष्ट भाग डोळयासमोर न ठेवता कोकण, मराठवाडा, विदर्भ, खानदेश या भागात भविष्यात कितीही दुष्काळ पडला तरी तेथे पाण्याची टंचाई भासणार नाही अशा प्रकारचे काम शासनाकडून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुढील काळात पाऊस कमी झाला आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन केले नाही तर या सरकारला सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. लोक रस्त्यावर येतील आणि मंत्र्यांच्या लाल दिव्याच्या गाड्या फोडल्याशिवाय राहणार नाहीत एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दुष्काळावरील चर्चा थांबविली तर बरे होईल. शेतकऱ्यांची विटंबना आम्हाला पाहवत नाही. सत्तारुढ पक्षाच्या बाजूकडील उपस्थिती पाहिल्यानंतर आम्हाला दु:ख होत आहे. माननीय सभापतींना मी चिठ्ठी पाठविली होती. कोणकोणत्या खात्याचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे हे मी त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. त्या विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित झाल्याशिवाय चर्चा सुरु ठेवणे योग्य होणार नाही. त्यामुळे सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता तहकूब करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** (श्री.जयवंतराव जाधव) : संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना सभागृहात तातडीने उपस्थित राहण्याबद्दल सूचना देण्यात यावी. सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.57 ते 5.02 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

**तालिका सभापती (श्री.जयवंतराव जाधव )** :सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.04 ते 5.15 पर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगिती नंतर

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज सकाळ पासून आम्ही या प्रस्तावावर चर्चा करीत होतो. असे असताना महसूल, कृषी आणि रोजगार हमी विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. यावरून असे दिसते की, या प्रस्तावाबाबत शासन गंभीर नाही. सभागृहात मंत्री नसल्यामुळे 5-5 मिनिटांसाठी बैठक स्थगित करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मंत्री उपस्थित रहात नसल्यामुळे माननीय सभापतींच्या दालनात बैठक सुरू आहे. याबाबत लवकरच मार्ग काढण्यात येणार आहे म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करावी.

**उप सभापती** : माननीय सभापतींच्या दालनात बैठक सुरू असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 5 वाजून 16 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 05:25

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात मानननीय मंत्री उपस्थित न राहिल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करावी लागते. अधिवेशनाची सांगता होताना माननीय सभापती महोदय अधिवेशनामध्ये काय काय कामकाज झाले, किती कामकाज झाले, गोंधळामुळे किती वेळ वाया गेला याची माहिती देतात. दोन वर्षापूर्वी मी माननीय सभापतींना विनंती केली की होती की, सभागृहाच्या कामकाजाची माहिती देत असताना त्यामध्ये मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे किती वेळ वाया गेला याची देखील माहिती द्यावी. तेव्हा पासून सभागृहात मंत्री उपस्थित नसल्यामुळे किती वेळ वाया गेला याची माहिती देण्यात येते.

सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये काय चर्चा होते याची सन्माननीय सदस्यांना माहिती नसते. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे मी मागणी केली होती की, संसदीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी राजीनामा दिला पाहिजे. कारण संसदीय कामकाज मंत्री म्हणून त्यांचे कामकाज अयोग्य आहे असे माझे मत आहे. हे अधिवेशन दोन आठवड्याचे का झाले त्यावरुन हा विषय चर्चेला आला होता. संसदीय कामकाज मंत्री म्हणून सत्ताधारी आणि विरोधकांना एकत्र ठेवून त्यांच्याकडून कामकाज करुन घेण्याची जबाबदारी त्यांची आहे. फक्त विरोधकांची समजूत काढण्यापुरते त्यांचे मंत्री पद नाही. लॉबीमध्ये भडंग आणि चहा देऊन सौहार्दाचे संबंध ठेवण्यापुरते ही ते मर्यादित नाही.

सभापती महोदय, गेल्या दहा अधिवेशनामध्ये ज्या ज्या घटना घडतात मग त्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून असो वा विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून असो त्याचे चिंतन आणि मनन करावयाचे असते. त्या संबंधीचा अहवाल घेऊन माननीय मुख्यमंत्री किंवा मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यावर चर्चा करावयाची असते कारण त्यावेळी सर्व मंत्री उपस्थित असतात. मंत्री महोदयांना स्पष्ट सांगावयास पाहिजे की, सभागृह चालविण्याची जबाबदारी आपली आहे. या सभागृहात निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नांना उत्तरे देण्याची जबाबदारी आपली आहे. आपल्यावर ही जबाबदारी असून सुध्दा आपण सभागृहात गैरहजर राहिल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागते आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

माझ्यावर माफी मागण्याची पाळी येते असे आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित मंत्र्यांना सांगावयास पाहिजे, असे मी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये सांगितले होते. आपणास हे माहीत आहे. हे सर्व सांगितल्यानंतर सुध्दा मंत्री महोदयांना आपली जबाबदारी कळत नाही.

सभापती महोदय, मला मान्य आहे की, विधानपरिषद सभागृहामध्ये एक मंत्री आणि अन्य राज्यमंत्री उपस्थित असले तरी सभागृह चालविता येते. परंतु आज सभागृहात अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. सर्वांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. ग्रामीण भागात काम करणाऱ्या आणि विशेषत: दुष्काळग्रस्त भागात काम करणाऱ्या आमदारांचा चिंतेचा विषय आहे. हा कोणा एका पक्षाचा प्रश्न नाही. येथे उपस्थित असलेल्या सर्वांच्या दृष्टीने हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. खरे म्हणजे हा प्रस्ताव विरोधी पक्षाकडून मांडण्यात येणार होता, परंतु आम्हीच सांगितले की हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून मांडण्यात यावा. परंतु या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, ही चर्चा सुरु असताना सभागृहात मंत्री उपस्थित नव्हते ही बाब आम्ही लक्षात आणून दिली असता, मंत्री महोदय पाच मिनिटांत उपस्थित राहतील असे सांगण्यात आले. परंतु पाच मिनिटांची 30-45 मिनिटे झाली तरी सभागृहात मंत्री उपस्थित झाले नाहीत. त्यांनतर आपण आलात. त्याबद्दल धन्यवाद. सभागृहात इतका महत्वाचा विषय सुरु असताना सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नाहीत. आज सभागृहात महत्वाची चर्चा सुरु असताना सभागृहाची बैठक नऊ वेळा स्थगित करावी लागली हा एक विक्रम आहे आणि ही अतिशय चिंतेची देखील बाब आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार तसेच माननीय श्री.शरद पवार यांना विनंती करतो की, बरीच वर्षे मंत्री पदी राहिल्यामुळे अनेकांना अजीर्ण झाले आहे. तेव्हा मंत्रिमंडळामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता आहे. ज्यांना अजीर्ण झाले आहे त्यांना घरी पाठवावे आणि जे उत्साही आणि तडफदार आहेत त्यांना मंत्रिमंडळात घ्यावे. ते चांगल्या प्रकारे कामकाज चालवतील आणि महाराष्ट्राचा कारभार करतील. तेव्हा मंत्रिमंडळामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे अशी माझी विनंती आहे. सभागृहात मंत्री उपस्थित नाहीत म्हणून माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करावी असे मला वाटत नाही.

..3..



AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 05:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी उपस्थित केलेली बाब अतिशय गंभीर आहे असे मला वाटते. सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना संबधित विभागाच्या मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित न राहिल्यामुळे सभागृहाची बैठक आठ-नऊ वेळा तहकूब करावी लागते ही गंभीर बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या निश्चितपणे राज्याच्या प्रमुखांकडे व्यक्त करण्यात येतील. या सभागृहाची एक उच्च परंपरा आहे. सभागृहात मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृह तहकूब करावे लागत असेल तर ती गंभीर चूक आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करु नका असे सांगितले असले तरी तो त्यांचा मोठेपणा आहे. तरी सुध्दा संसदीय कार्य मंत्री म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो. राज्यामध्ये दुष्काळा सारखा महत्वाचा प्रश्न असताना संबधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित राहिले नाहीत याची माहिती निश्चितपणे माननीय मुख्यमंत्री आणि त्या त्या पक्षाच्या प्रमुखांकडे द्यावी लागेल असे मला वाटते. कारण प्रश्नाला गांभीर्याने सामोरे जाण्याऐवजी सभागृहात उपस्थित न राहणे ही अतिशय गंभीर बाब आहे. अशाप्रकारची घटना भविष्यात घडणार नाही याची खबरदारी संसदीय कार्य मंत्री म्हणून मी घेईनच, परंतु आमच्या सहकाऱ्यांनी देखील ती घ्यावी अशाप्रकारची भूमिका व्यक्त करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहेत मला एक महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे. तो मला हरकतीच्या मुद्यातून मांडावयाचा आहे.

दुसरा मुद्दा म्हणजे मी दोन दिवसांपासून सांगत आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांची सभागृहात पाच मिनिटांची उपस्थिती असावी, मला सिंचनासंबंधी एक हरकतीचा मुद्दा मांडावयाचा आहे. माननीय सभापतींनी सांगितले होते की, त्यांना सभागृहात बोलाविण्यात येईल, परंतु आज दोन दिवस झाले. ते सभागृहात आले नाहीत. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात येणे आवश्यक आहे. फक्त पाच मिनिटांचा विषय आहे. तेव्हा आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत विनंती करावी. तसेच माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांच्याकडे अत्यंत महत्वाचा आणि भ्रष्टाचारासंबंधीचा मुद्दा मांडण्याची इच्छा आहे. आपण मला हे दोन मुद्दे उपस्थित करण्याची परवानगी दिली तर ते मला उपस्थित करता येतील.

यानंतर श्री.सरफरे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यामध्ये निर्माण झालेली अभूतपूर्व पाणी टंचाई आणि दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्यासाठी नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले व इतर सन्माननीय सदस्यांनी ही चर्चा उपस्थित केली आहे त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये दुष्काळ आहे काय, असेल तर त्याबाबत राज्य शासनाने अधिकृतपणे घोषणा करणे गरजेचे आहे. याचे कारण राज्यातील 122 तालुक्यांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती आहे. 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेली जी गावे आहेत त्यांना आपण डिसेंबर महिन्यामध्ये दुष्काळग्रस्त जाहीर करणार आहात, याबाबतीत अजूनही माझ्या मनामध्ये साशंकता आहे. जर खरेच दुष्काळ जाहीर झाला असेल, टंचाईसदृश परिस्थिती जाहीर झाली असेल तर त्या भागात शासनाने नेमकी कोणती मदत करणे अभिप्रेत आहे याबाबत जनतेला माहिती देणे अपेक्षित आहे. शासनाकडून त्यांना लांब-लचक मदत दिली जात असल्याचे सांगितले जाते परंतु प्रत्यक्षात त्यांना मदत मिळत आहे काय? हे देखील समजून घेण्याची गरज आहे. वारंवार निर्माण होणाऱ्या दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करावयाची असेल तर आपण त्याबाबत जुजबी उपाय योजना करावी की दीर्घकालीन ठोस उपाय योजना करावी याबाबत शासनाने गांभीर्याने निर्णय घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, सर्वात महत्वाचा प्रश्न पिण्याच्या पाण्याचा आहे. महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यातील, काही तालुक्यातील काही गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. परंतु उस्मानाबाद असा एकमेव जिल्हा असून त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये जवळ जवळ प्रत्येक गावामध्ये पाणी टंचाई आहे. पिण्याच्या पाण्याची अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. याचे कारण यावर्षी 395 एम.एम. एवढेच पर्जन्यमान झाले आहे. राज्याचा विचार केला तर सरासरी 1600 एमएम इतके पर्जन्यमान असते. उस्मानाबादचे 750 एमएम म्हणजे राज्याच्या सरासरीमध्ये निम्मे पर्जन्यमान असते. यावर्षी 400 एमएम पेक्षा कमी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे अभूतपूर्व पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. आज उस्मानाबाद शहराला 8 एमएलडी इतके पाणी उजनी धरणामधून बंद पाईपव्दारे आणणे ही एक महत्वाची योजना आहे.

माननीय मुख्यमंत्री एकदा उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आवर्जून आले होते. त्यावेळी माननीय पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत त्यांनी 51 कोटी रुपये जाहीर केले होते. या सभागृहामध्ये पुरवणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील....

मागण्या मंजूर झाल्या असल्यामुळे हे पैसे उस्मानाबादला तातडीने मंजूर झाले पाहिजेत. ही योजना पूर्ण करण्यासाठी त्या ठिकाणी एक वरिष्ठ अधिकारी नेमण्यात यावा. या योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी तो अधिकारी दैनंदिन त्यामध्ये लक्ष घालेल. याचे कारण या योजनेव्दारे रोज 80 लाख लिटर येणारे पाणी केवळ उस्मानाबाद शहरापुरते मर्यादित राहणार नसून त्यामधून तुळजापूर शहर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण होणार आहे. सभापती महोदय, त्यापेक्षा मोठा पाण्याचा कोणता स्त्रोत असेल तर तो म्हणजे सीना-कोळेगाव हे धरण आहे. उस्मानाबादपासून 100 कि.मी. अंतरावर हे धरण आहे. त्यामुळे ही योजना तातडीने होणे गरजेचे आहे. या योजनेकरिता पैसा पुरविण्याबरोबरच योग्य अधिकारी नेमण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत मुद्दा उपस्थित करीत असतांना उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये साधारणतः रोजगार हमी योजनेची 300 कामे सुरु असून त्यावर साडे तीन हजार मजूर काम करीत आहेत. परंतु गेल्या 15 दिवसापूर्वी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील बांधकामे पूर्णपणे थांबविण्याबाबत एक आदेश काढला आहे. आपल्याला कल्पना आहे की, शहरी भागामध्ये मोठया संख्येने बांधकामावर मजूर काम करीत असतात. त्यांना उपजीविकेसाठी या बांधकामाच्या कामांवर अवलंबून रहावे लागते. अशा परिस्थितीत या शहरी भागातील मजुरांनी नेमके काय करावे असा एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या करिता माननीय रोजगार हमी योजना मंत्री व माननीय मुख्यमंत्र्यांना आवर्जून विनंती करु इच्छितो की, ग्रामीण भागाच्या पातळीवर आपण रोजगार हमी योजनेचा विचार करीत असतो. परंतु या टंचाईच्या परिस्थितीत रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर शहरी भागातील लोकांना काम मिळावे या साठी एखादी तरी योजना आपण सुरु करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाने पुढाकार घेऊन छावण्या सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु त्यांच्या माध्यमातून अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यातील मुख्य अडचण म्हणजे बऱ्याचशा स्वयंसेवी संस्था शासनाच्या अनेक जाचक अटींमुळे छावण्या सुरु करण्यास पुढे येत नाहीत. मला शासनाला सूचना करावयाची आहे की, जनावरांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय करता आली, तसेच त्या भागातील शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये थेट पैसे जमा केले तर त्या ठिकाणी उपलब्ध

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील...

केलेला चारा शेतकरी स्वत: विकत घेतील. तसे जर केले तर या छावण्यांचा जास्त उपयोग होईल. त्यामुळे या योजनेचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल असे मला आवर्जून सांगावयाचे आहे. 19-

सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अडचणी आपणा सर्वांना माहीत आहेत. त्या बँकेमधून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजाबाबत आणि पुढील हंगामासाठी नव्याने कर्ज देण्यासंबंधी काही निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांच्या भाषणामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मला आपल्याला कल्पना द्यावयाची आहे. कृष्णा खोऱ्याचा जो काही भाग आहे त्यामधील 10 टक्के भौगोलिक क्षेत्र मराठवाडयातील आहे. हे लक्षात घेऊन कृष्णा खोऱ्यामधून 25 टीएमसी पाणी मराठवाडयाला देण्याचा निर्णय झाला होता. त्यामुळे 25 टीएमसीऐवजी 7 टीएमसी पाणी तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर त्या अनुषंगाने त्या ठिकाणी कामे सुरु करण्यात आली. ही कामे पूर्ण करण्यासाठी साधारणपणे 2600 कोटी रुपयांची आवश्यकता आहे हे मी या ठिकाणी मुद्दाम सांगत आहे. याचे कारण उस्मानाबाद जिल्ह्याला दुहेरी अडचणी भेडसावीत आहेत. एक तर या जिल्ह्यातील पर्जन्यमान अतिशय कमी आहे, दुसरी गोष्ट म्हणजे जिल्ह्यातील सिंचन क्षेत्र साडे सोळा टक्क्याच्या आसपास आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 05:40

श्री.राणा जगजितसिंग पाटील . . .

आपल्या राज्याची सरासरी 22 टक्क्यापर्यंत आहे, उस्मानाबाद मध्ये साडेसोळा टक्क्याच्या आसपास आहे.त्याठिकाणी कमी पाऊस, कमी सिंचन होत असल्याने उस्मानाबाद मधील दरडोई उत्पन्न अतिशय कमी आहे.महाराष्ट्रामध्ये जिल्हावार पाहिले तर उस्मानाबाद खालून चौथ्या क्रमांकावर आहे.त्याठिकाणी साधारणपणे 47 हजार रुपये इतके दरडोई उत्पन्न आहे.राज्याचे सरासरी उत्पन्न 88 हजार इतके आहे. त्यामुळे त्याठिकाणी दीर्घकालीन उपाययोजना राबविणे गरजेचे आहे असे मला नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, 2002 मध्ये महाराष्ट्र राज्याचा ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट तयार केला होता. त्यामध्ये संबंधितांनी प्रत्येक जिल्ह्याचा अभ्यास केला होता. जेणेकरुन तेथे कोणत्या अडचणी आहेत, तेथे शिक्षणाचे प्रमाण किती आहे, तेथील लोकांच्या आरोग्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे, तेथील दरडोई उत्पन्न किती आहे याच्या आधारावर प्रत्येक तालुक्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण दुष्काळी तालुके, दुष्काळी जिल्हे आणि दुष्काळी गावे यांच्या बाबतीत नुसते बोलून दीर्घकाळासाठी त्याचा काही उपयोग होईल असे मला वाटत नाही. याबाबतीत आपल्याला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. कारण जेव्हा शासन मोठ्या प्रमाणात मदत करते मग ती जलसंधारणाची कामे असतील, जलसंपदाचे मोठमोठे प्रकल्प असतील किंवा वेगवेगळी अनुदाने असतील, या विविध माध्यमातून आपण शेतकऱ्यांना मदत करतो. परंतु शेत जमिनीचा वापर आणि पिकाचे नियोजन या दोन गोष्टीच्या बाबतीत शासनाला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील असे मला नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत लांबलचक न बोलता मला एवढेच सांगावयाचे आहे की, ज्या दीर्घकालीन योजना आहेत किंवा ज्या योजना लगेच करता येण्यासारख्या आहेत त्यासाठी शासनाने एक वेगळी यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे हे मला नमूद करावयाचे आहे. मग याला दुष्काळी महामंडळ किंवा अजूनही काही म्हणता येईल. परंतु दोन-चार वर्षांनी दुष्काळ आल्यानंतर शासनाने मोठ्या प्रमाणात निधी द्यावयाचा हेच सतत करणे योग्य नाही. याबाबतीत कायम स्वरुपी उपाययोजना आखणे आणि ती राबविणे ही शासनाची जबाबदारी आहे हे मला सांगावेसे वाटते. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये शासनाची भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती करुन मी थांबतो. धन्यवाद.

----

19-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राणा जगजितसिंग पाटील यांनी महत्वाचा मुद्दा मांडला असून तो धाराशीवच्या जीवन-मरणाचा विषय आहे.साधारणपणे 7 टीएमसी चा 2800 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. यासाठी 700 कोटी रुपये खर्च झाले असून श्वेतपत्रिकेमध्ये असे धोरण जाहीर केले आहे की, 25 टक्क्यापर्यंतच्या खर्चाची कामे थांबवावयाची. पण ही कामे थांबली तर हा प्रकल्प देखील थांबणार आहे. त्यामुळे या माध्यमातून मी स्वत: किंवा सन्माननीय सदस्य श्री. राणा जगजितसिंग पाटील विनंती करीत आहोत असे समजा आणि या प्रकल्पाच्या बाबतीत श्वेतपत्रिकेमध्ये जे धोरण आहे ते या एका प्रकल्पासाठी राबवू नये अशा प्रकारची विनंती आपण या माध्यमातून केली पाहिजे.

सभापती महोदय, एक मुद्दा असा आहे की, मी कै.विलासराव देशमुख यांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना मराठवाड्याच्या बाबतीत बोलताना सांगितले होते की, त्यांनी 25 टीएमसी पाणी देण्याबाबत मान्यता दिली होती. त्यामुळे आम्हाला ते पाणी मिळण्याची आशा निर्माण झाली. पण ते थांबविण्याचाही प्रयत्न झाला असाही मी उल्लेख केला होता. माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी नंतर मला सांगितले होते की, मी त्यावर ताबडतोब सही केली होती, मी ते थांबविले नव्हते. याबाबतीत माझ्याकडे असलेली माहिती चुकीची असल्यामुळे कळत न कळत माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या संदर्भात हा उल्लेख गैरप्रकाराने झाला असेल तर तो अयोग्य आहे असे मी मानतो आणि त्याबाबतीत मी स्वत: दिलगिरी व्यक्त करतो. मराठवाड्याला पाणी मिळण्यासाठी जे काही करता येईल ते आपण सर्वांनी मिळून करणे आवश्यक असल्यामुळे हा प्रकल्प राहिला पहिजे हे आपण ठासून सांगितले पाहिजे हा महत्वाचा विषय आहे.

श्री.राणा जगजितसिंग पाटील : सभापती महोदय, माझे एक सबमिशन आहे की, ज्या प्रकल्पाच्या ठिकाणी 25 टक्क्यापेक्षा कमी काम झाले आहे अशा प्रकल्पांच्या निविदा रद्द कराव्यात असा एक प्रस्ताव होता. याबाबतीत एक शिष्टमंडळ माननीय राज्यपाल महोदयांना भेटावयास गेले होते. त्यावेळी माननीय राज्यपाल महोदयांनी कोणताही प्रकल्प रद्द करण्याचे माझ्या मनामध्ये नाही परंतु निधीचे नियोजन योग्य पध्दतीने व्हावे असा उल्लेख केला होता. त्या अनुषंगाने माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडे एक बैठक झाली. आमचे पालक मंत्री माननीय श्री.मधुकरराव चव्हाण साहेबांनी या बैठकीसाठी विनंती केली होती. त्या बैठकीमध्ये देखील हे स्पष्ट करण्यात आले की, कोणताही प्रकल्प रद्द होणार नाही. आमची शासनाला एवढीच विनंती राहील की,पैशाचे नियोजन..

. . . .2 एल-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्हावे आणि पुढच्या चार-पाच वर्षामध्ये प्रकल्प पूर्ण व्हावा. हा भाग दुष्काळग्रस्त असून येथील दरडोई उत्पन्न अतिशय कमी आहे. ह्युमन डेव्हल्पमेंट इंडिक्स अतिशय कमी आहे म्हणून केंद्र शासनाकडे अतिशय खास बाब म्हणून बीड आणि उस्मानाबाद येथील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीची मागणी करण्यात यावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

-----

. . . .2 एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामदास कदम, दिवाकर रावते यांनी तसेच बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सगळा पैसा आलेला आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या सगळ्या योजना आहेत त्यापैकी जास्त योजना पश्चिम महाराष्ट्रामध्ये झालेल्या आहेत त्यामुळे तेथे दुष्काळच नाही अशा प्रकारच्या भावना व्यक्त करण्यात आल्या. ज्या प्रमाणे मराठवाडा, विदर्भ, कोकण याठिकाणी टंचाईची परिस्थिती आहे तशीच परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुध्दा परंपरागत जे दुष्काळी तालुके आहेत, त्याठिकाणी आहे. सातारा जिल्ह्यातील माण,खटाव तसेच सांगली जिल्ह्यातील आटपाडी, कवठे-महांकाळ, जत, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा अशा प्रकारे तेथे देखील भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे.आता पावसाचे दिवस संपलेले आहेत.परंतु सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भाषणामध्ये आणेवारीच्या बाबतीत सांगितले. प्रत्येक ठिकाणी पावसाची असलेली जी परिस्थिती आहे ती तहसीलदार कलेक्टरना कळवितात. परंतु काही तालुक्यामध्ये पाऊस मोजण्यासाठी जी पर्जन्य मापक यंत्रे आहेत ती फक्त तहसीलदार कार्यालयामध्ये असून त्या ठिकाणी जो पाऊस पडला असेल त्यानुसार तेथील तहसीलदार यांनी त्या तालुक्यामध्ये झालेल्या पावसाची माहिती द्यावयाची आहे ती त्यांनी कलेक्टर यांना कळविली असून ती शासनाकडे आलेली आहे.परंतु ती अत्यंत चुकीची आहे असे एक जबाबदार प्रतिनिधी म्हणून माझे मत आहे. उदाहरण द्यावयाचे तर माझ्या सांगोला तालुक्यामधील पावसाची आकडेवारी चुकीची पाठविली आहे. आज तालुक्यातील जवळजवळ 70 टँकर . . .

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पर्जन्यमापकाचा मुद्दा परवाच्या चर्चेमध्ये आला आहे.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, याठिकाणी बऱ्याच गोष्टींची चर्चा झाली पण त्याबाबत कारवाईच होत नाही. माननीय मंत्री महोदयांनी पर्जन्यमापक यंत्राच्या बाबतीत दोन अधिवेशनामध्ये सूचना केली की, जिल्हा परिषदत गटवाईज यंत्रे बसविली जातील. पण त्याची कार्यवाही झाली नाही. तसेच आपण आणेवारीची पध्दत बदलण्यासाठी विधान सभेतील काही सन्माननीय सदस्य आणि विधान परिषदेतील काही सन्माननीय सदस्य यांची कमिटी करावयास ...

. . . .2 एल-5



श्री.दिपकराव साळुखे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे पण त्याबाबत देखील काही कार्यवाही झालेली नाही. अशा वेळी जर दुष्काळ पडला आहे हे कसे निश्चित करावयाचे याची जर पध्दतच ठरली नसेल तर राज्यात दुष्काळ पडला आहे हे कसे म्हणता येईल असा महत्वाचा प्रश्न माझ्या सारख्या कार्यकर्त्याला पडलेला आहे. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, हे संकट भविष्य काळामध्ये निश्चितच गंभीर होणार आहे. आज माझ्या भागातील परिस्थिती पाहिली तर सरकारी बोअर वेल 150 फूटापर्यंत नेतो पण आज खाजगी बोअर वेल 700, 800,900 फूटापर्यंत गेले आहेत आणि आजही आपण शासनाच्या धोरणा नुसार 150 फुटापर्यंत बोअर मारतो आणि ते वर्षातून महिना-दोन महिने चालतात आणि बाकीचे महिने बंदच असतात. मात्र त्यावर शासनाचा कोट्यावधी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे जी जुनी धोरणे आहेत त्यामध्ये आता आपल्याला बदल करावा लागणार आहे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मत आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये अनुशेषाचे फार मोठे भूत आहे. मी आपल्याला एक गमतीशीर उदाहरण सांगणार आहे. सांगोला, मंगळवेढा हे तालुके परंपरागत दुष्काळी आहेत. याला वरदान ठरणारी टेंभू योजना असून त्यातून सांगोला तालुक्याला पाणी मिळणार आहे. टेंभू योजनेचे पाणी विट्यापासून सांगोला तालुक्यामध्ये येण्यासाठी 150 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. जर दोन वर्षापूर्वी या प्रकल्पाला 150 कोटी रुपये मिळाले असते तर आटपाडी व सांगोला तालुक्यातील दुष्काळ कायम स्वरुपी नाहीसा झाला असता. पण गेल्या सहा महिन्यामध्ये या शासनाने माझ्या तालुक्यामध्ये जो खर्च केला आहे, त्यामध्ये चारा डेपोला आतापर्यंत 60 कोटी रुपये खर्च झाला आहे. चारा छावण्या सुरु झाल्या आहेत त्याला 60 कोटी रुपये खर्च झाला आहे. पाण्याच्या टँकरसाठी 10 कोटी रुपये खर्च झाला आहे आणि रोजगार हमी योजनेच्या कामासाठी जवळजवळ 20 कोटी रुपये म्हणजे 155 कोटी रुपये सहा महिन्यामध्ये माझ्या एका तालुक्यासाठी शासनाने खर्च केले आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपक साळुंखे ....

गेल्या दोन वर्षापासून आम्ही सांगत आहोत. आपण जर टेंभू योजनेसाठी 150 कोटी रुपये दिले तर आटपाडी आणि सांगोला या दोन्ही तालुक्यातील दुष्काळाचे कायम स्वरुपी निवारण करण्यासाठी चांगल्या पध्दतीने मदत होईल. पण अशा प्रकारची विसंगती असल्यामुळे आणि वरचेवर पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढत चाललेली आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राकडे बघण्याची दृष्टी बदलली पाहिजे. पश्चिम महाराष्ट्र म्हटला की, सर्व सुजलाम सुफलाम आहे असे काही लोकांना वाटते. पण तशी परिस्थिती नाही. मघाशी सन्माननीय सदस्यांनी जत तालुक्यातील जी परिस्थिती सांगितली ती खरी आहे. जत तालुक्यातील 40 गावांनी ग्रामसभेचा ठराव घेऊन सांगितले की, जर आम्हाला पिण्यासाठी पाणी दिले नाही तर आमचा समावेश कर्नाटक राज्यात करावा. ती गावे माझ्या गावापासून 20 किलोमीटर अंतरावर आहेत. भविष्य काळामध्ये जर अशीच परिस्थिती निर्माण व्हावयास लागली तर त्याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, शिरपूर तालुक्यामध्ये चांगल्या प्रकारचा पॅटर्न राबविलेला आहे. तसा पॅटर्न या दुष्काळी तालुक्यांमध्ये राबविण्यासाठी जे ओढे आणि नाले आहेत ते जेसीबीने खोदून मोठे करुन त्यावर सिमेंटचे छोटे छोटे बंधारे बांधावेत. जे छोटे तलाव आहेत त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर गळती आहे. शासनाने भरीव कार्यक्रम घेऊन दुष्काळामध्ये पडलेले जे छोटे तलाव आहेत त्याची गळती थांबविण्याची कामे जर हातामध्ये घेतली आणि शिवारातील पाणी शिवारातच राहिले पाहिजे यासाठी जर एमआरइजीएसच्या माध्यमातून पैसे खर्च केले तर त्याचा चांगला उपयोग होईल. या दुष्काळी भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या फीच्या बाबतीत मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सांगितले. ज्या ठिकाणी दुष्काळाची तीव्रता जास्त आहे त्या ठिकाणी शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या फीच्या बाबतीत शासनाने विचार करावा तसेच विजेच्या बिलामध्ये सुध्दा सवलत मिळावी अशी विनंती करतो. या सर्व बाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दीपक साळुंखे यांनी शेवटी जो मुद्दा मांडला त्याला धरुनच मी माझे म्हणणे मांडणार आहे. प्रामुख्याने गेल्या वर्षीच्या दुष्काळाच्या वेळी सुध्दा टंचाईसदृश्य परिस्थिती की दुष्काळ हाच प्रश्न निर्माण झाला होता. जोपर्यंत आपण दुष्काळ घोषित करीत नाही तोपर्यंत या ज्या सर्व सवलती आहेत त्या मिळणार नाहीत. विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफ करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करणे, एस.टी.मध्ये 50 टक्के सवलत, विजेच्या बिलामध्ये सवलत आणि सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळणे हे सर्व विषय यामध्ये आहेत. गेल्या वर्षीच्या टंचाईसदृश्य परिस्थितीमध्ये सर्व प्रकारे शेतकऱ्यांनी विम्याचे पैसे भरलेले असताना सुध्दा त्यांना विमा कंपन्यांकडून पैसे मिळाले नाहीत. कारण त्याचे असे म्हणणे होते की, टंचाईसदृश्य स्थितीमध्ये आम्ही तुम्हाला विम्याचे पैसे देऊ शकत नाही. त्यासाठी दुष्काळ घोषित करावा लागेल. त्यामुळे आपण नजर आणेवारी म्हणा किंवा आणखी काही म्हणा, कोणते तालुके घ्यावयाचे, कोणते तालुके घ्यावयाचे नाहीत, तालुक्यातील किती गावे घ्यावयाची ती घ्यावीत पण जी काही परिस्थिती आहे त्याला टंचाईसदृश्य परिस्थिती न म्हणता जोपर्यंत आपण दुष्काळ घोषित करीत नाही तोपर्यंत या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना मिळणार नाहीत. आता डिसेंबर महिना संपत आलेला आहे. आपण यापेक्षा जास्त शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. ज्या गावांना, ज्या तालुक्यांना दुष्काळ घोषित करावयाचा असेल तो लवकरात लवकर घोषित करावा. दुष्काळी गावे घोषित करण्यामध्ये जर काही मतभेद निर्माण होणार असतील तर त्या सर्व समित्यांमध्ये सरकारी अधिकारी आणि सर्व पक्षाच्या आमदारांना बरोबर घ्यावे पण दुष्काळ घोषित केल्याशिवाय यातील कोणतीही गोष्ट शेतकऱ्यांना मिळणार नाही. म्हणून सुरुवातीलाच सर्वात महत्वाची मागणी मी शासनाकडे करतो की, शासनाने लवकरात लवकर दुष्काळ घोषित केला पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या टंचाई सदृश्य स्थितीमध्ये ज्या ज्या उपाययोजना प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रामध्ये केल्या त्याचा एका अर्थाने अनुभव घेऊन, त्यातून शिकून या वर्षी खूप गोष्टी वेळेत करण्याची आवश्यकता आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात चारा डेपो सुरु केले. चारा छावण्या सुरु करा किंवा शेतकऱ्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे भरा असे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव )**

श्री. चंद्रकांत पाटील .....

म्हणत असताना या पूर्वीच्या चारा छावण्यांचा अनुभव चांगला नाही म्हणून शासनाने चारा डेपो सुरु केले. आता यावेळी काय झाले हे माहीत नाही पण शासनाने पुन्हा एकदा चारा डेपो बंद करुन चारा छावण्या सुरु केल्या. यामध्ये शेतकऱ्यांना नेमके काय पाहिजे याचा विचार केला पाहिजे. जे चारा डेपो सुरु केले त्यामध्ये कोठेही प्रती जनावर पंधरा किलो चारा मिळत नव्हता. त्यावेळी सर्वांचीच तक्रार होती आणि 12 किलो, 13 किलो चारा मिळत होता. त्यामध्ये प्रामुख्याने ऊसाचा चारा मिळत होता. त्यातून सर्व जनावरांचे जबडे खराब झाले. गेल्या वर्षीचा अनुभव लक्षात घेता या वेळेला चारा डेपो की चारा छावण्या, जे काही सुरु करावयाचे ते करा पण त्या ठिकाणी मिळणारा जो चारा आहे तो गुरांना आवश्यक असणारा, त्यांना जे पचेल, त्यांना जे मानवेल अशा प्रकारचा चारा जर देणार नसलो तर एका बाजूने त्यावर पैसे खर्च होतात पण प्रत्यक्षात उपयोग होत नाही. म्हणून चारा डेपो की चारा छावण्या हे आपण ठरवावे पण त्या ठिकाणी दिला जाणारा जो चारा आहे तो योग्य प्रकारचा दिला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, पाण्याच्या बाबतीत खूप भीषण परिस्थिती असल्याचे आपण पाहतो. गेल्या वेळी एक प्रश्न निर्माण झाला. गेल्या वर्षी पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाणी लांबवर उपलब्ध होते पण टँकर उपलब्ध होत नव्हते. एवढे टँकर नसतात. मला असे वाटते की, सहा महिन्यासाठी टँकर लागणार आहेत. राष्ट्रीयकृत बँकांना आवाहन करुन मोठ्या प्रमाणावर काही तरुणांना टँकर घेण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. नाही तर दूरवरुन सुध्दा पाणी कशातून आणणार ? गेल्या वेळी सातारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी राष्ट्रीयकृत बँकांना आवाहन करुन काही तरुणांना टँकर घेण्यास प्रोत्साहित केले. ते टँकर देत असताना त्यांनी असे कम्पल्शन केले की, हे टँकर ग्रामीण भागामध्ये आम्ही सांगू त्या योजनेमध्ये पाण्यासाठी लावले पाहिजेत.

सभापती महोदय, गेल्यावेळी आणखी एक मुद्दा असा लक्षात आला की, टँकर गावामध्ये जातो आणि बऱ्याच दिवसाने टँकर गावात गेल्यानंतर झुंबड उडते आणि सर्व पाणी वाया जाते. मग अनेक स्वयंसेवी संस्थांना काही जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले, काही बँकांना आवाहन केले की, तुम्ही पाच हजार, दहा हजार लिटरच्या पाण्याच्या टाक्या द्या. गावाने श्रम करुन त्या पाण्याच्या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. चंद्रकांत पाटील .....

टाक्या नीट फिक्स कराव्यात. गावात टँकर आल्यानंतर पहिल्यांदा त्या टाक्यांमध्ये पाणी भरले जाईल आणि मग दिवसभर गावातील लोक त्यातील पाणी घेत राहतील. गेल्या वेळचे असे सर्व अनुभव लक्षात घेऊन तशी योजना आपण आतापासून केली पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या वेळी आरोग्याचा एक मोठा प्रश्न निर्माण झाला होता. मिळेल त्या ठिकाणाहून पाणी आणण्यास सुरुवात झाली आणि त्यातून लोकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. सांगली जिल्ह्याच्या नियोजन बैठकीत सर्व आमदारांनी आग्रहाने सांगितले की, आपण जे पाणी देतो ते जर तसेच रॉ पाणी दिले तर मोठ्या प्रमाणावर रोगराई सुरु होईल. त्यावेळी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी आम्ही पाणी कसे शुद्ध करुन पाठवितो या संदर्भात थातूरमातूर उत्तरे दिली. या सर्व गोष्टींचा विचार जर आपण डिसेंबर संपत असताना केला नाही आणि याचा विचार व योजना करण्यामध्ये जर आपण जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिना जाऊ दिला तर महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी भागामध्ये अतिशय भीषण परिस्थिती निर्माण होणार आहे. त्यामुळे याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, एका बाजूला शासन पैसे खर्च करण्यास तयार आहे. पण दीर्घकालीन योजनांसाठी आमदारांना आवाहन करावे व त्यांनी आपल्या आमदार निधीतून निधी द्यावा अशी एक सूचना आली. आमदार दीर्घकालीन योजनांसाठी पैसे देतील तेव्हा देतील पण प्रामुख्याने 1 एप्रिल ते 30 जून हा जो क्वार्टर आहे त्यातून प्रत्येक आमदाराने 50 लाख रुपये दुष्काळी कामावर खर्च करावेत. मागासवर्गीयांसाठी 10 टक्क्याचे कम्पल्शन आहे, विशेष प्रकल्पासाठी 5 टक्क्याचे कम्पल्शन आहे. तो खर्च केल्याशिवाय आपल्याला बाकीचा निधी वापरता येत नाही. त्या पध्दतीने वर्षात जे चार क्वार्टर्स असतात त्यातील पहिल्या क्वार्टरचा 50 लाख निधी दुष्काळी कामावर खर्च केला पाहिजे अशी सक्ती करु शकतो आणि त्यातून आपण आपापल्या तालुक्यामध्ये अशा प्रकारची जी कामे आहेत ती आपापल्या मतदारसंघामध्येच आपण करु शकू. सर्वात महत्वाची मागणी अशी आहे की, शासनाने दुष्काळ लवकर घोषित करावा. दुष्काळ घोषित केल्याशिवाय यातील कोणतीही गोष्ट उपलब्ध होणार नाही. तसेच मागच्या वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन आतापासून योजना आखावी अशी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनायक राऊत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आणि इतर सन्माननीय सदस्यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये या महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, साधारणत: लोकशाहीमध्ये शासनाच्या धोरणावर विधायक दृष्टीकोनातून टीका करणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. शासनाच्या ध्येयधोरणाची पाठराखण करुन त्यावर विचार मांडण्याचे काम सत्ताधारी पक्षाचे सदस्य नेहमी करीत असतात. परंतु अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे की, आजच्या या सभागृहाच्या चर्चेमध्ये सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आणि महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाच्या चित्राचे जे वर्णन केले आहे ते करीत असताना ज्या त्वेषाने आणि ज्या आत्मियतेने या महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेच्या हिताचे रक्षण करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे त्याकडे कृपया महाराष्ट्र शासनाने दुर्लक्ष करु नये अशी माझी सर्वप्रथम आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 06:00

श्री. विनायक राऊत...

सभापती महोदय, आदरणीय श्री. भारदेसाहेब यांनी असे म्हटले आहे की, हे सभागृह डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले लोकशाहीचे एकमेव मंदिर आहे आणि या मंदिराचा देव मंदिराच्या बाहेरील जनता आहे आणि आपण त्याचे सेवक म्हणून येथे बसलो आहोत. आज परिस्थिती अशी आहे की, या मंदिराचा देव बाहेर दुष्काळामध्ये पिचत आहे, तो भुकेकंगाल झालेला आहे. त्या देवाचे भक्तगण येथे गा-हाणी मांडत असताना ती ऐंकण्यासाठी या सभागृहामध्ये उपस्थित राहाण्याकरिता माननीय मंत्री महोदयांना वेळ मिळत नसेल तर ते या लोकशाहीचे दुर्दैव आहे असे म्हणावे लागेल. मंत्र्यांच्या उपस्थितीसंबंधी हे सभागृह 8 वेळा तहकूब करावे लागले. माननीय मंत्री महोदयांची सभागृहातील अनुपस्थिती गांभीर्याने घेऊन त्यांना सभागृहामध्ये उपस्थित राहाण्याची ताकीद दिली त्याबद्दल सभापती महोदय मी आपला अत्यंत आभारी आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित हे आपल्या व्यथा मांडत होते. हे हिवाळी अधिवेशन नाही तर दिवाळी अधिवेशन आहे असे त्यांनी सांगितले. हे हिवाळी अधिवेशन फक्त दोन आठवडे असताना माननीय मंत्री महोदय महत्वाच्या चर्चेला उपस्थित राहू शकत नसतील तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, दिनांक 23 ऑगस्टच्या दरम्यान वृत्तपत्रातून महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांची यादी जाहीर झाली. त्याआधी दोन दिवस 66 दुष्काळी तालुके जाहीर झाल्याची बातमी वृत्तपत्रातून आली होती. काय झाले माहीत नाही. "लोकसत्ता" वर्तमानपत्रामध्ये असे छापून आले की जोवर राज्यात दुष्काळ जाहीर केला जात नाही तोवर केन्द्राकडून मदत मिळत नाही. नंतर राज्यात 122 तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्या दुष्काळी तालुक्यांच्या यादीमध्ये केन्द्रीय कृषिमंत्री श्री. शरद पवार यांचा माढा तालुका, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचा बारामती तालुका, माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांचा संगमनेर तालुका, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ यांचा येवला तालुका,माननीय आदिवासी विकासमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांचा श्रीगोंदा तालुका, या तालुक्यांचा समावेश आहे. आता या प्रस्तावाला उत्तर देणारे माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या पलूस तालुक्याचा देखील दुष्काळी तालुक्यांच्या यादीमध्ये समावेश आहे.

डॉ. पतंगराव कदम : पलूस तालुका टंचाईमध्ये नाही. तासगावमधील जी चार गावे पलूस तालुक्यामध्ये आली त्या चार गावांचा टंचाईमध्ये समावेश आहे.

..2..

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, जेव्हा 66 तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाले त्यावेळी त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड, मोखाडा, वाडा या तालुक्यांचा समावेश केला नव्हता. ठाणे जिल्ह्यातील वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, शिरपूर आदी भागामध्ये पिण्याचे पाणी नाही. तीन-चार कि.मी.वरुन पाणी पुरवठा केला जातो. असे असताना 122 दुष्काळी तालुक्यांच्या यादीत ठाणे जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश होऊ शकला नाही. हे 122 दुष्काळी तालुके केन्द्राकडून मिळणा-या निधीच्या वितरणासाठी दुष्काळी तालुके म्हणून जाहीर झाले असतील तर ती अत्यंत निंदनीय अशी गोष्ट आहे. ज्यांना देय आहे अशाच लोकांना दुष्काळाचा फायदा मिळाला पाहिजे. श्री. साईनाथ यांनी "दुष्काळ आवडे सर्वांना" हे पुस्तक लिहिले आहे. या राज्यामध्ये कायम दुष्काळ असला पाहिजे असे म्हणणारी मंडळी देखील आहेत. त्यामध्ये ठेकेदार हे पहिल्या क्रमांकावर आहेत. त्यांची पाठराखण करणारे प्रशासन हे दुस-या क्रमांकावर आहे आणि त्यानंतर त्यांचे चोचले पुरविणारी इतर मंडळी आहेत. दुष्काळाच्या माध्यमातून काही लोकांची घरे भरण्याचे काम झालेले आहे. टेम्पो आणि ट्रकमधून चा-याचा पुरवठा केला पाहिजे. असे असताना लुनावरुन चारा आणला जातो आणि त्या जागी ट्रकने चारा आणला अशी नोंद केली जाते. हा भ्रष्टाचार बंद केला...

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्यांनी कोणत्या वर्तमानपत्रामध्ये दुष्काळी तालुक्यांची यादी छापून आली होती हे सांगावे.

श्री. विनायक राऊत : लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये हे छापून आले आहे हे मी सांगितले आहे. सभापती महोदय, हा पाण्यामुळे निर्माण झालेला दुष्काळ आहे. ब-याच ठिकाणी पाऊस न पडल्यामुळे हा दुष्काळ निर्माण झालेला आहे. विदर्भातील चंद्रपूर सारख्या जिल्ह्यामध्ये कोलमाईन आहे. या कोलमानईच्या माध्यमातून भूगर्भातील पाण्याचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर उपसा होत असतो. ते करीत असलेल्या पाण्याच्या उपशावर कोणतेही बंधन नाही. बोअरवेल घेण्यासाठी 180 फुटाचे बंधन आहे. मात्र कोलमाईन 800 फूटापेक्षा जास्त खाली जाऊन पाण्याचा अमर्याद उपसा करीत आहे. त्यामुळे विदर्भातील भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खोलवर गेलेली आहे. त्यामुळे विदर्भामध्ये पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

.... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर मी फक्त एक-दोन सूचना करणार आहे.

सभापती महोदय, दुष्काळावर खूप चर्चा झालेली आहे. मी मदत व पुनवर्सन मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे एकच मागणी करणार आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांच्या सर्व मुलांना जे कोणत्याही शासकीय सवलतीस अपात्र आहेत अशा मुलांची मग ती अनुदानित शाळेत शिकत असोत वा विनाअनुदानित शाळेत शिकत असोत त्यांची सर्व प्रकारची शैक्षणिक फी माफ करावी, अशी मी विनंती करतो. कारण घरात खाण्यासाठीच काही नाही तर ते फी तरी कोठून भरणार. म्हणून त्यांची फी शासनाने माफ करावी एवढी सूचना करुन माझे दोन शब्द संपवितो.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकली व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सकाळपासून या दुष्काळावरील चर्चा मी ऐकलेली आहे. सर्वच सन्माननीय सदस्य पाणी नाही, पाणी नाही असे सांगत आहेत. कोकणामध्ये तर पाणी असताना देखील दुष्काळ आहे. हा दुष्काळ शासनाच्या नाकर्तेपणामुळे आहे. कोकणामधील 1565 टीएमसी फुकट जाणारे पाणी उपाययोजना करुन पाणी नसलेल्या भागाकडे वळविले तरी आमचे काही म्हणणे नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी या ठिकाणी दुष्काळाचा इतिहास सांगितला. त्यावेळी कोणते ग्लोबल वॉर्मिंग नव्हते. तरी देखील दुष्काळ पडत होता आणि यापुढेही दुष्काळ पडत राहाणार आहे. दुष्काळ ही कंटिन्युअस प्रोसेस आहे. या दुष्काळावर कायमस्वरुपी मात करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कोकणामध्ये पडणारे 1565 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. सह्याद्रीच्या माथ्यावर तलाव बांधून ते पाणी पाईपद्वारे दुष्काळी भागाकडे नेते तर निदान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. कोल्हापूर सारख्या भागाला देखील ते पाणी फुकट देता येईल.

नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत....

कमी खर्चात पाणी मिळू शकते. डोंगर माथ्यावर 10x10 चा तलाव केला आणि तेथे एक मीटर पाऊस पडला तर त्या तलावात 1लाख लिटर्स पाण्याची साठवणूक होऊ शकते. तसेच डोंगर माथ्यावर 100x100 मीटरचा तलाव केला व 1 मीटर पाऊस पडला तर 1कोटी लिटर्स पाण्याची साठवणूक होऊ शकते. कोकणात मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. पडलेल्या पावसाचे पाणी वाहून जात आहे. त्यामुळे कोकणातही सातत्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. कोकणात एवढा पाऊस पडूनही तेथील गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

**तालिका सभापती (श्री.जयवंत जाधव )** : सन्माननीय सदस्यांनी फक्त दोन मिनिटातच आपले विचार संपवावयाचे आहे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मला या विषयावर सूचना करावयाच्या असल्यामुळे मी आज सकाळपासून सभागृहात बसून आहे. जर सूचना मांडण्यासाठी आपण पुरेसा वेळ देणार नसाल तर मी खाली बसतो. विदर्भात पाणी टंचाई आहे, कोकणात पाणी टंचाई आहे, मराठवाडयात पाणी टंचाई आहे. राज्यात पाणी टंचाईची परिस्थिती असताना त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी आपण पुरेसा वेळ दिला पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये एकाही तलावाचे काम पूर्ण झालेले नाही. कोकणात एका तलावाचे काम पूर्ण केले असेल तर त्या बाबतीत शासनाने सभागृहात माहिती द्यावी. कोकणात तिलारी प्रकल्प हा एकच पाटबंधारे प्रकल्प झालेला आहे, तो प्रकल्प गोवा शासनाच्या निधीतून झालेला आहे.

सभापती महोदय, कोकणात देवधर धरणाच्या कामासाठी 12 कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. त्या धरणाचे काम निधी अभावी पूर्ण होत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे दरवर्षी 50 कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना तसेच ग्रामस्थांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्या धरणातून दोन कालव्यांची कामे केली तर शेतकऱ्यांना त्या पाण्याचा उपयोग होऊन शासनाचा कोटयावधी रुपयांचा खर्च वाचू शकतो. म्हणून या धरणाच्या कामासाठी शासनाने 12 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणात धामापूर तलाव आहे, त्या तलावातील पाणी आटत नाही. त्या तलावातून पाणी पुरवठा करण्यासाठी कायम स्वरुपाची नळ पाणी पुरवठा योजना केली तर अनेक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत...

गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटेल. परंतु त्या ठिकाणी कायम स्वरुपी नळ पाणी पुरवठा योजना करण्याबाबत शासनाकडून विचारच केला जात नाही. कोकणातील प्रत्येक गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचे शासनाने ठरविलेले आहे हे यावरुन स्पष्ट होते. या ठिकाणी कायम स्वरुपी नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करुन त्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने राज्यातील सर्व विभागांना समान न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे. कोकणातील डोंगर माथ्यावर तलाव केले तर सातारा,सांगली, कोल्हापूर जिल्हयांना कायम स्वरुपी पाणी उपलब्ध होऊ शकेल. डोंगर माथ्यावर तलावांची कामे करण्यासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घ्यावे व ती कामे पूर्ण करावीत अशी माझी मागणी आहे. कोकणातील डोंगर माथ्यावर मोठया प्रमाणात तलाव केले तर पाण्याची कमतरता भासणार नाही, कायम स्वरुपी फुकट पाणी मिळू शकते.

सभापती महोदय, मला या विषयावर अजून काही सूचना करावयाच्या होत्या, परंतु वेळे अभावी त्या सूचना मी सभागृहासमोर मांडू शकत नाही. मी ज्या दोन-तीन सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी दुष्काळी भागातील आमदार आहे. मला फक्त एकच मुद्दा मांडावयाचा आहे. माझ्या तालुक्यात 90 हजार जनावरे छावण्यांमध्ये ठेवण्यात आलेली आहेत. जनावरासाठी सुरु करण्यात आलेल्या छावण्या बंद करण्यात येणार असल्याचे माझ्या एकीवात आहे. माझी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनाने छावण्या बंद करण्याचा निर्णय घेतला तर जनावरांच्या मालकांना काही प्रमाणात अनुदान देण्यात यावे व ते अनुदान जनावरांच्या मालकाच्या नावे बँकेत जमा करावे अशा प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या सभागृहात दुष्काळाच्या प्रश्नावर नेहमी चर्चा होत असते. दुष्काळग्रस्त भागात आम्ही माहिती घेण्यासाठी जातो. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुन्हा सभागृहात चर्चा करणे भाग पडते. आज नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव मांडला गेला त्यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. या प्रस्तावात असे म्हटले आहे की, दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन त्या महामंडळास निधी देण्यात आलेला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे. माझ्या माहिती प्रमाणे या राज्यात अजून पर्यंत दुष्काळी महामंडळ स्थापनच झालेले नाही. मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेब व माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना असा प्रश्न विचारु इच्छिते की, या राज्यात दुष्काळी महामंडळ अस्तित्वात आहे की नाही ?

डॉ.पतंगराव कदम : नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सदर महामंडळ अस्तित्वात नसेल तर या प्रस्तावाच्या अनुषंगाने असत्य माहिती सभागृहासमोर आली आहे. लोकांना आश्वासन देण्याआधी आपण आश्वासनाची हत्या केली असे माझे मत आहे. राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून अशा प्रकारची असत्य माहिती सभागृहात येते या गोष्टीस आम्ही काय म्हणावयाचे ? या प्रस्तावात दुष्काळी महामंडळाचा उल्लेख झालेला आहे, तो चुकीचा झालेला आहे अशा प्रकारचे स्पष्टीकरण शासनाकडून आले पाहिजे. दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत शासन काही पाठपुरावा करणार नसेल तर तेवढी वाक्ये वगळावीत. डॉ.पतंगराव कदम साहेब, नुकतेच आपल्या घरी शुभ कार्य झालेले आहे. आपण मघाशी बोलण्याच्या ओघात बोलून गेलात की, नेहमी सारखे उत्तर देऊ की वेगळे उत्तर देऊ. नेहमी सारखे उत्तर म्हणजे काय आणि वेगळे उत्तर म्हणजे काय याचा खुलासा आपण करावा. आपल्या घरी झालेल्या शुभ कार्यानंतर आपल्यात काही फरक पडला असेल अशी आमची अपेक्षा आहे. (अडथळा) मला त्याच्या घरातील शुभ कार्याचे निमंत्रण होते. माझ्या बोलण्याने श्री.रमेश शेंडगे यांना का वाईट वाटते मला कळत नाही. हा जो प्रस्ताव दिला आहे, त्यात दुरुस्ती होणे आणि वस्तुस्थितीला धरुन प्रस्ताव होणे गरजेचे होते.

महोदय, दुसरे असे की, 2 सप्टेंबर 2012 रोजी माझ्या माहिती प्रमाणे माननीय श्री.जयराम रमेश यांच्याकडून राज्य शासनास पत्र आलेले आहे की, जलसंधारणाची क्षमता वाढविण्या संदर्भातील 611 कोटी रुपयांचा निधी वापरा विना पडून आहे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

केंद्राकडून दुसरा हप्ता हवा असेल तर प्रथम दिलेला निधी पूर्णपणे वापरला पाहिजे. एका बाजूला दुष्काळी परिस्थिती असताना दुसरीकडे मात्र केंद्राकडून जलसंधारणासाठी आलेला निधी वापरला जात नाही ही खेदाची गोष्ट आहे. केंद्राकडून आलेला निधी वापरण्यात राज्य शासनाची अनास्था दिसून येत असेल तर ती एक मोठी चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, आपण टंचाई आणि दुष्काळ यासंबंधी प्राप्त झालेल्या आकडेवारीवर या सभागृहात चर्चा करतो. गेली तीन वर्षे 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी ज्या तालुक्यात आहे, ते तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करण्यात आले आहेत काय ? केले नसतील तर ते तालुके दुष्काळी म्हणून जाहीर केले जातील काय? या बाबतीत 15 डिसेंबरपर्यंत जी आकडेवारी शासनास प्राप्त होईल, त्यानंतरच केंद्र शासनाची मदत मिळेल अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे. 15 डिसेंबर तारीख निघून गेली आहे. दुष्काळ निवारण करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न केले गेले आहेत वा करण्यात येत आहेत याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

महोदय, विदर्भ,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र,खानदेश या विभागातील अनेक तालुके दुष्काळी असून ते दुष्काळी नाहीत असे जाहीर करुन शासनाने अन्याय केला आहे असे त्या तालुक्यातील लोकांचे म्हणणे आहे. विशेषत: विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये या बाबतीत नाराजी आहे. जेथे टंचाई सदृश्य परिस्थिती असेल, तेथे सुध्दा ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या ठिकाणी मदत करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनांची अंमलबजावणी ज्या तालुक्यात आवश्यक वाटते तेथे ती योजना योग्य पध्दतीने राबविण्यात यावी. प्रत्येक महसूल विभागामध्ये रोहयो विषयी बैठका घेऊन ज्या जिल्हयात रोहयोची आवश्यकता आहे, ती योजना तेथे राबविली गेली पाहिजे.

सभापती महोदय, आज सकाळ पासून हे सभागृह आठ वेळा तहकूब झाले. तुमची गावांमध्ये दहशत असेल त्यामुळे तुम्हाला कोणी या संदर्भात प्रश्न विचारीत नसतील. परंतु या बाबतीत जनता आम्हाला सातत्याने प्रश्न विचारीत असते. माननीय श्री.बाळासाहेब थोरात तुमच्याकडून मला अशी अपेक्षा नव्हती. तुम्ही या सभागृहात सकाळ पासून यावयास पाहिजे होते..

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मी या सभागृहात सकाळ पासून उपस्थित रहावयास पाहिजे होते. माझे विधानसभा सभागृहात काम होते. मी उत्तर देण्यासाठी या सभागृहात उपस्थित झालो आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.शिगम 06:10

डॉ.नीलम गोऱ्हे : आपण अदृश्य नाहीत, आपण आम्हाला दिसता आहात. प्रस्तावाला सुरुवात सकाळपासून झाली आहे.मराठवाडयाला पाणी पाहिजे असेल तर त्यासाठी तुमची मान्यता गरजेची आहे.

----------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील एक माणूस या दुष्काळावर काय बोलणार आणि बोलण्याची आवश्यकता काय अशा प्रकारची भावना माझ्या मनात नक्की होती. सर्वार्थाने या सभागृहात चर्चा झाली ती चारा घोटाळ्याबाबत झाली असली तरी या विषयावर चर्चा करण्याची माझी इच्छा झाली. मी कायद्याचा विद्यार्थी आहे. या सभागृहात विषमता दिसून आली. मी महापालिकेत काम केलेले आहे. या सभागृहात आल्यानंतर समानता अधिक असेल असे मला वाटले होते. दुर्दैवाने शासनाचा जीआर आणि जी माहिती मला प्राप्त झाली त्यातून विषमतेची परिसीमा महाराष्ट्रामध्ये वाढत चालली आहे अशी स्थिती दिसून येते.

सभापती महोदय, डीपीएपीचा उल्लेख करुन 22 ऑगस्ट 2012 रोजी शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. 53 तालुके डीपीएपी कार्यक्रमांतर्गत दुष्काळग्रस्त तालुके म्हणून जाहीर करण्यात आले. या 53 तालुक्यांमध्ये डीपीएपी कार्यक्रमांतर्गत काय घोटाळे झाले हा भाग बाजूला ठेवला तरी शासन निर्णयातील एक वाक्य अतिशय महत्वाचे आहे. मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणात या संदर्भात एका शब्दाने जरी उल्लेख झाला तरी या चर्चेच्या अनुषंगाने वेगळया ॲंगलने उत्तर येऊ शकते. डीपीएपी म्हणजे काय? "DPAP is given a programme to strive to encourage the restoration of ecological balance and it seeks to improve the economic and social condition of the poor and the disadvantaged sections of the society."

सभापती महोदय, इकॉलॉजिकल बॅलेन्स या विषयापुरते मी बोलणार आहे. चारा, दुष्काळ, शेतकरी, छावण्या याबद्दल अनेकांनी आपले विचार मांडले आहेत. दोन-दोन वर्षे काही भागात पाऊस पडला नाही. टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले गेले. परंतु ज्या जमिनीमध्ये इकॉलॉजिकल बॅलेन्स कित्येक वर्षापूर्वी संपला आहे त्या भागासाठी सरकारची नेमकी योजना काय आहे? महाराष्ट्रातील बहुतेक जमिनींमधील इकॉलॉजिकल बॅलेन्सचा विचार बाजूला ठेवला तरी

..2..

ॲड.आशिष शेलार..........

प्रामुख्याने या 53 तालुक्यातील इकॉलॉजिकल बॅलेन्स कसा साध्य होणार, त्यासाठी लाँग टर्म योजना काय आहे? शॉर्ट टर्म योजनांच्या गोष्टी करण्यात आल्या. पिण्याच्या पाण्याची, विद्यार्थ्यांची फी माफी, शेतसारा माफी यांचा त्यात समावेश होतो. काही तालुके दरवर्षी पाण्याविना आहेत तेथे लाँग टर्म योजना राबविली गेली पाहिजे. कृत्रिम पाऊस पाडणे, क्लाऊड सीडिंग संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, काही जिल्हे आणि तालुक्यातील स्थिती अशी आहे की, पाणी नसल्यामुळे रोगराई वाढीस लागली आहे. 53 तालुक्यांपैकी काही तालुक्यांमध्ये आरोग्याशी निगडित अडचणी समोर आलेल्या आहेत. तेथे लाँग टर्म सोल्यूशनसाठी आरोग्य विषयक सुविधा देणार आहोत का याचे स्पष्टीकरण शासनाने दिले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यात 255 पैकी 123 तालुके जरी दुष्काळग्रस्त असले तरी आज स्थिती अशी आहे की, 35 टक्के तालुके हे टंचाईग्रस्त आणि दुष्काळाने व्यापलेले आहेत. राज्य सरकारने केंद्र सरकारकडे 3761 कोटी रुपयांची मागणी केली. म्हणजे सरासरी एका तालुक्यासाठी 30 ते 30.5 कोटी रुपये गृहित धरले आहेत. ही रक्कम पुरेशी आहे का? हा निधी अद्याप मिळालेला नाही. केंद्र सरकारने 575 कोटी रुपये दिल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. म्हणजे एका तालुक्याला सरासरी 4.5 कोटी रुपये मिळणार आहेत. हे जर खरे असेल तर हा निधी दुष्काळ निवारणासाठी पुरेसा आहे का?

सभापती महोदय, 6250 गावे टंचाईसदृश आहेत. एका गावाला 9 ते 9.5 लाख रुपयांचा निधी मिळणार असेल तर त्यातून टंचाई संपुष्टात येणार आहे का? लाँग टर्म योजनेच्या माध्यमातून सरकार इकॉलॉजिकल बॅलेन्स कसा सांभाळणार याचे विश्लेषण सरकारने करावे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये जी भयानक दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे त्या परिस्थितीला सामोरे जात असताना आज शासनातर्फे 122 तालुके दुष्काळी असल्याचे जाहीर करण्यात आले असले तरी दुष्काळाची परिस्थिती पिढ्यानपिढ्या भोगणारे जे तालुके आहेत त्या भागातील मी एक आहे. ज्या तालुक्यांमध्ये दुष्काळ निर्माण झाला, तेथील सिंचन, गुंराच्या छावण्या याबाबत नियोजन करीत असताना निसर्गनिर्मित दुष्काळ आणि मानवनिर्मित दुष्काळाच्या परिस्थितीकडे पाहिले तर काही परिस्थितीबाबत चांगल्याप्रकारे सामोरे जाता येईल. या राज्यात काही तालुके कायम दुष्काळी आहेत. या संदर्भात बोलत असताना सभागृहात मी वारंवार मागणी केली की, सिंचनाचे नियोजन करीत असताना तालुका हा घटक मानण्यात यावा. आज सिंचनाबाबत नियोजनाच्या दृष्टीने योजनांसाठी निधी देत असताना जिल्हा घटक मानण्यात येतो. म्हणून मी कायम मागणी केली की, तालुका घटक मानण्यात यावा. त्यातून जे कायम दुष्काळी तालुके आहेत तेथे उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

सभापती महोदय, देश पातळीवर 40 टक्के सिंचन झाले असले तरी राज्यामध्ये 18 ते 19 टक्के सिंचन झाले आहे. देशातील काही राज्ये 70 ते 80 टक्क्यापर्यंत पुढे गेली आहेत. सांगली जिल्हयातील कवठे महाकाळ, आटपाडी, जत; सोलापूर जिल्हयातील सांगोला व मंगळवेढा, सातारा जिल्हयातील माण आणि खटाव हे कायम दुष्काळी तालुके आहेत. या परिसरामध्ये पाण्याचे नियोजन झाले. अधिक निधी ताकारी, म्हैसाळ व टेंभू योजनेसाठी उपलब्ध करुन दिल्यामुळे दुष्काळ कमी होउन कायमस्वरुपी पाणी येण्यास मदत होईल. मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे आभार मानतो. आमच्या भागातील ताकारी, म्हैसाळ योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबरोबर योजनेचे उद्‌घाटन करण्यासाठी ते स्वत: आले होते. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील व डॉ.पतंगराव कदम यांनीही यासाठी प्रयत्न केले.

सभापती महोदय, कवठे महाकाळ हा कायम दुष्काळी तालुका आहे. तेथील काही भागामध्ये आता पाणी आलेले आहे. कवठे महाकाळ पासून जत पर्यंत पाणी पोहोचले आहे. टेंभू योजनेंतर्गत ढालगाव गटातील 17 गावांचा समावेश करण्याची घोषणा केली गेली. त्या गावांचे अद्याप सर्वेक्षण झालेले नाही. त्या गावांचा टेंभू योजनमध्ये समावेश झाला आणि योजनेसाठी 150

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 06:20

श्री.रमेश शेंडगे........

कोटी रुपयांचे नियोजन झाले तर खानापूर, आटपाडी, कवठे महाकाळ तालुक्यातील ढालगाव, सांगोला, मंगळवेढा तालुक्यांना पाणी मिळाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी निधीचे नियोजन करण्यात यावे अशी विनंती करतो.

नंतर श्री.जुन्नरे....

अप्रसिद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे.....

यासंदर्भात केंद्राची समिती आली होती व त्या समितीने अहवालही दिला आहे. या अहवालाप्रमाणे आपण 3 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांची मागणी केली परंतु त्यापैकी थोडासाच निधी आपल्याला मिळालेला आहे. आपल्या राज्यातून टॅक्सच्या रुपाने केंद्रसरकारला दर वर्षी 40 हजार कोटी रुपये मिळत असतात. आपल्या राज्यावर आपत्ती आली तर केंद्राकडून सुध्दा आपल्याला जास्त प्रमाणात निधी मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, छावण्यांमध्ये जनावरे ठेवतांना आपण शेतकऱ्यांकडून फॉर्म भरुन घेतो की, जनावर मेले तर छावणी मालकाला कोणी काही विचारणार नाही, जबाबदार धरणार नाही. एक तर छावणी मालकावर यासंदर्भात बंधन घाला किंवा जनावरांचा तरी विमा उतरवा. परवा आमच्या भागातील एका छावणीमध्ये काही जनावरे जळून मेली. माननीय पतंगराव कदम साहेबांनी त्यासाठी खास बाब म्हणून निधी दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु हा प्रश्न कायमस्वरुपी मिटण्यासाठी या छावण्यातील जनावरांचा विमा उतरवण्याचे बंधन घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वर्षाचे 8 ते 9 महिने मेंढपाळ समाज मेंढयांना चारण्यासाठी भटकंती करीत असतो. दर वर्षी हा मेंढपाळ वेगवेगळया विभागात जात असतो. हा समाज वर्षानुवर्षे अशाच प्रकारची भटकंती करीत असतो. शासनाने छावण्यांमध्ये गाई-म्हशींचे नियोजन केलेले आहे. परंतु आज या राज्यात 1 कोटी 10 लाख शेळया आहेत व 30 लाख मेंढया आहेत. त्यामुळे शेळया व मेंढया पशू नाहीत काय ? त्यांचे आपण काही नियोजन करणार आहात की नाही ? मेंढपाळ व्यवसाय आता उध्वस्त होऊ लागला आहे. मेंढपाळांचा पंरपरागत समाज उध्वस्त व्हावयास लागला आहे. या समाजासाठी आपण काहीही नियोजन केलेले नाही. शेळया मेंढयासाठी वेगळी छावणी सुरु करावी अशी माझी माननीय मंत्रीमहोदय डॉ.पतंगराव कदम यांना विनंती आहे. शेळया मेंढयांचे कळपच्या कळप देशाधडीला लागत आहेत. पुढील काळात अतिशय गंभीर प्रसंग आपल्यावर येऊ शकतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे संबंध महाराष्ट्रामधील बहुसंख्य भागामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपल्या राज्याची निर्मिती होऊन 52 वर्षे झाली आहेत. आपल्या राज्याचे नाव महाराष्ट्र आहे. त्या काळात आपल्या राज्यात 63 तालुके कायम दुष्काळी होते. 52 वर्षाच्या कालखंडामध्ये महाराष्ट्रातील 150 तालुके आता कायमस्वरुपी दुष्काळी म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. कदाचित उद्या या महाराष्ट्राचे नाव दुष्काळी राष्ट्र पडू नये म्हणून माझी राज्यकर्त्यांना विनंती आहे की, आता तरी राज्यकर्त्यांनी जागे व्हावे आणि कायमस्वरुपी दुष्काळी तालुक्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

सभापती महोदय, 1972 चा दुष्काळ आम्ही पाहिला नाही. त्यावेळेस आमचा जन्मही झाला नव्हता. परंतु 1972 च्या दुष्काळाच्या संदर्भात आम्ही जे ऐकले त्या प्रमाणे तो महाभयंकर दुष्काळ होता. परंतु आजच्या जाणकारांचे असे म्हणणे आहे की, 1972 च्या दुष्काळापेक्षाही भयंकर दुष्काळ या वर्षी आपल्या राज्यात पडलेला आहे. मला सरकारला एवढेच विचारावयाचे आहे की, 1972 चा दुष्काळ लोटल्यानंतर आपले राज्य पुन्हा विकासाकडे आले. परंतु 72 च्या दुष्काळाच्या त्या काळात आपल्या राज्याने रोजगार हमी योजना सुरु केली तशा योजना आपण सुरु करणार आहोत काय ? आपल्या राज्याने जी ओळख सबंध देशाला दिली, तशा काही योजना आपण या दुष्काळात सुरु करणार आहोत काय ? त्याच दरम्यान कै.आदरणीय वसंतराव नाईक साहेबांनी दुष्काळ निवारणासाठी रोजगार हमी योजना सुरु केली व त्यामुळे रोजगार हमी योजनेची ओळख संपूर्ण देशात झाली आणि उभा देश आपल्या राज्यात योजना कशी चालते हे पाहण्यासाठी येऊ लागला आणि आपापल्या राज्यात तशी योजना राबवू लागला. या दुष्काळामध्ये आपल्याकडून अशा काही गोष्टी होणार आहेत काय ? अशा पध्दतीने पुढील काळात आताच्या राज्यकर्त्यांची ओळख होणार आहे काय ?

सभापती महोदय, काही प्रश्न अतिशय गंभीर आहेत. माझ्या अगोदरच्या अनेक वक्त्यांनी दुष्काळग्रस्त तालुके कसे आले, कसे जाहीर झाले याबाबत सविस्तर उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, बीड जिल्हयातील 9 तालुक्यांचा समावेश दुष्काळग्रस्त यादीत करण्यात आला. परळी आणि आंबेजागाई तालुक्यांचा समावेश दुष्काग्रस्त

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे .....

यादीत करण्यात आला नाही. दुष्काळी तालुक्यांमध्ये परळी आणि आंबेजोगाईचे नाव आले नाही म्हणून आमचा काही आक्षेप नाही. कारण या दोन तालुक्यात 50 टक्क्यापेक्षा जास्त पाऊस पडला याची नोंद शासनाकडे आहे. या दोन तालुक्यांची आणेवारी 50 टक्क्यापेक्षा जास्त आहे व त्याचीही नोंद शासनाकडे आहे. म्हणून या दोन्हीही तालुक्यांचे नाव दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत आले नाही. सुदैवाने या दोन तालुक्यांमध्ये परतीचा पाऊस चांगला पडला, दोन्ही तालुक्यातील जवळ जवळ सर्व तलाव पाण्याने तुडुंब भरले, ओसंडून वाहिले ही वस्तुस्थिती आहे. परंतु गेल्या तीन महिन्यापासून या ठिकाणच्या तलावातील एक थेंब पाणी येथील शेतकऱ्यांना आपल्या पिकासाठी घेता येत नाही. या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे विजेचे सर्व कनेक्शन तोडले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी जे कारण सांगिले आहे त्या कारणाशी आम्हीही सहमत आहोत. भविष्यात पाण्याची टंचाई झाली व टँकरमध्ये पाणी भरावयाचे झाले तर ते कोठून भरावयाचे ? तर ते पाणी आमच्याकडील जे काही तलाव तुडुंब भरले आहेत त्या तलावातून टँकरमध्ये भरले जाणार आहे. यासंदर्भात माझी विनंती आहे की, या शेतकऱ्यांचे नुकसान जर वीज कनेक्शन तोडण्यामुळे होत असेल, निसर्गाच्या अवकृपेमुळे इतर ठिकाणी दुष्काळ पडला व या दोन तालुक्यात निसर्गाची कृपा झाल्यामुळे दुष्काळ पडला नाही. (अडथळा)

सभापती महोदय, माझी एक माफक अपेक्षा आहे. मराठवाडयाच्या जायकवाडी धरणामध्ये 28 टीएमसी पाण्याची आवश्यकता असतांना आम्हाला 28 टीएमसी पाणी दिले जात नाही. आम्हाला केवळ 9 टीएमसी पाणी मिळाले आहे. त्यामुळे मराठवाडयातील जनतेचा असंतोष नगर आणि नाशिक जिल्हयावर आहे. असे असतांना मराठवाडयातील लोक प्रतिनिधीला बोलू दिले नाही तर पुन्हा नगर व नाशिक जिल्हयावर असा आक्षेप येऊ नये अशी माझी आपल्याकडे माफक अपेक्षा आहे.

**तालिका सभापती (श्री.जयंतवराव जाधव )** : माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी 8 मिनिटांचा कालावधी देऊन झालेला आहे. बीड जिल्हयाला बोलण्यासाठी सर्वात जास्त वेळ देण्यात आलेला आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी एवढीच अपेक्षा आहे की, परळी आणि आंबेजोगाई हे दोन तालुके जर दुष्काळग्रस्त यादीत येत नसतील आणि या तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती दुष्काळी तालुक्यांतील शेतकऱ्यांसारखी होत असेल तर या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे जे नुकसान झालेले आहे त्याचे पंचनामे होऊन दुष्काळग्रस्त तालुक्यांप्रमाणे न्याय मिळावा. जर न्याय मिळणार नसेल तर त्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे हे मला माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून अपेक्षित आहे. जायकवाडीच्या पाण्यासंबंधी मराठवाडयात फार मोठा असंतोष आहे. आम्ही 28 टीएमसी पाण्याची मागणी केली होती ही मागणी 2005 मध्ये जो कायदा झाला त्या कायद्याप्रमाणे आम्ही केली होती. परंतु आम्हाला त्या प्रमाणे पाणी दिले नाही. जायकवाडीच्या पाण्याच्या संदर्भात मंत्र्यांनी राजीनामे देण्याची भाषा केली असा उल्लेख माननीय रावते साहेबांनी आपल्या भाषणात केला होता. जायकवाडीचे पाणी संबंध मराठवाडयाला मिळणार आहे. परळी येथे 1250 मेगावॅटचे औष्णिक वीज केंद्र आहे.

यानंतर श्री. अजित .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धनंजय मुंडे....

उद्या तेथील लोकप्रतिनिधींनी सांगितले की, नाशिक आणि नगर जिल्हा पाणी देणार नसेल तर आम्ही सुध्दा आमच्या गावामध्ये निर्माण होणारी वीज त्यांा देणार नाही, असे झाले तर काय परिस्थिती होईल ? नगर आणि नाशिक जिल्ह्याने पाणी न सोडल्यामुळे मराठवाड्यात पाण्याचा दुष्काळ होईल. परळी येथे तयार होणारी वीज देणार नाही असे त्या जिल्ह्याने सांगितल्यास 1200 मेगावॅट विजेची तूट होईल. आज मराठवाड्यात पाणी नाही, चारा नाही, हाताला काम नाही आणि या महाराष्ट्रात वीजही नसेल तर कोणती भयावह परिस्थिती समोर येणार आहे हे आपण सर्वांनी लक्षात घ्यावे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी म्हणून पुढील काळात आमच्या भागात एक भयंकर परिस्थिती निर्माण होईल की काय अशी मला शंका येते. बीड जिल्ह्यातील जवळपास साडेचार लाख लोक ऊस तोडण्यासाठी अन्य जिल्ह्यांमध्ये गेले आहेत. ते लोक ज्या ठिकाणी ऊस तोडायला गेले आहेत ते मार्च-एप्रिल-मे महिन्यांपर्यंत तेथे राहतील. त्यानंतर हे सर्व लोक पुन्हा जिल्ह्यामध्ये येणार आहेत. हे लोक जिल्ह्यामध्ये आल्यानंतर या ठिकाणी हाताला रोजगार नाही. रोजगार हमी योजनेची कामे मग ती नरेगा मधील असतील किंवा एमआरईजीएसमधील असतील, या कामांमध्ये अनेक अडचणी आहेत. तलावासाठीच्या कामास परवानगी नाही. फक्त रस्त्यांच्या कामासाठी परवानगी दिली जाते.मग जिल्ह्यामध्ये आलेल्या साडेचार लाख लोकांचे पुढे काय होणार आहे ? त्यांच्या रोजगारासाठी कोणती व्यवस्था करणार आहात, त्यांच्या हाताला कोणता रोजगार देणार आहात ? खरीप आणि रब्बी अशी दोन्ही पिके त्यांच्या हातातून गेली आहेत. मग परत आलेल्या साडेचार लाख लोकांनी रहायचे कसे, जगायचे कसे असा मोठा गंभीर प्रश्न आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दुष्काळग्रस्त भागातील अनेक गावांची पाहणी केली. बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांची सुध्दा पाहणी केली. म्हणून त्यांच्या भाषणात तळमळ होती, कारण त्यांनी वास्तविक गोष्टी पाहिल्या होत्या. दुष्काळग्रस्त भागातील जनतेचे दु:ख त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले होते. पण राज्यकर्त्यांकडून तशी पाहणी झाली असती तर वास्तव माहिती शासनाच्या दरबारी आली असती.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धनंजय मुंडे....

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असताना एवढेच सांगू इच्छितो की, 1972 साली पडलेल्या दुष्काळापेक्षा हा दुष्काळ गंभीर असला तरी जनतेची अशी अपेक्षा आहे की, राज्यकर्ते निश्चितपणे् चांगले काम करतील आणि या दुष्काळाची झळ महाराष्ट्रातील जनतेला बसू देणार नाही.तेव्हा सरकारने तशी काळजी घ्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या दुष्काळाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. विदर्भामध्ये दुष्काळ आहे. मराठवाड्यात देखील गंभीर परिस्थिती आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा या भागात मागील दोन वर्षापासून दुष्काळ आहे. मागील एक वर्षापासून तेथे टँकर सुरु आहेत. जनावरांच्या छावण्या सुरु आहेत. शासनाने छावण्यांचे डेपो सुरु केले होते, आता छावण्या सुरु केलेल्या आहेत. परंतु आज छावण्यांची काय परिस्थिती आहे याचा आपण विचार केला पाहिजे. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु केल्या. दुष्काळी भागात मोठे कारखाने नाहीत. स्थानिक विकास सोसायट्यांच्या माध्यमातून छावण्या सुरु केलेल्या आहेत. परंतु त्यांना छावण्यांची बिले तीन-तीन महिने मिळत नाहीत किंवा नवीन जनावरांना छावण्यांमध्ये दाखल करुन घेतले जात नाही. तेव्हा या बाबत शासनाने विचार करावा. ज्यांच्याकडे जनावरांना पुरेल इतका चारा होता त्यांनी स्वत:कडे जनावरे ठेवली परंतु आता त्यांच्याकडे चारा नसल्यामुळे त्यांनी आपली जनावरे छावण्यांमध्ये आणली असता त्या जनावरांना छावण्यांमध्ये दाखल करुन घेतले जात नाही. तेव्हा या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, अशीच परिस्थिती पाण्याच्या बाबतीत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळण्यासाठी त्यांना टँकर खरेदी करुन द्यावेत, त्यातून त्यांना व्यवसाय मिळू शकेल. परंतु तीन-तीन महिने झाले तरी टँकरची बिले मिळत नाहीत. त्यामुळे दुष्काळासाठी ज्या उपाय योजना केलेल्या आहेत त्यामध्ये खंड पडू शकतो.

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी आणि चाऱ्याची टंचाई निर्माण झालेली आहे. खटाव, माण, कवठेमहांकाळ, जत किंवा सांगली व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भाग असेल या ठिकाणी शेतकऱ्यांनी पिकांसोबत द्राक्ष आणि डाळिंबाच्या बागा घेतल्या आहेत. शेतकऱ्यांनी या बागांसाठी कर्ज घेतले आहे. एका वर्षी पाऊस झाला नाही तरी दुसऱ्या वर्षी पाऊस पडेल अशी शेतकऱ्यांना आशा असते. परंतु या वर्षी देखील दुष्काळ पडलेला आहे. शेतकऱ्यांवर गेल्या वर्षीचे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे.....

कर्ज आणि या वर्षीचे कर्ज आहे. तेव्हा या बागा जगविण्याच्या दृष्टीने शासनाने त्या शेतकऱ्यांना मदत करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जे 87 दुष्काळी तालुके आहेत त्यामध्ये आमच्या पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांचा समावेश आहे. त्या ठिकाणी पाणी लिफ्ट केल्याशिवाय पाणी आणता येणार नाही. काही ठिकाणी दोन-चार टप्प्यांमध्ये पाणी लिफ्ट करावे लागणार आहे. हे लिफ्ट केलेले पाणी त्या भागातील शेतकऱ्यांना परवडणारे आहे काय ? औष्णिक वीज असेल किंवा हायड्रोलिक वीज असेल आपण विजेचे दर समान ठेवलेले आहे. त्याप्रमाणे पाण्याचे दर सुध्दा समान ठेवावेत. कारण जे शेतकरी उंचावर राहतात हा त्यांचा गुन्हा नाही. ते उंचावर राहत असल्यामुळे त्यांना दोन-तीन वेळा लिफ्ट केलेले पाणी परवडणार नाही. तेव्हा आपण सर्व शेतकऱ्यांसाठी पाण्याचा एकच समान दर ठेवावा आणि शासनाने असे केले तरच दुष्काळी भागातील दुष्काळ कायम स्वरुपी संपणार आहे. तेव्हा दुष्काळी भागासाठी जास्तीत जास्त निधी देऊन तेथील योजना लवकर पूर्ण कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या दुष्काळाच्या चर्चेमध्ये बोलण्यासाठी मला आग्रहाने संधी मिळावी यासाठी मी प्रयत्न करीत होतो. आपण मला आता बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, दुष्काळाचे परिणाम खोलवर आणि दूरवर असतात. याठिकाणी दुष्काळामध्ये होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल अतिशय गंभीरतेने चर्चा सुरु आहे. काही दुर्लक्षित सामाजिक समुहाकडे, ज्यांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे, शेतीतील रोजगारावर अवलंबून आहे, जो छोटा शेतकरी आहे,

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड...

किंवा भूमिहीन, शेतमजूर असतो तो शेतमजुरी करुन आपली गुजराण करीत असतो. अशा भूमिहीन शेतमजुरांकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, 1972 चा दुष्काळ आपण पाहिला आहे त्याप्रमाणे अनेक लोकांनी देखील तो दुष्काळ पाहिला असेल. 1972 च्या दुष्काळामध्ये मराठवाडयामधून अनेक कुटुंबे मुंबई, पुणे या शहरामध्ये स्थलांतरित झालेली आपण पाहिली आहेत. रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर, एस.टी. स्थानकावर, रेल्वेच्या पूलाखाली ज्या ठिकाणी आसरा मिळेल त्याठिकाणी अतिशय भयावह, दयनीय परिस्थितीमध्ये ते रहात होते. आजचा दुष्काळ त्या दुष्काळाइतका तीव्र नाही. तो जर तेवढा तीव्र असेल तर त्याबाबत आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. 1972 च्या दुष्काळामध्ये खेडयातून शहरामध्ये जे लोक आले त्यांना कुणीही तत्काळ ॲक्सेप्ट केले नाही. त्यापैकी काही लोकांना अक्षरश: भीक मागतांना मी पाहिले आहे. त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायकारक घटना मी पाहिल्या आहेत. अशाप्रकारे दुष्काळी परिस्थितीचा जो परिणाम होतो त्याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे.

दुष्काळ पडल्यामुळे शेतकऱ्याची शेती उजाड होते त्यामध्ये त्याचे प्रचंड नुकसान होते. दुबार पेरणी केल्यानंतर ती देखील वाया जाते त्यामुळे तो कर्जबाजारी होतो. कर्जाचे ओझे खांद्यावर पडल्यामुळे शेवटी त्याला आत्महत्त्या करावी लागते. हे जसे सत्य आहे त्याप्रमाणे खेडयातील गरीब, भूमिहीन माणूस जगण्यासाठी शहरामध्ये येतो त्यावेळी तो जगण्यासाठी करीत असलेल्या संघर्षाचा आपण विचार केला पाहिजे. मला शासनाला विचारावयाचे आहे की, या दुष्काळी परिस्थितीमुळे ज्यांच्यावर परिणाम झाला आहे असे वेगवेगळया गावामध्ये शेतमजूर किती आहेत, त्यांना आपण कोणत्या प्रकारे सहाय्य करीत आहोत? त्यांनी स्थलांतर करु नये याकरिता आपण काही उपाय योजना करणार आहोत की नाही? त्या उपाय योजना आपण केल्या पाहिजेत असे आग्रहाचे प्रतिपादन मी या ठिकाणी करीत आहे. दुष्काळामध्ये जे शेतमजूर किंवा भूमिहीन शेतावर काम करतात त्यांची नोंद करुन त्यांना आपण कोणत्या प्रकारचे कॉम्पेन्सेशन देतो, किंवा त्यांनी शहराच्या ठिकाणी स्थलांतर करु नये यासाठी कोणत्या प्रकारच्या ठोस उपाय योजना करतो?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड...

सभापती महोदय, दुष्काळ पडल्यानंतर खालच्या वर्गातील माणूस शासनाच्या मदतीची वाट पहातो किंवा त्याला जर तग धरुन रहाता येत असेल तर तो आपल्या गावामध्येच रहातो. अन्यथा, तो गावाबाहेर स्थलांतर करण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी त्याने केलेले स्थलांतर त्याच्या जीवावर बेतते. सभापती महोदय, परवाच्या वर्तमानत्रामध्ये छापून आलेली बातमी वाचली. पुण्यामध्ये एका

इमारतीचे बांधकाम कोसळून त्यामध्ये 13 माणसे ठार झाली. ही माणसे खेडयापाडयातून आली होती, मिळेल ते काम करुन जगण्याचा प्रयत्न करीत होती. अशाप्रकारे आपला जीव जोखमीमध्ये टाकून ते काम करीत असल्याचे आपण पहातो. दोन महिन्यापूर्वी दुसऱ्या एका इमारतीचा स्लॅब कोसळल्यामुळे त्याखाली 11 माणसे गाडली गेली. अशाप्रकारे ही आपदग्रस्त माणसे आपला गाव सोडून शहरात येतात आणि जगण्याच्या प्रयत्नात ते अशाप्रकारच्या संकटांना सामोरे जातात.

सभापती महोदय, आपण दुष्काळावर अतिशय गंभीरपणे चर्चा करतो. ही चर्चा करीत असतांना मला एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधावेसे वाटते. आपल्या भारत देशामध्ये शेतीवर अवलंबून असलेला ग्रामीण महाराष्ट्र मोठया प्रमाणावर आहे. दुष्काळ पडल्यानंतर त्या संकटाबाबत चर्चा करण्यापेक्षा जर पाऊस पडला नाही तर कोणती उपाय योजना करावी यासंबंधी शासनाने विचार करण्याची गरज आहे. जर पाऊस पडला तर प्रश्नच उदभवणार नाही परंतु निसर्गाची अवकृपा केव्हा होईल हे कुणालाच सांगता येणार नाही. एखाद्या माणसाला आपल्या मृत्यूबाबत सांगता येत नाही त्याप्रमाणे आपले सायन्स कितीही डेव्हलप झाले तरी दुष्काळ पडू नये म्हणून आपण काहीही करु शकत नाही. त्यामुळे वरचेवर हे दुष्काळ पडत असल्यामुळे त्यासंबंधी कोणती उपाय योजना करावी यासंबंधीचा तपशील शासनाने ठरविला पाहिजे. ज्यामुळे शासनाला ऐनवेळी धावपळ करण्याची गरज पडणार नाही अशी सूचना करुन उद्‌भवणाऱ्या टंचाईसदृश, दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी कायम स्वरुपी उपाय योजना करावी अशी सूचना करुन माझे भाषण संपवितो.

-----

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये यावर्षी पडलेल्या कोरडया दुष्काळावर चर्चा करण्यासाठी नियम 260 अन्वये या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने चर्चेमध्ये उपस्थित न झालेल्या मुद्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्राबद्दल आपणा सर्वांचा असा समज असतो की, सह्याद्रीच्या पश्चिम घाट योजनेमध्ये येणारे कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे,अहमदनगर, नाशिक हे जिल्हे फार सुपीक आहेत. या जिल्ह्यांमध्ये प्रचंड पाऊस पडतो असे सांगितले जात असले तरी गेल्या काही वर्षामध्ये या जिल्ह्यांमध्ये मान्सूनचा पाऊस पडत नाही आणि परतीचा पाऊस पडत नाही. दोन्ही पाऊस वेळेवर येत नाही परंतु जो पाऊस येतो तो केव्हातरी अवकाळी येतो. त्यामुळे इरिगेशनचे पाणी मिळाल्यामुळे जी काही थोडी पिके येतात त्यांच्यावर या पावसाचा अनिष्ट परिणाम होतो. याबाबत कुठेतरी शास्त्रीय संशोधन करण्याची गरज आहे. कोकणातील पर्जन्य छायेच्या प्रदेशामधून येणाऱ्या पावसाची गेल्या दहा-पंधरा वर्षाची सांख्यिकीय माहिती लक्षात घेतली तर त्या पर्जन्यमानामध्ये प्रचंड घट झाली आहे. यावर्षी पर्जन्यमानामध्ये लक्षणीय घट झाल्यामुळे त्याचे दुष्परिणाम आपल्याला जाणवत आहेत. त्या भागामध्ये असलेले कोयना धरण, वारणा धरण, हरभळ धरण, भाटघर धरण इत्यादी धरणामधील पाण्यामुळे आमची बागायती शेती जगत असली आणि पिण्याचे पाणी मिळत असले तरी त्या भागामध्ये दुष्काळ नाही असे समजण्याचे कारण नाही. त्या ठिकाणी धरणे झाली नसती व हे पाणी जर वाहून गेले असते तर विदर्भ आणि मराठवाडयापेक्षा या भागाची अवनत अवस्था पहावयास मिळाली असती. हे जरी खरे असले तरी तेथील पर्जन्यमान घटत असल्यामुळे तेथील धरणांमध्ये जर उद्या पाण्याचा साठा झाला नाही तर बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या चर्चेचा हेतू दुष्काळी कामे काढणे आणि दुष्काळ घोषित करणे हा आहे. याकडे लक्ष वेधीत असतांना आपण महाराष्ट्रामध्ये खूप पाझर तलाव बांधले आहेत. परंतु आज त्या पाझर तलावांची अवस्था मोठी दयनीय आहे. कित्येक पाझर तलाव गाळाने भरुन गेले आहेत, कित्येक पाझर तलाव फुटले आहेत तर कित्येक पाझर तलावांची उंची वाढविण्याची आवश्यकता आहे. पाझर तलावाच्या बांधकामामध्ये पैसे खर्च झाले परंतु त्याचा लाभ मिळणे बंद झाले आहे. या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपल्याला एक महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

घ्यावा लागेल. या पाझर तलावाचे खोदकाम करणे, पाझर तलावाची उंची वाढविणे, त्यांची डागडुजी करणे या करिता एक मोठा कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे आपल्याकडे असलेले शिवकालीन तलाव, शिवकालीन पाण्याचे साठे सुधारण्याच्या नावाखाली बऱ्यापैकी मोडतोड केली आहे. परंतु अजून देखील ग्रामीण भागात जुन्या काळातील तलाव आणि पाण्याच्या साठयांकडे आपले लक्ष गेले नाही. यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढल्यामुळे आपण सर्वांनी दुष्काळ पडल्याचे मान्य केले असून हा मानवनिर्मित दुष्काळ आहे. या दुष्काळी परिस्थितीवर इलाज करण्याची आपली जबाबदारी आहे. या शिवकालीन पाण्याच्या साठयांचे जतन करुन त्यामधील गाळ काढणे, त्याची डागडुजी करण्याचा कार्यक्रम हातात घेण्याची आवश्यकता आहे. आज सुध्दा खेडयापाडयात बऱ्याचशा गावविहिरी वापराविना पडून आहेत. त्या गावात पाणी पुरवठयाच्या योजना केल्यामुळे थोडयाफार बुजलेल्या अवस्थेत, खराब झालेल्या आहेत. त्या विहिरीमधील वापरात नसलेले पाणी निदान पशुधनासाठी वापरले जाईल, गावातील घरच्या पाण्यासाठी वापरले जाईल अशाप्रकारचा एक कार्यक्रम ग्राम पातळीवर हाती घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदरणीय वनमंत्री भागृहामध्ये बसले असून त्यांनी 100 कोटी झाडे लावण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून एक चांगला कार्यक्रम हाती घेऊ शकतो. त्याचा परिणाम दुष्काळ हटविणे आणि पर्जन्यमानामध्ये वाढ होणे यावर सुध्दा होऊ शकतो. तो कार्यक्रम कशाप्रकारे राबविता येईल हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, आपण खूप मोठया योजना जाहीर करुन त्यासाठी खूप जास्त तरतूद करीत असतो. परंतु त्या योजनेमधील सेंट परसेंट पैशावर ठेकेदार, दलाल, पैसा बुडविणाऱ्या यंत्रणा उभ्या राहिल्या आहेत. त्या संबंधित यंत्रणेमधील अधिकारी असो, धोरणे ठरविणारी व कामे करणारी मंडळी असो या सर्वांना दुरुस्त करुन योजनेवरील पैसा योजनेवरच कसा खर्च होईल यासाठी आपण एक महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला तर आणि तरच हा दुष्काळ दूर होईल. नाही तर हे सभागृह वर्षानुवर्षे या दुष्काळावर चर्चा करीत राहील . आपल्याला जर हे थांबवावयाचे असेल तर याचा आपण विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी अतिशय कमी वेळेमध्ये माझे विचार मांडणार आहे. मराठवाडयात पडलेल्या दुष्काळाची दाहकता प्रचंड आहे. मी ज्या भागाचे नेतृत्व करतो त्या मराठवाडयामधील 76 तालुक्यांमध्ये दुष्काळ पडला आहे. मी त्या तालुक्यांचा दौरा केला असून अनेक तालुक्यांमध्ये प्रचंड दुष्काळ पडल्याचे आपल्याला पहावयास मिळाले आहे. अतिशय कमी शब्दामध्ये मी जर या ठिकाणी काही ओळी वाचून दाखविल्या तर आपल्या लक्षात येईल की, दुष्काळाची दाहकता किती असू शकते? माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब, आपण मराठवाडयातील आहोत. त्या ओळी मी आपल्याला वाचून दाखवितो.

"होरपळलेल्या माणसांचा सुकाळ आहे,
सुदृढ माणसांचा दुष्काळ आहे,
दुष्काळाने गलितगात्रांची ही तर पंगत आहे,
तरीही पुढे घेऊन जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्राची संगत आहे"

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

सभापती महोदय, आज 1972 पेक्षा सुध्दा आपल्याला दुष्काळाची वाईट परिस्थिती जाणवत आहे. आज भारतातील 1/3 लोकांना दरवर्षी दुष्काळाचा सामना करावा लागतो. हे सर्व थांवावयाचे असेल, याबाबत कायम स्वरुपी उपाययोजना करावयाची असेल तर नदी-जोड प्रकल्प केला पाहिजे अशा प्रकारे माजी राष्ट्रपती माननीय डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांनी कॅनडा येथे केलेल्या भाषणात म्हटले होते. त्यामुळे नदी-जोड प्रकल्पाच्या बाबतीत पुढे काय झाले आहे, तो प्रकल्प कधी होणार याबाबत सुध्दा प्राधान्याने विचार केला पाहिजे. 2011 च्या जनगणनेनुसार 67.84 टक्के लोक खेड्या-पाड्यामध्ये रहातात आणि 57.81 टक्के लोक शहरामध्ये रहातात. आज भारताची लोकसंख्या 121 कोटी आहे. त्यापैकी 83 कोटी लोक ग्रामीण भागामध्ये रहातात. ग्रामीण भागामध्ये रहाणाऱ्या लोकांचा आर्थिक स्तर नेहमीच खालावलेला आहे आणि याचा विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. गेल्या वर्षी आपल्या राज्यामध्ये दुष्काळ होता. यावर्षी 6250 गावांमध्ये आज दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे.म्हणून मध्यंतरी मंत्रीमंडळाने 123 तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले. अशा वेळी दुष्काळग्रस्त खाईत लोटलेल्या माऊलीला आपल्याला बाळाला गोंजारणे सुध्दा मुष्किल झाले आहे एवढी दुष्काळाच्या बाबतीत अवघड परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, मी शेवटी असे सांगेन की, राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी वेदनापूर्वक वर्णन केलेले आहे.शेवटी माणूस बेंबीच्या देठापासून कधी बोलतो तर ज्यावेळी त्याला वेदना होतात, जाणवतात. आज सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित जरी भारतीय जनता पार्टीमधून या पक्षामध्ये आलेले असले तरी सुध्दा ते बेंबीच्या देठापासून बोलतात. शेवटी आम्ही हे का बोलतो, कारण आम्ही सुध्दा ते चटके सहन करीत आहोत. आम्ही त्या तालुक्यामध्ये, जिल्ह्यामध्ये रहात आहोत. आम्ही गाडीतून जेव्हा जात असतो तेव्हा आम्हाला तेथील कोरडी झालेली तळी, कोरडा झालेला आमचा बिंदूसरा पहावत नाही आणि मग खाली उतरुन त्याच्याकडे पहात रहातो अशा प्रकारे या भागामध्ये दुष्काळाची अवस्था निर्माण झालेली आहे. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. फक्त एकच सांगू इच्छितो की, सरकारने आणि तुम्ही-आम्ही काय केले पाहिजे. यासाठी तातडीने काही उपाययोजना केल्या पाहिजेत. यासाठी एकतर शाळा, महाविद्यालया तील विद्यार्थ्यांची फी माफ करण्याचा तातडीने निर्णय घेतला पाहिजे. कर्जाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हप्त्याचे पुनर्गठन केले पाहिजे. याठिकाणी माननीय सहकार मंत्री महोदय उपस्थित आहेत. ते मुद्दे लिहून घेत असून त्याचा बारकाईने अभ्यास करीत आहेत. गावातील पाणी पुरवठा योजना आहे पण त्या योजनेचे कनेक्शन तोडा असे सांगण्यात येत आहे. तुम्हाला मने आहेत की नाही, इतके निष्ठूर झालेले आहात काय? अधिकारी सांगतात की, कंपनी . . .अरे, कसली कंपनी. ही कंपनी कोणी केली? शेवटी माणसेच आहेत की नाही, तुम्हाला मने आहेत की नाही? पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचे कनेक्शन तोडले जाते. आपण देखील काल सांगितले की, निदान पिण्यासाठी तरी पाणी ठेवावे. म्हणून ज्या ग्रामीण पुरवठा योजना आहेत त्यांची कनेक्शन तोडू नयेत अशा प्रकारचे आदेश त्वरित दिले पाहिजेत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभापती महोदय, ज्या-ज्या गावामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी विंधन विहिरी असतील त्या पहिल्यांदा अधिग्रहित करण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावयास पाहिजे. तसेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे त्यांची वीज बिले माफ करण्याचा क्रांतीकारी निर्णय किमान दुष्काळाच्या निमित्ताने झाला पाहिजे. किमान या तालुक्यातील लोकांच्या बाबतीत तरी हा निर्णय झाला पाहिजे. कालच आम्ही टी.व्ही.वर वाचले की, शेतकऱ्यांसाठी पाणी सोडण्यात यावे. ठीक आहे. तुम्ही-आम्ही आज आपण शेतकऱ्यांसाठी झगडत आहोत. हा महाराष्ट्र शेतकऱ्यांसाठी आहे. पण आज प्रॉयॉरिटी पिण्याच्या पाण्याला दिली पाहिजे. त्यामुळे पहिल्यांदा पिण्यासाठी पाणी सोडले पाहिजे आणि ते पिण्यासाठीच राखून ठेवले पाहिजे. त्यानंतर जर पाणी शिल्लक रहात असेल तर ते शेतीला सोडले पाहिजे. आमचा शेतकऱ्यांना विरोध नाही. परंतु अशा वेळी दुष्काळाचा विचार केला पाहिजे.अजून पावसाळ्यासाठी सहा महिने आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना पुरेल एवढे पाणी शिल्लक आहे की नाही याचा विचार करुन शेतकऱ्यांसाठी पाणी किती सोडावयाचे याचा निर्णय घेतला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात कामे सुरु केली पाहिजेत.

सभापती महोदय, आज गोरगरिबांच्या हाताला कामे नाहीत,ते पैशाअभावी उपाशी मरत आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी कामे सुरु केली पाहिजेत अशी मी यानिमित्ताने सूचना करतो. माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब,आपण 3761.61 कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केलेली आहे असे समजते. डॉ.पतंगरावजी कदमसाहेब, आपले दिल्लीमध्ये वजन आहे आणि आपण ते वापरले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे. 3761.61 कोटी रुपयांचा निधी केव्हा मिळणार आहे हा प्रश्न आहे. याबाबत असे सांगितले जात आहे की, ज्या गावाची आणेवारी 50 टक्क्यापेक्षा कमी आहे, त्या गावांचा विचार करण्यात येईल ही अडचण आहे. त्यामुळे हा निधी कधी मिळणार आहे याचा देखील निर्णय झाला पाहिजे.

शेवटी असे सांगू इच्छितो की, नुसते पहात रहाण्यापेक्षा या आघाडी सरकारने निर्णय घेतला पाहिजे, हे निर्णय घेणारे सरकार आहे. म्हणून मी अशी अपेक्षा करतो की, याबाबतीत उद्याच्या उद्या सदरहू निर्णय जाहीर झाले पाहिजेत आणि राज्यातील जनतेला कळले पाहिजे की,हे

सरकार शेतकऱ्यांचे, शेतकऱ्यांच्या सुपूत्राचे असल्याने याबाबतीत निश्चितपणे निर्णय होईल.शेवटी एवढेच म्हणतो की,

"वाढलेल्या जवळावर टाकलेले पाणी सुध्दा ओसरते,ओघळते,ओझरते
पण दुष्काळाचा पेटलेला वणवा ओझरतही नाही, ओघळतही नाही
आणि विझतही नाही."

धन्यवाद.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्राच्या संगतीत जावे. मराठवाडा पायाने चालतो म्हणून दुष्काळाचे अंतर कापतो आणि पश्चिम महाराष्ट्र डोक्याने चालतो म्हणून पाण्याचे उद्दिष्ट गाठतो.

**उप सभापती** : सदरहू विषयावरील उर्वरित चर्चा उद्या घेण्यात येईल.

-----

. . . .2 टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई शहरातील उपनगरामध्ये या शहरासाठी एका अर्थाने शान असलेल्या वांद्रे-वरळी या सागरी उड्डाण पुलाची शासनाने निर्मिती केली आहे. सरकारने या सागरी पुलाच्या निर्मितीचे काम एम.एस.आर.डी.सी.ला दिले. त्या सागरी पुलाच्या बाजूला समुद्र किनाऱ्याजवळ परवापासून अचानकपणे म्हाडाच्या मालकीच्या जागेवर 300 ते 350 अनधिकृत झोपड्या वांद्रे-वरळी सी-लिंकला लागून बांधण्यास सुरुवात झाली आहे. ती सरकारी जागा आहे आणि जी जागा वांद्रे-वरळी सी-लिंकसाठी ठेवलेली जागा आहे त्या जागेवर अनधिकृतरित्या सीआरझेड चे व्हॉयोलेशन करुन सरकारी जागा हडपण्याचे काम केले असून तेथे अचानकपणे 300 ते 350 झोपड्या बांधण्याचे काम अनधिकृतपणे सुरु आहे. याबाबतीत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर सुध्दा काही कारवाई होत नाही. त्यामुळे मी याठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. त्याबाबत कायम स्वरुपामध्ये कारवाई व्हावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे, तो राज्य शासनाने अत्यंत गांभीर्याने घ्यावा. एमएमआरडीए च्या जागेवर त्याच प्रमाणे सीआरझेड चे उल्लंघन करुन त्याठिकाणी जे अनधिकृत बांधकाम करण्यात येत आहे ते त्वरित थांबविण्याचे आदेश सन्माननीय आयुक्त, मुंबई महानगरपालिका आणि म्हाडाच्या यंत्रणेला देखील द्यावेत. त्याचप्रमाणे स्थानिक पोलीस स्टेशनने याची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत आदेश द्यावेत अशी मी राज्य शासनाला सूचना देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबत निवेदन आले पाहिजे.

**उप सभापती** : याबाबत उद्या सभागृहामध्ये निवेदन करण्यात यावे. शासनाच्या वतीने याबाबत कोण सांगणार आहे?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याबाबत उद्या निवेदन करण्यात येईल.

**उप सभापती** : तसेच याबाबतीत कारवाई देखील करण्यात येईल काय ?

. . . .2 टी-5



डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आपल्या आदेशानुसार निवेदन करण्यात येईल आणि याबाबत नगरविकास विभागाला सूचना देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ठीक आहे.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXXIX OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA DISTRICT PLANNING COMMITTEES (CONSTITUTION AND FUNCTIONS) ACT, 1998.)

श्री. राजेंद्र मुळक ( नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 39 - महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, 1998 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 39 - महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, 1998 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, डीपीडीसीमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण द्यावे या संदर्भात हे सुधारणा विधेयक आहे. जिल्हा नियोजन समितीमध्ये 50 टक्के जागा महिलांसाठी राखून ठेवण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, 1998 मधील कलम 4 मध्ये दुरुस्त करण्याच्या संदर्भात हे विधेयक आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्वरित सर्व जिल्हा नियोजन समित्यांच्या निवडणुका घेण्याचे प्रस्तावित आहे. या विधेयकाला सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी आपल्या वतीने सभागृहाला नम्र विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 39 - महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती अधिनियम, 1998 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक माननीय मंत्री महोदयांनी मांडलेले आहे त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, यामध्ये एक बाब निश्चितपणे चांगली आहे की, आज महिलांची लोकसंख्या 50 टक्के आहे आणि म्हणून या जिल्हा नियोजन समितीमध्ये देखील 50 टक्के महिला असल्या पाहिजेत असे विधेयक आपण मांडलेले आहे. या एका गोष्टीचे मी स्वागत करतो. पण त्याही पलीकडे जाऊन या विधेयकाच्या खंड 3 मध्ये असे नमूद केले आहे की, "या अधिनियमाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम,1998 याच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास....". आपल्याला कोणती अडचण येणार आहे हे बिलामध्ये स्पष्ट केलेले नाही. आपल्याला कोणता संशय आहे, आपल्या मनामध्ये काय हेतू आहे, हे बिल आपणच आणलेले आहे मग कोणत्याही अडचणी उद्‌भवल्यास म्हणजे काय याचा या बिलामध्ये कोठेही खुलासा केलेला नाही.

सभापती महोदय, यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "...कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनाला अडचण दूर करण्याच्या प्रयोजनाकरिता त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे करता येईल." म्हणजे हे सर्व अधिकार आपण राज्य शासनाकडे घेतलेले आहेत. मग हे बिल कशासाठी आणले आहे ? आम्ही फक्त म-म म्हणावे यासाठी हे बिल आणले आहे का ? एका बाजूला असे दाखवावयाचे की, आम्ही 50 टक्के महिलांना न्याय देत आहोत आणि दुसऱ्या बाजूला हे बिल पास झाल्यानंतर पुढच्या दोन वर्षात कोणत्याही अडचणी वाटल्या तर त्याबाबत राज्य शासनाने आपल्याकडे अधिकार घेतलेले आहेत. पुढची दोन वर्षे आपली सत्ता असेल पण पुढच्या दोन वर्षानंतर सत्ता येईल की नाही हे आम्हाला माहीत नाही.

सभापती महोदय, या बिलामध्ये जे नमूद केले आहे तेच मी सांगत आहे. यामध्ये शासनाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम ....

दोन वर्षाचा कालावधी नमूद केलेला आहे. म्हणजे आमची सत्ता असेपर्यंत आम्हाला जे वाटतील ते बदल राजपत्राव्दारे करण्याचा अधिकार शासनालाच असेल असे या बिलामध्ये म्हटले आहे. याच्या अगोदर काय झाले याची आम्हाला कल्पना आहे. याच्या अगोदरचे आम्हाला जे वाईट अनुभव आहेत त्यावरुन फक्त आपल्या पक्षाचेच सदस्य जिल्हा नियोजन समितीमध्ये घ्यावयाचे, नवीन निवडणुका झाल्या तरी माननीय राज्यपालांच्या सहीने राजपत्राव्दारे आदेश काढून त्या ठिकाणी आपल्याच पक्षाचे सदस्य वाढवावयाचे हा याच्या पाठीमागचा स्पष्ट उद्देश आहे. पण आपण कोंबडे झाकून ठेवलेले आहे. बिलाला हात न लावता ते अधिकार आम्हाला असतील, आम्ही राजपत्र काढू अशी तरतूद यामध्ये केलेली आहे. म्हणजे आपले पक्षीय काम करण्यासाठी हे बिल आणलेले आहे. हे बिल आणण्यामागे आपला चांगला हेतू नाही.

सभापती महोदय, एक गोष्ट आणखी मला आपल्याला सांगितली पाहिजे. याच्या अगोदर अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विभागवार आमदार कामे सूचवत होते. कोणत्या विभागामध्ये कोणते काम पाहिजे त्यानुसार प्रत्येक आमदाराकडून कामे घेतली जात होती. मला विधान परिषदेच्या सदस्यांच्या बाबतीत काय अनुभव आहे हे माहीत नाही पण मी 20 वर्षे विधानसभेचा सदस्य म्हणून काम केले आहे आणि तो अनुभव माझ्याकडे आहे. तुमची कोठली कोठली कामे आहेत ती द्या, आम्ही ती बजेटमध्ये घेतो, या पध्दतीने आमच्याकडून कामे घेण्यात येत होती. ती कामे बजेटमध्ये येत होती. परंतु आता वित्त मंत्र्यांनी आम्हाला सांगितले की, आता बजेटमध्ये कामे घ्यावयाची नाहीत. हा सर्व अर्थसंकल्पाचा पैसा आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे देणार आणि जिल्हाधिकारी त्या पैशाचे वाटप या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये करणार. हे रेकॉर्डवर आहे. अर्थसंकल्पाचा जो निधी आहे त्या संदर्भात आमदाराचे हक्क आपण काढून घेतले आणि त्या संदर्भातील सर्व अधिकार आपण जिल्हा नियोजन समितीला दिले.

सभापती महोदय, पुढची गंमत अशी आहे की, या सर्व पैशावर नागोबा म्हणून पालकमंत्री बसलेले आहेत. आता तो निधी पालकमंत्र्यांचा निधी झाला आहे. तो निधी जिल्हा नियोजन समितीचा नाही, जिल्हाधिकाऱ्यांचा नाही. हा सर्व शासनाच्या अर्थसंकल्पाचा निधी आहे. त्या निधीवर कालपर्यंत आमदारांचा अधिकार होता. आपण आमदारांचे अधिकार काढले आणि शासनाच्या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

अर्थसंकल्पाचा निधी आपण जिल्हा नियोजन समितीला दिला. त्या ठिकाणी सचिव म्हणून जिल्हाधिकारी काम करतात. पालकमंत्री त्या समितीचे अध्यक्ष असतात. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सचिव म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ते सर्व पैसे पक्षाच्या लोकांना वाटले जातात. यामध्ये गंमत अशी आहे की, कोणत्याही कामाचे भूमिपूजन पालकमंत्र्याशिवाय होता कामा नये असे आहे. ही वस्तुस्थिती आहे. जिल्हा नियोजनमध्ये कोणत्याही कामाचे भूमिपूजन किंवा उद्‌घाटन पालकमंत्र्यांच्या हस्तेच होते. त्या फंडाला पालकमंत्र्यांचा फंड असे नाव दिले आहे. या पध्दतीने जर जिल्हा नियोजन समितीचे काम होत असेल तर हे बिल आम्ही कशासाठी मंजूर करावयाचे हे आम्हाला कळू द्यावे. या बिलाला आम्ही मंजुरी दिल्यानंतर या विधान परिषदेच्या सदस्यांचा यावर काय हक्क असणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, मागच्या तीन वर्षांमध्ये मी जिल्हाधिकाऱ्यांना जी कामे दिली त्यातील एकही काम घेतले गेले नाही. मी धनगरवाड्यांची कामे दिली, मागासवर्गीयांची कामे दिली पण त्यातील एकही काम घेतले गेले नाही. असे असताना हे बिल आम्ही का मंजूर करावयाचे ? जिल्हा नियोजन समिती कशी असावी याबाबत आम्ही या ठिकाणी बोलावयाचे आणि प्रत्यक्षात त्या ठिकाणी आम्ही जर एखाद्या गरिबाचे किंवा धनगरवाडीतील रस्त्याचे काम सुचविले आणि त्याला जर केराची टोपली मिळणार असेल तर हे बिल आम्ही मंजूर करावयाचे का या बाबत माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. हा फंड नेमका कोणाचा आहे ? हा फंड तुमच्या घरचा, काँग्रेस पक्षाचा किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नाही. महाराष्ट्राच्या जनतेच्या विकासासाठी दिलेला हा फंड आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 07:30

प्रा.सुरेश नवले...

या सभागृहात सुरेश नवले असेल किंवा नसेल. पण विधान परिषदेचा सदस्य म्हणून आम्हाला काही अधिकार आहेत की नाही याचेही स्पष्टीकरण या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी करावे अशी मी आग्रहाची विनंती करतो. हा निधी म्हणजे पालक मंत्र्यांना दिलेला अधिकार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना "मुख्यमंत्री निधी" असतो. त्याचे वितरण गरजेप्रमाणे, अनिवार्यपणे माननीय मुख्यमंत्री करतात. तशा प्रकारची धारणा माननीय पालक मंत्री करुन घेत असतील तर मला असे वाटते हे साफ चुकीचे आहे. ते लोकशाहीला मारक आहे. विधान परिषदेच्या सदस्यांचे हक्क पूर्णत: डावलणारे आहे. त्यामुळे या बाबतीत शासनाने स्पष्ट सूचना, सुस्पष्ट स्पष्टीकरण या विधेयकाच्या निमित्ताने करावे अशीही मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, महिलांना 50 टक्क्यांचा अधिकार देण्यात येतो आहे. एक व्दितीयांश अधिकार महिलांना देण्यात येत असल्याचे मी त्या निर्णयाचे मनापासून स्वागत करतो. मी या ठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी करावे अशी मी आग्रहाची विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

---------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, जिल्हा नियोजन समित्यांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याच्या संदर्भातील हे विधेयक आहे. जिल्हा नियोजन मंडळामध्ये कशा पध्दतीने निर्णय घेण्यात येतात या बाबतीत सभागृहात चर्चा झालेली आहे. मला या विधेयकाच्या अनुषंगाने तीन-चार मुद्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय,1998 च्या सुमाराला 9 वी पंचवार्षिक योजना झाली. त्यावेळी नियोजन आयोगा बरोबर महिला संघटनांची बैठक झाली होती. माननीय मोहन धारिया हे त्या आयोगाचे अध्यक्ष होते. माननीय श्री. प्रकाश जावडेकर हे त्यावेळेला राष्ट्रीय नियोजन मंडळावर सदस्य म्हणून काम करीत होते. त्या बैठकीसाठी पुणे विद्यापीठामध्ये महाराष्ट्रातील जवळपास 150 महिला संघटना उपस्थित होत्या. त्या बैठकीत सर्व महिला संघटनांनी राष्ट्रीय नियोजन मंडळाकडे मागणी केली की, ज्या डीपीडीसी आहेत, त्यामध्ये महिलांना आरक्षण ठेवण्यात यावे. त्यामागे हेतू असा होता की, महिलांना विधानसभा, लोकसभा, राज्यसभा या ठिकाणी आरक्षण मिळाले किंवा मिळाले नाही तरी सुध्दा जिल्हा स्तरावरील विकासामध्ये आणि नियोजनामध्ये स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या ग्रामपंचायतीपासून ते नगरपालिकापर्यंतच्या महिला सदस्यांना किंवा ज्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्या नाहीत अशा महिलांना त्यांचे जे विशिष्ट प्रश्न आहेत ते नियोजन आयोगाच्या माध्यमातून सुटतील असे आपण अपेक्षित धरतो. आरोग्य, शिक्षण, तसेच इतर विषय आहेत, त्या बाबतीत त्यांचे म्हणणे काय आहे, ते नियोजनात प्रतिबिंबित व्हावे ही माझी सूचना होती. असा माझा सूचना मांडण्यामागचा संदर्भ आहे. महिलांना 50 टक्के आरक्षण देता आहात ही अभिनंदनीय गोष्ट आहे. परंतु आरक्षणासंदर्भात कोणते निकष लावले जाणार आहेत, कोणत्या महिलांचा यामध्ये अंतर्भाव करणार आहात याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मघाशी प्रश्न उपस्थित केला की, ठरावीक मर्जीतल्या, सत्तेच्या चौकटीतील ठरावीक महिलांना आपण या निमित्ताने वाव देणार आहात काय की तालुकावाईज महिलांची निवड केली जाणार आहे ? शिक्षण, आरोग्य अशा क्षेत्रात काम करणाऱ्या महिला अथवा संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महिला यांना वाव देण्यात येणार आहे काय ? यामध्येजिल्हा परिषदेच्या सदस्या असणार आहेत काय,सरपंच असलेल्या महिलेला वाव देण्यात येणार आहे काय इत्यादी गोष्टीचा खुलासा होणे गरजेचे आहे.कोणत्या महिलांसाठी आरक्षण ठेवले

3...



ABG/ प्रथम श्री.शिगम 07:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जाणार आहे हे निश्चित ठरविले नाही तर राज्य महिला आयोगाची जशी वासलात लागली तशी या समितीची देखील वासलात लागेल.

महोदय, एका बाजूला महिलांसाठी 33 टक्क्याचे आरक्षण होते ते 50 टक्के आरक्षण केल्यावर प्रतिकात्मता फक्त वाढते ही माझी खरी नाराजी आहे. आरक्षण मिळाले पाहिजे, पण आरक्षण देताना गुणवत्तेचा निकष, कामाचा निकष लावला नाही तर आज जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये जी परिस्थिती निर्माण होते, तशीच परिस्थिती या समित्यांच्या बैठकीत निर्माण होईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, नियोजन मंडळामध्ये विधान परिषद सदस्यांचे म्हणणे ऐकले जात नाही, त्यांनी सुचविलेली कामे मंजूर केली जात नाहीत. अशी परिस्थिती सर्वच जिल्हयातील नियोजन मंडळांची आहे. पुणे जिल्हयाची नियोजन मंडळाची बैठक होते. त्या बैठकीसंदर्भात मला नमूद केले पाहिजे की, आमचे जे पालक मंत्री आहेत, त्यांचे "हम करे सो कायदा " अशा पध्दतीने कामकाज चाललेले असते. आम्ही पालक मंत्र्यांना कामे सांगतो ती कामे ते करतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु कामे त्यांच्या मर्जी प्रमाणे होतात हा त्यातील फरक आहे. आम्ही विधान परिषदेचे सदस्य आहोत म्हणून ते काम झाले पाहिजे असे आमचे मत आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांच्याकडे जाऊन आरडाओरड करीत असतो त्यावेळी ते बोलवतात आणि सांगतात की, डॉ.गोऱ्हे तुमचे काय काम आहे ते काम मी करतो. मी वस्तुस्थिती या ठिकाणी सांगते आहे. एखाद्या खासदाराला खुर्ची मिळाली नाही तर ते सर्वांसमोर जिल्हाधिकाऱ्यांची खरडपट्टी करतात, जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठका पार पडतात.

महोदय, काही बैठकांमध्ये असे दिसून आले आहे की, गोड बोलून बैठक पार पडत असते. नियोजन मंडळाची बैठक सुरु होण्यापूर्वी खासदार, आमदारांची जिल्हाधिकारी यांच्याबरोबर बैठक झालेली असते. त्या बैठकीत बहुतेक निर्णय झालेले असतात. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत आमच्या पक्षाचे आमदार, खासदार आणि जिल्हाधिकारी यांच्यामध्ये नेहमी वादविवाद होतो. याला काही कारणे आहे. खासदारांच्या निधीतून केलेल्या कामाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला खासदारांना बोलाविले जात नाही. हा संघर्षाचा विषय झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. विधान परिषदेचा आमदार म्हणून कामे सुचविताना आम्ही त्या मतदार संघातील असू किंवा नसू त्यांना सन्मान देण्याबरोबर अधिकार असला पाहिजे हा खरा प्रश्न आहे. सन्मानाच्या बरोबरीने अधिकार आणि

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय प्रक्रियेतील सहभाग असला पाहिजे.(अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना सांगू इच्छिते की, आपण कृपया प्रथम समजून घ्यावे

श्री.रमेश शेंडगे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी माननीय श्री.अजित पवार यांच्यावर हेत्वारोप केलेला आहे. त्यांनी उल्लेख केला की, पुणे जिल्हा नियोजनाची बैठक सुरु होण्यापूर्वी पुणे जिल्हयाचे पालक मंत्री त्यांच्या पक्षाचे खासदार,आमदार आणि जिल्हाधिकारी यांच्या बरोबर बैठक घेतात. त्या बैठकीत निर्णय घेतात..

**उप सभापती** :सन्माननीय सदस्या त्यांच्या जिल्हयाबाबत बोलत आहेत, त्यांना आपले विचार मांडू द्यावेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे हे माझ्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. मला माझा मुद्दा पूर्ण करु द्यावा. मी या ठिकाणी काहीही चुकीची माहिती सांगितलेली नाही. (अडथळा) सत्ताधारी पक्षातील तीन-चार सदस्यांना व्हायरस झालेला दिसून येतो आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या बाबतीत काहीही बोलले तरी त्याचा अर्थ न समजून घेता सन्माननीय सदस्य माझ्या भाषणात अडथळे आणत आहेत. कारण नसताना ते आरडाओरड करीत आहेत. (अडथळा ) मी माझा या ठिकाणी अनुभव सांगितलेला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या बाबतीत जो हेत्वारोप केला आहे तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्य माझे विचारच ऐकून घेणार नसतील तर त्यास काय म्हणावयाचे. (अडथळा)

श्री.दिवाकर रावते : या ठिकाणी दादांचे नाव घ्यावयाचे नाही काय ? या सभागृहात त्यांचे नाव घ्यावयाचे नसेल तर त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाका.(अडथळा)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय श्री.अजितदादा पवार हे या राज्याचे उप मुख्यमंत्री आहेत. ते सरकारमध्ये आहेत. त्यांचा संदर्भ, त्यांचे नाव सन्माननीय सदस्यांकडून घेतले जाईल. त्यांचे नाव घेतले की, काही सन्माननीय सदस्य भराभरा उठावयास लागतात हे अत्यंत गैर आहे. तुम्हाला दादांचा एवढा राग येत असेल तर त्यांना मंत्रिमंडळातून बाहेर काढा, त्यांना कवटाळून बसा. आम्हाला त्यासंबंधी काही देणे घेणे नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी माननीय श्री.रावते साहेबांचा आदर करतो. यांनी माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या बाबतीत खोटे आरोप केले आहेत. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकी अगोदर माननीय श्री.अजितदादा पवार हे जिल्हाधिकारी व काही आमदारांना घेऊन बैठक घेतात. त्या बैठकीत निधीचे वाटप केले जाते असा खोटा आरोप सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केलेला आहे. त्या नियोजन मंडळाच्या सदस्या आहेत. त्यांच्या समोर बैठक होते. नियोजन मंडळाची बैठक सुरु होण्यापूर्वी जिल्हाधिकारी व आमदार यांच्या बरोबर बैठक घेऊन निधीचे वाटप केले जाते असा खोटा आरोप माननीय श्री.अजितदादा पवार यांच्यावर करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्या डॉ.गोरे हया नियोजन मंडळाच्या सदस्या आहेत, त्यांच्या समोर नियोजन मंडळाची बैठक होते, त्यावेळी या बाबतीत ते आवाज का उठवित नाहीत. माननीय श्री.अजितदादा पवार सभागृहात नसताना त्यांच्यावर खोटे आरोप केले गेले ते आम्ही कसे काय सहन करणार ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**उप सभापती** : एखाद्या महत्वाच्या बैठकीपूर्वी ज्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार असते, त्याचे ब्रिफिंग होत असते. त्या स्वरुपाची बैठक घेतली असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. त्यांनी हेत्वारोप केलेला नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्पष्टपणे म्हटले की, अगोदर बैठक होते, त्या ठिकाणी निधीचे वाटप निश्चित केले जाते. तुम्ही रेकॉर्ड तपासून घ्यावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मराठी भाषा ज्यांना कळते त्यांना मी आव्हान देते. मी माझा एक अनुभव सांगितला आहे. हेत्वारोप केलेला नाही. डीपीडीसीच्या बैठकीत काय होते हे आम्हाला चांगले माहिती आहे. माझे या सभागृहातील हे दहावे वर्ष आहे. आणखी काय बोलले तर पुन्हा बडबडत बसाल वाघ मागे लागल्यासारखे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**उप सभापती** : असंसदीय शब्द रेकॉर्डवरुन काढण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपली आभारी आहे. या महिलांना ज्या पध्दतीने प्रशिक्षण दिले जाणार आहे त्याबद्दलचा प्रश्न आहे. डीपीडीसीची बैठक म्हणजे आमदारांना काही बोलायचे असेल तर दहा वेळा विचार करुन बोलावे लागते. काही वेळेला भांडणे होतात, मतभेद होतात. त्यासाठी वेगळी बैठक घ्यावी लागते. महिलांना डीपीडीसीमध्ये घेणार आहात. तुम्हाला सर्वांना कल्पना आहे, बैठकीमध्ये जिल्हयाच्या बजेटची मोठमोठी पुस्तके दिली जातात. त्यातील बजेट समजून घ्यावे लागते. त्यामध्ये अखर्चित म्हणून निरंक रक्कम दाखविलेली असते. त्याचा अर्थ बजेटची रक्कम खर्च झालेली नाही. म्हणजे प्रश्न विचारावे लागतात. बैठकीचे मिनिट्स पाठविले जातात. त्या आधारे आपण प्रश्न विचारतो. ही डीपीडीसीच्या बैठकीची प्रोसेस आहे. त्यासाठी महिलांना प्रशिक्षण दिले पाहिजे. माझे गेल्या दहा वर्षात पुणे जिल्हयाच्या डीपीडीसीमध्ये चांगल्याप्रकारे प्रशिक्षण झालेले आहे. ते मी आपल्यासमोर मांडते. 50 टक्के महिलांसाठी आरक्षण देत असताना पालकमंत्री असो, जिल्हयातील सर्व आमदार असो, 50 टक्के महिलांसाठी प्रशिक्षण देण्याची गरज आहे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) विधेयकावर बोलत असताना माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मूलभूत प्रश्न मांडले आहेत. हे खरे आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून डीपीसीमध्ये 50 टक्के महिलांना आरक्षण मिळणार आहे. त्याचे स्वागत करावे लागणार आहे आणि आम्ही सभागृहात या विधेयकाचे स्वागत करीत आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जो प्रिटिंग मिस्टेकचा मुद्दा मांडला तो लक्षात घेऊन योग्य ती सुधारणा करावी लागेल. कलम 3(1) नुसार आपण चर्चा केली. माझी शासनाला विनंती आहे की, उद्देश व कारणांचा विचार केला तर मंत्री महोदयांनी या सदनाला स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे. उद्देश व कारणांमध्ये म्हटले आहे की, "Article 243-ZD of the Constitution of India provides for the constitution of the District Planning Committees..." It is not DPDC, it is DPC. "....by the State Government, at the district level in every State to consolidate the plans prepared by the Panchayats and the Municipalities in the district and to prepare a draft development plan for the district as a whole..."सभापती महोदय, मूळ ऑब्जेक्ट डीपीसी बनविण्यामागचा घटनेतील कलम 243 झेड डी खाली आहे. मग कलम 3(1) काय सांगतो? "Power to remove the difficulty." By whom? "...effect to the said Act in respect of the matters contained in this Act, the State Government may, as occasion arises, by an order published in the Official Gazette, do anything not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing such difficulty:" सभापती महोदय, ज्यावेळेला अडचण समोर येईल अशा वेळेला राज्य सरकार सर्व काही करेल. At that time the State Government will do anything not inconsistent with the Act. असे राज्य सरकार अभिप्रेत करीत आहे. डीपीसीतील रोल काय आहे? हा रोल काय आहे यासाठी भारताच्या राज्य घटनेतील 74 व्या दुरुस्तीने काय दिले हे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार............

समजून घेणे आवश्यक आहे. "Role of the District Planning Committee." "District planning Committees should be formed to provide overall leadership to the district planning process." सभापती महोदय, 74 व्या घटना दुरुस्तीनंतर आर्टिकल 243 झेड डी लागू झ ाल्यानंतर डीपीसीला सर्वात पहिले अपेक्षित काय आहे? "Provide overall leadership to the district planning process..."

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मराठी भाषेतून बोलण्याचा आग्रह करतात)

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या सभागृहाच्या नियमानुसार इंग्रजी आणि हिंदी भाषेतूनही माननीय सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. माझ्याकडे इंग्रजी भाषेतील प्रत असल्यामुळे मी इंग्रजी भाषेतील काही तरतुदी वाचून दाखवित आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, नियमानुसार सन्माननीय सदस्यांना 12 भाषांपैकी कोणत्याही भाषेमधून बोलण्याचा अधिकार आहे. परंतु या राज्याची राज्यभाषा मराठी असल्यामुळे मराठी भाषेतून विचार मांडावेत अशी विनंती आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, कायद्यामध्ये इंग्रजी भाषेत काय म्हटले आहे ते मी वाचून दाखविले. मराठी भाषेतील त्याचा अर्थ सांगण्यापूर्वी हरकत घेण्यात आली तर अडचण होईल. डीपीसीने असे अपेक्षित केले आहे की, जिल्हास्तरीय नियोजनाच्या प्रोसेसमध्ये महिलांना नेतृत्व मिळावे. घटनेनुसार कायद्याला अपेक्षित आहे की, जिल्हा नियोजन समितीमध्ये महिलांना नेतृत्व मिळावे. राज्य सरकारने कलम 3(1) मध्ये म्हटले आहे की, अशी कोणतीही अडचण निर्माण झाली की, राज्य सरकार सर्व काही करेल. हे 74 व्या घटना दुरुस्तीला अभिप्रेत नाही. आर्टिकल 243 झेड डी नुसार असे अपेक्षित आहे की, डीपीसीच्या माध्यमातून जिल्हास्तरीय नेतृत्व विकसित व्हावे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार .....

जिल्हास्तरीय व्हीजन, जिल्हास्तरावर निर्माण करावे अशी घटनेमध्ये, डीपीसी मध्ये कल्पना आहे. सरकारने अधिकार आपल्याकडे घेतल्यावर जिल्हास्तरीय व्हीजन डॉक्यूमेंट कसे तयार होईल हा खरा प्रश्न आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केला आहे की, जिल्हास्तरीय ज्या लोकल बॉडीज आहेत त्या सर्वांनी एकत्र येऊन एक व्हीजन विकसीत करावे व त्यामध्ये ज्या नागरी संस्था आहेत त्यांचा सुध्दा सहभाग घ्यावा. वेगवेगळया ॲकॅडमीक शैक्षणिक संस्था आहेत त्यांना सुध्दा पार्टीसिपेट करावे, भागधारकांचा सुध्दा सहभाग घ्यावा अशी डीपीसीची कल्पना आहे. कलम 3(1) मध्ये अडचण आली तर ती अडचण आम्हीच सोडवू असे जेव्हा शासन म्हणते त्यावेळेला सहमती खालच्या स्तरावर जाऊच शकत नाही. त्यामुळे कलम 3(1) हे राज्यघटनेशी विसंगत आहे. या मध्ये पुढे असे म्हटले आहे की, पोटेंशल लिंक क्रेडीट प्लॅन बद्दल नाबार्ड बरोबर चर्चा करुन ठरवावा. इतके अधिकार डीपीसीला प्लॅनिंगसाठी देण्यात आलेले आहे. त्यामुळे हे अधिकार राज्य सरकार काढू कसे शकेल ? हे अधिकार काढले तर कायद्याला जे अभिप्रेत आहे ते होणार आहे काय ? याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने देण्याची आवश्यकता आहे. या सर्व अधिकारांबद्दल नॅशनल प्लॅनिंग कमिशनने एक मॅन्युअल प्रसिध्द केलेले आहे त्याला विसंगत तरतुद 3(1) मध्ये आहे हे मला नम्रपूर्वक सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, अशीच एक प्लॅनिंग कमिटी मुंबईसाठी झाली होती. एमएमआरडीएच्या रिजनमधील मुंबई प्लॅनिंग कमिटीच्या निवडणुका झाल्या व या निवडणुकीमध्ये मी स्वत: निवडून आलो आहे. मुंबईच्या प्लॅनिंग कमिटीची अडीच वर्षात एकही बैठक झाली नाही. त्यामुळे व्हीजन म्हणण्याचे सोडून द्या, नियोजन म्हणण्याचे सोडून द्या, प्लॅन बनविण्याचे सोडून द्या, नाबार्डशी चर्चा करण्याचे सोडून द्या, लोकल गर्व्हनंन्समध्ये अधिकार देण्याचे सोडून द्या. गेल्या अडीच वर्षात एमएमआरडीएच्या अंतर्गत एनपीसी झाली त्याची एकही बैठक झालेली नाही व त्याचे उदाहरण आमच्या समोर आहे. आज आपण 50 टक्के रिझर्व्हेशनची मागणी करीत आहात परंतु यासंदर्भातील बैठका किती होणार, त्या किती काळात झाल्या पाहिजेत, त्या बैठका झाल्या नाहीत तर काय होणार, याबद्दलचा कोणताही उल्लेख या विधेयकात करण्यात आलेला नाही. केवळ संविधानाला अभिप्रेत असणारी बाब 3(1) मध्ये नाही, 74 व्या घटना दुरुस्तीला अभिप्रेत असलेली बाब यामध्ये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार .....

नाही, नॅशनल प्लॅनिंग कमिशनच्या मॅन्युअलला अभिप्रेत गोष्ट यामध्ये नाही. त्यामुळे यासंदर्भातील स्पष्टीकरण जोपर्यंत सरकारच्या बाजूने येत नाही तोपर्यंत आपण अगोदर दिलेले अधिकार खालून पुन्हा वर आणत आहोत अशी उलटी गंगा घेण्याचे काम आपल्या हातून घडू नये अशी माझी अपेक्षा आहे व त्यावर शासनाने स्पष्टीकरण द्यावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या बिलाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी भाग घेतला आहे.

सभापती महोदय, जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महानगरपालिकांमधून निवडून आलेल्या सदस्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. निवडून आलेले सदस्य हे डीपीडीसीचे सदस्य असतात. डीपीडीसीचे सदस्य जेव्हा डीपीडीसी मधून निवडून येतात त्यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण राहील यासंदर्भात तरतूद करण्यासाठी हे विधेयक येथे आणलेले आहे. यापूर्वी डीपीडीसीमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांसाठी आता 50 अक्के आरक्षण केलेले आहे. 50 टक्के महिलांचे आरक्षण डीपीडीसीमध्येही रहावे असे अभिप्रेत ठेवून या बिलामध्ये बदल करण्यात आलेला आहे. या बिलाच्या संदर्भात काही चांगल्या सूचना आलेल्या आहेत तशाच काही शंकाही व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी सांगितले आहे की, राज्यशासनाने पोट कलम 3 मध्ये काही अधिकार ठेवलेले आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या एकूण सदस्यांपैकी अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्ग प्रवर्ग यासर्व कॅटेगरीजमध्ये 50 टक्के आरक्षण ठेवतांना महिलांचे एकूण आरक्षण 50 टक्क्यापेक्षाही पुढे जाऊ शकते. असे झाल्यास महिलांच्या आरक्षणाच्या संदर्भातील निर्णय घेत असतांना आवश्यक ठरले तर ती अडचण दूर करण्यास राज्य शासनास अडचण येऊ नये यासाठी ही प्रोव्हीजन बिलामध्ये करण्यात आलेली आहे. अडचण आल्यानंतर निर्णय घेता आला नाही तर या एवढया बाबीसाठीच राज्य शासनाकडे ही बाब येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले आहे की, जिल्हा नियोजन मंडळांमध्ये विधानपरिषदेचे सदस्य असतात. विधानपरिषदेचे सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आलेले असतात. अनेकदा ते राज्यपाल नियुक्त असतात तसेच विधानसभेच्या सदस्यांकडून निवडून आलेले असतात व ते या डीपीडीसीचे सदस्य असतात. डीपीडीसीमध्ये आपण निधीच्या नियोजनाचे काम करीत असतो. जिल्हयातील कामांचे नियोजन करीत असतांना या सदस्यांनाही सहभागी करावे अशी विनंती आहे. डीपीडीसीच्या बैठकीत पुढच्या वर्षीचा आराखडा तयार केला जात असतो. हा आराखडा तयार करीत असतांना सभागृहाला पूर्ण विश्वासात घेऊनच तो तयार केला जातो. आराखडा तयार

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .........

झाल्यानंतर निधीचे जे वाटप करावयाचे असते त्यामध्ये सदस्यांना विश्वासात घेतले जात नाही अशी बाब सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. खास करुन रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील बाबीचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जी खंत व्यक्त केलेली आहे त्याबाबत जिल्हा नियोजन अधिकाऱ्याला तशा प्रकारची सूचना दिली जाईल, जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देऊ एवढेच नाही पालक मंत्र्यांना सुध्दा सूचना देऊ की, डीपीडीसीचा फंड वाटपाच्या बाबत लोकसंख्या आणि भौगोलिक परिस्थितीच्या संदर्भात आपण जे धोरण ठरवलेले आहे ते लक्षात घेऊन काम करावे.

निधीचे वाटप करीत असतांना रस्त्याचा 3054 चा निधी असेल, 5054 चा निधी असेल तसेच डीपीडीसीचे इतर जे काही हेड आहेत त्यामध्ये आपण जे वाटप करतो ते करीत असतांना विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनाही विश्वासात घेणे आवश्यक आहे. एका जिल्हयातील विधानपरिषद सदस्य हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य असतोच. तो जर स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य असेल तर तो जेथून निवडून येतो तेथील नगरपालिकेचे सदस्य हे त्याचे मतदार असतात, जिल्हा परिषद सदस्य त्याचे मतदार असतात, पंचायत समितीचे सदस्य त्याचे मतदार असतात. जिल्हयातील 5-6 विधानसभा मतदारसंघ असतात त्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्य हे त्याचे मतदार असतात. या ठिकाणी विधान परिषदेचा सदस्य जातो तेव्हा त्याच्याकडे निरनिराळया मागण्या होत असतात.

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

विधान परिषद सदस्याने त्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातच स्थानिक विकास निधी वापरायचा असतो. पण त्याच्या बाहेर जाऊनही अनेक कामे प्रस्तावित केली जातात. स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आलेला विधान परिषद सदस्य, नामनियुक्त सदस्य, विधानसभेने निर्वाचित केलेला सदस्य असेल त्यांनी 50/ 54 व इतर हेड मधून सांगितलेली कामे ही सर्वसामान्य जनतेशी निगडित असतील तर जिल्ह्याचा जो काही वार्षिक नियतव्यय ठरला असेल त्यानुसार करून विधान परिषद सदस्यांचा देखील सन्मान करावा अशा प्रकारच्या सूचना निश्चितपणे देण्यात येतील

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, जिल्हा नियोजन समितीमध्ये मी देखील पालकमंत्री म्हणून काम केलेले आहे. जे नियोजन असते ते शासनाकडे पाठवून मंजूर करून घेण्यात येते व त्या जिल्ह्याचा विकास करण्यात येतो. बजेटची कामे घेण्याचा अधिकार आमदारांना होता. त्यासंबंधी माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले की, यापुढे या कामाचा सगळा पैसा आपणाकडे न देता जिल्ह्यामध्ये देणार आहोत. त्यामुळे हा निधी वितरित करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्याला असेल. जिल्हाधिकाऱ्याकडे जमा होणारा निधी हा आमच्या हक्काचा आहे. त्या निधीवर पालकमंत्री पुन्हा साप होऊन बसले आहेत. त्या निधीला आता पालकमंत्री निधी असे नाव पडलेले आहे. जेथे राष्ट्रवादीचा पालकमंत्री असेल तेथे तो निधी राष्ट्रवादीला वाटतो. जेथे काँग्रेसचा आमदार असतो तेथे तो निधी काँग्रेसला वाटतो. आता जे प्लॅनिंग केले जाते ते या निधीसह केले जाते. हा महत्वाचा मुद्दा आहे. आपण आमच्या हक्कावर गदा आणत आहात. बजेटमध्ये आम्ही कामे दिली तर ती घेतली जात नाहीत. आता सगळा पैसा जिल्हाधिकाऱ्याकडे वर्ग केला आहे. जिल्हा परिषदेकडे प्लानिंगचा पैसा हा पहिल्या पासून होताच. आमचा पैसा तेथे गेला आहे. त्यावर आमदारांचा हक्क कसा असेल, याबाबत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, जिल्हास्तरीय योजना डीपीसीच्या माध्यमातून राबविल्या जातात. राज्यस्तरीय योजना आपण आपल्या बजेटमधून प्लॅन, नॉन प्लॅन मधून घेतो. सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून जी काही कामे प्रस्तावित करतात ती कामे यामध्ये येतात. जिल्हा नियोजन समितीला राज्यस्तरीय योजना राबवायची असेल तर ती जिल्हास्तरीय योजनेच्या माध्यमातून राबवितो. स्टेट बजेटमधून काही योजना जिल्हा स्तरावर शिफ्ट केलेल्या आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

सुरूवातीला आपण राज्य शासनाच्या बजेटमधून आमदारांना निधी देत होतो. तो हक्क थोडासा कमी झाला हे मान्य आहे. ही योजना यशस्वीरितीने राबविली पाहिजे. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी मॉनेटरींग केले तर कामे फास्ट होऊ शकतील. हे ध्येय ठेवूनच या योजना आपण जिल्हा नियोजन मंडळाकडे दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा त्यांच्या डीपीसी संबंधात काही आक्षेप असेल तो त्यांनी मला सांगावा. तो मी तेथील जिल्हाधिकारी व माननीय पालकमंत्र्यांना देखील सांगतो. आपल्या कामांची यादी असेल तर ती जरूर सांगावी. मग ते काम 50/54 रस्त्याचे किंवा, नगरउत्थानाचे काम असू द्या. त्यासंबंधी आम्ही निश्चितपणे त्यांना मदत करू.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासन सन्मान म्हणून माननीय सदस्यांची कामे करणार की, त्यांना अधिकार दिला आहे म्हणून करणार यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्मान म्हणून नाही तर अधिकार म्हणून विधान परिषद सदस्यांची कामे करणार आहोत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांचा अधिकार त्यांनी मान्य केलेला आहे म्हणून त्या रेफरन्समध्ये त्यांनी सन्मान हा शब्द वापरला आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी डीपीडीसीच्या निधी वाटपासंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. निधीचे नियोजन ही जिल्ह्याची एकूण लोकसंख्या व क्षेत्रफळ तसेच मानव निर्देशांक पाहून करतो. त्यांनी एक चांगली सूचना केली आहे. आता डीपीडीसीमध्ये 50 टक्के आरक्षण महिलांसाठी येणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका अथवा नगरपरिषदा यातील सदस्यांचा समावेश त्यात होणार आहे. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण द्यावे अशी सूचना केली आहे. त्यानुसार महिलांना प्रशिक्षण देण्यासंबंधीच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 39 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 39 संमत झाले आहे.

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य सुरक्षा महामंडळ (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXXIV OF 2012**

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION ACT, 2010.)

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 34 - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, 2010 यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 34 - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, 2010 यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

ॲड.आशिष शेलार (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, प्रस्तावित विधेयकातील खंड 5 मधील तरतूद ही महासंचालक व महानिरीक्षक यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून केलेल्या नियुक्तीचे आणि त्याने केलेल्या कार्यवाहीचे विधिग्राह्यीकरण या संबंधात आहे. आपण यात महा संचालक असा शब्द समाविष्ट केला आहे. तेथे आपण आता त्या दर्जाच्या अधिकाऱ्याला बसविले आहे.

मी अगदी थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. खंड 5 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (सुधारणा) अधिनियम, 2012 याच्या प्रारंभापर्यंतच्या कालावधीमध्ये अशा व्यवस्थापकीय संचालकाने वापरलेला कोणताही अधिकार" अशा प्रकारची तरतूद आहे. याचा अर्थ असा होतो की, त्यांची नियुक्ती केली होती तेव्हा तो बदल केला नव्हता. तो बदल आता आपण केलेला आहे. पुढे असेही नमूद केले आहे की, "पार पाडलेले कार्य हे जणू काही उक्त अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी नुसार समजावे." म्हणजे त्यातून रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट फॉर एक्झिक्युटीव्ह वर्क अभिप्रेत आहे. यात पूर्वलक्षी कार्यपद्धतीचा प्रभाव असणार आहे. माझ्या हातात सर्वोच्च न्यायालयाचे जजमेंट आहे. ते मी आपणास वाचून दाखवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ 08:00

ॲड्.आशिष शेलार....

" Constitution and the rules can be given retrospective operation but the State Government while amending the rules should have taken into consideration the practical problems which would arise as a consequence of retrospective effectivity."

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

म्हणजे रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टचा प्रॅक्टीकल प्रॉब्लेमवर इम्पॅक्ट काय होईल हे राज्य सरकारने सदनासमोर सांगणे आवश्यक आहे. असा रिट्रॉस्पेक्टीव्ह एक्झिक्युटीव्ह कोणत्या पॉवरच्या वेळी अभिप्रेत आहे हे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण असे कोणतेही कार्य आणि असे कोणतेही कर्तव्य याला रिट्रॉस्पेक्टीव्ह मान्यता घेत आहात त्यावेळेला त्याचे प्रॅक्टीकल प्रॉब्लेम्स काही आहेत काय, असल्यास ते कोणते आहेत, झालेली कार्ये कोणती आहेत याची माहिती सरकारने देणे आवश्यक आहे एवढाच माझा मुद्दा आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, शब्दश: तसा अर्थ असला तरी तसे या ठिकाणी अभिप्रेत नाही. परंतु आपण निश्चितपणे पद निर्माण करीत आहोत. फक्त या पदाची पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्ती यामध्ये प्रस्तावित आहे त्याची डयुटीज किंवा अधिकाराचा विषय यामध्ये येत नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, व्यवस्थापकीय संचालकांनी वापरलेला कोणताही अधिकार किंवा पार पाडलेली कार्ये असे यामध्ये म्हटले आहे. मी माझ्या मनाचे सांगत नाही. त्यांनी पूर्वलक्षी प्रभावाने जी काही कार्ये केली असतील ती विधिग्राह्य मानण्याचा हा विषय आहे. त्यांनी काय केले त्याचा प्रॅक्टीकल इम्पॅक्ट काय आहे, केले नसेल तर तसे सांगावे, आम्हाला तसे स्पष्ट करावे. माननीय मंत्री महोदय कार्य अभिप्रेत नाही असे म्हणाले. आपण ते रेकॉर्ड तपासावे. या विधेयकात म्हटले आहे की, कोणती कार्ये व अधिकार दोन्ही वापरले असतील तर ते सुध्दा विधिग्राहय मानले जातील. तसे त्यांनी केले आहे काय, त्याची प्रॅक्टीकल अडचण सांगावी.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, अपॉईटमेंट हीच..

**उप सभापती** : पद हीच प्रोव्हीजन आहे हे मी त्यांना सांगत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक आणि हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 34 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 34 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप **सभापती**.....

सभा□ृहाची बैठ□ आता स्थगि□त होत आहे. सभागृहाची विशेष बैठक उद्या गुरुवार, दिनांक 20 डिसेंबर 2012 रोजी सकाळी 10.00 वाजता सुरु होईल.

या बैठकीत सकाळी 10.00 ते 10.45 या वेळेत "पटपडताळणी व शिक्षक भरतीवरील बंदी" या विषयावरील अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

त्यानंतर सकाळी 10.45 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत "स्त्रीभ्रूण हत्या व महिलांवरील अत्याचार" या विषयावरील अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

दुपारी 12.00 ते 1.00 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ रात्री 8 वाजू□ 15 मि□िटां□, गुरुवार, दि□ां□ 20 डिसेंबर, 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगि□त झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही